१९१४

म. ग्रं. सं. ठाणें

विषय

सं. क्र.

REFBK-0000993

१६७

ग्रंथ संग्रह

ग्रं. पु. नं. १९

ता. ........

फ्रेंच बादशाहा

पहिला

# नेपोलियन.

९९३

लेखक,

केशव नागेश बापट.

[illegible] ठाकुरद्वार, [illegible]

किंमत १२ आणे.

# अनुक्रमणिका.


| | | पृष्ठ. |
|---|---|---|
| प्रकरण १ लें. | जन्म, शिक्षण, लष्करांत नोकरी, विवाह, पहिलें युद्ध ... ... ... ... ... ... | १ |
| प्रकरण २ रें. | इटाली व आस्ट्रियावरील स्वारी ... ... ... | ७ |
| प्रकरण ३ रें. | ईजिप्ट व सीरियावरील स्वारी; फ्रेंच रिपब्लिकचें अध्यक्षत्व ... ... ... ... ... | १२ |
| प्रकरण ४ थ. | आस्ट्रियावर स्वारी ... ... ... ... | १७ |
| प्रकरण ५ वें. | इंग्लंडवरील स्वारीची तयारी; राजपद ... ... | २१ |
| प्रकरण ६ वें. | आस्ट्रियन व रशियन यांशीं युद्धें ... ... | ३३ |
| प्रकरण ७ वें. | प्रशिया व रशिया या देशांवरील स्वारी ... | ३८ |
| प्रकरण ८ वें. | स्पेनवरील स्वारी ... ... ... ... ... | ४४ |
| प्रकरण ९ वें. | आस्ट्रियावरील चौथी स्वारी ... ... ... | ४९ |
| प्रकरण १० वें. | जोसेफाइन राणीचा त्याग; द्वितीय संबंध; पुत्रजन्म ... ... ... ... ... ... | ५४ |
| प्रकरण ११ वें. | रशियावरील दुसरी स्वारी ... ... ... | ६२ |
| प्रकरण १२ वें. | सर्व युरोपबरोबर युद्ध ... ... ... ... | ७० |
| प्रकरण १३ वें. | सर्व युरोपची फ्रान्सवर स्वारी ... ... ... | ७१ |
| प्रकरण १४ वें. | एल्बा बेटावरील वास्तव्य ... ... ... | ८३ |
| प्रकरण १५ वें. | वाटर्लू येथील पराभव; देशत्याग ... ... | ९१ |
| प्रकरण १६ वें. | सेंट हेलेनाबेटावरील बंदिवास; मृत्यु. ... ... | ११८ |
| प्रकरण १७ वें. | युद्धेतर कृत्यें; कांहीं विषयांवरील मतें; कर्तृत्वशक्ति ... ... ... ... ... ... | १२५ |

# प्रस्तावना.

प्रस्तुत पुस्तकांत नेपोलियनला अनुकूळ व प्रतिकूळ असलेल्या ग्रंथकारांच्या ग्रंथांतून अवतरणें दिलेलीं आढळतात; तरी लेखकानें स्वतः निव्वळ वृत्तांतच दिलेला दिसून येतो. तेवढ्यावरून नेपोलियनचें कर्तृत्वसामर्थ्य चांगलें नजरेस येईल. नेपोलियनच्या कृत्यांच्या योग्यायोग्यतेसंबंधीं व त्याच्या स्वभावाच्या बरेवाईटपणाविषयीं टीका करण्याचा आपला हेतुच नाहीं असें लेखकानें पृष्ठें २५, ५९ व १५० मध्यें सांगितलें आहे. परंतु कोणच्याही चरित्रांत शीलचर्चा हेंच प्रधान अंग असल्यामुळें नेपोलियनच्या स्वभावासंबंधीं येथें दोन शब्द लिहिण्याचें योजिलें आहे.

नेपोलियन बोनापार्ट या अद्वितीय पुरुषासंबंधानें जितकीं विरुद्ध मतें पडलीं आहेत तितकीं दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीसंबंधानें पडलीं नसतील असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. कित्येकांना तो अगदीं चांडाळासारखा दिसतो, तर कांहीं लोक त्याची उत्तम पुरुषांमध्यें गणना करितात. परंतु त्याचा स्वभाव व वर्तन हीं चांगलीं अगर वाईट अशा एकाच विशेषणानें वर्णन करण्यासारखीं नाहींत हें त्याचें चरित्र वाचल्यावर सहज लक्षांत येतें. नेपोलियन हें एक कूट आहे व तें सोडविण्याचा अनेक लोकांनीं प्रयत्न केला आहे; पण तें आजतागाईत कोणींही निखालस सोडविलें नाहीं. तत्संबंधीं ग्रंथसंग्रह अतिप्रचंड झाला आहे. एकाच मनुष्यानें आपण हे सगळे ग्रंथ वाचूं व मग निदान ठरवूं असें म्हटलें तर तें साध्य होण्याजोगें नाहीं. लॉर्ड रोजबरी म्हणतात त्याप्रमाणें या कामाला पुष्कळ वांटेकरी पाहिजेत. रणसंग्रामाची ज्यांना उत्तम माहिती आहे व ज्यांनीं युद्धशास्त्राचा सांगोपांग अभ्यास व

विचार केला आहे त्यांनाच फक्त त्याचे रणविशारदत्वाविषयीं मत देण्याचा अधिकार पोंचेल. पण तो केवळ योद्धाच नव्हता. फ्रान्सचा यच्चयावत् कारभार तो पहात असे. फ्रान्सकरितां त्यानें पूर्वी झालेल्या एकंदर कायद्यांची चाळणी केली, व नवीन कायदे बनविले. व तो मुत्सद्दीही होता. एकाच व्यक्तीमध्यें इतकें विविध नैपुण्य क्वचितच आढळतें. त्याच्या बरोबरीचा जर कोणी पुरुष झाला असेल तर तो जूलियस सीझरच. अशा विविधगुणसंपन्न पुरुषासंबंधानें तो चांगला किंवा वाईट असें करारी मत ठोंकून देणें बरेंच धाडसाचें आहे.

नेपोलियनसंबंधीं परस्परविरुद्ध मतें किती आहेत हें पुढें दिलेल्या मासल्यावरून कळून येईल. लामार्टीन ( फ्रान्सचे एक कवि व गद्य-ग्रंथकार ) म्हणतात:— नेपोलियनची बुद्धि विलक्षण होती हें कोणीही कबूल करील; पण अशा बुद्धीचा उपयोग नेपोलियननें स्वत:ची शेखी मिरविण्याकरितांच केला. त्या बुद्धीचा जगाची स्थिति सुधारण्याकडे बिलकुल उपयोग झाला नाहीं. अशी देणगी ईश्वरभक्तीकडे, जनतेच्या कल्याणाकडे, निदान फ्रान्सच्या कल्याणाकडे किंवा स्वत:च्या आध्यात्मिक उन्नतीकडे लावावयास पाहिजे होती. लाविली नाहीं हा नेपोलियनचा मोठा अपराध. बुद्धि जितकी अचाट तितकीच हितकारिणी असती तर जगाचें पाऊल किती तरी पुढें पडलें असतें ! अर्वाचीन पुरुषांमध्यें बुद्धिमत्तेनें त्याचें ठिकाण पहिलें मानिलें पाहिजे; पण ती बुद्धिमत्ता जगाच्या दृष्टीनें केवळ निष्फळ झाली. सतत चौदा वर्षे फ्रान्सची व युरोपची त्यानें धुळधाण केली. एखादा तरी उदात्त विचार जगाचें पाऊल पुढें पाडण्याकरितां त्यानें प्रकट करावयास पाहिजे होता, एखाद्या तरी कृत्यानें जगाची संसारयात्रा सुखकर करावयाची होती ! तथापि फ्रान्सला त्याचा विसर पडतां कामा नये. फ्रान्सच्या नांवानें कांहीं काळ सर्व जग दुमदुमत होतें तें त्याचेच प्रभावामुळें. ही स्वदेशाची

सेवाच समजली पाहिजे, अशा एका वीरपुरुषामुळें देशाला एका प्रकारचें अमरत्व येतें.

एडमंड शेरेर ( फ्रान्सचेच एक धर्मग्रंथ व वाङ्मय यांचे विवरणकार ) म्हणतातः—“ नेपोलियनचा एकंदर आयुष्यक्रम जगाच्या कल्याणाच्या दृष्टीनें वंध्य झाला, इतकेंच नव्हे, तर त्या जीवितापासून जगावर अनर्थ कोसळले. त्याचें ध्येय काय होतें, त्यानें जन्माला येऊन चांगलें किंवा चिरस्थायी केलें काय हें कोणालाही सांगतां येणार नाहीं. त्याच्या वर्तनांत उदात्त हेतु मुळींच नव्हता. जशी वेळ येईल तसें वागावें हा त्याचा क्रम. फ्रान्सला एका काळीं त्यानें उच्च दशेला नेलें हें खरें; पण त्याच्याच कृत्यांनीं फ्रान्स देशाचा जास्त अधःपात झाला. इतिहासांत अजरामर व्हावयाला एखादा उच्च आशय किंवा एखादें महत्कृत्य असें कांहीं सुद्धां दाखवितां येणार नाहीं. लढाया मारणें व देश जिंकणें हा काय तो त्याचा उद्देश. अशा क्रूर कृत्यांनीं जग त्याला काय म्हणून दुवा देईल ? त्याला मुत्सद्दी म्हणावें तर त्याच्या वर्तनांत उच्च ध्येय कांहीं नव्हतें. जगाची सुधारणा नीतीच्या पायावर होते; पण नीतीचें आणि त्याचें अगदीं वांकडें ! जनता म्हणजे केवळ कस्पट ! आध्यात्मिक उन्नति, विचारस्वातंत्र्य, लोकांचे हक्क, लोकसत्ता हे केवळ शब्द. ह्यामुळेंच त्यानें लोकांच्या हक्कांची पायमल्ली केली. त्याची राज्य हांकण्याची पद्धत म्हणजे लोकांना बुदबळांतल्या प्याद्याप्रमाणें वागविणें. लोकांचें काम फक्त हुकूम पाळावयाचें. लोक यंत्रें नव्हत, त्यांच्यामध्येंही मानसिक शक्ति आहे व तिचा त्यांनींही उपयोग केला पाहिजे व त्यांनीं परावलंबी असतां कामा नये असे विचार त्याला कधीं शिवले नाहींत. धर्मसंस्थापना, विद्याप्रसार, सगळीं आपली सत्ता बळकट करण्याकरितां. कायदे केले पण लोकसंस्था बुडविल्या ! देश भरभराटीला आणिला, पण लोकांस केवळ गुलाम बनविलें. तो सद्गुणी होता का, तर नाहीं; दुर्गुणी होता का, या प्रश्नाला तेंच

उत्तर. थोडक्यांत म्हणावयाचें म्हणजे त्याच्या कोशात नीति-अनीति हे शब्दच नव्हते. आणि ह्यामुळेंच त्याचें वर्तन मोठेंही होतें, नीचही होतें; त्यांत अचाटपणाही होता व क्षुद्रपणाही होता. " इंग्रजांनीं त्याजविषयीं वापरलेली भाषा ह्याहून फारशी कडक नसेल.

सर विल्यम नेपियर ( आंग्ल इतिहासकार ) ह्यांचें मत ह्या मताहून बरेंच भिन्न आहे. ते म्हणतात:--"नेपोलियनच्या अमदानींत इंग्लंडच्या खर्चाच्या अर्ध्याहून कमी फ्रान्सचा खर्च होता. राष्ट्राकरितां कर्ज काढावयाचें नाहीं असा त्यानें आपला निश्चय सतत कायम ठेविला. त्यामुळें पैसे खाणाऱ्या लोकांचें पैसे खाण्याचें एक द्वार अजीबात बंद पडलें. घरीं स्वस्थ बसून सरकारी वेतनावर उपजीविका करावयाची हा जो पूर्वीच्या सरदारांचा बाणा त्याला आतां वाव उरला नाहीं. पगार भरपूर व कामही त्याप्रमाणें भरपूर असा त्यानें कायदा घालून दिला. हिशोबाच्या चोख पद्धतीनें लबाडीला जागा राहिली नाहीं. सगळे सारखे अशी त्यानें जिकडे तिकडे श्रद्धा उत्पन्न केल्यामुळें लोक त्याचेवर फार खुष होते, व तो मेल्यानंतरही ते त्याला कृतज्ञतेनें स्मरत. लोकांच्या कल्याणासाठीं त्याचा सतत उद्योग, त्यानें मोठमोठे रस्ते, कालवे, पूल वगैरे सार्वजनिक उपयोगाचीं केलेलीं कामें, व गरिबांना काम पुरविण्याच्या त्यानें केलेल्या सोई ह्या लक्ष्यांत घेतल्यानें तो इतका लोकप्रिय कां झाला हें सहज समजतें. फ्रान्सचें विश्वविद्यालय, कायद्यांची संघटना व अपूर्व राष्ट्रवैभव यामुळें ते तर खुष होतेच; पण त्यांचें त्याच्यावर जें विशेष प्रेम होतें त्याचें मुख्य कारण म्हणजे त्यानें केलेली जमिनीची पाहणी. या पाहणीमुळें प्रत्येक इसमाला आपल्या मालकीची जमीन किती आहे हें बरोबर कळे. अर्थातच लबाड्या, जमिनीविषयीं कज्जे, जमाबंदी करणाऱ्यांची अरेरावी हे पूर्वींचे प्रकार एकदम संपुष्टांत आले.

" लढाया करण्यांतही त्याला लोकांचें पाठबळ होतें यांत शंका नाहीं. कारण सगळ्यांना लष्करी शिक्षण सक्तीचें होतें. त्याचें सैन्य म्हणजे

सगळ लोक. ते त्याला देवाप्रमाणें भजत व त्याच्याशीं लडिवाळपणानें वागत व तोही त्यांच्याशीं मोकळ्या मनानें वागे. तो लढाईवर जाऊं लागला कीं लोकांच्या झुंडीच्या झुंडी त्याचा जयजयकार करीत. द्वेषभाव म्हणून त्यांचे मनांत यत्किंचित्सुद्धां नव्हता. ”

अशीं विरुद्ध मतें पडण्याचें कारण मत देणाऱ्याची दृष्टि. नेपियर हे नेपोलियनकडे व्यावहारिक दृष्टीनें पाहतात व कांहीं कांहीं गोष्टी लक्षांत घेत नाहींत. देशांतला कारभार चोख होता यांत संशय नाहीं. परंतु नेपोलियनाच्या सारख्या चाललेल्या रणसंग्रामांनीं लोक त्रासून गेले होते, पैशाची व प्राणाची सारखी होळी चालली होती व प्रेमभावाच्या ऐवजीं द्वेषभाव उत्पन्न होत गेला हें ते विसरतात. विचारी लोक तर नेपोलियनला कंटाळून गेले होते. कारण, लोकसत्तेला त्यानें अगदीं झुगारून दिलें होतें. करांनीं लोक पिळून गेले होते व शतदैनिक अमलांत लोक त्याचेभोंवतीं जमले त्याचें कारण त्याची लोकप्रियता नसून बुरबांग घराण्याविषयीं द्वेषभाव हा होता. त्यांना पाहिजे होती शांतता व नेपालियनास पाहिजे होतें सार्वभौमत्व.

लामार्टीन व शेरेर यांची ही दृष्टि एकतर्फीच होय. त्यांचें लक्ष व्यवहाराला सोडून उच्च ध्येयाकडे जातें व त्यामुळें नेपोलियननें कांहीं केलें नाहीं असें त्यांना वाटतें; पण तसें म्हणणें केवळ अन्याय होय. आज जें विश्वविद्यालय, जी धर्मसंस्था, जे कायदे व जी मान देण्याची संस्था अस्तित्वांत आहे तीं सगळीं नेपोलियननेंच उत्पन्न केलेलीं. एकसूत्रा कारभार अजूनही फ्रान्सदेशांत चालू आहे. अजूनही पूर्व वैभवानें फ्रान्सला स्फुरण येतें. नेपोलियनला फ्रान्सच्या लोकांच स्वभाव चांगला कळून आला होता व त्यानें आपलें वर्तन तदनुरूपच ठेविलें.

ही जर वस्तुस्थिति असेल तर नेपोलियनचा पाडावा कां झाला हा प्रश्न सहजच उत्पन्न होतो. ह्या पाडावाचें मुख्य कारण म्हणजे नेपो-

लियनचा महत्वाकांक्षा. महत्वाकांक्षा ही दोन प्रकारची असू शकते. अन्याय दूर करून लोकांना सुखी करावयाचें हा उच्च महत्वाकांक्षा. असंख्य जनांचें कल्याण करणारा मनुष्य स्वाभाविक रातान उच्चपदाला पोंचलाच पाहिजे. त्याशिवाय त्याला अशी मोठा कामगिरी बजावतां येणार नाहीं. आपल्याला उच्चपद नको अशा भावनेनें जर कोणी मागें सरकेल तर तो देवाच्या द्वारीं निदान लोकांच्या समजुतीनें तरी गुन्हेगार ठरेल. आपल्याला जी बुद्धिसामुग्री मिळाली आहे ता लपवून ठेवण्याकरितां नव्हे. तिचा आपल्याला हिशोब पैन्पै द्यावा लागेल हीच बुद्धिवान् लोकांची समजूत असली पाहिजे. फ्रान्सचा राष्ट्रसंघामध्यें अपमान होत आहे, त्याचें पूर्ववैभव नष्ट होत चाललें आहे, आपसांत दुही माजून सर्वत्र बेबंदशाही जारी जाहे, हें सगळें **मला** बंद करतां येईल अशी जोंपर्यंत नेपोलियनची समजूत व तदनुरूप कृति होती तोंपर्यंत त्याची महत्वाकांक्षा चांगलीच होती आणि म्हणूनच डिरेक्टरी जेव्हां त्यानें उलथून टाकली तेव्हां लोकांना वाईट न वाटतां उलटा आनंदच झाला. कारण सर्वांना स्थिर आणि जोरदार राष्ट्रकारभार पाहिजे होता. पहिल्यांदां ज्या त्यानें लढाया केल्या त्यांत फ्रान्स मोठें व्हावें हा उदात्त हेतु होताच होता. दुसरा हेतु असल्यास—आणि तो नव्हता असें फारच थोडे लोक म्हणतील—तो या वेळेस गौण होता.

पण सर्वच त्याच्या इच्छेप्रमाणें होत गेल्याकारणानें व सर्वच त्याच्या ओंजळीनें पाणी प्यायला लागल्यामुळें त्याला दुसऱ्या महत्वाकांक्षेचा मोह सुटला यांत संशय नाहीं. राष्ट्राचें कल्याण व महत्वाकांक्षा हीं दोन्हीं कांहीं वेळ समतोल होतीं; पण हा समतोलपणा हळू हळू बिघडत चालला. ह्या विषमतेला कारण नेपोलियनचा व फ्रेंच लोकांचा स्वभाव. नेपोलियनच्या कृत्यांनीं आपल्या हक्कांची पायमल्ली होत आहे हें जाणून लोकसंस्थांनीं त्याला न भितां विरोध करावयास पाहिजे होता. त्यानें

मिळविलेले जय व काबाज केलेले देश ह्यांनीं भुरळून जायला नको होतें. पण हा फ्रेंच लोकांचा स्वभाव नेपोलियन यास पुरा कळला होता. त्यानेंही पोक्त विचार केला नाहीं. लोकांच्या स्वभावाचा अशा रीतीनें त्यानें अपमान करावयास नको होता. आपल्याभोंवतीं कारकुनी पेशाची मंडळी जमवून त्यानें सर्व राष्ट्राची कुवत कमी केली. स्वतंत्रतेनें कोणी वागावयाचें नाहीं, आपण सांगूं त्याप्रमाणेंच सर्वांनीं वागलें पाहिजे अशी समजूत नेपोलियननें सर्वत्र उत्पन्न केली त्यामुळें प्रत्येक अधिकारी सांगकाम्या होऊन त्याचें प्रसंगावधान सुटत चाललें व प्रसंगीं आपल्याच बुद्धीनें आपल्याला वागावें लागणार हें ते विसरले. नेपोलियनवर जे शेवटीं प्रसंग गुदरले त्यांचें हें एक कारण होय. कोणी प्रतिस्पर्धी नाहीं, सगळे कस्पटाप्रमाणें ही भावना जोरावत गेली. ती कमी व्हावयास पाहिजे होती. लहानपणीं सुद्धां यत्किंचित् विरोध त्याला खपत नसे. विरोधाची त्याला संवय व्हावयाला पाहिजे होती. तारुण्यांतच वारंवार त्याचा पाडाव होत गेला असता तर तो इतका उन्मत्त झाला नसता. पुढें पुढें तो कोणाचें कांहीं ऐकत नसे. आस्ट्रियाचा मंत्री—मेटरनिख—ह्यानें सामोपचाराच्या गोष्टी दोनदां त्याला सांगितल्या. त्या त्यानें जर एकल्या असत्या तर त्याचा व फ्रान्सचा दोघांचाही नाश झाला नसता. ज्यांचा नाश व्हावयाचा त्यांची बुद्धि आधीं नष्ट हात ह्या म्हणीप्रमाणें नेपोलियनचा विचार जात चालला व अहंपणा अमर्याद झाला. इंग्लंडनें माझें ऐकलेंच पाहिजे म्हणून त्यानें त्या देशावर स्वारी करण्याची तयारी केली व तिचा कांहीं उपयोग होत नाहीं असें पाहून सर्व यूरोप पादाक्रांत करावयाचा व मग इंग्लंडची खैरी जिरवावयाची असा त्यानें बेत केला. इंग्लंडचा व्यापार बंद करण्याकरितां जिकडेतिकडे नाकेबंदी करावयाची व याकरितां सर्व यूरोप हस्तगत करावयाचा त्याकरितां ईजिप्त, प्राशिया व रशिया या देशांवर स्वाऱ्या ह्या सगळ्या अथपासून इतिपर्यंत त्याच्या चुका होत गेल्या. लोकांच्या स्वातंत्र्यावर

गदा घालणें हा मोठा गुन्हा आहे व ह्याला शासन होणारच होणार, न्यायदेवता सृष्टींत जागृत आहेच आहे, जय नुसते वरवर, भीतिही क्षणिक, लोकांचा कोप हा मात्र कायमचा व तो खास जाळून टाकणार हें ज्याला समजत नाहीं किंवा जो स्मरत नाहीं त्याचा नाश झालाच पाहिजे. इतिहासकार वारंवार म्हणतात, नेपोलियन इथेंच थांबला असता तर बरें झालें असतें. पण मदांधतेमुळें थांबतो कोठून! मेटरनिखनें सांगितलें त्याच वेळेला जर नेपोलियन थांबता तर फ्रान्सचें वैभव कमी झालें नसतें, बुर्बांग घराणें नामशेष झालें असतें व नेपोलियनच्या वंशजांनीं कांहीं दिवस तरी राज्योपभोग घेतला असता. पण हें झालें असतें म्हणणें म्हणजे स्वभाव बदलला असता असेंच म्हणणें होय. हा सगळा स्वभावाचा दोष होय. बळी तो कान पिळी किंवा सामर्थ्य हाच न्याय ही नेपोलियनची समजूत व ह्या समजुतीप्रमाणें तो वागत गेला. त्यामुळें त्यानें लबाड्या केल्या, खोटें बोलला, वचनें मोडलीं, लढाईशिवाय इतर बाबतींतही लोकांना चकविलें. जेथें तेथें आपली सरशी झाली पाहिजे म्हणून नुसत्या पत्त्यांच्या खेळांतही तो लोकांना फसवी व डाव जिंकल्यावर फुशारकीनें आपण काय लबाडी केली तें सांगे. गुप्त गोष्टी काय चालल्या आहेत हें कळण्याकरितां लोकांचीं पत्र फोडून पाही.

त्याला मोठा म्हणावयाचें तें त्याच्या अलौकिक मानसिक प्रभावामुळें व कृत्यांमुळें. त्याच्या चरित्राशीं नीतिमत्तेचा बिलकुल संबंध नव्हता. मी इतर माणसांसारखा नाहीं, नीतीचे नियम व योग्यायोग्यतेचे विचार माझ्यासारख्यांच्या करितां ईश्वरानें मुळींच निर्माण केले नाहींत, असें तो म्हणे. या अलौकिक प्रभावामुळें मडाम हूडेटो म्हणतेः—“ त्याच्यापुढें सर्व इतिहास संकुचित होतो व कल्पनेचें साम्राज्य सुरू होतें. ” लॉर्ड डड्ली म्हणतातः—“ पूर्वकालीन वैभवाविषयीं त्याच्या वैभवानें संशय उत्पन्न केला आहे व भविष्यकालीन वैभव त्याच्या वैभवाच्या तोडीला येणें म्हणजे अशक्यच आहे. ” नेपोलियन हें नांव आठविल्याबरोबर जाज्वल्य

प्रताप, सर्वतोगामी वर्चस्व व प्रचंड अंतःप्रज्ञा ह्या कल्पना मनापुढें उभ्या राहतात. अतिमानुष बुद्धीमुळें तो उच्चपदाला चढला, व तिज-मुळेंच तो पतन पावला.

त्याचें चरित्र लिहिण्याचे व वाचण्याचे उद्देश दोन. नेपोलियन हा अजून न सुटणारा कूट प्रश्न आहे तो सोडविणें हा एक; व अलौकिक पुरुषाशीं काल्पनिक सहवास करून आपल्या मनाला बरेंचसें हलविणें हा दुसरा. एखादी गांवें-रानें उध्वस्त करणारी वावटळ पाहून जसे आपण तोंडांत बोट घालतों व वावटळीसंबंधानें स्तुतिपर किंवा निंदापर उद्गार काढीत बसत नाहीं, तशीच नेपोलियनविषयीं आपल्या मनाची स्थिति होते. नेपोलियन ही एक मानवी वावटळ. हिच्या सोंसाट्यांत झाली ती जीवहानि व्हावयाचीच. नेहमीं आपल्यासारखे कोट्यवधि शेळपट, रेमे-डोके, गतानुगतिक लोक पाहून मनाला खंत येते व सीझर, अलेक्झांडर, शिवाजीसारख्या जाज्वल्य पुरुषांचीं चरित्रें वाचून मनाला आल्हाद होतो. नुसता मानवी आवेश, मनुष्याच्या अंगांतला नुसता जोर पाहून आप-ल्याला स्फुरण चढतें. असाधारण पुरुषांचीं चरित्रें वाचण्यापासून फायदा हाच. मनुष्य काय करूं शकेल हें नेपोलियनच्या चरित्रापासून चांगलें कळतें. नेपोलियन जसा सीझर, अलेक्झांडर, हॅनिबाल ह्यांच्याहून कांहा बाबतींत वरचढ ठरतो तसा नेपोलिनहूनही श्रेष्ठ पुरुष जगामध्यें कां न निघावा असा प्रश्न सहज उद्भवतो. श्रेष्ठ पुरुष एखाद्या देशांत निर्माण झाल्यास तो त्या देशालाच केवळ भूषण होतो असें नाहीं; त्याच्यामळें सर्व मनुष्यजातीला अभिमान उत्पन्न होतो. बापट यांनीं लिहिलेलें पुस्तक अशाच दृष्टीनें वाचलें पाहिजे. तरुणजनास अशा व्यक्तीशीं परिचय होऊन फायदाच होईल. मनुष्यजातीविषयीं अभिमान उत्पन्न होऊन घटकाभर तरी थोरांचें अनुकरण करावेंसें वाटेल. शहरांतील कोंदट हवेंत वर्षानुवर्षे राहून सिंहगडासारख्या उंच ठिकाणीं खुल्या व थंड हवेंत थोडा वेळ तरा वावरण्यानें जसें रक्ताभिसरण जोरानें चालतें,

गदा घालणें हा मोठा गुन्हा आहे व ह्याला शासन होणारच होणार, न्यायदेवता सृष्टींत जागृत आहेच आहे, जय नुसते वरवर, भीतिही क्षणिक, लोकांचा कोप हा मात्र कायमचा व तो खास जाळून टाकणार हें ज्याला समजत नाहीं किंवा जो स्मरत नाहीं त्याचा नाश झालाच पाहिजे. इतिहासकार वारंवार म्हणतात, नेपोलियन इथेंच थांबला असता तर बरें झालें असतें. पण मदांधतेमुळें थांबतो कोठून! मेटरनिखनें सांगितलें त्याच वेळेला जर नेपोलियन थांबता तर फ्रान्सचें वैभव कमी झालें नसतें, बुर्बांग घराणें नामशेष झालें असतें व नेपोलियनच्या वंशजांनीं कांहीं दिवस तरी राज्योपभोग घेतला असता. पण हें झालें असतें म्हणणें म्हणजे स्वभाव बदलला असता असेंच म्हणणें होय. हा सगळा स्वभावाचा दोष होय. बळी तो कान पिळी किंवा सामर्थ्य हाच न्याय ही नेपोलियनची समजूत व ह्या समजुतीप्रमाणें तो वागत गेला. त्यामुळें त्यानें लबाड्या केल्या, खोटें बोलला, वचनें मोडलीं, लढाईशिवाय इतर बाबतींतही लोकांना चकविलें. जेथें तेथें आपली सरशी झाली पाहिजे म्हणून नुसत्या पत्त्यांच्या खेळांतही तो लोकांना फसवी व डाव जिंकल्यावर फुशारकीनें आपण काय लबाडी केली तें सांगे. गुप्त गोष्टी काय चालल्या आहेत हें कळण्याकरितां लोकांचीं पत्रं फोडून पाही.

त्याला मोठा म्हणावयाचें तें त्याच्या अलौकिक मानसिक प्रभावामुळें व कृत्यांमुळें. त्याच्या चरित्राशीं नीतिमत्तेचा बिलकुल संबंध नव्हता. मी इतर माणसांसारखा नाहीं, नीतीचे नियम व योग्यायोग्यतेचे विचार माझ्यासारख्यांच्या करितां ईश्वरानें मुळींच निर्माण केले नाहींत, असें तो म्हणे. या अलौकिक प्रभावामुळें मडाम हूडेटो म्हणते:—" त्याच्यापुढें सर्व इतिहास संकुचित होतो व कल्पनेचें साम्राज्य सुरू होतें. " लॉर्ड डड्ली म्हणतात:—" पूर्वकालीन वैभवाविषयीं त्याच्या वैभवानें संशय उत्पन्न केला आहे व भविष्यकालीन वैभव त्याच्या वैभवाच्या तोडीला येणें म्हणजे अशक्यच आहे. " नेपोलियन हें नांव आठविल्याबरोबर जाज्वल्य

प्रताप, सर्वतोगामी वर्चस्व व प्रचंड अधःपात ह्या कल्पना मनापुढें उभ्या राहतात. अतिमानुष बुद्धीमुळें तो उच्चपदाला चढला व तिज-मुळेंच तो पतन पावला.

त्याचें चरित्र लिहिण्याचे व वाचण्याचे उद्देश दोन. नेपोलियन हा अजून न सुटणारा कूट प्रश्न आहे तो सोडविणें हा एक; व अलौकिक पुरुषाशीं काल्पनिक सहवास करून आपल्या मनाला बरेंचसें हलविणें हा दुसरा. एखादी गांवें-रानें उध्वस्त करणारी वावटळ पाहून जसे आपण तोंडांत बोट घालतों व वावटळीसंबंधानें स्तुतिपर किंवा निंदापर उद्गार काढीत बसत नाहीं, तशीच नेपोलियनविषयीं आपल्या मनाची स्थिति होते. नेपोलियन ही एक मानवी वावटळ. हिच्या सोंसाट्यांत झाली ती जीवहानि व्हावयाचीच. नेहमीं आपल्यासारखे कोट्यवधि शेळपट, रेमे-डोके, गतानुगतिक लोक पाहून मनाला खंत येते व सीझर, अलेक्झांडर, शिवाजीसारख्या जाज्वल्य पुरुषांचीं चरित्रें वाचून मनाला आल्हाद होतो. नुसता मानवी आवेश, मनुष्याच्या अंगांतला नुसता जोर पाहून आप-ल्याला स्फुरण चढतें. असाधारण पुरुषांचीं चरित्रें वाचण्यापासून फायदा हाच. मनुष्य काय करूं शकेल हें नेपोलियनच्या चरित्रापासून चांगलें कळतें. नेपोलियन जसा सीझर, अलेक्झांडर, हॅनिबाल ह्यांच्याहून कांहा बाबतींत वरचढ ठरतो तसा नेपोलिनहूनही श्रेष्ठ पुरुष जगामध्यें कां न निघावा असा प्रश्न सहज उद्भवतो. श्रेष्ठ पुरुष एखाद्या देशांत निर्माण झाल्यास तो त्या देशालाच केवळ भूषण होतो असें नाहीं; त्याच्यामळें सर्व मनुष्यजातीला अभिमान उत्पन्न होतो. बापट यांनीं लिहिलेलें पुस्तक अशाच दृष्टीनें वाचलें पाहिजे. तरुणजनास अशा व्यक्तीशीं परिचय होऊन फायदाच होईल. मनुष्यजातीविषयीं अभिमान उत्पन्न होऊन घटकाभर तरी थोरांचें अनुकरण करावेंसें वाटेल. शहरांतील कोंदट हवेंत वर्षानुवर्ष राहून सिंहगडासारख्या उंच ठिकाणीं खुल्या व थंड हवेंत थोडा वेळ तरा वावरण्यानें जसें रक्ताभिसरण जोरानें चालतें,

तसेंच अशा असाधारण पुरुषांच्या सहवासानें किंवा चरित्रवाचनानें मनाला जोराचें चलन मिळतें. बापट यांनीं नेपोलियनच्या गुणदोषांचें विवेचन केलें नाहीं तें एक प्रकारें बरेंच आहे. नेपोलियनविषयीं कितीही काथ्याकूट केला तरी तो संपणार नाहीं. बापट यांनीं मूळ चरित्रें व लेख बरेचसे वाचले आहेत व दोन्ही पक्षाच्या ग्रंथकारांचीं मतें कांहीं प्रसंगीं थोडक्यांत दिलीं आहेत.

बापट यांची पहिल्या अर्धांतली भाषा साधारण आहे, पण पुढें पुढें ती जोरावत गेली आहे. रशियावरची मोहीम, वाटर्लूची लढाई, नेपोलियनच्या आंगचें शौर्य, नेतृत्व, कार्यपटुत्व व एकसमयावच्छेदानें अनेक व असंबद्ध कामें करण्याची शैली, फ्रान्सच्या कल्याणाकरितां केलेलीं विलक्षण कामें यांचें वर्णन करतांना व रोजबरीसारख्यांचीं मतें देतांना लेखणीला स्फुरण चढलेलें जागजागीं दृष्टोत्पत्तीस येतें. पुस्तक अत्यंत वाचनीय झालें आहे ह्यांत बिलकुल संशय नाहीं. ही आवृत्ति खपून दुसऱ्या आवृत्तीची आवश्यकता लवकरच भासूं लागेल असें आम्हांस वाटतें. थोर पुरुषांचीं चरित्रें लिहिण्याचा रा. बापट यांचा बेत बरेच दिवसांचा आहे. हें चरित्र दोन वर्षांपूर्वीच लिहिलेलें होतें, व मला त्याची हस्तलिखित प्रत दाखविण्यांत आल्यासही एक वर्ष होऊन गेलें. परंतु त्यांच्या कांहीं अडचणीमुळें त्यांस हें छापण्यास इतके दिवस सवड झाली नाहीं. त्यांच्या चरित्रमालेंतील दुसरें पुस्तक ‘ नेल्सन ’ हें तयार असून लवकरच प्रसिद्ध होईल.

पुणें,
ता. २–११–१९१४.

वै० का० राजवाडे.

# नेपोलियन.

## प्रकरण १ लें.

### जन्म; शिक्षण; लष्करांत नोकरी; विवाह; पहिलें युद्ध.

( १७६९--१७९७. )

भूमध्यसमुद्रांतील फ्रेंचसरकारच्या कॉर्सिका बेटांत अजाशो नांवाच्या शहरीं इ. स. १७६९ सालीं ऑगस्टच्या १५ वे तारखेस नेपोलियन याचा जन्म झाला. याचा बाप चार्लस बोनापार्ट हा एक सामान्य प्रतीचा वकील होता. नेपोलियन यास जोसेफ, लशियन, लुई आणि जेरोम असे चार भाऊ व एलिझा, पॉलीन आणि कॅरोलीन अशा तीन बहिणी होत्या. चार्लस बोनापार्ट याचे मृत्युसमयीं नेपोलियनची आई लिटीशिया ही अवघी ३० वर्षांची होती. परंतु येवढ्या सर्व मुलांचें पालनपोषण व शिक्षण याची तिजवर पडलेली जबाबदारी पुरेसें द्रव्यसामर्थ्य नसतांही तिनें चोख पार पाडली. नेपोलियननें आपल्या आईसंबंधीं एके प्रसंगीं असे उद्गार काढले आहेत कीं, ' तिच्या योग्यतेची दुसरी बायको पहावयास सांपडणें कठीण आहे. तिचे ठिकाणीं स्त्रीजातीचे सौम्यपणाबरोबर धैर्य व पराक्रम हे पुरुषास शोभण्यासारखे गुण होते. ' नेपोलियन यास प्राप्त झालेलें असामान्य वैभव व त्याचा अत्यंत दुःख-कारक शेवट हीं दोन्हीं आपल्या डोळ्यांनीं पाहून ही प्रसिद्ध स्त्री नेपोलियनच्या मृत्यूनंतर पंधरा वर्षांनीं मरण पावली.

१७६७ सालीं फ्रेंचसरकारनें कॉर्सिका बेटावर फौज पाठविली, व १७६९ च्या जून महिन्यांत तें बेट पूर्णपणें जिंकून आपल्या राज्यांत सामील

केलें. त्या वेळेपर्यंत, म्हणजे नेपोलियनच्या जन्मापूर्वी दोन महिनेपर्यंत, कॉर्सिकामध्यें सर्वत्र तद्देशीयांचें फ्रेंच सैन्याशीं युद्ध सुरू असल्यामुळें नेपोलियनची आई लिटीशिया हीस आपल्या पतीबरोबर या गांवाहून त्या गांवीं व या किल्ल्यांतून त्या किल्ल्यांत याप्रमाणें घोड्यावरून दौड करावी लागे. परंतु जूनमध्यें युद्धाचा अंत होऊन कॉर्सिका बेट फ्रेंच मुलखास जोडण्यांत आल्यानंतर कॉर्सिकांतील इतर रहिवाशांप्रमाणें बोनापार्ट कुटुंबासही स्वस्थता मिळाली. ऑगस्ट १५ तारखेस नेपोलियनची आई चर्चमध्यें प्रार्थनेस गेली असतां तिला मध्येंच उठून घरीं येणें भाग पडलें. घरीं आल्याबरोबर थोड्याच मिनिटांत ईलियडमधील योद्ध्यांचीं चित्रें विणलेल्या एका गालिच्यावर तिनें आपला दुसरा मुलगा नेपोलियन यास जन्म दिला.

नेपोलियनचें प्राथमिक शिक्षण त्या गांवच्याच एका शाळेंत झालें. वयाच्या दहाव्या वर्षीं कॉर्सिका येथील फ्रेंच गव्हर्नराच्या वशिल्यानें त्याचा फ्रान्समधील ब्रायनच्या लष्करी शिक्षणाच्या शाळेंत प्रवेश झाला. या शाळेंत बहुतेक सरदार व बडय लोकांचीं मुलें असत. तीं नेपोलियनसारख्या फ्रेंच भाषा चांगलीशी जाणणाऱ्या दरिद्री व परदेशीय विद्यार्थ्यांचा साहाजिकच तिरस्कार करीत. नेपोलियनचा स्वभाव बालपणापासूनच मानी असल्यामुळें त्यानें या धनोन्मत्त मंडळीबरोबर संबंध अजीबात वर्ज केला. तो आपला शाळेबाहेरचा सर्व वेळ वाचनांत घालवीत असे. ब्रायनप्रमाणें आणखी अकरा ठिकाणीं युद्धशिक्षणाच्या शाळा ह त्या. या शाळांत अभ्यासक्रम चार वर्षांचा असे. शेवटच्या वर्षाची परीक्षा झाली म्हणजे तात प.त झालेल्यांपैकीं पहिलीं तीन मुलें प्रत्येक शाळेंतून पॅरिसच्या लष्करी कॉलेजमध्यें घेत असत. नेपोलियनचें शिक्षण १७८४ सालीं संपून परीक्षेंत त्याचा नंबर तिहींचे आंत आल्यामुळें त्यास पॅरिसच्या कॉलेजमध्यें घेण्यांत आलें. येथेंही त्याचा अभ्यास ब्रायनप्रमाणें मध्यरात्रीपर्यंत सुरू असे. गणित व भौतिक शास्त्रें यांचा त्यास फार नाद लागून त्या विषयांबद्दल त्याची या कॉलेजमध्यें फार ख्याति झाली. इतिहास, अर्थशास्त्र, राजनीतिशास्त्र यांसंबंधींही त्यानें जबर अध्ययन केलें. तसाच त्याचा काव्याबद्दलचा शोकही फार मोठा होता. मोठमोठ्या कवींचीं स्फूर्तिदायक काव्यें व प्लुटार्कसारख्यांनीं लिहिलेलीं थोर पुरुषांचीं उत्साहजनक चरित्रें ह्यांचीं त्यानें पुनः पुनः इतकीं पारायणें केलीं कीं, त्यांतले सर्व सरस

भाग त्यास शेवटपर्यंत मुखोद्गत होते. त्यानें रिकामपणांत अगर खेळांत एक तासही दवडला नाहीं असें म्हटलें असतां चालेल. इतर विद्यार्थी क्रिकेट व फूटबॉल यांत दंग असतां नेपोलियन हा गणितांतील एखादा बिकट प्रश्न; अथवा ग्रीक अगर रोमन इतिहासांतील रोमहर्षणप्रसंग यांत तल्लीन झालेला असे. 'नेपोलियन यास प्राप्त झालेलें कल्पनातीत वैभव हें केवळ यदृच्छा अगर अनुकूल परिस्थितीमुळें नसून ब्रायन व पॅरिस येथें या पांच वर्षेपर्यंत त्यानें केलेल्या खडतर तपश्चर्येचें फळ होय; महत्पदाच्या प्राप्तीसाठीं नेपोलियन-इतकी श्रमाची जबर किंमत कोणींही दिलेली नाहीं,' असें एक ग्रंथकार म्हणतो. असे अश्रांत मानसिक परिश्रम व व्यायामाची हेळसांड यांचा नेपोलियनच्या प्रकृतीवर परिणाम झाल्यावांचून राहिला नाहीं. तो निरोगी होता खरा, परंतु लष्करी पेशाच्या मनुष्यास साजेसा त्याच्या शरीराचा बांधा सुदृढ नव्हता.

सर्व विषयांतील प्रावीण्यामुळें नेपोलियन तेथील शिक्षकवर्गाच्या पूर्ण पसंतीस उतरला. वाङ्मयाचे प्रोफेसरानें असें बोलून दाखविलें कीं, 'नेपोलियनच्या निबंधांतील वक्तृत्वपूर्ण व जळजळीत वाक्यें पाहून मला ज्वालामुखींतून उसळणाऱ्या तप्तशिलांचें स्मरण होतें.' सुप्रसिद्ध लाप्लास हा त्याचें गणितांतील प्रावीण्य पाहून फार खूष झाला. या कॉलेजमधील शिक्षण एक वर्षाचेंच असे. येथील परीक्षा पास झाल्यामुळें **नेपोलियन यास तोफखान्यामध्यें लेफ्टेनंटची जागा मिळाली** (१७८५).

कांहीं वर्षें फ्रान्समध्यें नोकरी केल्यानंतर स्वदेशीं जाण्याची इच्छा झाल्यामुळें नेपोलियन रजा घेऊन कॉर्सिका बेटांत गेला. तेथें त्या वेळीं पॅओली हा प्रसिद्ध देशभक्त गव्हर्नर होता. फ्रेंचांनीं कॉर्सिकावर स्वारी केली तेव्हां पॅओलीनें स्वदेशबांधवांचें पुढारीपण पत्करून दीड वर्षभर फ्रेंचांशीं लढून युद्धकौशल्याबद्दल चांगला लौकिक मिळविला होता. फ्रेंचांची संख्या फार मोठी असल्यामुळेंच कॉर्सिकनांस अखेरीस हार जावें लागलें होतें. परंतु तें बेट हस्तगत केल्यावर तेथील गव्हर्नराच्या जागीं फ्रेंच सरकारनें पॅओली याचीच नेमणूक केली. या मनुष्यानें आतां असें मनांत आणिलें कीं, फ्रेंच सत्ता झुगारून देऊन कॉर्सिकावर राज्य करण्यास इंग्लिशांस पाचारण करावें. या कामीं तो नेपोलियनचें सहाय मागूं लागला. फ्रेंचसरकारची नोकरी पत्कर-

लेल्या पॅओलीचें हें कृत्य विश्वासघाताचें वाटून नेपोलियननें त्यास मदत करण्याचें नाकारलें. पॅओलीनें पूर्वी केलेल्या स्वदेशसेवेबद्दल अत्यंत पूज्यबुद्धि असूनही नेपोलियननें त्यास बजावलें कीं, ' तुम्हीं बंड केल्यास माझ्या हातून होईल तितका मी विरोध करीन. माझें असें मत आहे कीं, कॉर्सिकासारखें लहानसें बेट कायमचें स्वतंत्र राहणें शक्य नाहीं. तेव्हां त्याचा इंग्लंडच्यापेक्षां फ्रान्सच्या साम्राज्यांत अंतर्भाव होणें जास्त हितावह होईल. कारण, भाषा, चालीरीति व धर्म वगैरे बाबतींत आपलें इंग्लिशांपेक्षां फ्रेंचांशीं जास्त सादृश्य आहे. ' तथापि पॅओलीचा बेत लोकप्रिय होऊन बंडाचें निशाण उभारण्यांत आलें. इंग्रजी आरमारही पॅओलीच्या सहायार्थ कॉर्सिकास दाखल झालें. नेपोलियन प्रतिकूल असल्याचें समजल्यावरून बंडवाल्यांच्या एका टोळीनें त्याचे घरावर हल्ला केला. कांहीं वेळपर्यंत जेमतेम टिकाव धरून त्यास रात्रीचे वेळीं आपली आई, भाऊ व बहिणी यांसह पळ काढावा लागला. एका गलबतांत बसून ही सर्व मंडळी फ्रान्सला येऊन पोहोंचली. मूठभर हत्यारबंद लोकांपासून आपले जीव वांचविण्याकरितां गुप्तपणें गलबतांत बसून परदेशीं निघालेली ही सर्व मंडळी युरोपांतील निरनिराळ्या देशांवर थोडक्याच दिवसांत राजे व राण्या म्हणून अंमल करूं लागतील अशी कल्पना त्या वेळीं कोणाच्या स्वप्नांतही येण्यासारखी नव्हती. कॉर्सिका बेट इंग्लंडच्या स्वाधीन करण्याबद्दल पॅओलीनें केलेल्या योजनेस नेपोलियननें अडथळा केल्यावरून ' एन्सायक्लोपीडिया ब्रिटॅनिका ' मधील लेखकानें नेपोलियनला स्वदेशद्रोही असें नांव दिलें आहे.

या सुमारास फ्रान्समध्यें मोठी राज्यक्रांति झाली. फ्रेंच लोकांनीं आपला राजा व राणी यांचा वध करून लोकसत्ताक राज्याची स्थापना केली. आपल्या देशांतील प्रजा देखील फ्रेंच लोकांचें अनुकरण करील अशा भीतीमुळें युरोपांतील इतर राजांनीं परस्परांशीं स्नेह करून आपलीं सैन्यें या प्रजासत्ताक राज्यास हाणून पाडण्यास पाठविलीं. खुद्द फ्रान्स देशांतही कित्येक राजपक्षीय लोक होते, ते या सर्व परकी राजांस फितूर होते. या लोकांनीं आरमारी सामग्रीचा अतोनात सांठा असलेलें व विलक्षण मजबुतीचें असें फ्रान्सच्या दक्षिणेकडील टूलून बंदर परकी सैन्याच्या स्वाधीन केलें. तें परत घेण्याकरितां फ्रेंचसरकारनें जी फौज पाठविली तींत नेपोलियनची पलटण होती.

नेपोलियननें आपल्या वरिष्ठांच्या असें नजरेस आणिलें कीं, सबंध बंदरास वेढा घालून तें घेण्याच्या प्रयत्नांत द्रव्य आणि काल यांचा व्यर्थ अपव्यय होणार असून 'लिटल जिब्रॉल्टर' नांवाचा एक जवळचा छोटा किल्ला ताब्यांत घेतल्यास बंदरामधील परकी जहाजांस तेथें राहणें अशक्य करतां येईल. हें म्हणणें मुख्य सेनापतीस पटून त्यानें नेपोलियन यास आपल्या मनाप्रमाणें व्यवस्था करण्याची परवानगी दिली. एक महिनाभर अहोरात्र खपून शत्रूंस न दिसेल अशा बेतानें नेपोलियननें योग्य ठिकाणीं तोफांची मांडामांड केली. व अखेरीस १७ डिसेंबर १७९३ रोजीं मध्यरात्रीपासून सकाळपर्यंत ८००० कुलपी गोळे सोडून त्यानें 'लिटल जिब्रॉल्टर' छिन्न-भिन्न करून टाकला. दुसरे दिवशीं ती जागा ताब्यांत येतांच त्यानें तेथून बंदरांतील इंग्रजी व स्पॅनिश गलबतांवर तोफांमधून आगीचा पाऊस पाडण्यास सुरुवात केली. असा भडिमार असह्य होऊन ह्या गलबतांस बंदर सोडून पळ काढावा लागला. या गलबतांवर चढून फ्रान्समधून निसटूं पाहणाऱ्या वीस हजार राजपक्षीयांवरही तोफा रोंखून नेपोलियननें त्यांस जलसमाधि दिली. नंतर टूलूनवर हल्ला सुरूं झाला. असें एकंदरींत तीन दिवसपर्यंत खडतर युद्ध करून नेपोलियननें टूलून सर केलें. ही नेपोलियनची पहिली लढाई होय. हीमध्यें तो मुख्य सेनापति नसून जरी तोफखान्यांतील एक अधिकारी होता तरी सर्व युद्ध त्याच्याच तंत्रानें चाललें असल्यामुळें विजयाचें श्रेय त्यासच आहे.

यानंतर लौकरच नेपोलियन यास फौजेसह इटालीकडे रवाना करण्यांत आलें. तेथें शत्रूंशीं लढाया होण्यास सुरुवात होतांच त्यास फितुरीचे आरोपावरून कैद करून फ्रान्समध्यें आणण्यांत आलें. या अंदाधुंदीचे काळीं फ्रान्समध्यें वाटेल त्यावर वाटेल ते आरोप येऊन फांशीं जाण्याची पाळी येत असे. तथापि नेपोलियननें तुरुंगांत असतांना स्वस्थ चित्तानें रोमन लोकांच्या दिवाणी कायद्याचा अभ्यास केला. पुढें खटला सुरूं झाला, व कोर्टानें त्यास निर्दोषी ठरवून सोडून दिलें. असें असूनही लष्करी अधिकाऱ्यांनीं त्याची ग्रेड कमी केली. हा अपमान सहन न होऊन नेपोलियननें नोकरीचा राजीनामा दिला.

नेपोलियननें यानंतर इतर ठिकाणीं नोकरी पाहण्याचे केलेले यत्न व्यर्थ झाले. तुर्कस्थानसारख्या परदेशीय सैन्यांतही नोकरी पत्करण्याची त्याची

तयारी होती. त्याला स्वतःला पैशाची फारच अडचण होत होती. तशांत त्याच्या आईचीं पैसे पाठविण्याबद्दल पत्रें येऊं लागलीं, म्हणून तो फारच खिन्न व उदास झाला. एके दिवशीं उद्विग्नतेच्या झटक्यांत तो जीव देण्याकरितां सीन नदीचे कांठीं गेला. तो पाण्यांत उडी घेणार इतक्यांत त्याचा डेमासिस नांवाचा शाळेंतील सहाध्यायी त्यास भेटला. त्यानें नेपोलियनचे हातावर तेथल्या तेथेंच ६००० डॉलरांचा ऐवज ठेवला. पुढें नेपोलियन बादशहा झाल्यावर डेमासिसला हुडकून काढून हें ऋण फेडण्याची व कृतज्ञता प्रदर्शित करण्याची त्यास अत्यंत उत्कंठा लागली. परंतु डेमासिसचा पत्ता लागेना. डेमासिस हा एकांतवासप्रिय मनुष्य होता. नेपोलियनला आपला पत्ता लागूं दिल्यास तो आपणावर कांहीं तरी मानमरातब लादल्याशिवाय राहणार नाहीं म्हणून डेमासिस गुप्तपणें रहात असे. परंतु अखेरीस नेपोलियननें त्यास हुडकून काढलेंच, व ६००० डॉलर कर्जाची बादशाही फेड म्हणून त्यास ६०,००० डॉलर घ्यावयास लावले, आणि त्याच्या स्वभावास जुळण्याजोगें असें बादशाही बागांवर देखरेख करण्याचें काम त्यास सांगून त्याबद्दल सालीना ६००० डॉलरांची नेमणूक करून दिली.

इ. स. १७९४ च्या अखेरीस रिपब्लिकच्या घटनेंत जो थोडासा फेरफार झाला तो पॅरिस येथील जहाल लोकसत्तावाद्यांस नापसंत होऊन त्यांनीं दंगा केला. दंगेखोरांत कांहीं बडतर्फ केलेले सेनापति व इतर युद्धनिपुण लोक असल्यामुळें दंग्यास उग्र स्वरूप प्राप्त झालें, व फ्रेंचसरकारास नेपोलियनचें सहाय मागावें लागलें. नेपोलियननें तोफांचा भडिमार करून हा दंगा तेव्हांच मोडून टाकला. फ्रेंच लोकांवर शस्त्र चालविल्याचा हा नेपोलियनच्या चरित्रांतील शेवटचाच प्रसंग होय. याबद्दल त्यास कांहीं अंशीं पश्चात्ताप होऊन पुढें याची कोणीं आठवण केलेली त्यास आवडत नसे. या उपकाराबद्दल फ्रेंचसरकारानें त्यास सेनापतीची जागा दिली.

यानंतर लौकरच ( १७९६ मार्च ) नेपोलियननें जोसेफाइन नांवाच्या एका विधवा स्त्रीशीं लग्न केलें. तिला पहिल्या लग्नाचा यूजीन नांवाचा मुलगा असून हॉर्टेन्स नांवाची मुलगी होती.

# प्रकरण २ रें.

## इटाली व ऑस्ट्रियावरील स्वारी.

( १७९७-९८. )

इ. स. १७९७ सालीं फ्रेंच रिपब्लिकवर ऑस्ट्रिया वगैरे राष्ट्रांनीं स्वारी केली. फ्रेंचसरकारानें आपली शेलकी दोन लक्ष फौज ऱ्हाइन नदीचे कांठावर आपल्या अत्यंत अनुभविक सेनापतींचे हाताखालीं पाठविली, व इटालीचे बाजूनें फ्रान्सवर चालून येणाऱ्या साठ हजार ऑस्ट्रियन फौजेस विरोध करण्याकरितां त्यांनीं नुकतेच लष्करांत घेतलेले ३०,००० कच्चे शिपाई देऊन नेपोलियन यास मार्च महिन्यांत रवाना केलें. युद्धखर्चाकरितां डिरेक्टरींनें नेपोलियनला एक पै सुद्धां दिली नाहीं, व त्यानें मागितलींही नाहीं. ऱ्हाइनवर गेलेल्या मोठ्या फ्रेंच सैन्याच्या हातून शत्रूविरुद्ध कांहीं विशेष कामगिरी झाली नाहीं. परंतु ११ एप्रिल रोजीं नेपोलियननें इटलींत मांटेनाट येथें शत्रूचा पराभव केल्याची अनपेक्षित बातमी पॅरिस येथें पोहोंचली. हा नेपोलियनच्या अद्वितीय आणि विस्मयजनक विजयपरंपरेचा* प्रारंभ होय.

---

* The series of Napoleon's successes is absolutely e most marvellous in history. No one can question that he leaves far behind him the Turennes, Marlboroughs and Fredericks; but when we bring up for comparison an Alexander, a Hannibal, a Cæsar, a Charles, we find in fhe single point of marvellousness Napoleon surpassing them all.

—*Prof. Sir J. Seely.*

शत्रूच्या निंपट फौज ज़वळ असतां अनेक युद्धांत एकसारखा जय मिळविल्याबद्दल नेपोलियनची युरोपांत सर्वत्र वाहवा झाली. युरोपांत सर्व देशांतील सैन्यें शस्त्रास्त्रांची तयारी, डावपेंच, कवाईन, शिस्त, शौर्य, राष्ट्रीयत्वाची भावना वगैरे सर्व बाबतींत बहुतेक सारख्या दर्जाचीं असल्यामुळें तेथें असे प्रकार फारसे दृष्टोत्पत्तीस येत नाहींत. तेथें कोणत्याही सेनापतीस शत्रूपेक्षां जास्त फौज जवळ असल्याशिवाय यशाची खात्री वाटत नाहीं.

मांटेनाटच्या लढाईपासून १८ एप्रिल १७९८ रोजीं ऑस्ट्रियाशीं तह ठरेपर्यंत जें एक वर्ष लोटलें त्यांत नेपोलियन व ऑस्ट्रियन सेनापति यांच्या सुमारें ८५ लढाया झाल्या. त्या लढायांची सविस्तर हकीकत कितीही चित्तवेधक व बोधप्रद असली तरी येथें त्यांचा नामनिर्देश करण्यासही सवड नाहीं. या सर्व लढायांत मिळून नेपोलियनचे २५,००० लोक ठार अगर कैद झाले व ऑस्ट्रियन पक्षाचे १॥ लक्ष ठार अगर कैद झाले. शिवाय त्यांच्या सुमारें ८०० तोफा व अगणित दारूगोळा नेपोलियनच्या हातीं पडला. नेपोलियननें यापुढें जेनासारख्या एकाच युद्धांत प्रशियासारख्या बलाढ्य राष्ट्राचें लष्करी सामर्थ्य जमीनदोस्त केलेलें ठाऊक असणारांस या मोहिमेंतील लढायांची संख्या पाहून आश्चर्य वाटेल. परंतु यांत नेपोलियनचा दोष नसून इतक्या लढाया होण्याचें मुख्य कारण नद्या उतरून जाण्यास लागणारें 'पांटूनचें' सामान फ्रेंचसरकारनें त्यास पुरविलें नव्हतें हें होय.

यानंतर नेपोलियनचीं इतर युरोपियन राष्ट्रांबरोबर जीं युद्धें झालीं आहेत त्यांत दोन्ही पक्षांकडे लाखांनीं मोजतां येण्यासारखीं सैन्यें असल्यामुळें त्यांच्या वृत्तांतानें कल्पनाशक्तीवर जो परिणाम होतो तो या इटालियन मोहिमेनें होत नाहीं. परंतु हींत नेपोलियनचें युद्धकौशल्य त्याच्या वयाच्या सव्विसावे वर्षींच पूर्णत्वानें प्रकट झालें, असें युद्धकलाभिज्ञांचें मत आहे. 'टॅक्टिक्स' मध्यें ह्मणजे रणांगणावर युद्ध जुंपल्यानंतर लढविण्याच्या डावपेंचांमध्यें सीझर, अॅलेक्झांडर वगैरे कांहीं प्राचीन योद्धे नेपोलियनची बरोबरी करतात; व मार्लबरो, फ्रेडरिक वगैरे कांहीं अर्वाचीन योद्धेही त्याच्याहून फारसे कमी ठरत नाहींत. परंतु 'स्ट्रॅटेजी' मध्यें म्हणजे आपणास इष्ट असलेल्या जागीं शत्रूंस लढाई देणें भाग पाडण्यासाठीं व त्या जागीं आपलें सैन्य शत्रूपेक्षां जास्त जमविण्यासाठीं करण्याच्या युद्धापूर्वीच्या हालचालींमध्यें तो सर्वांहून श्रेष्ठ आहे,

असें हॅम्ले, डेरेकॅगेक्स, लॉर्ड वगैरे युद्धनिष्णांत लेखकांचे अभिप्राय आहेत. हें त्याचें असामान्य 'स्ट्रॅटेजिक' कौशल्य या मोहिमेंत दिसून आलें. या वर्षी अर्कोला व रिव्होली येथें झालेल्या दोन लढायांखेरीज बाकीच्या सर्व युद्धांत त्याचें सैन्य शत्रूच्या जवळजवळ दुप्पट होतें. उदाहरणार्थ, पहिलें युद्ध मांटेनाट येथें शत्रूंस अनिष्ट असलेल्या ठिकाणीं झालें; व तेथें, एकंदर फ्रेंच फौज तीस हजार व ऑस्ट्रियन फौज साठ हजार अशी स्थिति असतां, लढाईचे वेळीं ऑस्ट्रियनांची संख्या १०,००० असून फ्रेंचांची १६,००० होती. अर्कोला व रिव्होली येथें अपरिहार्य कारणांमुळें त्यास शत्रूच्या निंपटही फौज आणतां आली नाहीं. तेथें त्यानें 'टॅक्टिकल' कौशल्याच्या जोरावर यश मिळविलें.

लेफ्टेनंट सार्जेंट यानें म्हटलें आहे कीं, " एखादी लढाई होऊन गेल्यावर तींत यशस्वी झालेल्या सेनापतीच्याही चुका सामान्य ऑफिसरास देखील दाखवितां येतात. परंतु या इटालियन मोहिमेची अगदीं अर्वाचीन काळीं मान्य झालेल्या नियमांप्रमाणें परीक्षा करितां नेपोलियनच्या हालचालींत टीकेस यत्किंचितही अवकाश मिळत नाहीं हें पाहून मन थक्क होतें. " नेपोलियन-विरुद्ध या वर्षी लढलेले ऑस्ट्रियन सेनापति बॉल्यू, वर्म्सर, अॅल्व्हिझी, चार्लस हे युरोपियन युद्धांत लौकिक संपादन केलेले अनुभविक लोक होते. परंतु या गतानुगतिक लोकांस नेपोलियनसारख्या कल्पक मनुष्याचे पेंच मुळींच समजले नाहींत.*

उन्झमार्क येथें (४ एप्रिल १७९८) शेवटची लढाई होऊन ऑस्ट्रियानें तहाचा विचार करण्याबद्दल मुदत मागितल्यानंतर नेपोलियन माटेबलो येथें येऊन

---

* His movements were so rapid and his blows so terrible and unexpected that the Austrian commanders could neither fathom his designs, nor understand his combinations. To them he seemed to have no system of war and no method in his undertakings. He seemed rather to be the incarnation of force, moving like lightning, and hurling thunderbolts of war against his enemies, till they were crushed, overwhelmed, annihilated.

—*Lieutenant H. H. Sargent.*

राहिला. तेथें निरनिराळ्या देशांचे वकील जमून सर्व देशांच्या मर्यादा ठरविण्याबद्दल चर्चा करण्यासाठीं अत्यंत थाटाचे दरबार भरूं लागले. एक वर्षापूर्वीं नेपोलियन फ्रेंच सैन्यांतील एक सामान्य ऑफिसर होता. परंतु आतां त्याचा हुद्दा कांहींही असला तरी हातांतील वास्तविक सत्ता कोणत्याही युरोपियन राजाहून जास्त झालेली होती.†

या युद्धमालेमुळें इटालींतील संस्थानें ऑस्ट्रियन वर्चस्वाखालून निघून फ्रेंच वर्चस्वाखालीं आलीं. लंबार्डीतील लोकांच्या इच्छेवरून नेपोलियननें तेथील राजास हांकून देऊन तेथें फ्रान्सच्या धर्तीवर लोकसत्ताक राज्य स्थापन केलें. त्यामळें लंबार्डीतील लोक इतके खूष झाले कीं, त्यांनीं नेपोलियन १८१५ सालीं पदच्युत होईपर्यंत झालेल्या सर्व युद्धांत कृतज्ञतेनें त्याचाच पक्ष स्वीकारला. लंबार्डीतील लोकसत्ताक राज्यास नेपोलियननें 'सिसाल्पाइन रिपब्लिक' असें नांव दिलें.

तहाच्या शर्ती ठरतां ठरतां बराच काळ लोटल्यामुळें ऑस्ट्रियनांस आपल्या फौजेची पुनः जमावाजमव करण्यास चांगली संधि सांपडली. त्यायोगानें ऑस्ट्रियन वकील आतां कांहीं तरी करापतीवर तह मोडण्याच्या विचारांत होते. ते भलत्यासलत्या मागण्या करूं लागतांच नेपोलियननें एकदम सभेंतून त्वेषानें उठून तह मोडल्याचें जाहीर केल, व टेबलावरील चिनीमातीचें भांडें जमिनीवर जोरानें फेंकून वकिलांस बजाविलें कीं, 'आजपासून एक महिन्याच्या आंत मी तुमच्या राज्याच्या या भांड्याप्रमाणें ठिकऱ्या उडवून देईन!'

† There (at Montebello) the future Emperor of the West (Napoleon) held his court in more than regal splendour. ......There weightier matters were to be determined and dearer interests were at stake than had ever been submitted to European diplomacy since the iron crown was placed upon the brows of Charlemagne... Already Napoleon acted as a sovereign prince. His power exceeded that of any living monarch. And he had entered on that dazzling existence which afterwards subdued and entranced the world.

—*Sir Archibald Alisson.*

असें म्हणून तो तावडतोब चालता झाला. हा क्रोधाचा आविर्भाव पूर्णपणें सफळ झाला. कारण त्यानें ऑस्ट्रियन वकील भयभीत होऊन गेले, व त्यांनीं नेपोलियनच्या वाड्यांत जाऊन तहाच्या कागदावर मुकाट्यानें सह्या केल्या. लढाई पुनः सुरू झाली असती तर नेपोलियनला यश येण्याची खात्रीच होती असें नाहीं. परंतु युद्धकौशल्याप्रमाणें केवळ आवेशाच्या आविर्भावानेंही शत्रूस गर्भगळित करून सोडण्याची हातोटी त्यास साधली होती.

या सालीं घडलेली दुसरी एक गोष्ट कांहीं अंशीं याच प्रकारची आहे. एका लढाईनंतर ऑस्ट्रियन फौजेच्या टोळ्या अनेक मार्गांनीं पळूं लागल्या. नेपोलियन पाठलाग करीत असतां एका खेड्यांत एक हजार शिपायांनिशीं विश्रांतीकरितां उतरला. बाकीची फ्रेंच फौज शत्रूच्या टोळ्यांमागें लागून दूर गेली होती. इतक्यांत ४००० शिपायांची ऑस्ट्रियन पलटण तेथें आली; व तिनें शरण येण्याबद्दल फ्रेंचांस निरोप पाठविला. तेव्हां नेपोलियन एक हजार लोकांसह कैद होण्याचा प्रसंग आला, व सर्व ऑफिसर घाबरून गेले. परंतु नेपोलियनला या प्रसंगांतून पार पडण्यासाठीं युक्ति शोधून काढण्यास एक क्षणही लागला नाहीं. त्यानें आपले सर्व स्टाफ ऑफिसर, बॉडिगार्ड वगैरे जलदीनें बोलावून आणून जवळ बसविले; व नंतर शत्रूच्या जासुदास आंत येण्याची परवानगी दिली. तो जासूद नेपोलियनच्या अज्ञमासाप्रमाणें हा सर्व थाट पाहून चपापला; व ही फ्रेंच सैन्याची लहानशी तुकडी नसून मुख्य छावणीच आहे असा त्याचा ग्रह झाला. नेपोलियन त्यास संतापानें म्हणाला, " आपल्या सर्व फौजेसह येथें तळ दिलेल्या खुद्द फ्रेंच सेनाधिपतीस तुम्ही शरण येण्यास सांगतां या उन्मत्तपणाचा अर्थ काय ? तूं परत जा, व आपल्या लोकांस माझा निरोप सांग कीं, पांच मिनिटांचे आंत तुम्ही शरण आलांत तर जीवदान तरी मिळेल; विलंब कराल तर या अपमानाबद्दल मी तुमच्यांपैकीं प्रत्येकास ठार करीन." तेव्हां ती शत्रूची चार हजारांची पलटण शस्त्रें ठेवून नेपोलियनच्या स्वाधीन झाली. वास्तविक स्थिति काय होती तें ऑस्ट्रियनांस कैद झाल्यानंतर समजलें; व पोकळ धमकीनें भेदरून गेल्याबद्दल पश्चात्ताप व शरम वाटूं लागली.

तहाची वाटाघाट चालू असतां इतर कारस्थानें संभाळून नेपोलियन इटालींतील विश्वविद्यालयें पहावयास गेला होता; व एके प्रसंगीं विद्यार्थ्यांस उदाहरणें

घालून त्यानें त्यांची गणितविषयांत परीक्षा घेतली. इटालींतील शास्त्रज्ञांस नेपोलियननें फ्रान्समध्यें येऊन राहण्याची विनंति केली; व स्वस्थपणें प्रयोग व शोध चालवितां यावे म्हणून पेन्शनें देण्याचें आश्वासन दिलें. या देशांतील संग्रहालयांतून नेपोलियननें उत्कृष्ट चितार्‍यांचीं दुर्मिळ अमूल्य चित्रें काढून नेऊन पॅरिसच्या म्यूझियममध्यें ठेवण्यास पाठविलीं. हें त्याचें कृत्य अतिनिंद्य मानण्यांत आलें आहे.

या कँपो फोर्मिओच्या तहानें फ्रान्सची पूर्वसीमा ऱ्हाइन नदीपर्यंत वाढली, व ऑस्ट्रियास नेपोलियननें स्थापिलेल्या 'सिसाल्पाइन रिपब्लिक' च स्वातंत्र्य कबूल करावें लागलें. मिळालेल्या जयाच्या मानानें या शर्ती फारच सवलतीच्या होत्या, असें इतिहासकार म्हणतात. इतर बाबतींतही नेपोलियननें शत्रूंशीं सौजन्याचें वर्तन ठेवलें होतें. शत्रूकडील वयोवृद्ध सेनापति वर्म्सर यास नेपोलियनच्यापुढें आपली तरवार ठेवून स्वाधान होण्याचा प्रसंग आला, आणि तो तर नेपोलियन यास तिरस्कारानें पोरगा असें म्हणत असे. जेता सेनापति म्हणून आपणास तरवार समर्पण करतांना वर्म्सर यास अत्यंत दुःख होईल हें जाणून नेपोलियननें तरवार घेण्याचें काम दुसऱ्या एकास सांगितलें व तो स्वतः त्या प्रसंगीं गैरहजर राहिला.

---

# प्रकरण ३ रें.

## ईजिप्ट व सीरीयावरील स्वारी; फ्रेंच रिपब्लिकचें अध्यक्षत्व.

( १७९८–९९. )

नेपोलियन फ्रान्सला परत गेला तेव्हां डिरेक्टरीचा इंग्लंडवर स्वारी करण्याचा विचार चाललेला होता. परंतु फ्रान्सजवळ चांगलें आरमार नसल्यामुळें तो प्रयत्न धोक्याचा होईल व त्यापासून विशेष उपयोगही नाहीं, इंग्लंडचें

खरें नुकसान त्याच्या वसाहती हिसकावून घेतल्यानेंच होईल व त्याकरितां ईजिप्टदेश ताब्यांत घेऊन भूमध्यसमुद्रावर अंमल बसविणें इष्ट आहे वगैरे सांगून नेपोलियननें ईजिप्टवर स्वारी करण्याकडे डिरेक्टरीचें मन वळविलें.

तो तारीख १९ मे १७९८ रोजीं १३ लढाऊ गलबतें व ४०,००० शिपाई बरोबर घेऊन ईजिप्टवर स्वारी करण्यास निघाला. येथील युद्धें गैरसुधारलेल्या मॅम्लूकांबरोबर झालीं असल्यामुळें विशेष महत्वाचीं नाहींत. तथापि, मॅम्लूकांजवळ हत्यारें थेट युरोपियन पद्धतीचीं असून त्यांच्या सैन्यांत इंग्रज, राशियन व फ्रेंच ऑफिसरही होते. शिवाय शौर्याचे बाबतींत मॅम्लूकांच्या तोडीचे शिपाई युरोपांतही पहावयास मिळण्याजोगे नव्हते.

नेपोलियन प्रथम ईजिप्टमधील अॅलेक्झांड्रियाचे बंदरांत भयंकर तुफान चालू असतां उतरला. व त्याच दिवशीं भडिमार करून त्यानें तें शहर हस्तगत केलें. नंतर त्यानें राजधानीचें शहर केरो यावर चाल करण्याचा निश्चय केला. परंतु कांहीं अडचणींमुळें त्यास नेहमींची वाट सोडून वाळवंटावरून फौज न्यावी लागली. या वालवंटांत उष्णता इतकी प्रखर आहे कीं, दिवसाचे वेळीं फक्त वाळूवर भांडीं ठेवून विस्तवाशिवाय अन्न शिजवितां येतें. म्हणून या प्रवासांत उष्णतेनें शिपायांस ज्या यातना झाल्या त्याचें वर्णन करणें अशक्य आहे. तोफांच्या माऱ्यांत निःशंकपणें राहणारे शिपाई येथें जीव नकोसा झाल्यामुळें वाळूवर लोळण घेऊन तळमळत प्राण सोडूं लागले. तथापि नेपोलियनची सैन्यावर इतकी छाप बसली होती कीं, त्यास उत्तेजनपर भाषणें करून शिपायांत नेहमींप्रमाणें शिस्त ठेवतां आली. सर्वांस धीर देण्याकरितां तो स्वतः पायानच वाट चालत होता. राजधानीनजीक फ्रेंच सैन्य आल्यावर मॅम्लूक फौजेची गांठ पडली. ईजिप्टमधील अति प्राचीन व भव्य मनोरे या रणांगणावरून दिसत होते. युद्धास सुरुवात होण्यापूर्वी या मनोऱ्यांकडे बोट दाखवून नेपोलियन आपल्या सैन्यास म्हणाला, “ या मनोऱ्यांतून चाळीस शतकांनीं आज तुमच्या पराक्रमाकडे डोळे लाविले आहेत! ” युद्धांत नेपोलियनचा जय झाला हें सांगावयास नकोच. पुढें केरो शहरांत प्रवेश करून नेपोलियननें सर्व ईजिप्टवर अंमल बसविला.

येथील राजकीय धोरणांतील मुत्सद्दीगिरीबद्दल थिअर्स वगैरेंनीं नेपोलियनची फार प्रशंसा केली आहे. मनोऱ्यांजवळच्या प्रसिद्ध लढाईंत (२१ जुलै १७९८) मॅम्लूकांचा पराभव करून हा देश जिंकल्यानंतर नेपोलियननें येथें ज्यांच्यापासून आपणास धोका आहे त्या शूर व बुद्धिमान् मॅम्लूकजातीस डोकें वर काढण्यास सवड मिळूं नये असें राजकीय धोरण ठेविलें होतें. मागसलेल्या व मूढत्वामुळें निरुपद्रवी बनलेल्या कॉप्ट वगैरे जातीच्या लोकांची जास्त हक्क वगैरे देऊन व इतर उपायांनीं उन्नति केली, आणि यामुळें बहुसंख्याक कॉप्टजातीची कृतज्ञता संपादन करून मॅम्लूक व कॉप्ट यांचेमध्यें कायमची चुरस लावून ठेविली. परंतु त्यानें येथील अनेक शतकांची बेबंदशाही मोडून युरोपप्रमाणें सुव्यस्थित राज्यपद्धति सुरूं केल्यामुळें एक प्रकारें सर्व वर्गांसच समाधान केलें.

नेपोलियन ईजिप्टमध्यें गेला तेव्हां तेथें चांगलें बस्तान बसविल्यानंतर तो पुढें पूर्वेकडे चाल करीत हिंदुस्थानांतील इंग्लिशांवरही स्वारी करील असा तर्क करून इंग्लिशसरकारनें नेल्सनच्या हातीं एक मोठें आरमार दिलें, व त्यास नेपोलियनच्या हालचालीवर लक्ष ठेवून शक्य तितका त्रास देण्यास ईजिप्टकडे रवाना केलें. नेपोलियनच्या आरमारी अधिकाऱ्याचें गाफिलपणामुळें फ्रेंच आरमारावर नेल्सनला नाईलनदीचे मुखाजवळ तारीख १ आगस्ट रोजीं रात्रीं छापा घालतां आला. युद्धाचे वेळींही कांहीं अधिकाऱ्यांनीं मूर्खपणाचें वर्तन केल्यामुळें फ्रेंच आरमाराचा पूर्ण नाश झाला. त्यायोगानें नेपोलियन ईजिप्टमध्यें कोंडला जाऊन फ्रान्समधून सैन्य अगर सामग्री आणणें दुर्घट झालें. शिवाय इंग्लिश मुत्सद्यांनीं तुर्की सुलतान व सीरियन पाशा यांस वश करून त्यांचेकडून मोठमोठ्या फौजा नेपोलियनवर ईजिप्टमध्यें स्वारी करण्याकरितां रवाना करण्याचा सपाटा चालविला. तेव्हां फ्रेंचांस स्वतःच्याच सुरक्षितपणाची पंचाईत वाटून हिंदुस्थानकडे चाल करण्याचे वगैरे बेत राहिलेच, परंतु ईजिप्टदेश सोडून कसें तरी फ्रान्सला पोंचतां आलें तर पुरें, असें होऊन गेलें. तथापि नेपोलियनचा धीर येवढ्यानें खचला नाहीं. त्यानें माऊंट टेबर (१६ एप्रिल १७९९) येथील घोर युद्धांत तुर्की फौजेचा विध्वंस करून टाकला; व सीरियांतील खिस्ती लोक आपल्या सैन्यांत सामील करून हिंदुस्थानावर स्वारी करण्याचा निश्चय केला. परंतु मार्गांतील एकरचा किल्ला घेण्याचे कामांत मनुष्यबळ व

साधनबळ यांच्या अभावानें त्यास यश आलें नाहीं.* तेव्हां जनरल क्रुबर यास ईजिप्टचा गव्हर्नर नेमून तो फ्रान्सकडे निघून आला.

त्या काळीं इंग्रजी आरमार इतकें प्रबळ होतें कीं, इतर सर्व देशांचीं गलबतें एकत्र झालीं असतांही इंग्लिशांस भिण्याचें कारण नव्हत. असें आरमार नेपोलियनच्या शोधार्थ समुद्रांत सतत घिरट्या घालीत असतां तो त्यास चुकवून फ्रान्समधून ईजिप्टला कसा पोंचला, याचेंच सर्वांस आश्चर्य वाटत होतें. आतां परत फ्रान्सकडे जातेवेळीं तर त्याचेजवळ लढाऊ गलबतें मुळींच नव्हतीं. कारण त्यांचा नाइलच्या लढाईंत नाश झाला होता. तेव्हां अशा स्थितींतही नेपोलियन ईजिप्टमधून सुखरूपपणें परत आलेला पाहून सर्वांस किती विस्मय वाटला असेल त्याची कल्पनाच करावी. सावधगिरीचे शक्य तितके उपाय योजल्यानंतर मनास चिंतेचा बिलकुल स्पर्श होऊं द्यावयाचा नाहीं, अशी नेपोलियनची पद्धत असे. शत्रूचे अटकेंत पडण्याचे भीतीनें इतरांचे जीव धागधुग करीत असतां या सबंध प्रवासांत नेपोलियनचें चित्त इतकें शांत होतें कीं, हा काल त्यानें भूमितींतील प्रश्न सोडविण्यांत घालविला.

नेपोलियन ईजिप्टमधून परत आला तेव्हां युरोपांत फ्रेंच फौजांचा सर्वत्र पराभव होऊन शत्रूंचें सैन्य फ्रान्समध्यें घुसण्याचा रंग दिसूं लागला होता.

---

* येथें नेपोलियनला अपयश येण्यास दोन लोक कारणीभूत झाले. एक कर्नल फिलिफॉ व दुसरा सिड्ने स्मिथ्. कर्नल फिलिफॉ हा फ्रेंच ऑफिसर नेपोलियनचा सहाध्यायी होता. परंतु तो राजपक्षीय असल्यामुळें फ्रेंच रिपब्लिकच्या विरुद्धपक्षानें लढत असे. नेपोलियनजवळ तोफा मुळींच नसतांना कर्नल फिलिफॉसारख्यानें किल्ल्यांतील तोफखान्याचें काम उत्कृष्टपणें चालविल्यामुळें नेपोलियनला किल्ला हस्तगत करणें अशक्य झालें. नेपोलियनचा एक सहाध्यायी डेमासिस यानें त्याचा प्राण कसा वांचविला तें मागें सांगितलेंच आहे. दुसरा सहाध्यायी फिलिफॉ यानें त्यास पूर्वेकडे चाल करणें अशक्य केलें. सर सिड्ने स्मिथ् या इंग्लिश ऑफिसरानें किल्ल्यास समुद्राचे सामुग्रीचा पुरवठा करण्याचा सपाटा मांडला होता. हा मनुष्य नेपोलियन ईजिप्टच्या मोहिमेवर निघण्याचे सुमारासच एका बनावट हुकुमाचा उपयोग करून फान्समधील तुरुंगांतून निसटला होता. या चमत्कारिक योगायोगासंबंधानें बूरीन म्हणतो:—

"A forged order of the Minister of Police prevented the revolution of the East."

त्यामुळें फ्रेंच लोक डिरेक्टरीवर नाखुष होऊन कोणातरी धुरक्षम मनुष्याच्या हातीं राज्याचा सर्व कारभार देण्यास तयार झाले होते. अशा स्थितींत सर्वांच्या मनांपुढें नेपोलियनसारख्या अप्रतिरथ योद्ध्याची मूर्ति साहजिकपणेंच उभी राहिली. 'नेपोलियन कोठें आहे? तो येथें कां येत नाहीं?' असें लोक एकमेकांस विचारूं लागले होते. इतक्यांत नेपोलियन फ्रान्समधील फ्रेजस बंदरांत उतरला व 'एष ते वाग्विषयीभूतः स वीरः' अशी बातमी लागलीच पॅरिस येथें येऊन धडकली. ती पोंचतांच लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांस जो आनंद झाला त्याचें वर्णन करणें अशक्य आहे. रिपब्लिकची घटना ( Constitution ) ज्या चार मुत्सद्यांनीं तयार केली होती त्यांपैकीं एक मुत्सद्दी ही बातमी ऐकतांच हर्षातिरेकानें एकदम मरण पावला.

नेपोलियन यास फक्त एक जॅकोबिन पक्षाचे म्हणजे जहाल लोकसत्तावाद्यांच्या पक्षाचे लोक प्रतिकूळ होते. सर्व सत्ता नेपोलियनच्या हातीं देण्यांत यावी, अशा अर्थाची सूचना सेनेटपुढें येतांच त्या पक्षाचे लोक गडबड करूं लागले. सभेंत दंगाधोपा न होतां कांहींही निकाल झाला तरी तो सुरळीतपणें व कायदेशीर रीतीनें व्हावा म्हणून या दिवशीं नेपोलियन यास पॅरिस येथील लष्कर हाताखालीं देऊन सभागृहाबाहेर ठेवण्यांत आलें होतें. परंतु जॅकोबिन पक्षाचे लोक तो सीझर किंवा क्रॉम्वेलप्रमाणें अखेरीस स्वदेशाचा घात करील असें म्हणून त्यास 'औट-लॉ' म्हणजे कायद्याच्या संरक्षणास अपात्र ठरविण्याची सूचना आणून मतें घेऊं लागले. ज्यांच्यासंबंधीं त्या काळीं अशा सूचना पास होत, त्यांचा शिरच्छेद होण्यास विलंब लागत नसे. म्हणून आतां नेपोलियन यास स्वसंरक्षणार्थ मध्यें पडणें भाग आलें. त्यानें दाराशीं सैन्य उभें केलें, व तो स्वतः सभागृहांत शिरून व्यासपीठावर चढला. तेथून त्यानें अत्यंत धमकीचें व दर्पोक्तींनीं भरलेलें भाषण करून व लष्करी सामर्थ्याचें प्रदर्शन करून सभेंत शांततेची पुनः स्थापना केली. "जर एखादा परकीयांस फितूर असलेला भाडोत्री वक्ता माझी सीझर व क्रॉम्वेल यांच्यांशीं तुलना करील, अगर मला 'औट-लॉ' करण्याचा प्रश्न काढील तर ज्यांच्या समशेरी दरवाज्याशीं चमकत आहेत त्या शूर शिपायांस मला आंत आणावें लागेल. दैव आणि विजयश्री हीं दोन्हीं

माझ्यापुढें हात जोडून उभीं असतात हें लक्षांत ठेवा. "* असें त्यानें सभासदांस बजाविलें. परंतु तो गेल्यावर पुनः गडबड सुरू झाली. म्हणून तो पुनः आंत जाऊं लागला असतां कांहींनीं आपले खंजीर उपसून त्याचेवर वार करण्याचा प्रयत्न केला. तेव्हां नेपोलियननें खुणावल्यावरून शिपायांनीं आंत घुसून सभागृह सर्कानें खुलें केलें. दुसरे दिवशीं सभा बोलाविली असतां नेपोलियनला अनुकूल तेवढेच सभासद हजर राहिले, व त्यास 'फर्स्ट कॉन्सल' अथवा फ्रेंच रिपब्लिकचा अध्यक्ष करण्याचा ठराव पास झाला.

# प्रकरण ४ थें.

## ऑस्ट्रियावर स्वारी.

(१८००.)

राज्याचीं सूत्रें हातीं पडल्यावर नेपोलियन राज्यक्रांतीपासून फ्रान्समध्यें सर्व बाबतींत जी अव्यवस्था माजून राहिली होती तिचें निराकरण करण्याच्या उद्योगास लागला. डिरेक्टरीनें ४०,००० राजपक्षीय कुटुंबांस हद्दपार करून

---

* या भाषणाचें इंग्रजींत पुढीलप्रमाणें भाषांतर प्रसिद्ध झालें आहे:—

Citizens, Representatives, you are not acting as in the ordinary course of business; but you are at the crater of a volcano......There is talk of a new Cæsar and a new Cromwell. Citizens, if I had desired to assume such a character, it would have been easy for me to have taken that part on my return from Italy, in the moment of my most glorious triumph when the army and the parties had invited me to take it. I did not wish for it then. I do not wish for it now. But if any speaker, the hireling of foreign courts, should talk of outlawing me, I will then appeal to my brethren-in-arms whose plumes are nodding at the door. Remember that I march accompanied both by the God of fortune and by the God of war.

त्यांची मालमत्ता जप्त केली होती. नेपोलियननें सर्वांस पूर्वीच्या गुन्ह्यांबद्दल माफी जाहीर करून परत बोलावलें, व ज्यांची मालमत्ता अद्याप विकली गेली नव्हती त्यांस ती परत दिली. राज्यक्रांतींत फ्रान्सनें झुगारून दिलेल्या ख्रिस्ती धर्माची नेपोलियननें पुनः स्थापना केली. राजकीय व धार्मिक बाबतींत त्यानें सर्वांस पूर्ण मतस्वातंत्र्य ठेवलें. नंतर नेपोलियननें फ्रेंच आरमार व व्यापार यांकडे लक्ष घातलें. फक्त पांच शांततेचीं वर्षें लाभल्यास फ्रेंच आरमाराचा दर्जा आज कितीही कनिष्ठ असला, तरी मी तें पहिल्या प्रतीचें करून सोडतों, असें तो म्हणत असे. त्यानें युद्ध थांबविण्याकरितां केलेली खटपट विशेषच लोकप्रिय झाली. नेपोलियनच्या कांहीं औदार्याच्या कृत्यांनीं मनावर परिणाम होऊन रशियन झार पॉल यानें त्याजबरोबर स्नेह केला, व फ्रान्सच्या शत्रूंशीं संबंध सोडला. नेपोलियननें इंग्लंडचा राजा तिसरा जॉर्ज यास स्वहस्तानें पत्र लिहून इंग्लंड व फ्रान्ससारख्या दोन मोठ्या राष्ट्रांनीं चालू ठेवलेल्या दोघांसही अनर्थकारक अशा युद्धाचा शेवट करावा, अशी सूचना केली. या पत्रास स्वतः उत्तर देणें कमीपणाचें वाटून जॉर्जनें आपला प्रधान ग्रेन्व्हिल याचेकडून असें उत्तर लिहविलें कीं, " फ्रान्सनें मूळच्या बुर्बोन वंशांतील राजा गादीवर बसविल्याखेरीज आम्ही तहाचा विचार करण्यास तयार नाहीं. " यावर नेपोलियननें आपल्या प्रधानामार्फत उत्तर दिलें कीं, " कोणची राज्यपद्धति देशांत पाहिजे तें ठरविण्याचा हक्क त्या देशांतील लोकांचा आहे. इंग्लंडनें पहिल्या चार्लसच्या वधानंतर स्थापन केलेली लोकसत्ताक पद्धतीच कायम ठेवली पाहिजे, किंवा पदच्युत केलेल्या दुसऱ्या जेम्सच्या वंशजांस परत आणून सध्यां गादीवर असलेला राजा हांकून दिला पाहिजे, असा आम्हीं आग्रह धरणें जसें असमंजसपणाचें होईल तसेंच बुर्बोन राजासंबंधाचें इंग्लंडचें म्हणणें गैर आहे. " यास प्रत्युत्तर देण्याच्या भानगडींत इंग्लिश प्रधान पडला नाहीं. " तुम्ही सर्व लुच्चे चोर आहांत " अशा आशयाचा फ्रेंचसरकारास जबाब देऊन त्यानें पत्रव्यवहार बंद पाडला. ऑस्ट्रियाकडून नेपोलियन यास कळविण्यांत आलें कीं, 'इंग्लंड आमचें दोस्त आहे, त्याच्या सल्ल्यावांचून आम्हांस तह ठरवितां येत नाहीं.'

लवकरच इंग्लिश आरमाराचा समुद्रावर सर्वत्र धुमाकूळ सुरू होऊन फ्रेंच व्यापार जवळजवळ बंद पडला. दोन लक्ष ऑस्ट्रियन सैन्य ऱ्हाइन नदीचे

कांठच्या फ्रेंच मुलखावर स्वारी करण्यास निघालें, व दोन लक्ष दक्षिण दिशेनें फ्रान्समध्यें घुसण्याच्या इरायानें इटालींत येऊन थडकलें. तेव्हां दोन्ही ठिकाणीं फौजा पाठविणें अवश्य झालें. एक फौज जनरल मोरो याच्या हातीं देऊन त्यास एकीकडे रवाना करावें, व दुसऱ्या फौजेनिशीं आपण स्वतः जावें, असा नेपोलियननें बेत केला. मोरोचें युद्धकौशल्य नेपोलियनच्या तोडीचें आहे व त्याबद्दल नेपोलियनच्या मनांत मोरोविषयीं मत्सरभाव आहे, असा त्या वेळीं कित्येकांचा ग्रह होता. तो चुकीचा आहे असें सिद्ध करण्याकरितां नेपोलियननें मोरोस फ्रान्समधील सर्वोत्कृष्ट दोन लक्ष फौज दिली, व सुचेल येईल त्या ठिकाणीं युद्धास जाण्याची परवानगी ठेवली. तिचा पूर्ण फायदा घेऊन मोरोनें उत्तर इटालीच्या डोंगराळ मुलखांतील अवघड युद्ध न पत्करतां -हाइनचे कांठच्या सपाट प्रदेशांत लढण्याचें अंगावर घेतलें. तेव्हां, नुकतेच लष्करांत घेतलेले साठ सत्तर हजार कच्चे व तरुण शिपाई बरोबर घेऊन नेपोलियनला इटालीकडे जावें लागलें. मोरोस कांहीं लढायांत यश व कांहींत अपयश येऊन कोणत्याही प्रकारचा निकाल लागला नाहीं. नेपोलियननें मरगो येथें शत्रूंस जमीनदोस्त करून एकाच लढाईनें मोहिमेची समाप्ति केली.

इटालीकडे जावयाचें असें ठरल्यावर नेपोलियननें आपलें सैन्य आल्प्स पर्वतावरून नेऊन शत्रूच्या पिछाडीस टाकावें, व त्याचें स्वदेशाशीं दळणवळण तोडून त्याचा संहार करावा असा विलक्षण धाडसाचा बेत केला. सड्या प्रवाशासही जो पर्वत चढणें दुष्कर होतें तेथून सर्व सामानसुमानासह एखादें सैन्य नेण्याचा प्रयत्न भयंकर धोक्याचा होईल, असें लष्करी इंजिनिअरांचें मत असतांही नेपोलियननें आपला बेत फिरवला नाहीं. आल्प्स हा जगांतील अत्यंत उंच पर्वतांपैकीं असून त्यांचीं शिखरें सर्व ऋतूंत हिमाच्छादित असतात. नेपोलियननें ज्या वाटेनें आपलें मुख्य सैन्य नेण्याचें ठरविलें होतें ती ग्रेट सेंट बर्नार्ड नांवाच्या समुद्रपृष्ठापासून ८००० फूट उंचीच्या शिखरावरून जाते. सर्वत्र बर्फाचे थर पडून राहिल्यामुळें घसरण्याची भीति इतकी आहे कीं, व त्या वाटेस इतकी चढण आहे कीं, सामान्यतः पर्वतांत संचार करणाऱ्या जनावरांचेही खूर येथें ठरत नाहींत. कांहीं कांहीं ठिकाणीं तर दोन पावलें शेजारीं शेजारीं ठेवण्यासही पुरेशी रुंदी नाहीं. मधून मधून सोसाट्याचे वारे सुटतात, त्यामुळें नाकाडोळ्यांत बर्फाचे कण शिरून श्वासोच्छ्वास करण्यास

व रस्ता निरखण्यास फार पंचाईत पडते. अशा ठिकाणीं झोंक गेल्यास अगर बर्फावरून पाय घसरल्यास पाताललोकाप्रमाणें भासणाऱ्या खालच्या खोल दऱ्यांत पडून खडकावर देहाचा चुराडा उडतो. कित्येक वेळां तर जास्त उंचीच्या शिखरावरून सुटलेले बर्फाचे मैल मैल लांबीरुंदीचे खडपे वेगानें घरंगळत येऊन आपल्या सपाट्यांत झाडें, माणसें, दगड इत्यादि सर्व खालच्या दऱ्यांत वाहून नेतात. अशा प्रसंगांतून वांचल्यास प्रवासी अखेरीस सेंट बर्नार्डचें शिखर गांठूं शकतो. या ठिकाणीं सृष्टीचें अत्यंत रुद्र व भयानक स्वरूप दृष्टीस पडतें. हिमप्रलयकाळीं ( Glacial epoch ) भूपृष्ठाची कशी अवस्था होते त्याचा येथें लहानसा नमुना पहावयास मिळतो. बर्फाचीं तळीं, बर्फाच्या नद्या, बर्फाचे एकावर एक उंच डोंगर असा या वनस्पतिशून्य व पशुपक्ष्यादिहीन प्रदेशांतील देखावा आहे. गरुडपक्ष्याचीही भरारी हवेच्या विरलतेमुळें या शिखरापर्यंत पोंचूं शकत नाहीं. याच कारणामुळें येथें श्वासोच्छ्वास नीट होत नाहीं व सर्पण चांगलें जळत नाहीं.

अशा रस्त्यानें केवळ सत्तर हजार सैन्यच नव्हे तर दोनशें तोफा, वीस हजार घोडे, तंबू, व पुलांकरितां पांटूनचें सामान यासारखीं अवजड प्रकरणें नेणें हें काम किती कठीण आहे याची कोणासही कल्पना करतां येईल. ज्यानें आफ्रिकन वाळवंटाच्या निखाऱ्यांवरून सैन्यासह चाल करून पिरॅमिड्सची लढाई जिंकली त्याच जबरदस्त इच्छाशक्तीच्या मनुष्यास युरोपियन मेरूचें उल्लंघन करून मॅरेंगोची लढाई जिंकण्याचा चमत्कार करून दाखवितां येण्यासारखा होता. असें अचाट, कल्पनातीत साहसाचें कृत्य करण्यांत येईल असें शत्रुपक्षाच्या ध्यानीं मनींही नव्हतें. कांहीं अगासुगा नसतां लंबार्डींत फ्रेंच सैन्य आलेलें पाहून अंतरिक्षांतून एखादी पिशाचसेना अचानकपणें उतरल्याप्रमाणें जनरल मेलास याची गाळण उडाली. नुसतें स्वदेशाशीं दळणवळण तुटणें येवढेंच कोणत्याही सेनापतीचें धाबें दणाणून जाण्यास पुरेसें होतें. परंतु या प्रसंगीं ज्या अघटित घटनेनें दळणवळण बंद करण्यांत आलें, तिनें एखाद्या भयंकर पराभवापेक्षांही शत्रूवर फार वाईट परिणाम होऊन त्यांचें अवसान खचून गेलें.

लंबार्डींत फ्रेंच सैन्य उतरल्यानंतर त्याच्या तुकड्या व ऑस्ट्रियन फौजेच्या तुकड्या यांच्या गांठी पडून चकमकी झडूं लागल्या. अखेरीस मॅरेंगोच्या रणांगणावर मोठें युद्ध होऊन ऑस्ट्रियाचा पुरा मोड झाला. तेव्हां त्यांनीं युद्ध

थांबवून तहाचा विचार करण्यास मुदत मागितल्यावरून नेपोलियन स्वदेशीं परतला. परंतु कांहीं सबबीवर त्यांनीं पांच चार महिने काढले व तेवढ्यांत तयारी करून ते पुनः युद्धास उभे राहिले. तेव्हां नेपोलियननें मोरोस फौजेसह पुनः रवाना केलें. त्यानें शत्रूंचा होहेनलिंडन येथें पराभव केल्यामुळें ल्यूनेव्हिलचा तह ठरला ( ९ फेब्रुवारी १८०१ ).

ग्रंथ संग्रहालय ठाणे ९१३

# प्रकरण ५ वें.

## इंग्लंडवरील स्वारीची तयारी; राजपद.

( १८०१-०४. )

या मोहिमेंत ऑस्ट्रियनांचा पुरा मोड करूनही नेपोलियननें ल्यूनेव्हिलच्या तहांत कँपोफोर्मिओच्या तहापेक्षां एकही जास्त शर्त घातली नाहीं याचें इतिहासकारांस आश्चर्य वाटत आहे. " फ्रान्सकरितां केवळ शांतता संपादन करण्याची माझी इच्छा होती. दुसऱ्याचे मुलूख जिंकण्याची मला मुळींच वासना नव्हती. म्हणून मीं शक्य असतांही शत्रूंवर कडक शर्ती लादल्या नाहींत " असें नेपोलियन म्हणतो. ऑस्ट्रियाची युद्धाची हौस जिरविल्यानंतर नेपोलियननें इंग्लंडकडे लक्ष फिरविलें. इंग्रजी आरमार इतकें प्रबळ होतें कीं, तें करील तें प्रमाण अशी समुद्रावर स्थिति होती. वाटेल त्या राष्ट्राच्या वाटेल त्या गलबताचा वाटेल त्या प्रसंगीं झाडा घेण्याचा व त्यांतील माल इष्ट वाटल्यास जप्त करण्याचा आम्हांस पूर्ण हक्क आहे, असें इंग्लिश सरकारनें जाहीर केलें. हें कृत्य केवळ फ्रान्सलाच नव्हे, तर इतर राष्ट्रांसही अपमानास्पद वाटलें. म्हणून इंग्लंडला हा हक्क सोडण्यास भाग पाडण्याकरितां नेपोलियनला फ्रान्स, रशिया, डेन्मार्क, हॉलंड व स्वीडन यांचा स्नेह जमवून आणतां आला. यामुळें इंग्लंडला फार काळजी उत्पन्न झाली. परंतु एका आकस्मिक प्रकारानें इंग्लंडची या संकटांतून लौकरच सुटका झाली. झार पॉल याचा राजवाड्यांत एकाएकीं खून झाला ( २४ मार्च १८०१ ); व इंग्लिशांस अनुकूल असलेला त्याचा मुलगा आले-

क्झांडर रशियाच्या गादीवर आला. या खुनांत इंग्लंडचें अंग होतें असें कांहींचें म्हणणें आहे. परंतु खुनाची बातमी समजतांच नेल्सन व रशियांतील इंग्रजी वकील लॉर्ड व्हिटवर्थ यांस दुःख व आश्चर्य वाटलें; तेव्हां वरील ह्मणण्यांत बिलकुल तथ्य नसल्याचें सिद्ध होतें, असें लॅन्फ्रे हा चरित्रकार लिहितो. शत्रूंच्या गोटांतून रशिया कमी झाल्यावर इंग्लिशांनीं डेन्मार्कच्या कोपनहेगन बंदरांतील गलबतें पाडाव करून आणण्याकरितां नेल्सनची रवानगी केली. नेल्सननें केवळ बंदरांतील गलबतांशीं युद्ध न करितां शहरा-वरही भडिमार केला. बायकामुलांच्या रक्तानें शहर भरून गेलेलें पाहून कोपन-हेगनच्या गव्हर्नरानें आंपलें सामर्थ्य व इभ्रत यांचा विचार बाजूस ठेविला व तो आपलें आरमार इंग्लिशांचें स्वाधीन करण्यास कबूल झाला ( २ एप्रिल. १८०१ ).

अशा कारणांनीं रशिया व डेन्मार्क यांनीं फ्रान्सचा पक्ष सोडल्यावर इतर लहान राष्ट्रांनींही इंग्लंडचा झाडा घेण्याचा हक्क मान्य केला. तेव्हां एकट्या फ्रान्सलाच स्वतःच्या व इतरांच्या समुद्रावरील स्वातंत्र्यासाठीं इंग्लिशांशीं दोन हात करणें भाग आलें. नेपोलियनजवळ लढाऊ आरमार मुळींच नव्हतें असें म्हटलें असतां चालेल. इतर कांहीं राष्ट्रांच्या आरमाराचा उपयोग होण्याची संधि आली होती तीही वर सांगितल्या प्रकारानें नष्ट झाली. करितां गुमपणें इंग्लिश किनाऱ्यावर उतरण्याचा त्यानें विचार केला. इंग्लिश आरमारास चुकवून इंग्लंडांत सैन्य उतरविणें हें फार तर दोन तऱ्हेच्या प्रसंगींच करतां येण्याजोगें होतें. एक प्रसंग धुक्याचा व दुसरा वादळानंतरचा. वादळ सुरू असेपर्यंत इंग्रजी लढाऊ गलबतांस इंग्लिश चॅनेलमध्यें राहणें अशक्य होऊन उघड्या समुद्राकडे जावें लागत असे, व तें शांत झाल्याखेरीज परत येतां येत नसे. म्हणून धुक्यानें दिशा धुंद झाल्या असतां, अगर वादळ सुरू झाल्यापासून ते शांत होऊन इंग्रजी गलबतें चॅनेलमध्यें परत येण्याचे अवधींत झपाट्यानें आपलें सैन्य गनबोटींतून नेऊन इंग्लंडांत उतरावें, असा नेपोलियनचा बेत होता. इंग्लंड-च्या दक्षिण किनाऱ्यावरील कोणत्याही स्थानीं धाडसी शत्रूंस अशा प्रसंगीं उतरतां येणें अशक्य नाहीं असा ड्यूक आफ वेलिंग्टनचाही अभिप्राय होता. नेपोलियनच्या पूर्वचरित्रावरून तो गत्यंतर नसल्यास कोणत्याही तऱ्हेचें साहस करण्यास मागेंपुढें पाहणार नाहीं, अशी ब्रिटिश सरकारची खात्री

झाली होती. करितां त्यांनीं नेपोलियननें बोलोन बंदरांत जमविलेल्या शेंकडों गनबोटी पकडून आणण्याकरितां नेल्सनची रवानगी केली. नेल्सन ४ आगस्ट १८०१ रोजीं पहांटे बोलोनजवळ आला. एकसारखा १६ तासपर्यंत भडिमार करून त्यानें बोटींशीं लगट करण्यासाठीं शर्थीचा प्रयत्न केला. परंतु अखेरीस त्याचा पूर्ण पराभव झाला. कोपनहेगन सर केलेल्या या वीरास हा अपमान अर्थातूच सहन झाला नाहीं. तो जास्त गलबतें घेऊन १६ तारखेस पुनः आला. परंतु त्याची पूर्वीपेक्षांही जास्त दुर्दशा झाली. तेव्हां हें प्रकरण मूळ अंदाजाहूनही जास्त जड आहे, असें इंग्लिश सरकारास वाटूं लागून त्यांची तहाकडे प्रवृत्ति होऊं लागली. इंग्लंड व आयर्लंडमध्यें या वेळीं मोठा दुष्काळ पडला असल्यामुळें लोकही या निष्कारण युद्धांच्या पायीं बसविण्यांत आलेले कर भरण्यास असमर्थ होऊन युद्ध थांबविण्याबद्दल ओरड करूं लागले. तेव्हां इंग्लंडचा युद्धप्रिय प्रधान विल्यम पिट यास राजीनामा द्यावा लागला. नवा प्रधान ॲडिंग्टन यानें नेपोलियनबरोबर तह केला (आक्टोबर १८०२). या तहास अमीन्सचा तह असें म्हणतात. यांत नेपोलियननें इजिप्त देश सोडावा, व इंग्लंडनें सीलोनखेरीज या काळांत जिंकलेलीं माल्टासारखीं सर्व बेटें सोडून द्यावीं असें ठरलें. या तहानें दोन्ही देशांत जितका आनंद झाला व त्याचेसाठीं जसा उत्सव करण्यांत आला तसा दुसऱ्या कोणत्याही तहानिमित्त झाल्याचें प्रसिद्ध नाहीं.

नेपोलियननें फर्स्ट कॉन्सल झाल्यावर थोड्याच अवकाशांत राज्यक्रांतीपासून सुरूं झालेली बेबंदशाही बंद करून राज्यकारभारांत इतक्या सुधारणा केल्या कीं, त्याचे सन्मानार्थ विजयस्तंभ बांधण्याची पॅरिसच्या लोकांस इच्छा झाली; व या गोष्टीस संमति देण्याबद्दल त्यांनीं नेपोलियनला विनंति केली. परंतु नेपोलियननें हरकत घेऊन पुढीलप्रमाणें उत्तर दिलें:—" या सूचनेबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहें. स्तंभ कोणत्या ठिकाणीं बांधावयाचा तें स्थळ आतां निश्चित करून ठेवा. परंतु तो बांधण्याचें काम पुढील पिढ्यांचें आहे. लोकांचें आज मजबद्दल जें मत झालें आहे तेंच भविष्यकाळींही कायम राहिलें तरच स्तंभ उभारला जाण्यांत अर्थ आहे. "

अमीन्सचा तह घडून येण्यास जितका कठीण तितकाच मोडून जाण्यास सोपा ठरला. युद्धामुळें फ्रान्समध्यें व फ्रान्सच्या वर्चस्वाखालील देशांत इंग्रजी

मालाचा खप बंद झाला होता. तो तहानें पूर्ववत् सुरू होईल असा अंदाज इंग्लंडनें केला होता. हा अंदाज खोटा ठरला. नेपोलियननें इंग्रजी मालावर जबर प्रतिबंधक जकाती बसवून व फ्रेंच कारखान्यांस देणग्या ( बोंटी ) देऊन फ्रेंच व्यापार झपाट्यानें भरभराटीस आणिला. बीटरूटपासून कृत्रिम साखर तयार करण्याच्या वगैरे कांहीं कला ज्या या वेळीं फ्रान्समध्यें निघाल्या त्यांचें श्रेय नेपोलियन यासच आहे. याप्रकारें तहापासून इंग्लंडचा कांहीं फायदा होईनासा झाला. म्हणून नेपोलियननें तहाच्या शर्ती जरी तंतोतंत पाळल्या होत्या तरी तहांत ठरल्याप्रमाणें इंग्लंडनें माल्टाबेट सोडण्याचें साफ नाकारलें; व त्या बाबतींत नेपोलियननें आग्रह धरल्यावरून फ्रान्समधील आपला वकील परत बोलाविला. "इंग्रजी वर्तमानपत्रांतून व इंग्लंडांत प्रसिद्ध होणाऱ्या राजपक्षीय फ्रेंच पत्रांतून माझी नालस्ती होत आहे." अशी नेपोलियननें इंग्लिश प्रधानमंडळाकडे तक्रार केली असतां त्यास असें उत्तर देण्यांत आलें कीं, "वर्तमानपत्रांच्या हक्कांत आम्हांस ढवळाढवळ करतां येत नाहीं. कांहीं पत्रांत आपली बदनामी करण्यासारखे लेख येत असल्यास त्यांविरुद्ध इंग्लिश कोर्टांत फिर्याद आणण्याचा मार्ग आपणांस आमच्या कायद्यानें खुला ठेविला आहे. या खटल्याचे रिपोर्ट देतेवेळीं आपणांस आक्षेपार्ह वाटत असलेले लेख वर्तमानपत्रांतून पुनः छापले जातील ही गोष्ट आम्हांस बंद करतां येण्यासारखी नसल्यामुळें आपणांस सहन करावी लागेल."

यानंतर युरोपांत जें युद्ध माजलें तें १८१५ सालपर्यंत सतत सुरू होतें. बारा वर्षेंपर्यंत युरोपास प्रचंड होमकुंडाचें स्वरूप आलें होतें. या भयंकर नरमेधाबद्दलची जबाबदारी नेपोलियननें पिटवर* टाकली आहे.

---

* नेपोलियननें सेंट हेलेना येथें एके वेळीं पिटसंबंधानें काढलेल्या उद्गारांचें असें इंग्रजी भाषांतर करण्यांत आलें आहे:—

Pitt was the master of European policy. He held in his hand the moral fate of nations. But he made an ill use of his power. He kindled the fire of discord throughout the universe and his name, like that of Eostratus, will be inscribed in history amid flames, lamentations and tears. Twenty-five

( पुढें चालू. )

परंतु तो व त्याच्या पक्षाचे लेखक म्हणतात त्याप्रमाणें केवळ युरोपांतील लोकपक्षास हाणून पाडण्याकरितां पिट् व इंग्लंडांतील बडे लोक युद्धास प्रवृत्त झाले होते असें दिसत नाहीं. लोकसत्तेचा पुरस्कार करण्याचे मिषाखालीं फ्रान्सच्या मनांत सर्व जग पादाक्रांत करण्याची, व विशेषतः इंग्लंडचा पाडाव करण्याची, असुरी महत्वाकांक्षा दडली होती अशी ब्रिटिश पुढाऱ्यांची खात्री होती. फ्रान्स व इतर देशांतील राजपक्षीय व प्रजापक्षीय चरित्रकारांत अशा तऱ्हेचा वाद बराच आढळतो. या प्रकरणीं ब्रिटिश पक्षाचें समर्थन जे. एच्. रोज यांचे ग्रंथांत उत्कृष्टपणें केलेलें दिसून येतें. असल्या प्रश्नांचा येथें केव्हांही खल करण्याचा विचार नाहीं नेपोलियनच्या युद्धादि कृत्यांतील हेतूंबद्दल त्याचें स्वतःचें काय म्हणणें आहे तें त्याच्या चरित्रांत देणें अवश्य असल्यामुळें येथें तें बरेच वेळां त्याच्याच शब्दांत अगर सारांशरूपानें दुसऱ्या शब्दांत सांगितलें आहे. परंतु त्यांतील ग्राह्य भाग सावधगिरीनेंच ठरवावा लागेल. आपलें वर्तन एखाद्या महात्म्यासारखें दाखविण्याकरितां नेपोलियननें आपली महत्वाकांक्षा व युद्धातुरता यांबद्दल

---

years of universal conflagration, the revolution and devastation of Europe, the bloodshed of nations, the frightful debt of England by which all these horrors were maintained, the pestilential system of loans by which the people of Europe are oppressed, the general discontent that now prevails—all must be attributed to Pitt. Posterity will brand him as a scourge. The man, so lauded in his own time, will hereafter be regarded as the genius of evil. Not that I consider him to have been wilfully atrocious, or doubt his having entertained the conviction that he was acting right. But St. Bortholomew has also its conscientious advocates, and we have no right to doubt their perfect sincerity. Such is the weakness of human reason and judgment! But that for which posterity will above all execrate the name of Pitt, is the hateful school which he has left behind him; its insolent Machiavellism, its profound immorality, its cold egotism, and its utter disregard of justice and human happiness. There was a touch of Sylla in Pitt's character. His system held the popular cause in check and brought about the triumph of the patricians.

लोकांची नजरबंदी करण्याचा बराच यत्न केला आहे. त्यामुळें, व कांहीं प्रसंगीं त्यास खरोखरच निव्वळ स्वसंरक्षणार्थ लढावें लागल्यामुळें, त्याच्या सात्विकते-बद्दल सीली यांनीं म्हटल्याप्रमाणें बरीच ' दंतकथा ' उठली आहे.

या युद्धांत पिटनें इतर राष्ट्रांचें साह्य घेण्याचें कारण नव्हतें, असें स्कॉटचें मत आहे. परंतु ॲलिसननें सांगितल्याप्रमाणें, जलयुद्धांत इंग्लंड अजिंक्य असलें तरी तें स्थलयुद्धांत फ्रान्सविरुद्ध टिकणार नाहीं, अशी त्या काळीं इतर देशांत व खुद्द इंग्लंडांतही समजूत होती वेलिंग्टन जेव्हां स्पेनमध्यें उतरला, व प्रथम तेथील कमकुवत फ्रेंच सैन्यावरही स्पॅनिशांस यश येत नसतां, पुढें वेलिंग्टननें जास्त जास्त अनुभविक फ्रेंच सेनापती स्पेनमध्यें येऊं लागल्यावरही जय मिळवून दाखविले, व इंग्लिश सैन्याची शिस्त वगैरे बाबतींतही हळूं हळूं चांगली सुधारणा केली, तेव्हांपासूनच स्थलयुद्धाबद्दल इंग्लंडची सर्वत्र ख्याति होऊं लागली. तेव्हां इंग्लिशांत प्रथम उत्पन्न झालेला आत्मप्रत्यय वाटर्लूच्या लढाईनें दृढ झाला. परंतु आरंभीं अशी स्थिति नसल्यामुळें इंग्लंडनें इतर राष्ट्रांचें साह्य घेतलें. या युद्धांत यश आलें तें इंग्लंडच्या नेतृत्वामुळेंच. इतर राष्ट्रांचा उत्साह मंद झाला असतां तो उदारहस्तें द्रव्यसहाय्य देऊन जागृत करणें, नेपोलियनच्या स्वारीचा प्रतिकार करणारांस मदत करणें, ज्या देशांतील लोकांनीं पराजित होऊन नेपोलियनला आपल्यावर अंमल स्थापूं दिला असेल त्यांस पारतंत्र्याचें जूं झुगारून देण्यास प्रोत्साहन देणें, व ते स्वातंत्र्यार्थ नेपोलियन-विरुद्ध बंड करूं लागल्यावर त्यांच्या साह्यास आपली फौज रवाना करणें, फ्रेंच आरमाराचा समुद्रावर समाचार घेणें, वगैरे दीर्घ यत्न इंग्लंडनें केले नसते तर नेपोलियनच्या तावडींतून कोणाचीही सुटका झाली नसती. म्हणून इंग्लंडनें या युद्धांत स्वार्थाप्रमाणें परार्थही साधला असें समजलें जातें.

नेपोलियनच्या सद्धेतूबद्दल साशंक वृत्तीनें माल्टा बेट सोडण्याचें इंग्लंडनें नाकारल्यामुळें अमीन्सचा तह मोडल्यावर इंग्लंडनें सर्व प्रकारचीं फ्रेंच गलबतें आंतील लोकांसह पाडाव करण्यास सुरवात केली; व नेपोलियननें फ्रेंच वर्चस्वा-खालच्या सर्व देशांत १८ व ६० वर्षांच्या दरम्यान वयाचे जेवढे इंग्रज मिळतील तेवढे कैद करण्याचा हुकूम सोडला. समुद्रापलीकडील फ्रान्सच्या मालकीचे सर्व प्रदेश आतां इंग्लिशांचे हातीं पडणार असें पाहून नेपोलियननें लुईसिआना ही फ्रेंच वसाहत युनैटेड स्टेट्सला विकून टाकली.

जलावर प्रभुत्व असणाऱ्या इंग्लिशांस नेपोलियनचें अनेक प्रकारानें नुकसान करतां येण्यासारखें होतें. परंतु स्थलावर सार्वभौम सत्ता गाजविणाऱ्या नेपोलियनला इंग्लंडचें नुकसान करण्याचा एकच मार्ग होता. युरोपियन कांटिनेंटवर इंग्लंडचा जो हॅनोव्हर प्रांत होता तो नेपोलियननें फौज पाठवून तेव्हांच हस्तगत केला, व १५००० सैन्य कैद करून ४०० तोफा व अगणित युद्धसामग्री पाडाव केली.

नेपोलियनला आतां इतर शत्रूंचा त्रास न उरल्यामुळें इंग्लंडवर स्वारी करण्याच्या तयारीकडे सर्व लक्ष घालतां आलें. त्यानें बोलोन, टुलून, फेरोल, व ला रॉचेटा या बंदरांत एकंदर २००० गनबोटी जमविल्या; व त्यावरून अचानकपणें वाहून नेण्याकरितां तीन लक्ष सैन्य किनाऱ्यानजीकच आणून ठेविलें. १८०१ सालापेक्षां या सालाची ( १८०४ ) तयारी जास्त व्यवस्थित व जास्त मोठ्या प्रमाणावर होती. इंग्लंडांत उतरतांना गोंधळ होऊं नये म्हणून बोटींतून किनाऱ्यावर उतरण्याची व किनाऱ्यावरून बोटीवर चढण्याची शिपायांकडून व घोड्यांकडून अनेक वेळां कवाईत घेण्यांत येत असे. यामुळें चढण्याउतरण्याचे प्रसंगीं कोणकोणत्या अडचणी येऊं शकतात तें अनुभवानें समजत असे. या सर्व अडचणींवर युक्त्या काढून त्यांचा उपयोग होतो किंवा नाहीं तें प्रयोगानें दिसून येत असे. या सर्व तयारीवर नेपोलियनची प्रत्यक्ष देखरेख होती. साम्राज्याच्या सर्व खात्यांचें काम पहावयाचें असल्यामुळें त्याचा सर्व वेळ जरी बांधल्यासारखा असे, तरी तो एकदोन दिवसांआड पॅरिसपासून १८० मैल अंतरावर असलेल्या बोलोन बंदरीं आल्याशिवाय रहात नसे. एके दिवशीं (२ आगस्ट १८०४) तो बोलोन येथें असतांना त्यास एक छोटेसें दर्यायुद्ध करण्याचाही प्रसंग आला होता. तो गलबतांची तपासणी करीत असतां एका इंग्रजी काफिल्यानें येऊन हल्ला केला. तेव्हां नेपोलियनची किनाऱ्यावर परत जाण्याबद्दल अधिकारी विनवणी करीत असतांही तो स्वतः कांहीं गलबतें घेऊन युद्धास पुढें सरसावला. त्याचें गलबत फार थाटानें शृंगारलेलें असल्यामुळें त्यांत तो स्वतः असल्याचें इंग्लिशांस कळून आलें; व त्यांनीं त्या गलबतावर विशेष जोराचा भडिमार चालविला. परंतु नेपोलियननें विशेष कौशल्यानें इंग्लिश गलबतांच्या मर्मस्थानीं अचूक

मारा केल्यामुळें त्यांत फार मोडतोड होऊन तीं पटापट निकामी होऊं लागलीं. एक तर बुडून गेलें. तेव्हां इंग्लिश काफिल्यास परत फिरणें भाग आलें. या चकमकींत १२० इंग्रज व २० फ्रेंचमन कामास आले.

नेपोलियन इतक्या दृढनिश्चयानें स्वारीच्या तयारीस लागल्यावर लंडनमध्यें येऊन राहिलेले पूर्वीच्या फ्रेंच राजाचे नातेवाईक व बडे राजपक्षीय लोक यांचे नेपोलियनविरुद्ध जे प्रयत्न चालले होते त्यास इंग्रजी प्रधानमंडळानें पैशाचा व सामग्रीचा पुरवठा करून प्रोत्साहन देण्यास सुरुवात केली. हे लोक नेपोलियनविरुद्ध उघड युद्ध करतील अशी इंग्लिश मुत्सद्यांची कल्पना झाली असावी हें उघड आहे. परंतु ते नेपोलियनचा गुप्तपणें खून करण्याच्या खटपटींत होते; व ब्रिटिश सरकारच्या अपुऱ्या माहितीमुळें त्यांस वाटेल तितकी साधनसामग्री मिळवितां आली. कांहीं कटवाल्यांनीं नेपोलियनवर कुलपी गोळे फेंकून अगर त्याची गाडी ज्या वाटेनें जावयाची असेल त्या वाटेवर सुरुंग लावून ठेवून अगर एअर-गन व इतर कांहीं नवीन शस्त्रास्त्रांचा त्याचेवर प्रयोग करून त्याचा खून करण्याचे अनेक यत्न केले. परंतु त्या सर्वांतून नेपोलियन बचावला. पंचवीस तीस कट मात्र पूर्णतेस पोंचण्याचे आंत फ्रेंच पोलिसांनीं उघडकीस आणिले. नेपोलियनचा खून करण्याचे असे वारंवार प्रयत्न होत तरी तो शरीरसंरक्षणासाठीं कांहींही उपाय योजीत नसे. बॉडीगार्ड बरोबर घेतल्याखेरीज न हिंडणें, राजधानींतून अगर बाहेर फिरण्याचे प्रसंगीं वेळ व मार्ग यासंबंधीं गुप्तपणा राखणें, अंगांत नेहमीं कोटाखालीं चिलखत घालणें, राजवाड्यांशीं व विशेषतः निजण्याचे जागीं पहारा ठेवणें वगैरे राजेलोकांचे उपाय त्यास आग्रहानें सुचविण्यांत आले असतां त्यानें ते मान्य केले नाहींत. बुर्बोन राजवंशांतल्या लोकांसंबंधानें तो ह्मणे कीं " हे लोक परदेशीं राहून माझा खून करण्याचा यत्न करतात. परंतु मीं त्यांचा खून व्हावा येवढी फक्त इच्छा प्रदर्शित केली तरी माझी लोकप्रियता इतकी आहे कीं हे लोक पृथ्वीच्या पाठीवर कोठेंही असले तरी तेथें त्यांचा खून होऊन जाईल. परंतु पापकर्म करण्याचें माझ्या मनांतही येत नाहीं. "

लंडनमध्यें तयार झालेल्या या सर्व कटांत अत्यंत प्रसिद्ध म्हणजे फ्रान्सच्या गादीचा आपणास वारस समजणारा कौंट ऑफ आर्टाय, त्याचे आप्त कौंट ऑफ मॉन्टेस व ड्यूक ऑफ एनगाएन, होहेनलिंडनची लढाई

जिंकलेला जनरल मोरो, जनरल लॅंजोलेस, पॉलिमॅक, हॉलंडदेश जिंकलेला जनरल पिचेग्र्यू वगैरे बड्या बड्या लोकांनीं केलेला कट होय. याचा खुद्द नेपोलियननेंच मोठ्या शिताफीनें सुगावा काढून पुढें त्यासंबंधानें रोजची माहिती गुप्तपणें ठेविली होती. या बड्या कटवाल्यांस व त्यांनीं खुनाचें कृत्य करण्याकरितां पदरीं ठेविलेल्या बदमाषांस एका काळोख्या रात्रीं इंग्रजी गलबतांनीं फ्रान्सच्या किनाऱ्यावरील एका सुरक्षित ठिकाणीं गुप्तपणें आणून सोडलें. व ते चोरवाटांनीं हलके हलके पॅरिस येथें पोंचलें. तेव्हां नेपोलियननें पॅरिसच्या वेशी एकदम बंद करून त्यांस कैद केलें. सर्वांनीं मर्दपणें कोर्टापुढें गुन्हा कबूल केला, व त्यांस कायद्यांतील शिक्षा सांगण्यांत आल्या. परंतु नेपोलियननें आपला माफीचा अधिकार बजावल्यामुळें शिक्षेची अंमलबजावणी मात्र थोड्यांवरच झाली. भलत्याच मनुष्याशीं आपली बरोबरी कल्पून मत्सरबुद्धीनें नीच कृत्यास प्रवृत्त झालेल्या मोरोसारख्या शूर व हाडाच्या चांगल्या मनुष्याची नेपोलियन यास कींव आली; व त्यानें मोरोस माफी करून अमेरिकेस पोंचविलें. पॉलिग्नॅक व लॅंजोलेस यांच्या बायकामुलांनीं हरतऱ्हेचे यत्न करून नेपोलियनच्या दृष्टीस पडून दया दाखविण्याबद्दल प्रार्थना करण्याची संधि मिळविली. अशी गांठ पडूं दिल्याबद्दल नेपोलियन प्रथम द्वारपालांवर जरी अत्यंत क्षुब्ध झाला तरी या बायकामुलांची शोकविह्वलता पाहणें व त्यांचे करुणविलाप ऐकणें त्यास सहन झालें नाहीं; व आपला भर रस्त्यावर मुडदा पाडण्यास उद्युक्त झालेल्या या बदमाषांबद्दल नेपोलियननें जागचेजागीं माफीहुकूम लिहिला. ड्यूक ऑफ एनगाएन यासही माफी करण्याचा नेपोलियनचा विचार होता. परंतु तसा हुकूम करण्यापूर्वीच शिक्षेची अंमलबजावणी झाल्याचें त्यास समजलें. हा ड्यूक राजकुलांतील मनुष्य असल्याकारणानें त्यास झालेल्या देहांतशासनानें युरोपियन राजमंडळांत अनिवार संताप उत्पन्न झाला. नेपोलियनच्या प्रतिपक्षीयांनीं लिहिलेल्या इतिहासग्रंथांत या ड्यूकास झालेल्या शिक्षेच्या अंमलबजावणीस खून असें स्पष्ट नांव दिलें आहे; व त्याचें वर्णन करितांना बेसुमार त्वेषाची भाषा वापरली आहे. हें ड्यूक डिएनूगाएन प्रकरण नेपोलियनच्या कीर्तीस कालिमा आणणाऱ्या प्रकरणांत गणलें गेलें आहे. परंतु नेपोलियनपक्षाच्या लेखकांस यांत कांहींच गैर दिसत नाहीं.

या कटामुळें फ्रान्समधील लोकमत राजपक्षीयांविरुद्ध फार खवळून गेलें व नेपोलियनबद्दलचा आपला विश्वास व कृतज्ञता व्यक्त करण्याकरितां

राष्ट्रानें त्यास बादशहा ही पदवी धारण करण्याची विनंति केली. लोकसत्ताक पद्धति फ्रान्समध्यें टिकूं दिल्यास तिचें अनुकरण इतरत्र होऊं लागेल या भीतीनेंच युरोपांतील राजमंडळानें फ्रान्सच्या गादीवरील बुर्बोनवंशाचा पक्ष धरला होता, व फ्रान्सवर एकामागून एक जुटीनें स्वाऱ्या करण्याचा सपाटा चालविला होता. तेव्हां फ्रान्समध्यें राजसत्ताक पद्धति सुरू केल्यास कोणती व्यक्ति गादीवर आहे याबद्दल फारशी पर्वा न करितां, युरोपियन राजे फ्रान्सशीं पूर्ववत् स्नेहभावानें राहण्यास तयार होतील, असा नेपोलियनचा अंदाज होता. त्याप्रमाणें त्यानें प्रश्न केल्यावरून, प्रशिया, ऑस्ट्रिया, स्पेन व इतर कांहीं लहान राष्ट्रें यांनीं, फ्रान्सनें नेपोलियनला बादशहा केल्यास आपणास फार संतोष होईल, असें कळविलें. शिवाय अमेरिकनांप्रमाणें फ्रेंच लोक लोकसत्ताक पद्धतीस पात्र झाले नाहींत, व शेजारच्या राष्ट्रांपासून उपसर्ग न होतां ती पद्धति अमेरिकनांस जशी टिकवितां आली तशी फ्रान्सला येणार नाहीं, असें गेल्या पंधरा वर्षांत फ्रेंच मुत्सद्यांनीं व लोकांनीं केलेल्या अत्याचारांवरून व फ्रान्सवर झालेल्या परकीयांच्या स्वाऱ्यांवरून सिद्ध झालें होतें. फ्रान्सनें १७८९ सालीं लोकसत्ताक पद्धति स्थापन करण्याकरितां महत्प्रयासानें राजकीय क्रांति घडवून आणली, व ती टिकविण्याकरितां इतर राष्ट्रांशीं लढण्याचे कामीं पैसा व रक्त पाण्याप्रमाणें खर्च केलें, त्या सर्वांचा मोबदला कांहींही न मिळतां पुनश्च राजसत्ताक पद्धतीचा अंगिकार केल्यानें पूर्वीचे श्रम व्यर्थ होणार असाही आक्षेप कोणास घेतां येण्याजोगा नव्हता. कारण जरी पुनः राजसत्ताक पद्धति स्थापन झाली तरी पूर्वीचा बुर्बोन वंश स्वस्थानापन्न व्हावयाचा नव्हता. बुर्बोन वंशाकडून राजपद काढून तें बोनापार्ट वंशास समर्पण करण्यांत प्रजेस १७८९ पूर्वीं नसलेला इष्ट वाटल्यास राजवंश बदलण्याचा हक्क स्थापित होणार होता. हा मोबदला लहानसहान नव्हे, असें विचारी फ्रेंच मुत्सद्यांचें मत होतें. करितां नेपोलियननें राजपद स्वीकारण्याची राष्ट्राची विनंति मान्य केली. नेपोलियनपुढें रोज बादशहा हा किताब धारण करण्याबद्दल अनेक संस्थांनीं स्वयंस्फूर्तीनें केलेल्या अर्जांचे ढीग पडत होते. परंतु प्रत्यक्ष राज्याभिषेकसमारंभ करण्यापूर्वीं फ्रेंच रिपब्लिकनें घालून दिलेल्या वयाच्या व प्राप्तीच्या निर्बंधाप्रमाणें ज्यांस मताचा हक्क पोंचत होता त्या सर्व व्यक्तींचें मत घेण्याचा नेपोलियननें आग्रह धरिला. त्यास ३५७२३२९ मतें अनुकूल व २५६९ प्रतिकूल पडलीं. मर्यादित राजसत्तेबद्दल प्रसिद्ध असलेल्या

युरोपच्या इतिहासांत इतक्या बहुमतानें कोणाची राजपदाचे जागीं निवड झाल्याचा दाखला सांपडणार नाहीं. नेपोलियनवर महत्वाकांक्षेचा आरोप करणारांस तो असें उत्तर देत असे कीं, 'मला फ्रान्सची गरज नाहीं, फ्रान्सलाच माझी गरज आहे; मला ऐश्वर्योपभोगाची हौस नव्हती, व राजपदावर आरूढ झाल्यावरही मला त्याची चटक लागली नाहीं.' गादी बळकावल्याचा आरोप करणारांस त्याचें असें उत्तर असे कीं, 'फ्रान्सचा राजमुकुट मीं बळकावला नाहीं. तो कित्येक वर्षे गटारांत पडला होता. तेथून उचलून तो फ्रान्सनें माझ्या मस्तकावर ठेविला.' *

राज्यारोहणाचा समारंभ ता. २ डिसेंबर १८०४ रोजीं अपूर्व थाटानें करण्यांत आला, हें सांगावयास नकोच. समारंभास जे अनेक मांडलिक हजर होते ते दांत व नखें काढलेल्या सिंहाप्रमाणें नसून खरेखुरे राजे होते. युरोपांत नेपोलियनची इतकी अमर्याद सत्ता होती कीं, राज्याभिषेक करण्यास खुद्द

---

* The charge of usurpation is also brought by some republicans. We have already observed that upto the time when Napoleon took the reins of government, no Republic can be said to have existed in France. We need, then, only ask whether the tendency of France was towards a republic and whether Napoleon ought to have lent his power to establish it provided he could have seen the possibility of its permanence. The forms of Government, important as they are, are but secondary, compared to the primary elements of national character and political condition, and are always dependent on the latter. The preservation of the new politico-social relations was also to be attended to. If a republic was incompatible with justice, safety of person and property, internal peace or national independence, the former ought to have given way to the latter. We believe, that there are few persons of judgment who at present maintain that at that period, a republic would have comported with the internal and external relations of France.

—*Encyclopadia Americana.*

( Quoted by J. S. C. Abbott. )

पोपमहाराज पॅरिस येथें आले होते. अशा कारणाकरितां पूर्वी कोणताही पोप रोमशहर सोडून गेल्याचें इतिहासांत नमूद नाहीं. पोपचा अधिकार आपल्यापेक्षां तात्विक दृष्ट्याही श्रेष्ठ असल्याचें कबूल करण्याची इच्छा नसल्यामुळें नेपोलियननें समारंभाचे अखेरीस रीतीप्रमाणें पोपला आपले मस्तकावर मुकुट ठेवूं न देतां तो स्वहस्तानें उचलून आपले मस्तकावर ठेविला.

इतर राष्ट्रांच्या विरोधामुळें खुद्द फ्रान्सलाच लोकसत्ताक पद्धति सोडावी लागलेली पाहून फ्रेंच रिपब्लिकच्या आश्रयानें राहणाऱ्या इटालींतील सिसाल्पाइन रिपब्लिकनें राजसत्ताक पद्धति स्वीकारण्याचें ठरविलें, व नेपोलियनला इटालीचें अध्यक्षत्व सोडून राजपद स्वीकारण्याची विनंति केली. तेथील राज्यारोहणसमारंभ २६ मे १८०५ रोजीं झाला. **याप्रमाणें वयाच्या छत्तिसावे वर्षीं नेपोलियन फ्रान्सचा बादशहा व इटालीचा राजा झाला.** नेपोलियननें परत येतांना आपला सावत्र मुलगा यूजीन यास इटालीचा व्हाइसरॉय नेमिलें.

हा वेळपर्यंत नेपोलियनची इंग्लंडवरील स्वारीची तयारी जवळ जवळ पुरी होत आली होती. आतां तो केवळ चांगल्या संधीची वाट पहात होता. या कामीं त्यास धुक्याचा अगर वादळाचा कसा फायदा होण्याजोगा होता तें मागें सांगितलेंच आहे. शिवाय नेपोलियनला आणखीही एक गोष्ट अनुकूल होती. पुष्कळ वेळां इंग्लिश चॅनेलमध्यें एकसारखा ४८ तासपर्यंत वारा पडलेला असतो. अशा प्रसंगीं लढाऊ इंग्रजी गलबतांच्या देखतही त्यास गनबोटी नेतां येण्यासारख्या होत्या. शिवाय इंग्रजी गलबतांबरोबर जरूर पडल्यास बेलाशक लढण्याचीही त्याची तयारी होती. त्यानें आपलीं मोडकीं तोडकीं सर्व लढाऊ गलबतें तयार केलीं होतीं. व त्या साधनानें इंग्रज आरमाराबरोबर लढत राहून गनबोटींस चॅनेल उतरून जाण्यास अवधि द्यावी, असा त्याचा बेत होता. यामुळें राहिल्यासाहिल्या फ्रेंच जहाजांचा नाश होऊन पांच दहा हजार लोक मृत्युमुखीं पडणार हें तो जाणून होता. परंतु दीड लक्ष सैन्य इंग्रजी किनाऱ्यावर उतरवितां येण्यासाठीं एवढें नुकसान सोसण्यास तो तयार होता.

# प्रकरण ६ वें.

## ऑस्ट्रियन व रशियन यांशीं युद्धें.

(१८०५)

स्वारीची सर्व बाबतींत कडेकोट तयारी करून इंग्लंडवर झडप घालण्याकरितां नेपोलियन बालोन येथें टपून बसलेला पाहून इंग्लंडांतील बड्या लोकांचें धाबें दणाणून गेलें. परंतु विल्यम पिटनें आपल्या अप्रतिम धैर्यानें या दारुण प्रसंगांतून स्वदेशाचा उद्धार केला. त्यानें वकिलांमार्फत सर्व युरोपियन दरबारांत कारस्थान सुरू केलें. इंग्लिश वकिलांनीं नेपोलियनच्या महत्वाकांक्षेपासून ओढवणाऱ्या अनर्थांचें भेसूर चित्र काढून नेपोलियनशीं स्नेहभावानें असणाऱ्या राजमंडळासही भयभीत केलें. आस्ट्रिया, प्रशिया, रशिया, स्वीडन युद्धास सज्ज झाले; व सर्वत्र शस्त्रांचा खणखणाट ऐकूं येऊं लागला. युद्धाच्या खर्चाबद्दल काळजी करण्याचें कोणासही कारण नव्हतें; कारण, तो चालविण्यास उदारांचा राणा विल्यम पिट् तयारच होता. पिट्नें या वेळीं लढविलेला पेंच नेपोलियन यास चांगलाच जाणवला व तो अखेरपर्यंत पिटच्या कारस्थानपटुत्वाबद्दल तारीफ करीत असे. या नव्या भानगडीमुळें योग्य संधि पाहून इंग्लंडवर चाल करण्याची नेपोलियनला सवड उरली नाहीं. धुक्याची अगर वादळाची वाट पहात बसावें, तर तेवढ्या अवधींत एक अजस्र युरोपियन सेना फ्रान्समध्यें घुसणार; व बोलोन येथून तळ उठवावा, तर दोन वर्षेंपर्यंत अहोरात्र केलेली मेहेनत व खर्चीं घातलेला पैसा व्यर्थ जाणार असा नेपोलियनवर प्रसंग आला. तथापि त्यानें प्रथम कॉंटिनेंटल शत्रूंकडे दुर्लक्ष करून लंडन काबीज करावें, व तेथेंच 'फ्रान्सविरुद्ध अनेक राष्ट्रांस एकत्र जोडणारी गांठ' छाटून टाकून पुनः शांतता स्थापित करावी असा संकल्प केला. इंग्लिश आरमारास हुलकावण्या दाखवून चॅनेलमधून बाहेर पडण्यास लावावें, व सर्व फ्रेंच गलबतें एकदम परतवून एका विवक्षित बंदरांत झपाट्यानें एकत्र आणावीं असा त्यानें ॲडमिरल व्हिलेन्यूव्ह यास गुप्त हुकूम दिला. व्हिलेन्यूव्ह ठरलेल्या स्थळीं सर्व जहाजांसह दाखल झाला म्हणजे सपाट्यानें आपलें सैन्य

घेऊन इंग्लंडांत उतरण्याचा त्याचा मानस होता. व्हिलेन्यून्व्हनें इंग्लिश आरमारास फसवून चॅनेलच्या बाहेर ओढलें, परंतु संकेताप्रमाणें आगस्टच्या ११ तारखेस तो फ्रेंच किनाऱ्यास परत आला नाहीं. नेपोलियननें त्याची आणखी तीन दिवस वाट पाहिली. १४ तारखेचे दिवशींही जेव्हां व्हिलेन्यून्व्ह दृष्टीस पडेना, तेव्हां त्यास सांगितलेली योजना साधत नसून तो कोठें तरी आपल्या आरमाराचा नाश करून घेणार असें नेपोलियननें अनुमान केलें; व इंग्लंडवरील स्वारीचा नाद सोडून ऑस्ट्रियावर तावडतोब चाल करण्याचा निश्चय केला.

सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध न झालेली कोणतीही लष्करी बातमी छापण्याची वर्तमानपत्रांस मनाई करून नेपोलियननें बोलोन येथील तळ उठविला. वीस हजार गाड्यांत पावणेदोन लक्ष सैन्य भरून त्यानें तें अत्यंत त्वरेनें व गुप्तपणानें फ्रान्सच्या पूर्व हद्दीकडे नेलें. या वेळीं ८६,००० आस्ट्रियनांनीं नेपोलियनशीं मित्रत्वानें असणाऱ्या बव्हेरियन राजाचा मुलूख पादाक्रांत केला होता. तेथें त्यास सव्वा लक्ष राशियन सैन्य लौकरच येऊन मिळण्याचा रंग होता. या वेळीं नेपोलियननें केलेल्या हालचाली इतिहासांत चिरस्मरणीय झाल्या आहेत. जेथें जेथें दोन्ही सैन्यांची गांठ पडे तेथें तेथें आस्ट्रियनांपेक्षां फ्रेंच सैन्य इतक्या पटींनीं जास्त असे कीं, युद्ध करणें केवळ आत्मघातकीपणाचें वाटून आस्ट्रियन पलटणी शस्त्रें ठेवून शत्रूच्या स्वाधीन होत. अशा रीतीनें पंधरा दिवसांत एकही नांव घेण्यासारखी चकमक न होतां नेपोलियननें ३५,००० आस्ट्रियन सैन्य कैद केलें. अखेरीस तर खुद्द आस्ट्रियन सेनापति मॅक् हा ३०,००० लोकांसह ऊम येथें सर्व फ्रेंच सैन्याच्या गराड्यांत सांपडला. लढाई देण्यांत अर्थ नाहीं असें पाहून मॅक् हाही आपल्या सर्व सैन्यासह २० आक्टोबर रोजीं नेपोलियनच्या स्वाधीन झाला. युरोपियन युद्धांत नेपोलियन सामील झाल्यापासून अनेक अश्रुतपूर्व चमत्कार दृष्टीस पडूं लागले होते. परंतु त्या सर्वांत, हाताखालील सैन्यास लढण्याची जरूर न पाडतां केवळ कौशल्य चालवून ६५,००० शत्रूंस कैद करण्याचा प्रकार सर्वांस अत्यंत अद्भुत वाटला. आपण ज्याच्या मदतीस जाणार तें आस्ट्रियन सैन्य भूतचेष्टा झाल्याप्रमाणें अदृश्य झालेलें पाहून राशियन सैन्य जागच्या जागीं थबकलें व शत्रुपक्षावर सर्वत्र रणविन्मुखतेची छाया पडून शांततेचें सुचिन्ह दिसूं लागलें.



होरेशिओ नेलसन

( ज्यानें ट्राफलगार येथें नेपोलियनच्या आरमाराचा विध्वंस केला )

परंतु इतक्यांत फ्रान्सच्या शत्रुवर्गास आनंददायक अशी ट्राफल्गारच्या जलयुद्धाची बातमी युरोपभर पसरली. नेपोलियननें जी अटकळ करून बोलोन येथील तळ उठविला होता ती खरी ठरून व्हिलेन्यूव्हनें फ्रेंच आरमाराचा नाश करून घेतला. सर्व फ्रेंच जहाजें एकत्र असल्यास इंग्लिश चॅनेलचा कांहीं तासपर्यंत सहज ताबा मिळेल, व इंग्लंडांत सैन्य नेतां येईल असें नेपोलियन यास वाटत होतें. परंतु फ्रेंच आरमार एकत्र नसून त्याच्या तुकड्या टूलून, ब्रेस्ट, रॉचेफर्ट वगैरे बंदरांत होत्या; व या सर्व बंदरांबाहेर नेल्सन, कॉर्नवालिस वगैरेंच्या हाताखालील निरनिराळे इंग्लिश काफिले खडा पहारा करीत उभे होते. नेपोलियननें सांगितल्याप्रमाणें व्हिलेन्यूव्ह हा नेल्सनचा डोळा चुकवून टूलूनच्या बाहेर पडला; व वेस्ट इंडियामधील मार्टिनिक बेटावर हल्ला करण्याचें मिष करून परतला. नेल्सन हा नेपोलियनच्या अंदाजाप्रमाणें व्हिलेन्यूव्हचा तपास करीत अफाट दर्यामध्यें हजारों मैलांचे हेलपाटे खाऊं लागला. येथ-पर्यंत सर्व ठीक झालें; परंतु फ्रान्सकडे परतल्यावर करण्याची कामगिरी व्हिलेन्यूव्ह यास झेंपली नाहीं. रॉचेफर्ट वगैरे बंदरानजीकच्या लहान लहान इंग्लिश काफिल्यांस पळवून लावून सर्व फ्रेंच आरमार चॅनेलमध्यें आणण्याचे कामीं त्यानें नेपोलियन यास अत्यंत उद्वेगजनक असा कमकुवतपणा प्रकट केला. आसपास इंग्लिशांचें प्रबळ आरमार असल्याबद्दलच्या अफवांवर विश्वास ठेवून तो भ्याडपणानें केडिझ बंदरांत दडून बसला. येथें तो असल्याची खबर कांहीं दिवसांनीं इंग्लिशांस लागतांच नेल्सन, कॉर्नवालिस वगैरेंच्या संयुक्त काफि-ल्यांनीं येऊन त्यास ट्राफल्गारनजीक गांठलें (२१ आक्टोबर). येथील लढाईचा विस्तृत वृत्तांत वाचल्यानें फ्रेंच आरमारांतील सेनापति, ऑफिसर, कप्तान व नावाडी सर्वच आपापल्या कामांत किती गैरवाकबगार होते तें दिसून येतें. फ्रेंच नौकासैन्याची गोलंदाजी तर शुद्ध भिकार होती असें म्हणण्यास हर-कत नाहीं. इंग्लिश आरमारास जो थोडाबहुत त्रास पोंचला तो फक्त शत्रू-कडील बंदुकांच्या अचुक माऱ्यामुळें पोंचला. या युद्धांत वीरशिरोमणि नेल्सन हा जरी हरपला तरी त्याच्या अप्रतिम विजयानें त्याच्या पक्षाची गारठलेली वीरश्री पुनः प्रज्वलित झाली.

नेपोलियन ऊम येथून निघून उत्तरेकडे चाल करीत असतां त्याच्या पृष्ठभागीं दीड लक्ष आस्ट्रियन व हंगेरियन सैन्य जमा होऊन फ्रान्सशीं दळणवळण तुट-

त्याचें त्यास समजलें. शिवाय उत्तरेकडील राशियन सैन्यांत दोन लक्ष राशियन शिपायांची भर पडल्याचीही बातमी आली. अशा स्थितींत देखील फ्रान्सचा रस्ता शाबूद राखण्याकरितां मागें न हटतां, व आपल्या मूळ योजनेंत यत्किंचितही फरक न करितां नेपोलियन बेधडकपणें उत्तरेकडेच जात राहिला. तेव्हां मोठमोठे लोकही त्याचें डोकें आतां ठिकाणावर राहिलें नाहीं, तो अशा फाजील धाडसानें आपला सत्यनाश करून घेणार असें उघडपणें बोलून दाखवूं लागले. ता. २ डिसेंबर रोजीं त्याच्या सत्तर हजार लोकांची एक लक्ष आस्ट्रो–राशियन फौजेशीं आस्टर्लिझ् येथें गांठ पडली. तेथें एक मोठी लढाई होऊन शत्रूंचा पूर्ण विध्वंस झाला. आस्टर्लिझ्च्या महायुद्धास the greatest tactical battle of the world असें म्हणतात. येथील हालचालींचें विस्तारानें वर्णन करण्यास अवकाश नाहीं. परंतु त्यासंबंधीं एक गोष्ट सांगणें अवश्य दिसतें. युद्धाचे वेळीं आपल्या सैन्यांतील कांहीं पलटणी शत्रूंच्या पार्श्वभागीं पाठवून तेथें जोराचा हल्ला करणें हें फार प्राचीन काळापासून विशेष कौशल्याचें मानण्यांत येत असे. यानें शत्रूचा मोड करणें सुलभ जातें असा अनुभवही अनेक प्रसंगीं आलेला होता. अर्वाचीन काळांत फ्रेडरिक दि ग्रेटनें आपले जय अशा हल्ल्यांनीं मिळविले असल्यानें ते योद्ध्यांस फार प्रिय झालें होते. परंतु नेपोलियन 'फ्लँक अटॅक्स' बहुधा करीत नसे. प्रतिपक्षाकडे खरा हुषार व दक्ष सेनानायक असल्यास असे हल्ले फायदेशीर न होतां उलट अनर्थकारक होतात असें त्याचें मत होतें. त्याची सत्यता या प्रसिद्ध लढाईंत त्यानें शत्रुपक्षाच्या निदर्शनास फार भयंकर रीतीनें आणली. शत्रूंनीं फ्रेंच सैन्यावर उजवीकडून हल्ला केला, व त्याच्या दळणवळणाचा मार्गही ताब्यांत घेतला. परंतु कांहींही प्रतिकार न करतां नेपोलियननें एका विशिष्ट योजनेनें या गोष्टी स्वतःसच फायदेशीर करून घेतल्या हें पाहून शत्रुपक्ष किती विस्मित झाला असेल त्याची कल्पनाच करावी. रशियन व आस्ट्रियन बादशहा रणांगणावर हजर होते. आपल्या अत्युत्कृष्ट फौजेची दाणादाण उडालेली पाहून त्यांस नेपोलियनविरुद्ध कांहीं केल्या यश येण्याची आशा राहिली नाहीं. त्यांनीं तह करण्याचें वचन दिल्यावरून नेपोलियननें पाठलाग बंद केला. नेपोलियन ह्मणे कीं "मला या दोन बादशहांस याच दिवशीं कैद करून सेंट हेलेनासारख्या एखाद्या बेटांत जन्म-

भर अटकेंत ठेवितां आलें असतें, व थोड्याच दिवसांत त्यांच्या सर्व फौजेचा संहार करतां आला असता; परंतु युरोपांत शांतता व्हावी हा माझा हेतु सफळ होतोसा दिसल्यावरून निष्कारण रक्तस्राव सुरू ठेवणें मला भूषणास्पद वाटलें नाहीं." आस्टर्लिंझ्च्या बातमीनें युद्धाच्या आद्य प्रवर्तकावर फार शोचनीय परिणाम झाला. संयुक्त राष्ट्रांस यश आलें म्हणजे युरोपांतील प्रदेशाची वांटणी कशी करावी हें ठरविण्याकरितां विल्यम पिट् नकाशा उघडून बसला असतां ही भयंकर वार्ता त्यास समजली. 'हा नकाशा गुंडाळा' असें तो निराशेनें सुस्कारा टाकून ह्मणाला. त्याच्या अंतःकरणास यायोगानें कायमचा धक्का बसला, व लवकरच तीव्र शोकानें त्याचा अंत झाला. पिट्च्या मृत्यूच्या या कारणावर कित्येक शोधकबुद्धीच्या इतिहासकारांनीं अलीकडे असत्यतेचा छाप मारला आहे. एक ग्रंथकार म्हणतो 'ही गोष्ट साफ खोटी आहे;' व आपल्या विधानास असा पुरावा देतो कीं 'पिट् हा इतक्या दुर्बल मनाचा मनुष्य नव्हता' ( Pitt was too great a man for that. ). ही गोष्ट असत्य ठरल्यानें पिट्च्या धीरगंभीरतेचा इतिहासग्रंथांतून पुरता उठाव होण्यास बिलकुल अडचण उरत नाहीं.

या सुमारास हालंडच्या लोकांनीं आपली लोकसत्ताक पद्धति मोडून नेपोलियनचा भाऊ लुई बोनापार्ट यास राजा निवडलें. शिवाय नेपोलियनच्या वजनानें -हाइनच्या कांठच्या सोळा संस्थानांचा एक संघ ( Confederation of the Rhine ) होऊन त्यानें फ्रान्सशीं मित्रत्वानें राहण्याचें ठरविलें.

इटालियनांच्या विनंतीवरून नेपोलियननें इटालीचें राजपद स्वीकारलें होतें. परंतु फ्रान्सच्या गादीवरील व्यक्ति इटालीच्या गादीवर असल्यानें इटालीचा पुढेंमागें फ्रेंच साम्राज्यांत अंतर्भाव होऊन नुकसान होऊं नये म्हणून नेपोलियननें आपल्यामागें यूजीन यास इटालीच्या गादीचा वारस नेमिलें.

# प्रकरण ७ वें.

## प्रशिया व रशिया या देशांवरील स्वारी.

( १८०६-०७. )

इ० स० १८०५ सालीं आस्ट्रियन सेनापति मॅक यास ऊम येथें वेढण्या-करितां नेपोलियननें भिन्न भिन्न मार्गांनीं ज्या पलटणी पाठविल्या त्यांपैकीं कांहींस ॲन्स्पॅच् संस्थानांतून जाणें भाग पडलें. हें संस्थान प्रशियन राजाच्या अंमलांतील होतें. त्या वेळीं प्रशिया नेपोलियनच्या शत्रूंस मदत करण्याच्या खटपटींत होता, परंतु ॲन्स्पॅच्मधून फ्रेंच पलटणी जाईपर्यंत त्यानें फ्रान्सविरुद्ध युद्ध जाहीर केलें नसल्यामुळें त्यास तटस्थ म्हणून समजल्याप्रमाणें वागणें फ्रान्सला जरूर होतें. तथापि नाइलाज झाल्यामुळें प्रशियन मुलखाचा त्यास आपल्या सैन्याच्या हालचालींस उपयोग करावा लागला. नाइलाज कसा झाला तें प्रशियन राजास कळवून खेद प्रदर्शित करण्यासाठीं नेपोलियननें तेव्हांच एक वकील बर्लिन येथें पाठविला होता. नेपोलियनची माफी प्रशियन राजानें त्या वेळीं मान्य केली, परंतु आतां त्याची लढाईची फार चांगली तयारी झाली होती. म्हणून त्यानें १८०५ मध्यें आपल्या ताटस्थ्याचा भंग केल्याबद्दल १८०६ मध्यें फ्रान्सविरुद्ध शत्रुत्व जाहीर केलें. इंग्लंड व रशिया त्यास मदत करण्यास तयार होतेच. म्हणून फिरून एकवार या तीन बड्या राष्ट्रांचा फ्रान्सविरुद्ध लढण्यास संघ तयार झाला.

१६ मे रोजीं इंग्लंडनें ' आर्डर्स इन कौन्सिल ' नांवाचें फर्मान काढून जाहीर केलें कीं, ' आमचा आजपासून सबंध फ्रान्स देशास वेढा आहे. तेव्हां त्या देशाशीं आम्ही कोणासही व्यापार करूं देणार नाहीं. ' हें फर्मान सुधारलेल्या राष्ट्रांत युद्धाचे जे नियम पाळण्यांत येतात त्यांच्या विरुद्ध होतें असें नेपोलियनच्या पक्षाचे लेखक म्हणतात. त्यांच्या म्हणण्याचा सारांश असा आहे कीं, " दोन राष्ट्रें परस्परांशीं युद्ध करीत असलीं तरी

त्यांच्या बंदरांत युद्धसामग्रीखेरीज वाटेल तो माल नेण्याचा तटस्थ देशांस हक्क आहे. लढणाऱ्यांपैकीं एका राष्ट्रानें दुसऱ्याच्या बंदरास वेढा दिला तर मात्र त्यास तटस्थ देशांतील गलबतांना तेथें मज्जाव करण्याचा अधिकार पोंचतो. परंतु कोणासही शत्रूच्या बंदराची नाकेबंदी केवळ शाब्दिक हुकमानें करतां येत नसून तेथें आपला वेढा दर्शविणारीं कांहीं लढाऊ जहाजें प्रत्यक्ष ठेवावीं लागतात. इंग्लंडला फ्रान्सच्या सर्व बंदरांची बंदी करणें होतें तर सर्व बंदरें आपल्या लढाऊ गलबतांनीं प्रत्यक्ष कोंडणें भाग होतें. आणि तशांतून तटस्थ गलबतें जाण्याचा यत्न करूं लागलीं असतीं तर तीं जप्त करण्याचा इंग्लंडला अधिकार प्राप्त झाला असता. इंग्लंडनें सर्व बंदरें गलबतांनीं अडविलीं नाहींत, व इतकीं गलबतें कोणाजवळ असणें शक्यही नाहीं. आमचा फ्रान्सला वेढा आहे, तेव्हां तेथें जात असलेला माल सांपडेल तेथें जप्त करूं असा जाहीरनामा काढून केवळ कागदी वेढा ( paper blockade ) घालणें कायद्यास सोडून होतें. शिवाय, अशी बंदी सुद्धां तटबंदी केलेल्या लष्करी उपयोगाच्या बंदरांचीच करतां येते, इतरांची नाहीं." ब्रिटिश सरकारास हा कोटिक्रम बिलकुल मान्य नव्हता, व त्यांनीं आपली अमान्यता फार जोरदार कृतीनें व्यक्त केली.

'आर्डर्स इन कौन्सिल'ची अंमलबजावणी ताबडतोब सुरू झाली. इंग्रजी गलबतांनीं समुद्रावर फ्रान्सच्या व्यापारी व मच्छीमारी बोटी पाडाव करण्याचा व त्यांतील लोकांस कैद करण्याचा सपाटा सुरू केला. दोन लक्ष प्रशियन सैन्यानें नेपोलियनशीं मित्रत्वानें असणाऱ्या सॅक्सनीच्या राजाच्या मुलखांत घुसून तो सहज काबीज करून टाकला. मागोमाग दोन लक्ष रशियन सैन्यही फ्रान्सवर स्वारी करण्यास वाट चालूं लागलें. या बातम्या कानावर येतांच नेपोलियननें स्वतःस ४८ तासपर्यंत एका खोलींत कोंडून घेतलें, व तेथें एकाग्र चित्तानें पुढील युद्धाची सर्व योजना ठरविली. ती अमलांत येण्याकरितां पुढील दोन दिवसांत त्यानें सर्व देशांतील आपल्या वकिलांस व ठिकठिकाण-च्या पलटणींवरील अधिकाऱ्यांस मिळून सुमारें २०० सविस्तर पत्रें लिहिलीं. हें काम आटपतांच तो २४ सप्टेंबर रोजीं रात्रीं पॅरिस येथून निघाला, व पुरा एक महिना लोटण्याचे आंत १५ आक्टोबर रोजीं त्यानें प्रशियनांचा जेनाचे युद्धांत भयंकर पराभव करून [illegible]

या वेळीं नेपोलियन प्रशियन सैन्यावर समोरून चालून गेला असता तर याप्रमाणें लढाईत जय मिळूनही त्याचा विशेष फायदा झाला नसता. कारण युद्धांतून सुटलेले प्रशियन मागें हटून उत्तरेकडून येणाऱ्या रशियन सैन्यांत सामील झाले असते, व लवकरच या मोठ्या सैन्याशीं लढण्याचा प्रसंग नेपोलियनवर आला असता. तो टाळण्याकरितां नेपोलियननें प्रशियनांच्या पिछाडीस आपलें सैन्य नेऊन त्यांना तोंड फिरवून लढाई देणें भाग पाडलें. त्यामुळें या लढाईंत प्रशियन पराभूत झाल्यानंतर ते मागें दक्षिणेकडे पळूं लागले, व त्यांच्यांत आणि रशियनांत उत्तरोत्तर जास्त जास्त अंतर पडूं लागलें. परंतु हा फायदा मिळविण्यासाठीं प्रशियनांचे पिछाडीस सैन्य नेतांना नेपोलियननें ज्या हालचाली केल्या त्या फार साहसाच्या व धोक्याच्या होत्या. त्यासंबंधानें जास्त लिहिण्यास येथें सवड नाहीं, परंतु त्या अत्यंत दक्षतेनें, त्वरेनें व गुप्तपणें पार पाडल्याबद्दल नेपोलियनची तज्ज्ञांनीं फार तारीफ केली आहे.

फेडरिक दि ग्रेट यानें प्रशियन सैन्य युरोपांत पहिल्या प्रतीचें करून सोडलें होतें. युद्धशास्त्रांतील ताज्या शोधांबरहुकूम अनेक प्रचंड व भव्य किल्ले बांधून त्यानें आपला देश अजिंक्य करून सोडला होता. तो स्वतः जरी या वेळीं जिवंत नव्हता तरी त्याच्या तालमींत तयार झालेले सेनापति व त्याचें दिग्विजयी ठरलेलें सैन्य या समरांगणावर हजर होतें. परंतु अशा सैन्याचा नेपोलियननें इतका भयंकर पराभव केला, कीं जेनाच्या एकाच लढाईनें प्रशियन राष्ट्र अर्धशतकपर्यंत नामशेष होऊन गेलें. या लढाईंत व याच दिवशीं झालेल्या दुसऱ्या एका लढाईंत मिळून चाळीस हजार शत्रू ठार अगर कैद झाले. यानंतर चौदा दिवसपर्यंत नेपोलियननें केलेला पाठलागही तसाच भयंकर होता. त्यांत प्रशियनांची जी गाळण उडाली तिचा वृत्तांत वाचतांना मानवी सैन्याचा राक्षससेनेकडून पाठलाग चालल्याचा भास होतो. शत्रुसेनेस आपली पुनः जमवाजमव करण्यास अगर अन्यत्र कोठें ठाणें धरून बसण्यास अगर किल्ले लढविण्यास क्षणाचाही अवसर सांपडला नाहीं. दोन आठवड्यांत फ्रेंच स्वारांनीं दक्षिणोत्तर दिशेनें सबंध प्रशियादेश दोन वेळां तुडवून टाकून राहिलेलें शत्रूचें सर्व सैन्य ठार अगर कैद केलें; आणि एकूनएक किल्ला व [illegible] रातीनें हें प्रबल राष्ट्र

नेपोलियननें जगाच्या नकाशांतून एका पंध्रवड्यांत पुसून टाकिलें. एखादा विशाल व जोमदार वृक्ष विद्युत्पातानें क्षणार्धांत छिन्नविच्छिन्न व्हावा, अगर एखादा प्रचंड पर्वत धरणीकंपानें पहातां पहातां जमिनींत गडप व्हावा, त्याप्रमाणें प्रशियाची अवस्था झाली.* इतक्या बलाढ्य राष्ट्राचा इतक्या अल्पावकाशांत संहार झाल्याचें जगाच्या इतिहासांत दुसरें उदाहरण नाहीं. जेनाच्या मोहिमेसंबंधीं ॲबॉट यानें असें उद्गार काढले आहेत कीं "या अपूर्व युद्धलीलेचा वृत्तांत 'ॲरेबियन नाइट्स' मधील अस्वाभाविक व असंभवनीय गोष्टींप्रमाणें भासतो."

फ्रान्सबरोबर झुंज खेळण्यास उठलेल्या अनेक शत्रूंपैकीं प्रशियाचें मस्तक पहिल्या टकरीसरशीं फोडून टाकल्यानंतर आतां नेपोलियनला कांहींशी स्वस्थता मिळाली. म्हणून त्यानें इंग्लंडच्या 'आर्डर्स इन कौंसिल'ला उत्तरादाखल 'बर्लिन डिक्री' नांवाचें फर्मान २६ नोव्हेंबर रोजीं बर्लिन येथून प्रसिद्ध केलें; व त्याच्या द्वारें जाहीर केलें कीं, "इंग्लंडनें सुधारलेल्या राष्ट्रांस लांछनास्पद असा 'आर्डर्स इन कौन्सिल' नांवाचा जाहीरनामा काढल्यामुळें जशास तसें या न्यायाचा अवलंब करून आम्ही असा हुकूम सोडतों कीं, कोणताही इंग्लिशमन दृष्टीस पडतांच युद्धाचा कैदी म्हणून अटकेंत ठेवावा, इंग्लंडांतील माल सांपडेल तेथें जप्त करावा, आणि जें राष्ट्र इंग्रजी माल येऊं देईल त्यास फ्रान्सचा शत्रू समजून त्याप्रमाणें वागविण्यांत यावें." या काळीं नेपोलियनचें युरोपांत 'कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुम्' अशा प्रकारचें सामर्थ्य होतें, व त्याचा शब्द मोडण्याची कोणाचीही छाती नसल्यामुळें इंग्रजी व्यापाऱ्यांचें अतोनात नुकसान झालें.

---

* The fall of the house of Brandenburg was as if a castle, with all its trophied turrets strong and entire, should be at once hurled to the earth by a superhuman power. Men alike stunned with the extent and suddenness of the catastrophe, were ........ struck with terror at the demolition of a bulwark, by the destruction of which, all found their own safety endangered. In Prussia fell the last State of Germany who could treat with Napoleon in the style of an equal.

—*Sir Walter Scott.*

या डिक्रीमुळें युरोपांतील इतर देशांचेंही प्रथम नुकसान झालें तरी इंग्लंडचा तेथें खपणारा माल त्या त्या देशांतील कारखान्यांतून तयार होऊं लागून परिणामीं त्यांचें हितच होईल असें नेपोलियन म्हणत असे. इंग्लंडचा सूड उगविण्यासाठीं इतर देशांवर सक्ति करणारें नेपोलियनचें हें फर्मान अत्यंत दुष्टपणाचें गणलें जातें. ॲलिसनच्या मतानें नेपोनियनपेक्षां जगाच्या धिक्कारास जास्त पात्र (more worthy of universal detestation) असा मनुष्य आजवर झाला नाहीं. तेव्हां अशा मनुष्यास इंग्लंडनें आर्डर्स इन कौन्सिल' प्रसिद्ध करून बर्लिन डिक्रीचें फर्मान सोडण्यास आयतें निमित्त करून दिल्याबद्दल ॲलिसननें खेद प्रकट केला आहे तो साहजिकच आहे. 'बर्लिन डिक्री'ला प्रत्युत्तर म्हणून दुसरें एक 'आर्डर्स इन कौन्सिल' इंग्लंडनें १ जानेवारी १८०७ रोजीं प्रसिद्ध केलें

रशियनांस त्यांच्या सवडीप्रमाणें सावकाशपणें वाटेल तेव्हां हल्ला करण्याची सवड न ठेवतां नेपोलियननें हिंवाळ्यांतच उत्तरेकडे चाल सुरू केली. अनेक ठिकाणीं निकराच्या लढाया होऊन पराभूत रशियन सेना मागें हटत चालली. अखेरीस ४ फेब्रुवारीचे सुमारास ईलॉचे आसपास दोन्ही पक्षांचे तळ पडले. या वेळीं पलटणींच्या हालचालीसंबंधानें हुकमाचे लखोटे पोंचविण्याचें काम एका 'स्टाफ ऑफिसराच्या' चुकीनें अयोग्य लोकांवर सोंपविण्यांत आलें. त्यामुळें हे सर्व हुकूम फ्रेंच अधिकाऱ्यांस न पोंचतां उलट रशियन सेनापतीचे हातीं पडले. अशा रीतीनें शत्रूंस नेपोलियनचें धोरण आगाऊ समजल्यामुळें त्यांचा तारीख ७ रोजीं येथें झालेल्या लढाईत व्हावा तसा पुरा मोड झाला नाहीं. रशियन सेनापति बेनिंजेन याचा पराभव झाला तरी त्यास आपलें अवशिष्ट सैन्य व्यवस्थितपणें मागें घेऊन एका सुरक्षित ठिकाणीं नेतां आलें. हें ईलॉचें युद्ध मात्र इतकें घनघोर झालें कीं त्याचे अखेरीस रणांगणावर पाऊण लाख मुडदे पडून राहिले. पैकीं फ्रेंच पक्षाकडील तीस हजार होते.

यानंतर कडक हिंवाळ्यामुळें युद्ध कांहीं दिवस बंद होतें. परंतु ५ जूनपासून लढाईस पुनः सुरुवात होऊन ती १४ जूनपर्यंत सारखी चालू होती. हील्सबर्ग (ता. १० व ११ जून) आणि फ्राइलँड (ता. १४) येथील दारुण संग्रामांत रशियन सेनेची पूर्ण वाताहत झाली. या दहा दिवसांत ६०,००० रशियन ठार अगर कैद होऊन त्यांच्या सव्वाशें तोफा, दीड लाख बंदुका व

त्यांच्याकरितां युद्धसामग्रीनें भरून किनाऱ्याजवळ आलेलीं तीनशें इंग्रजी गलबतें नेपोलियननें पाडाव केलीं. यश येण्याची यत्किंचित्‌ही आशा न राहिल्या-मुळें रशियन व प्रशियन बादशहांनीं नेपोलियनला युद्ध थांबविण्याबद्दल विनंति केली. टिल्सिट येथें जित व जेत्या बादशहांची मोठ्या समारंभानें भेट होऊन तह ठरला ( ७ जुलै १८०७ ).

ज्या फ्रेंच फौजेनें १८०५ पासून १८०७ पर्यंत आस्टर्लिझ, जेना, फ्रीडलंड वगैरे ठिकाणीं लढून फ्रान्सचे झेंडे रशियापर्यंत नाचवीत नेले ती इंग्लंडवरील स्वारीकरितां १८०४ मध्यें बोलोन येथें जमविलेली फौजच होय असें थिअर्सनें आपल्या वाचकांस स्मरण दिलें आहे. यावरून नेपोलियनची इंग्लंडकडील रुळां-वरून येणारी भयंकर गाडी विल्यम पिट्‌नें योग्य वेळीं सांधा दाबून कांटिनेंट-कडील रुळांवर घातल्यामुळें इंग्लंडवरील केवढें अरिष्ट टळलें त्याचा अंदाज करतां येईल. नेपोलियनचीं युद्धें समान शौर्याच्या व समान संस्कृतीच्या राष्ट्रां-बरोबर झालीं असल्याकारणानें थिअर्सच्या मतें प्रशियामधून रशियावर स्वारी करणारा नेपोलियन हा पर्शियामधून हिंदुस्थानवर स्वारी करणाऱ्या शिकंदर बादशहापेक्षां श्रेष्ठ ठरतो.

ही लढाई चालू असतां तुर्कस्थानास फ्रान्सविरुद्ध उठविण्याचा इंग्लंडचा यत्न चालू होता. तुर्कस्थान कबूल न झाल्यामुळें त्या देशचीं गलबतें पाडाव करण्याकरितां इंग्रजी आरमार रवाना झालें. परंतु तेथील हुषार फ्रेंच वकिला-च्या दक्षतेमुळें इंग्रजी आरमारासच पराभव पावून परतावें लागलें.

या तहांत नेपोलियननें रशियन झारच्या मुलखाच्या सरहद्दी बदलल्या नाहींत. परंतु प्रशियाचा निंमा भाग खालसा केला. त्यापैकीं पोलंडच्या प्रशि-यानें बळकावलेल्या भागास वॉर्साचें संस्थान बनवून नेपोलियननें तें सॅक्सनी-च्या राजास देऊन टाकलें; व राहिलेल्या भागाचें वेस्टफॅलियाचें राज्य बनवून तें आपला भाऊ जेरोम यास दिलें. या तहानें नेपोलियन युरोप-खंडांत राजाधिराज पदवीस चढल्यामुळें हा तह ह्मणजे त्याच्या वैभ-वाचा कळस असें समजण्यांत येतें.

कैद झालेल्या प्रशियन व रशियन ऑफिसरांस नेपोलियननें तहानंतर मुक्त केलें. त्यांमध्यें प्रसिद्ध प्रशियन सेनापति मार्शल ब्लूचर हा होता. यानें पुढें वाटर्लूच्या लढाईंत महत्वाची कामगिरी केलेली आढळून येईल.

# प्रकरण ८ वें.

## स्पेनवरील स्वारी.

(१८०८.)

टिल्सिटच्या तहानंतर नेपोलियननें इटालींतून त्वरेनें फेरफटका करून पोर्तुगालकडे लक्ष फिरविलें. हा देश नांवाला स्वतंत्र होता. परंतु या वेळीं इंग्रजी मुत्सद्यांनीं त्यास पूर्णपणें कह्यांत आणून आपल्या वसाहतीचें स्वरूप दिलें होतें. त्यानें इंग्लिश मालाच्या बंदीचे बाबतींत धरसोडीचें वर्तन मांडल्या-वरूनें नेपोलियननें एक पलटण पाठवून तो देश ताब्यांत घेतला.

स्पेनमध्यें बुर्बोन वंशांतला पांचवा चार्लस नांवाचा राजा राज्य करीत होता. तो वेडा असल्यामुळें राज्यांत जी सर्वत्र बेबंदशाही माजली होती ती नाहींशी करण्याकरितां कांहीं लोकांनीं त्याचा मुलगा फर्डिनांड यास गादीवर बसवि-ण्याची खटपट चालविली होती. चार्लस व फर्डिनांड या दोघांनींहि नेपोलियनचें सहाय मागितलें. बाप म्हणूं लागला कीं, मला पदच्युत केलें तरी चिंता नाहीं, पण मुलास गादी देण्यांत येऊं नये; व मुलगा म्हणूं लागला कीं, मला गादी मिळाली नाहीं तरी चिंता नाहीं, पण बापास पदच्युत करण्यांत यावें. दोघांचें वैमनस्य अशा थरावर गेल्यामुळें, दोघांनीं आपसांत तडजोड काढून तंटा मिटवावा अशी नेपोलियनची इच्छा व यत्न निष्फळ झाले. स्पेनचे बुर्बोन राजे पॅरिसच्या गादीवरून पदच्युत झालेल्या आपल्या बांधवांची तेथें पुनः प्रस्था-पना करण्याकरितां इंग्लंडच्या साह्यानें वरचेवर प्रयत्न करीत असत. जेनाच्या युद्धाचे वेळीं व इतर कांहीं अडचणीच्या प्रसंगीं त्यांनीं फ्रान्सवर उघडपणें स्वारी करण्यास सुरुवात केली होती. म्हणून नेपोलियनच्या मनांत त्यांस हांकून देण्याचा बरेच दिवस बेत होता. त्यास ही आयतीच संधि मिळाली. नाश झाला तरी पुरवला पण तडजोड करणार नाहीं अशी जी बाप व मुलगा या दोघांत वृत्ति दिसून आली तिचा त्यानें उपयोग करून घेण्याचा विचार केला. इतक्यांत स्पेनमधील गोंधळाचा फायदा घेऊन इंग्लिशांनीं तेथील राज-

कारणांत हात घालण्यास सुरुवात केली. त्याबरोबर नेपोलियननें चार्लस व फर्डिनांड या दोघांस मोठमोठ्या जहागिरी देऊन स्पेनच्या गादीवर आपला भाऊ जोसेफ यास बसविलें. एक राजा जाऊन दुसरा आला ह्यापेक्षां स्पेनमध्यें कोणताही जास्त फरक झाला नाहीं. कारण स्पेनच्या वसुलांतील कांहींही भाग फ्रान्सच्या खर्चाकडे घेण्यांत येत नसे. जोसेफ बोनापार्टची कारकीर्द त्याच्या सुव्यवस्थित राज्यपद्धतीमुळें प्रजेस फार सुखावह झाली. स्पेनमध्यें बुर्बोन वंशांतील राजे असल्यामुळें फ्रान्सच्या शत्रूंस तेथें उतरून पश्चिमेकडून फ्रान्सवर हल्ला करण्याची जी सोय होत असे ती बंद व्हावी यापेक्षां स्पेनपासून कोणत्याही प्रकारचा जास्त फायदा घेण्याची नेपोलियनची इच्छा नव्हती. या व्यवस्थेमुळें चार्लस व फर्डिनांड हेही खुष झाले. नेपोलियनला जेव्हां जेव्हां जय मिळे तेव्हां ते अभिनंदनपर पत्रें लिहीत असत.

नंतर नेपोलियन परतला, व फ्रान्सच्या दक्षिणभागांतून तीन हजार मैलांचा तपासणीप्रवास करून पॅरिसला आला. परंतु या अवधींत पाद्र्यांच्या चिथावणीवरून स्पेनमध्यें जोसेफविरुद्ध बंड उद्भवलें. जो जो इसम फ्रेंचांविरुद्ध लढेल त्यास परमेश्वरापाशीं रदबदली करून स्वर्गाच्या राज्याचा वांटेकरी करूं असें भटांनीं आश्वासन दिलें. व बंड करण्यास तयार होईल- त्या प्रत्येकास रोख द्रव्य देण्याचा सपाटा इंग्रजी एजंटांनीं सुरू केला. तेव्हां ऐहिक व पारलौकिक सुख एकाच कृत्यानें साधण्याची संधि फारशा लोकांनीं दवडली नाहीं. बंड सुरू झाल्याबरोबर इंग्लंडांतील सर्व स्पॅनिश कैद्यांची सुटका करण्यांत आली; व त्यांस शस्त्रास्त्रांसहित थाटानें स्पेनमध्यें पोंचविण्यांत आलें. शिवाय ४०,००० उत्कृष्ट इंग्रजी फौज बंडखोरांस सहाय्य करण्याकरितां स्पेनमध्यें रवाना झाली. हें वर्तमान ऐकतांच नेपोलियननें एक लक्ष सैन्य जोसेफच्या मदतीकरितां पाठविलें, व पाठवितांना त्यास वीरश्री आणण्यासारखें भाषण करून त्यांत सांगितलें कीं, ‘ चित्त्याच्या* गलिच्छ स्पर्शानें भ्रष्ट झालेला स्पेन तुह्मी पूर्ववत् शुद्ध करून या.’

या सैन्याबरोबर नेपोलियन यास जातां आलें नाहीं. कारण या वेळीं फ्रान्समध्यें बँकांचीं दिवाळीं निघून अनर्थ झाला होता त्याचा बंदोबस्त केल्या-

---

* इंग्रजी निशाणावर चित्त्याचें ( leopard ) चित्र असे.

शिवाय त्यास हालतां येईना. स्पॅनिश लोकांनीं फ्रेंच फौजेशीं गनिमी काव्यानें लढाई मांडली, व त्यांत विलक्षण धाडस व कौशल्य दाखविलें. म्हणून नेपोलियननें जोसेफ यास लिहिलें कीं 'तूं मॅड्रिडमध्येंच रहा, व तेथें स्पॅनिश लोकांस बेलाशक वेढा घालूं दे. कारण तशानें मी आल्यावर मला सर्व स्पॅनिश फौज एके ठिकाणीं सांपडेल व तिचा एकाच लढाईंत संहार करतां येईल.'

फ्रान्समधील सांपत्तिक अनर्थांचा अत्यंत कौशल्यानें तावडतोब बंदोबस्त केल्यावर व फ्रेंच बँकांची पत पूर्ववत् स्थापित केल्यावर नेपोलियन व झार ॲलेक्झांडर यांनीं इंग्लंडला तहाबद्दल पत्र लिहिलें. थोडेंसें नुकसान पतकरूनही स्पेनमधील युद्ध परस्पर मिटविण्याचा नेपोलियनचा इरादा होता इंग्लिश प्रधान कॅनिंग यांचेकडून या पत्रास जें उत्तर आलें तें केवळ प्रतिकूळच नसून उपमर्दकारक आहे असें फ्रेंच व रशियन बादशहांस वाटलें. म्हणून निरुपाय झालासें वाटून २९ आक्टोबर रोजीं नेपोलियन स्पेनकडे निघाला.

नेपोलियननें सांगितल्याप्रमाणें शत्रूच्या वेढ्यांत आपणास कोंडून घेण्याची जोसेफची छाती झाली नाहीं. व त्यानें युद्धांतही हलगजीपणा दाखविल्यामुळें इंग्रज व स्पॅनिअर्ड यांनीं फ्रेंच फौजांवर मोठमोठे जय मिळविले होते. त्यामुळें ते फारच चढून गेले होते. परंतु नेपोलियन आल्यावर पांच सात दिवसांतच ते त्राहि भगवन् म्हणून आक्रोश करीत दाही दिशांस पळूं लागले. एका आठवड्यांत नेपोलियननें स्पॅनिश पर्वतांतील घाटांत पांच सात अवघड ठिकाणीं बंडखोरांचे भयंकर पराभव करून त्यांची दाणादाण केली. नंतर थेट मॅड्रिडपर्यंत चाल करून त्यानें तें शहर भडिमार करून हस्तगत केलें (३ डिसेंबर). स्पेनला सौम्य रीतीनें वागविण्यांत अर्थ नाहीं असें त्याच्या मतें सिद्ध झाल्यावरून त्यानें तो देश फ्रेंच मुलूख म्हणून जाहीर केला व धर्माधिकारी आणि सरदार लोक यांचे विशेष हक्क रद्द करून तेथें फ्रान्सचे समतेचे कायदे लागूं केले. नेपोलियनच्या स्पेनमधील युद्धांस विशेष प्रकारचें महत्व आहे. गनिमी काव्यांत तरबेज असलेल्या शूर फौजेचा असा सपाट्यानें विध्वंस झाल्याचें इतिहासांत दुसरें उदाहरण नाहीं.

मॅड्रिडच्या पश्चिमेस अद्याप कांहीं बंडवाल्यांच्या पलटणी होत्या. परंतु नेपोलियननें त्यांच्यावर चाल करण्याचें तहकूब केलें. कारण मूरचें ४०,००० इंग्रजी सैन्य मॅड्रिडकडे येत होतें, व तें होतां होईल तितकें किनारा सोडून दूरवर

-आंत यावें अशी त्याची इच्छा होती. परंतु मूर फार धूर्त होता. स्पॅनिश सैन्यास झंझावातापुढील भुस्कटाप्रमाणें उधळून टाकून सव्वा महिन्यांत निम्मा स्पेन नेपोलियननें पादाक्रांत केल्याचें त्यास समजतांच तो थांबला. आतां आपणास स्पॅनिश मदतीशिवाय प्रत्यक्ष नेपोलियनबरोबर लढावें लागणार असें त्याच्या लक्षांत आलें. तथापि न गडबडतां त्यानें अवर्णनीय प्रसंगावधान दाखवून एकदम पाठ फिरविली, व समुद्राकडे धूम ठोकली. हें समजतांच, हातची शिकार जाते असें वाटून, नेपोलियन ४०,००० फौजेसह त्याच्या पाठलागास निघाला; व पांच सहा दिवसांत त्याचे नजीक पोंचला. त्याबरोबर आपला वेग वाढविण्याकरितां मूरनें सामानसुमान टाकून सड्या सैन्यासह धांव सुरू केली. जखमी शिपायांस तर शुश्रूषेच्या अशक्यतेमुळें त्यानें टाकून दिलेंच, पण मद्यानें झिंगणाऱ्या सोजिरांसही उचलून घेण्याकरितां तो थांबेनासा झाला. धान्याचीं पोतीं फेंक, तोफा फेंक, दारूगोळा फेंक, तिजोरीच्या पेट्या फेंक असा प्रकार करीत तो भरधांव पळूं लागला; व पराक्रमी मनुष्यास निश्चयाच्या बळावर प्रसंगीं हरणाची चपळाई देखील कशी आंगीं आणतां येते तें त्यानें जगाच्या दृष्टोत्पत्तीस आणिलें.

पाठलाग चालू असतांच नेपोलियननें आपल्या कांहीं तुकड्या अन्य मार्गानें जाऊन मूरच्या पुढें पोंचाव्या अशी तजवीज केली होती. तो ॲस्टोर्गा येथें दाखल होईपर्यंत (२ जानेवारी) त्याच्या फौजेचें जाळें इंग्लिश सेनेभोंवतीं भक्कम बसून गेलें; व ४०,००० ब्रिटिश शिपाई त्याचे हस्तगत होण्याचा प्रश्न कांहीं तासांवर येऊन ठेपला. परंतु इंग्लिशांचा पाडाव करण्याचें काम त्यास वाटलें इतकें सोपें गेलें नाहीं. कारण, ॲस्टोर्गा येथें हातीं पडलेल्या टपालावरून त्यास एका नव्या संकटाची बातमी समजली. पश्चिमेकडे मूरची सुटका व्हावी म्हणून नेपोलियन यास पूर्वेकडे पायबंद देण्यासाठीं इंग्लंडनें आस्ट्रिया व रशिया यांशीं तातडतोब संघ जमवून आणला; व हीं सर्व राष्ट्रें फ्रान्सवर पूर्वेकडून चाल करण्यास त्वरेनें सिद्ध झालीं. तुर्की सुलतानास नेपोलियनचीं म्हणून कांहीं बनावट पत्रें दाखविण्यांत आल्यावरून तोही या संघांत सामील झाला. पूर्व क्षितिजावर असे भयसूचक मेघ जमत चालल्याचें कळतांच नेपोलियननें पाठलागाचें काम सूल्ट याजवर सोंपविलें व तो स्वतः तडक पॅरिसकडे निघाला.

पाठलागाचें काम मार्शल सूल्ट याचेकडे आल्यानंतर तें चांगल्या रीतीनें चाललें नाहीं. मूरनें अखेरीस किनारा गांठला. तेथें कोरुनानजीक त्याची व सूल्टची थोडीशी झटापट झाली (१९ जानेवारी १८०९). तींत मूर ठार झाला; परंतु रात्रीचे वेळीं बरेचसे इंग्लिश शिपाई गलबतावर चढून स्वदेशाकडे निघूं शकले. हें सैन्य परत आलेलें पाहून इंग्लंडांतील लोकांचे मनावर काय परिणाम झाला तें ॲलिसन येणेंप्रमाणें सांगतो:—" मूरचे शिपाई स्पेनकडे निघाले तेव्हां त्यांस निरोप देण्यासाठीं किनाऱ्यावर हजारों लोक उत्साहानें जमा झाले होते. निशाणें फडकत आहेत, रणवाद्यांचे गजर चालूं आहेत, लक्षावधि देशबांधव टाळ्यांचा कडकडाट करीत आहेत, अशा थाटामध्यें ते स्वारीवर निघाले होते. परंतु आतां हे जेव्हां परत आले तेव्हां त्यांतील निमे ठार झालेले, इतरांत अन्नपाण्याच्या हालांमुळें सांसर्गिक रोग पसरलेला, त्यांचीं गालफडें बसलेलीं व कपडे फाटून गेलेले पाहून किनाऱ्यावरच्या गांवांतील लोकांस आश्चर्य व भीति वाटल्यावांचून राहिली नाहीं."

मूर यास अपयश येण्याचें कारण स्पॅनिशांचा दुबळेपणा हें होय. त्याच्या शौर्याबद्दल व कौशल्याबद्दल सर्वत्र स्तुति केलेली आढळते. परंतु नेपोलियनच्या धडाक्यानें खुद्द स्पॅनिश लोकच जर हतवीर्य होऊन गेले तर मूरसारखा तेजस्वी व रणपटु सेनानायक तरी मदत कोणास करणार ? स्पॅनिशांनीं स्वतः हातपाय गाळले, परंतु त्यामुळें मूर स्वदेशाकडे फिरला असतां त्यांनीं मर्मभेदक दुर्वचनांनीं त्यास छळण्यास मात्र कमी केलें नाहीं. ते म्हणूं लागले कीं " स्वतःचा मतलब साधण्यासाठीं तुम्ही आम्हांस साह्य करण्याचे मिषानें येथे आलांत; आणि कांहींही मदत न करतां उलट आम्हांला कृतघ्न म्हणत पळत सुटलांत काय ! " मूरसारखा मोहोरा गमावल्यानें त्याच्या पक्षाची फार हानि झाली. परंतु त्यास जो मृत्यु आला तो वीरांस अत्यंत अभिप्रेत अशाच समयीं आला. नेल्सन, ॲबरक्रॉंबी, वूल्फ वगैरे अतुलप्रतापी इंग्लिश योद्ध्यांप्रमाणें रणांगणावर जय संपादन करून व तेथेंच देह ठेवून तो अक्षय्य स्वर्गवासास निघून गेला. त्याचेवर वूल्कनामक कवीनें केलेलें एक कवन इंग्लंडांत फार लोकप्रिय झालेलें आहे.

---

# प्रकरण ९ वें.

## आस्ट्रियावरील चौथी स्वारी.

( १८०९ )

फ्रान्सवर पूर्वेकडून येऊं पाहणाऱ्या परचक्राचा बंदोबस्त करण्याकरितां नेपोलियन ॲस्टोर्गा येथून पॅरिसकडे चालला असतां त्यास वाटेंत व्हॅलॅडॉइड येथें मुक्काम करावा लागला. कारण स्पेनमध्यें नवीन स्थापन झालेल्या राज्यासंबंधीं अद्यापि बरीच व्यवस्था करण्याची राहिली होती. व फ्रान्समधील सर्व खात्यांतील अधिकाऱ्यांकडून आलेले रिपोर्ट व पत्रें स्पॅनिश युद्धामुळें तुंबून राहिलीं होतीं, त्यांस तावडतोब उत्तरें रवाना होणें अगत्याचें होतें. सामान्य मनुष्यास एक वर्षभर खपवील इतकें हें काम होतें असें मोठमोठ्या मुत्सद्यांचे अभिप्राय आहेत. नेपोलियननें विश्रांति व निद्रा यांस अजीबात फांटा देऊन तें पांच दिवसांत उरकून टाकलें. पुढें क्षणाचांही विसांवा न घेतां तो घोड्यावर बसून पॅरिसकडे निघाला. पहिल्या पांच तासांत त्यानें ८५ मैलांचा प्रवास केला. या प्रवासांत त्यानें विश्रांति घेतली नाहीं, इतकेंच नव्हे तर तो घोड्याच्या पाठीवरूनही उतरला नाहीं. अगाऊ सूचना देऊन त्यानें गांवोगांवीं घोडे तयार ठेवले होते. एक घोडा थकला म्हणजे त्याच्या पाठीवरूनच दुसऱ्याच्या पाठीवर उडी मारावी असा त्याचा क्रम चालला होता. अशा बेफाम वेगानें भयंकर सोसाट्याच्या वावटळी-प्रमाणें तो ज्या रस्त्यानें गेला तेथील लोकांच्या स्मृतींतून हा क्षणमात्र दृष्टीस पडलेला देखावा जन्मभर हलला नाहीं. पुढील प्रवास थोडा गाडींतून व थोडा घोड्यावरून करीत तो २२ जानेवारी रोजीं पॅरिस येथें पोंचला.

येथें आल्यावर भावि रक्तस्राव टाळण्याकरितां युरोपियन राष्ट्रांबरोबर, विशेषत: आस्ट्रियाबरोबर, नेपोलियननें तह करण्याची पुष्कळ खटपट केली. परंतु तीस यश आलें नाहीं. तेव्हां युद्धाखेरीज गत्यंतर उरलें नाहीं असें त्यास वाटलें. परंतु दरबारांतील कारस्थानांची सामान्य लोकांस बातमी लागत नाहीं, जो पहि-

त्यानें सैन्यासह चाल करूं लागलें त्याच्यांच माथ्यावर युद्ध उकरून काढल्याचें खापरें फुटतें; ह्मणून, आस्ट्रियन सैन्य प्रत्यक्ष फ्रेंच मुलखावर चाल करीपर्यंत वाट पाहण्याचें त्यानें ठरविलें. टिल्सिटच्या तहांत ठरल्याप्रमाणें प्रशियानें आपली फौज ४२,००० पेक्षां जास्त वाढविल्यास तो युद्धाचा जाहीरनामा समजला जाईल अशी त्या सरकारास ताकीद देऊन, व युद्धाचा संभव असल्यामुळें आपलें लष्कर तयारींत ठेवावें अशी बव्हेरिया वगैरे दोस्त राष्ट्रांस सूचना करून तो स्वस्थ बसला. यामुळें शत्रूंस पूर्ण तयारी करण्यास अवधि सांपडली ती त्यानें सोसली.

दोन लक्ष आस्ट्रियन सैन्यानें इन नदी ओलांडून बव्हेरियावर चाल केली, व त्याचे पाठोपाठ आणखी तीन लक्ष सैन्य व्हिएन्ना येथून निघूं लागलें आहे, अशा बातमीचा लखोटा एप्रिल १० रोजीं रात्रीं दहा वाजतां नेपोलियनच्या हातीं पडला. तेव्हां नेपोलियन म्हणाला, " यांस लढाई हवी असेल तर ती अगदीं अंतःकरणाची तृप्ति होईपर्यंत मिळेल. " लखोटा वाचल्यापासून बरोबर एक तासानें म्हणजे अकरा वाजतां गाडींत बसून तो आस्ट्रियाकडे निघाला. पॅरिस व डॅन्यूब यांमधील सहाशें मैलांचें अंतर सहा दिवसांत आक्रमून तो युद्धक्षेत्रांत हजर झाला. बव्हेरियन राजास त्याच्या मुलखांतून शत्रूंस पंधरा दिवसांत हांकून देण्याचें नेपोलियननें वचन दिलें. हें वचन त्या वेळीं सर्वांस फारच साहसाचें वाटलें. परंतु नेपोलियननें तें आठच दिवसांत खरें करून दाखविलें. २० तारखेस एबेन्सबर्गची लढाई, २१ रोजीं लँडशटची लढाई, २२ रोजीं अनेक ठिकाणीं लढाया, २३ व २४ रोजीं एकमुल व रॅटिस्बॉन येथें घनघोर युद्धें होऊन २५ तारखेस बव्हेरिया पूर्णपणें खुला झाला. आस्ट्रियन सैन्यानें बव्हेरियांत बरीच जाळपोळ केली होती. हें नुकसान आपल्या स्नेहामुळें बव्हेरियन राजास सोसावें लागलें असें जाणून नेपोलियननें त्याची पूर्णपणें भरपाई होईल इतकें द्रव्य त्यास रोख दिलें.

रॅटिस्बॉनचे लढाईत नेपोलियनच्या बुटास एक गोळी चाटून गेली, व बोटांस लहानशी जखम झाली. त्याबरोबर तो घोड्यावरून खालीं उतरला. शस्त्रवैद्यांनीं जखमेवर जागचे जागींच औषधाची पट्टी बांधली; तथापि, तीव्र वेदना होत असल्यामुळें सैन्याच्या पिछाडीस जाऊन स्वस्थपणें निजण्याचा त्यानें विचार केला. परंतु बादशहास जखम झाल्याची बातमी जवळील

पा. क्र. १९३

पलटणींत फुटल्यावांचून राहिली नाहीं. शत्रूकडून भयंकर भडिमार सुरू असतांहीं, सर्व शिपायांस युद्ध सुचेनासें होऊन, ते असल्या, तोफा व बंदुकी टाकून प्रकृतीबद्दल चौकशी करण्याकरितां नेपोलियनच्या भोंवतीं गोळा झाले. नेपोलियननें जखम क्षुल्लक असल्याबद्दल सर्वांस सांगितलें, व ज्यांस हात पोंचूं शकला त्यांच्यांशीं 'शेकह्यांड' केला. वेदना सहन करून नेपोलियन पुनः घोड्यावर बसला, व सैन्याच्या सर्व रांगांमधून हिंडला. शिपायांस पुनः उमेद येऊन ते पूर्ववत् लढूं लागलेले दिसतांच तो एका झोंपडींत जाऊन निजला.

बव्हेरियांतील लढायांत शत्रूंचे ६०००० लोक ठार अगर कैद होऊन त्यांच्या सर्व तोफा व दारूगोळा नेपोलियनच्या हातीं पडला. एप्रिल १६ पासून २५ पर्यंत दररोज नेपोलियन यास अठरा तासांपेक्षां जास्त काळ घोड्याच्या पाठीवर काढावा लागला. शिवाय या काळांत त्यानें जीं पत्रें लिहिलीं आहेत त्यांचा एक मोठा छापील ग्रंथ झाला आहे. बव्हेरियांतून शत्रूची हकालपट्टी केल्यावर नेपोलियननें थेट व्हिएन्नापर्यंत ह्मणजे दोनशें मैल चाल केली. मार्गांत जीं अनेक खडतर युद्धें झालीं त्यांपैकीं ॲबर्संबर्गनजीक ट्रॉन नदीचे पुलावर झालेल्या भीषण संग्रामाची हकीकत अंगावर रोमांच आणण्यासारखी आहे. येथें, लढणाऱ्या शिपायांसाठीं वाट मोकळी करतांना, पूर्वीं चेंदामेंदा होऊन पडलेल्या शिपायांच्या राशि चिखलांच्या राशींप्रमाणें फावड्यांनीं वारंवार उचलून टाकाव्या लागल्या. १० मे रोजीं सर्व दिवसभर भडिमार करून नेपोलियननें व्हिएन्नाशहर सर केलें.* नंतर परतीरावरील शत्रूंशीं घोर युद्ध चालू असतां २२ व २३ मे रोजीं डॅन्यूबचें दीड मैल रुंदीचें पात्र महापुरांत ओलांडण्याचा नेपोलियननें केलेला यत्न, व अखेरीस ते ओलांडल्यावर ६ जुलै रोजीं वॅग्रॅमच्या मैदानावर त्यानें केलेला शत्रूचा भयंकर पराभव यांचीं या काळासंबंधींच्या इतिहासांतून दिलेलीं वर्णनें अत्यंत हृदयंगम झा-

---

* आस्ट्रियन बादशहा व त्यांचे कुटुंबांतील मंडळी या वेळीं राजवाड्यांतून पळून गेली होती. परंतु एक राजकन्या आजारानें अत्यवस्थ असल्यामुळें तीस तेथेंच ठेवणें भाग पडलें होतें. फ्रेंच तोफांतील गोळे आसपास पडूं लागल्यावर आस्ट्रियन अधिकाऱ्यांनीं नेपोलियन यास ही स्थिति कळवून वाड्यावर मारा न करण्याची विनंति केली. नेपोलियननें ती मान्य करून वाड्यास अखेरपर्यंत धक्का पोंचूं दिला नाहीं. ही गोष्ट नेपोलियन यास भूषणावह मानिली जाते.

लेलीं आहेत. वॅग्रॅमच्या लढाईपूर्वी नेपोलियननें डॅन्यूब नदीवरून फौज नेण्याकरितां जो गुप्तपणानें व त्वरेनें साठ कमानींचा व बाराशें फूट रुंदीचा पूल बांधला तो अद्यापि कायम आहे. रानांतील लांकडें तोडून हा पूल प्रथम अलीकडील तीरावर झाडीच्या आड तयार करण्यांत आला होता. हा ऐन वेळीं नदींत सोडतांच केवळ प्रवाहाच्या जोरानें दोन्ही तीरांस भक्कम बसावा, व त्यावरून फौजेची ताबडतोब चाल सुरू व्हावी यासाठीं योजावी लागलेली नवी शिल्पविषयक क्लृप्ति नेपोलियन यानें स्वतः काढली होती.

या प्रसंगीं आस्ट्रियन सेनेचें आधिपत्य आर्चडयूक चार्लस याचेकडे होतें. हा नेपोलियनविरुद्ध लढलेल्या युरोपियन सेनापतींमध्यें युद्धकौशल्याचे बाबतींत निष्णातांच्या मतानें अग्रगण्य आहे. नेपोलियनच्या प्रखर तेजामध्यें लुप्त झालेल्या त्या काळच्या तारांगणांत याची चमक विशेष प्रेक्षणीय होती. त्यामुळें नेपोलियन व चार्लस या दोघां समवयस्क व जवळजवळ तुल्यविक्रम योद्ध्यांत झालेले समरप्रसंग युद्धशास्त्राच्या विद्यार्थ्यांस अत्यंत महत्वाचे आहेत असें म्हणतात. १७९८ सालीं यास कांहीं वेळा नेपोलियनविरुद्ध लढण्याचा प्रसंग आला होता. परंतु तेव्हांच्या पराभवाची पूर्ण जबाबदारी कांहीं कारणानें त्याचेवर पडत नाहीं. तेव्हांपासून १८०९ पर्यंत त्याचेवर आस्ट्रियन दरबाराची इतराजी असल्यामुळें त्यास कोणत्याही मोहिमेवर रवाना करण्यांत आलें नव्हतें.

वॅग्रॅमच्या तुंबळ रणकंदनांत चार्लससारख्या सेनापतीचा पुरा मोड झाल्यानंतर आस्ट्रियनांस नेपोलियनविरुद्ध यश येण्याची आशा उरली नाहीं. तथापि त्यांचे दोस्त इंग्लिश यांनीं पिट्चा वडील बंधु लॉर्ड चॅथम यास मोठ्या फौजेसह पाठवून अँटवर्प बंदर घेण्याचा जो यत्न चालविला होता त्याचा काय निकाल होतो तो कळेपर्यंत तहास कबूल न होतां त्याची वाटाघाट करण्याच्या मिषानें वेळ काढावा असें आस्ट्रियाचें धोरण होतें. इंग्रजी फौज शेल्टचे मुखाजवळील वॉल्चेरन बेटांत तारीख ३१ जुलै रोजीं उतरली. नेपोलियननें त्या बाजूकडे बर्नाडॉट नांवाचा एक चांगल्यापैकीं सेनापति रवाना केला होता. परंतु त्याजबरोबर दिलेलें ८०,००० सैन्य मात्र कच्च्या शिपायांचें होतें. कारण इंग्लिश सेनानायकांच्या अकुशलतेमुळें आपल्या पक्षास फारसें लढण्याचें कारणच पडणार नाहीं असें नेपोलियन यास लक्षण दिसूं लागलें होतें. नेपो-

लियनच्या हुकमाप्रमाणें बर्नाडॉटनें बांध फोडून सबंध वाल्चेरन बेट जलमय करून सोडलें, व किनाऱ्यालगतचा फ्लशिंगचा किल्ला उत्तम प्रकारें लढवून इंग्लिशांस बराच वेळपावेतों दलदलीच्या प्रदेशांत अडकवून धरिलें. त्यामुळें दहा दिवसांत इंग्लिश सैन्यांत १५,००० शिपाई दोषीतापानें आजारी होऊन इस्पितळांत पडून राहिले. अशा प्रकारानें सर्व गोंधळ होऊन चॅथॅम यास आपलें दीड हजार लहान मोठ्या गलबतांचें अवाढव्य आरमार शेल्टच्या पात्रांतून २०–२५ मैल वर रेटण्यासच सतरा दिवस लागले. रोज शेंकडों रोगग्रस्त शिपाई स्वदेशीं रवाना होऊं लागले, व एकंदरींत सर्व तऱ्हेनें दुर्दशा झाल्यामुळें इंग्लिशांस येवढ्या तयारीनें आल्यासारखें कांहींही काम न करितां सर्व जगासमोर फजीत होऊन परत जावें लागलें. इंग्लंडांत या काळीं पुष्कळ चांगले सेनापति होते. त्यांपैकीं एखाद्याची या कामावर योजना झाली असती तर त्यांत खात्रीनें यश आलें असतें.

इंग्लंडसारख्या बड्या दोस्तानें आपलें जगद्विख्यात टोलेजंग आरमार पाठवून साह्य करण्याचा जो यत्न केला त्याचें असें शोचनीय पर्यवसान झालेलें पाहून आस्ट्रियन पक्ष सर्वस्वीं हताश झाला. व आतां फाजील दिरंगाई केल्यास नेपोलियनच्या क्षोभाचे परिणाम सहन करावे लागतील अशा भीतीनें ते तहास कबूल झाले. हा व्हिएन्नाचा तह १४ आक्टोबर रोजीं झाला.

वरील युद्धांची धामधूम चालू असतां एक इंग्लिश काफिला पोपच्या ताब्यांतील मुलखाचे किनाऱ्याशीं घिरट्या घालीत होता. नेपोलियनचा आस्ट्रियांत कोठें तरी पराभव झाल्यास पोपच्या प्रांतांतून इटालींत प्रवेश करावा व तेथील फ्रेंच मुलखावर स्वारी करून नेपोलियनची जास्त तारंबळ उडवावी असा इंग्लिशांचा विचार होता. पोपची इंग्लिशांशीं पूर्ण सहानुभूति दिसून आली. स्पेन–पोर्तुगालमधील भानगडही पोपच्या चेल्यांनींच उत्पन्न केली होती. अशा तऱ्हेच्या वर्तनाबद्दल नेपोलियननें पोपचें राज्य पूर्वीं अनेक वेळां जिंकलें होतें; परंतु धर्मगुरूंस कडक शासन करणें बरें नव्हे अशा विचारानें त्यानें तें राज्य पुनः परत दिलें होतें. आतां मात्र क्षमावृत्तीचा अतिरेक अयोग्य वाटून त्यानें रोमचें संस्थान फ्रेंच मुलखास जोडलें. हें सहन न झाल्यामुळें पोपमहाराजांनीं नेपोलियनला एक शाप दिला, व त्याचा मृत्यूनंतरचा स्वर्गमार्ग बंद करून टाकला. याबद्दल नेपोलियन धर्मगुरूजवळ उःशाप मागतो कीं

तिकडे दुर्लक्ष करतो वगैरे समजण्याची वाट न पाहतां एका उतावळ्या फ्रेंच सेनापतीनें पोपमहाराजांस पकडलें. व यापुढें त्यांस फ्रान्समध्यें फांटेनेब्लू येथें नजरकैदेंत दिवस काढावे लागले.

---

# प्रकरण १० वें.

## जोसेफाइन राणीचा त्याग; द्वितीय संबंध; पुत्रजन्म.

( १८०९-११ )

याप्रमाणें शस्त्रानें पुनः स्वस्थता संपादन करून नेपोलियन दुसऱ्या गोष्टींकडे मन घालण्यास मोकळा झाला. ' दर खेपेस राजाची निवडणूक करण्याची देशामध्यें पद्धति असल्यास प्रत्येक राजाच्या मृत्युसमयीं बखेडे सुरू होतात; तसें फ्रान्समध्यें घडूं नये म्हणून मी राष्ट्राच्या संमतीनें आपल्या कुळाकडे गादीवरील वंशपरंपरा हक्क घेतला ' असें नेपोलियन सांगतो. येवढ्यानें फ्रान्सच्या कारभारास कायमचें सुरळीत वळण लागेल अशी त्याची अपेक्षा होती. परंतु ती साध्य होण्याचा रंग उत्तरोत्तर कमी दिसूं लागला. कारण जोसेफाइन राणीपासून त्यास पुत्रसंतान होण्याची आशा नष्ट होत चालली. संततीचा अभाव नवीन स्थापन झालेल्या वंशास फार हानिकारक असतो. कारण अशा वेळीं पूर्वीच्या वंशापैकीं वारस पुढें येऊन कित्येकांचा आश्रय मिळवूं शकतो. आपला सावत्र मुलगा यूजीन यासच दत्तक घेऊन फ्रान्सच्या गादीसंबंधीं तंटा होण्याचा संभव बंद करावा, असें एक वेळ नेपोलियन यास वाटत होतें. परंतु हीही गोष्ट जुळण्यासारखी नव्हती. कारण नेपोलियनला यूजीनपेक्षांही जवळचे नातलग पुष्कळ होते. पुतण्यांपैकीं अगर भाच्यांपैकीं एखाद्यास दत्तक घ्यावें तर यूजीनला न घेतल्याबद्दल जोसेफाइनला तर राग आलाच असता; शिवाय ज्या भावाचा अगर बहिणीचा मुलगा दत्तक घ्यावा त्याखेरीज इतर

भाऊ व बहिणी यांची नाखुषी पत्करावी लागली असती. आपल्या मागें गादीवर कोणी यावयाचें यासंबंधीं यत्किंचित् अनिश्चितता असल्यास त्यावेळीं गादीवर हक्क सांगणारे अनेक लोक पुढें येणार, व परराष्ट्रांपैकीं कोणी एकाचा तर कोणी दुसऱ्याचा पक्ष उचलून फ्रान्सच्या कारभारांत सर्व ढवळाढवळ करणार हें नेपोलियन यास उघड दिसत होतें. तेव्हां औरस पुत्राशिवाय या भानगडींतून सुटका नाहीं असें त्यास वाटलें. ख्रिस्ती धर्माप्रमाणें दोन लग्नें करणें निषिद्ध आहे. करितां घटस्फोटानें प्रथमपत्नीचा त्याग करून दुसरा विवाह करण्याचे त्यानें ठरविलें.

यासंबंधाची कुणकुण जोसेफाइनच्या कानावर बरेच दिवसांपूर्वीं गेली असल्यामुळें ती अलीकडे सचिंत व उद्विग्न असे. नेपोलियनला आपल्या निरपराधी स्त्रीस हा कठोर निश्चय सांगण्याचें धाडस होत नव्हतें. अखेरीस बराच वेळ मनाची तयारी करून त्यानें ३० नोव्हेंबर १८०९ रोजीं आपला मानस तिला स्वमुखानें कळविला. त्याबरोबर ती मूर्च्छा येऊन पडली. आपला कांहीं काळ सुखांत गेला असेल तर तो जोसेफाइनच्या सहवासांतच होय, असें नेपोलियन ह्मणत असे. म्हणून, ही गोष्ट काढतांच तिच्या अंतःकरणास जो धक्का बसलेला दिसला त्यानें नेपोलियन यास विवाहसंबंध तोडण्यांत अगोदरच वाटत असलेला खेद द्विगुणित झाला. परिस्थिति लक्षांत घेऊनें जोसेफाइननें हा प्रसंग धैर्यानें सहन करावा अशी त्याची अपेक्षा होती.

ता. १५ डिसेंबर रोजीं दरबार भरवून विवाह रद्द करण्याचा कायदेशीर व धार्मिक विधि उरकण्यांत आला. नेपोलियननें भाषण करून दरबारास आपला निश्चय सकारण निवेदन केला. नंतर जोसेफाइन ही फ्रान्सच्या हितास्तव असा स्वार्थत्याग करण्याची आपली तयारी असल्याबद्दलचें लिहून आणलेलें भाषण वाचावयास उभी राहिली. परंतु प्रथमारंभींच कंठ दाटून आल्यामुळें तिला पुनः परत सिंहासनावर बसावें लागलें. तिचें भाषण एका प्रधानानें वाचून दाखविलें. जोसेफाईन ही आपल्या सौजन्यानें प्रजेस फार प्रिय झाली होती. म्हणून या प्रसंगीं सर्व समाज दुःखी दिसत असून हा समारंभ स्मशानविधीप्रमाणें भासल्याचें प्रेक्षकांनीं लिहून ठेविलें आहे. दुसरे दिवशीं राज्ञीपद नष्ट झाल्यामुळें जोसेफाइन राजवाड्यांतून निघून अन्यत्र रहावयास जाण्यास निघाली तेव्हां राजवाड्यांतील माणसांमध्यें झालेल्या शोकाची हकी-

कतही अशीच हृदयद्रावक आहे. तिच्या अभावामुळें शून्य भासूं लागलेल्या राजवाड्यांत राहणें कठीण वाटूं लागल्यामुळें नेपोलियन कांहीं दिवस पॅरिस सोडून दुसऱ्या गांवीं जाऊन राहिला. हा घटस्फोट नेपोलियनच्या अत्यंत निर्घृण कृत्यांत गणलेला आहे.

इ. स. १८१० सालीं इंग्लंडनें फ्रान्सचें जावा बेट काबीज केलें. यापुढें फ्रान्सपासून समुद्रामुळें तुटलेला कोणताही फ्रेंच प्रांत इंग्लिश आरमारास काबीज करण्यास उरला नाहीं. नेपोलियननें युरोपच्या कांटिनेंटवर जरी सर्वत्र वर्चस्व बसविलें होतें तरी त्यानें फ्रान्सला प्रत्यक्ष जोडलेला मुलूख फार थोडा होता. या मुलखापेक्षां अनेकपट जास्त प्रांत इंग्लंडनें दोन्ही गोलार्धांत मिळून नेपोलियनच्या कारकीर्दीतच जिंकला होता. या गोष्टीचा उपयोग नेपोलियन परराष्ट्रांचीं मनें इंग्लंडविरुद्ध वळविण्याकडे करीत असे. तो म्हणे कीं, " राज्याचा भयंकर विस्तार इंग्लंड करीत आहे का फ्रान्स करीत आहे तें नीट पहा. सत्तेच्या समतेस ( Balance of power ) धोका इंग्लंडच आणीत आहे हें लक्षांत घ्या. व इंग्लंडच्या वाढत्या सामर्थ्यास आळा घालण्यास तुम्ही मला मदत करा. " इतर राष्ट्रांनीं आपणास मिळावें म्हणून नेपोलियन मोठमोठे जय मिळवूनही त्यांच्यावर कडक शर्ती लादत नसे. उदाहरणार्थ, वॅग्रमच्या लढाईनंतर आस्ट्रियाचे तीन तुकडे करून व त्यावर तीन निराळे राजे बसवून आस्ट्रियास कायमचे पंगू बनविण्याचा त्याचा विचार होता. परंतु त्यानें तो अमलांत आणला नाहीं. नेपोलियनचे हे मुत्सद्दीगिरीचे डाव इंग्लिश प्रधानांच्या कौशल्यापुढें फिके पडले. युरोपियन राष्ट्रें इंग्लंडचे बाजूस राहून अखेरीस नेपोलियनचाच पाडाव झाला.

सबंध अठराव्या शतकभर इंग्लंड व फ्रान्स यांचेमध्यें इतर खंडांतून साम्राज्याचा विस्तार करण्याबद्दल चढाओढ चालू होती. त्यामुळें त्यांच्यांत वारंवार युद्धें होत असत. इतर दोन देशांत लढाई उपस्थित झाली तरी इंग्लंडनें एका पक्षास मिळावें व फ्रान्सनें दुसऱ्या पक्षास मिळावें असा प्रकार सुरू होता. युद्धाचीं तात्कालिक कारणें उभय पक्षांकडून कांहींही सांगण्यांत आलीं तरी वास्तविक मूळ कारण वर सांगितलेली स्पर्धा हेंच होय, असें प्रो० सीलीयांचें मत आहे. नेपोलियनच्या काळांत ही स्पर्धा विशेष तीव्र झाली. या काळच्या युद्धांत अन्याय दुसऱ्या पक्षाकडे असल्याचें प्रत्येक पक्ष निक्षून

सांगत आहे. दोन्ही पक्षाच्या ग्रंथकारांनीं आपापली बाजू कितीही सजविली तरी सोयीप्रमाणें तह मोडणें अगर राष्ट्रांराष्ट्रांतील व्यवहाराचे कायदे गुंडाळून ठेवणें हे प्रकार दोन्ही पक्षांच्या कृत्यांत आढळतात हें निर्विवाद आहे. नेपोलियनचीं अन्याय्य कृत्यें जास्त असलीं तरी इंग्लंडप्रभृति इतर राष्ट्रांनीं एकही अन्याय्य कृत्य केलें नाहीं असें कोणासही म्हणतां येणार नाहीं. नेपोलियन शांततेबद्दल नेहमीं उत्सुकता दाखवीत असे हें खरें; परंतु स्वस्थता मिळाल्यावर तो आरमार वगैरे बाबतींत सुधारणा करून पुढें कदाचित् इंग्लंडचें नुकसान करील, व त्याचें युरोपांतील अग्रस्थान नष्ट करील, अशा संशयानें युद्ध थांबूं न देण्याची इंग्लंडनें खबरदारी ठेवली असल्यास त्यांत कांहीं गैर झालें असेंही कोणास म्हणतां येणार नाहीं.

या चढाओढींत अखेरीस इंग्लंडला यश येऊन इंग्लिश साम्राज्य विस्तार कां पावलें, व फ्रेंच साम्राज्याचा लय झाला नसला तरी संकोच कां झाला याचें कारण प्रो. सीली असें सांगतात कीं, फ्रान्स हें युरोप व वसाहती अशा दोन्ही ठिकाणीं युद्ध करून स्वतःस थकवून घेत असे; आणि इंग्लंड हें फ्रान्सच्या युरोपांतील शत्रूंस युद्धखर्चाचा सढळ हातानें पुरवठा करून इतर खंडांत मात्र आपलें साम्राज्य वाढवीत असे.* या धोरणाचा उपक्रम प्रथम सप्तवार्षिक युद्धाचे वेळीं चॅथॅम यानें केला. त्याचा मुलगा विल्यम पिट हा नेपोलियनच्या काळीं पित्याचें हेंच वळण गिरवीत होता.

नेपोलियनच्या काळांतील युद्धांचें दुसरें एक कारण दिसतें. परंतु तें इंग्लंडला लागू नाहीं. नेपोलियन हा लोकनियुक्त बादशहा असल्यामुळें, ईश्वरदत्त हक्का-

* She (France) lost the New World because she was always divided between a policy of colonial extention and a policy of European conquest...... When Chatham said he would conquer America in Germany, he indicated that he saw the mistake which France committed by dividing her forces, and that he saw how by subsidising Frederick, to make France exhaust herself in Germany while her possessions in America passed defenceless into our hands. Napoleon, in like manner is distracted between the New world and the Old.

*—Prof. Seely.*

नें आपण राज्य करतो असें मानणारे राजे त्यास पदच्युत करून बुर्बोन घराणें सिंहासनावर चढविण्यास उद्युक्त झाले होते. फ्रान्समधील लोकसत्ताप्राधान्याचीं मतें आपल्या राष्ट्रांतून न पसरण्याबद्दल इतर राजे जसें जपत असत तसें इंग्लंडांत जपण्याचें कारण नव्हतें. तेथें राज्यकारभारावर लोकमताचें वजन पूर्वींच स्थापित झालें होतें. इंग्लिश समाजास स्वातंत्र्यविषयक धडे फ्रान्सपासून शिकावयाचे उरले नव्हते, व फ्रेंच मतांच्या संसर्गानें तो बिघडण्याचा संभवही नव्हता. अशा भिन्न उद्देशांनीं इंग्लंड व कांटिनेंटल राष्ट्रें फ्रान्सविरुद्ध झगडत होतीं. ही मीमांसा फक्त मूळ कारणांसंबंधीं आहे. प्रत्येक खेपेस युद्ध सुरू होण्यास तात्कालिक कारणें काय झालीं, त्यांचें मागें त्या त्या प्रसंगीं साधारणपणें दिग्दर्शन केलेंच आहे. तीं युद्धें फ्रान्सनें उकरून काढलीं कां इतर राष्ट्रांनीं, यासंबंधीं नामांकित लेखकांत तीव्र मतभेद आहे.

हा मतभेद प्रत्येक देशांत आहे. फ्रेंच लोक तेवढे युद्धाची जबाबदारी नेपोलियनवर नाहीं असें ह्मणतात, आणि इतर देशांतील लोक तेवढे त्यास जबाबदार धरतात, अशी स्थिति नाहीं. या प्रकरणीं सर्व दोष इंग्लंडकडे येतो असें प्रतिपादन करणारांत हॅझलिटसारखे इंग्लिश व ॲबॉटसारखे कॅनेडियन लेखकही आढळतात; आणि नेपोलियनची दुष्ट महत्वाकांक्षा हीच सर्वस्वीं युद्धाचें कारण होय, असें मत प्रकट करणारांत लॅन्फ्रेसारखे फ्रेंच लेखकही दिसून येतात. खुद्द विल्यम पिटचा वडील भाऊ चॅथॅम यानें त्या काळींच एकदां असें स्पष्टपणें बोलून दाखविलें होतें कीं, "आह्मी फ्रान्सशीं न्यायानें वागलों तर इंग्रजी राज्य चोवीस तासपर्यंतही टिकणार नाहीं." त्याचप्रमाणें कॉब्डेन हा म्हणाला होता कीं, "फ्रान्सनें युद्ध उकरून काढलें नाहीं, इतकेंच नव्हे, तर इंग्लंडबरोबर युद्ध टळावें ह्मणून त्यानें जवळजवळ लोटांगणही घालून पाहिलें." उलटपक्षीं, नेपोलियन हा केवळ महत्वाकांक्षेनें प्रेरित होऊन इतर देशांवर स्वाऱ्या करीत सुटला असें म्हणणारे फ्रेंच राजकारणी पुरुष त्या काळीं व त्यानंतरही होते. सारांश, या प्रश्नासंबंधीं अद्यापि जगांत एकमत झालेलें दिसत नाहीं. या युरोपियन वादाचें इकडील वाचकांस विशेष अगत्य वाटणारच नाहीं; तथापि, नेपोलियनचा सर्व पत्रव्यवहार पाहून यासंबंधीं स्वतंत्र विचारानें कोणास पूर्ण ऊहापोह करणें असल्यास या एकाच

मुद्यावरील चर्चेस प्रस्तुत पुस्तकाहून जास्त पानें लागतील. नेपोलियनचें वादविवाद-पटुत्व नजरेस आणण्यासाठीं तो आपल्या सर्व कृत्यांचें समर्थन कसें करीत असे त्याचा मासला येथें कांहीं ठिकाणीं दिला आहे, व कांहीं वादस्थळांचे बाबतींत वादाचें स्वरूप काय होतें तें स्थूलपणें दाखवून प्रसंगीं कांहीं इतिहासकारांचीं मतेंही थोडक्यांत दिलीं आहेत; परंतु हें चरित्र टीकात्मक नसून यांत नेपोलियनच्या हातून घडलेल्या कृत्यांचा निव्वळ वृत्तांत कांहीं ठळक इंग्रजी व फ्रेंच ग्रंथांच्या आधारें सांगितला आहे. तथापि प्रो. सीली यांची युद्धांच्या मूळ कारणाबद्दलची वर दिलेली मीमांसा या काळचा इतिहास समजण्यास बरीच उपयुक्त होईल असें वाटतें.

हीं युद्धें थांबविण्यास आपल्या नव्या विवाहाचा कसा फायदा करून घेतां येईल याचा विचार घटस्फोट झाल्यापासून नेपोलियन करूं लागला. एर्वीतेवीं दुसरें लग्न करणें आलेंच होतें, तेव्हां त्यांत आणखी एक कार्यभाग साधण्याचें त्यानें मनांत आणिलें. एखाद्या युरोपियन राजाच्या कन्येशीं विवाह केल्यास त्यास फ्रान्सशीं स्नेहसंबंधानें कायमचें जोडतां येईल, व फ्रान्सला शत्रूंशीं टक्कर देण्यास जास्त सामर्थ्य येईल; शिवाय, सामान्य जनसमूह व त्याची सत्ता यांबद्दल मनांत तुच्छता बाळगणारे युरोपांतील राजे व बडे लोक फ्रान्सच्या गादीवर सामान्य कुळांतील मनुष्य नसून राजवंशाशीं संबंध असलेला एखादा मनुष्य आहे असें पाहिल्यावर फ्रान्सशीं वैरभाव टाकतील असें नेपोलियन यास वाटत होतें. एखाद्या रशियन, ऑस्ट्रियन, अगर सॅक्सन राजकन्येशीं विवाहसंबंध जमून आल्यास तो नेपोलियनच्या मतें विशेष इष्ट होता. याबद्दल सल्ला घेण्याकरितां त्यानें २१ जानेवारी १८१० रोजीं प्रिव्ही कौन्सिलची सभा भरविली. या बैठकींत बहुमत ऑस्ट्रियन राजकन्या मेरिआ लुइसा इजकडे पडल्यामुळें तिचीच निवड करण्यांत आली. आस्ट्रियन बादशहानें या गोष्टीस ताबडतोब रुकार दिला. आपल्या मुलीस अकल्पित वैभव प्राप्त झाल्यामुळें त्यास अत्यानंद झाला. रशियाशीं त्याचें फार वैमनस्य होतें; तेव्हां, नेपोलियनशीं संबंध झाल्यानें रशियापासून आपण निर्भय झालों असें त्यास वाटूं लागलें. ११ मे रोजीं विवाहसमारंभ व्हिएन्ना शहरीं मोठ्या थाटानें करण्यांत आला. मेरिआ लुइसा पॅरिसकडे येत असतां वाटेवरील आस्ट्रियांतील व फ्रान्समधील गांवीं लोकांनीं तिचें विलक्षण उत्साहानें स्वागत केलें.

आतां कांटिनेंटवर स्वस्थता असल्याकारणानें इंग्लंडचा पाडाव करण्याची विशेष खटपट करण्यास नेपोलियन यास सवड होती. परंतु ट्राफल्गार येथील नेल्सनच्या अद्वितीय पराक्रमानंतर १८०१ अगर १८०४ प्रमाणें इंग्लंडवर स्वारी करण्याची तयारी आरंभणें दुरापास्त होतें.* 'कांटिनेंटल सिस्टिम 'ची अंमलबजावणी जारीनें चालू ठेवण्यापलीकडे त्यास आतां कांहीं करतां येण्यासारखें नव्हतें. परंतु त्यामुळेंही भानगडी उत्पन्न होऊं लागल्या. इंग्रजी माल घेण्याची बंदी केल्यामुळें त्याचेवर युरोपांतील सर्व राष्ट्रें नाखूष होऊं लागली. "तात्पुरती गैरसोय व नुकसान मनांत न आणतां तुमचे कारखान्यांस यानें जी ऊर्जितावस्था येईल ती लक्षांत घ्या" वगैरे त्याची विचारसरणी कोणासही पटली नाहीं. परंतु त्यास विशेष वैषम्य वाटण्यासारखी गोष्ट म्हणजे त्याचा भाऊ हालंडचा राजा लुई हाही इंग्लिश मालाची बंदी अमलांत आणण्याचे बाबतींत शैथिल्य दाखवूं लागला. नेपोलियननें त्यास कानउघाडणी करण्यासारखीं पत्रें लिहिल्यावर तो राज्य सोडून गुप्तपणें पळून गेला. तेव्हां हालंड हें फ्रेंच मुलखास जोडण्यांत आलें. **आतां नेपोलियनच्या प्रत्यक्ष अमलाखालीं आलेला एकंदर मुलूख ह्मणजे पोर्तुगाल, स्पेन, फ्रान्स, फ्रान्सच्या पूर्व सरहद्दीपासून ऱ्हाइन नदीपर्यंतचा प्रदेश, इटालीचा कांहीं भाग व हालंड एवढाच होय.** प्रशियाच्या एक चतुर्थांश भागावर त्याचा भाऊ जेरोम राज्य करीत होता. व नेपल्सचें राज्य त्यानें आपली बहीण कॅरोलिन हीस दिलें होतें. स्वीडनच्या लोकांनीं आपल्या राजास हांकून देऊन नेपोलियनच्या सैन्यांतील बर्नाडॉट नांवाच्या सेनापतीस आपला राजा निवडलें होतें. परंतु वर सांगितल्यापेक्षां जास्त प्रांत नेपोलियनच्या प्रत्यक्ष अमलाखालीं केव्हांही आला नाहीं.

---

* इ० स० १८०४ सालीं नेपोलियन बोलोन बंदरांत इंग्लंडवरील स्वारीची तयारी करीत असतां त्याचेकडे एक मनुष्य आला, व इंग्लंडबरोबर समुद्रावर लढण्यांत जिचा फार उपयोग होईल अशी एक आपण युक्ति काढली असल्याचें सांगूं लागला. त्याचें म्हणणें ऐकून घेण्यास फुरसद नसल्यामुळें नेपोलियननें त्यास एका प्रधानाकडे पाठविलें. तो मनुष्य शास्त्रज्ञ म्हणून प्रसिद्ध नसल्यामुळें प्रधानानें त्याचें म्हणणें नीटपणें न ऐकतां त्या युक्तींत कांहीं अर्थ नाहीं. असें बादशहास कळविलें. परंतु या मनुष्यास वाफेनें गलबतें कशीं चालवितां येतील त्याची चांगली कल्पना आली होती असें इतिहासकार सांगतात.

इटालींत इंग्रजी जहाजें आपला माल गुप्तपणें उतरवीत असत. या कामीं त्यांना उपयोगी पडणारें त्या देशांत जें एक स्वतंत्र संस्थान होतें तें नेपोलियननें खालसा करून टाकलें. शिवाय शेल्टनदीच्या मुखापासून एल्बनदीच्या मुखा-पर्यंत लष्करी ठाणीं व पहारा बसवून नेपोलियननें त्याही बाजूकडील गुप्त इंग्रजी व्यापार बंद पाडला.

या सुमारास नेपोलियनकडे सिसिलीच्या राणीकडून एक मनुष्य आला त्यानें राणीचा निरोप सांगितला कीं, " येथें इंग्लिशांनीं आह्मांवर असह्य जुलूम चालविला आहे. करितां सिसिलींतील एकूणएक इंग्रजांचा एके दिवशीं अचानकपणें खून करण्याची आह्मीं तयारी केली आहे. परंतु दैवयोगानें य यत्नांत आह्मांस अपयश आलें तर आह्मांस फ्रान्समध्यें आश्रय मिळेल असें आपलें आश्वासन असेल तरच हा प्रयत्न करणार आहोंत. " खुनाच्या कटांत आपणास बोलावल्याबद्दल नेपोलियनला इतका राग आला कीं, त्यानें या ऑफिसरास कैद करून ठेविलें. हा कट पुढें दोन महिन्यांनीं उघडकीस आला. नेपोलियननें या वेळीं उत्तेजन दिलें असतें तर तो या मुदतीपूर्वींच सिद्धीस गेला असता.

१९ मार्च १८११ रोजीं मेरिआ लुइसा प्रसूत होऊन तिला एक मुलगा झाला. मुलगी झाल्यास २० व मुलगा झाल्यास २१ तोफा उडतील असें पूर्वीं जाहीर करण्यांत आलें असल्यामुळें विसावी तोफ कानीं पडल्यावर पॅरिसमधील लोकांस क्षणभर जी तीव्र उत्कंठा वाटली, व एकविसावी तोफ झडतांच जो सर्वत्र एकच आनंद झाला त्याचें वर्णन शक्य नाहीं. या काळांत युरोपांतील कोणता प्रांत खालसा करावयाचा व तो कोणास द्यावयाचा या गोष्टी केवळ नेपोलियनच्या मर्जीवर व नेमस्तपणावर अवलंबून होत्या. राज्यांची अशी सर्रास वांटणी चालली असतां नेपोलियन आपल्या मुलास विसरण्याचा संभव नव्हता. त्यास रोमचा राजा हा किताब देण्यांत आला. या छोट्या राजेसाहेबांस त्यांच्या वड्या दर्जास शोभेल असा भव्य वाडा बांधून देण्याचें नेपोलियननें ठरविलें. त्याकरितां त्यानें पॅरिसनजीक एक मोठी जागा खरेदी करण्याचें मनांत आणिलें. परंतु त्या जागेपैकीं एका भागाचा मालक सरकारी इंजिनिअ-रांनीं केलेल्या किमतीच्या दसपट किंमत मागूं लागला. तेव्हां नेपोलियननें तितकी किंमत देण्याचा हुकूम दिला. त्याबरोबर तो मनुष्य पन्नासपट किंमत

मागूं लागला. नेपोलियन यास या प्रकारानें राग आला, परंतु त्यानें पन्नासपट किंमत देऊन ती जागा घेण्यास सांगितलें. आतां तो इसम शंभरपट किंमत मागूं लागला. तेव्हां त्याचें घर पाडून ती जागा विनमोबदला ताब्यांत घेण्यास नेपोलियन सांगेल असा सर्वांचा अजमास होता. परंतु तो म्हणाला, " या मनुष्याचें घर घेऊंही नका व पाडूंही नका. कायद्याबद्दलच्या माझ्या आदरबुद्धीचें स्मारक म्हणून तें घर तसेंच राहूं द्या. आपणांस ती जागा खरेदी करण्याचें कारण नाहीं. आपण दुसऱ्या जागेची निवड करूं. "

---

# प्रकरण ११ वें.

## रशियावरील दुसरी स्वारी.

(१८१२)

फारां दिवसांनीं वर्ष दोन वर्षांचा काळ युरोपांत शांततेचा गेला; परंतु त्यांत मधून मधून युरोपच्या ईशान्य कोंपऱ्यांतून असंतुष्ट रशियन अस्वलाच्या गुरगुरण्याचा अस्पष्ट ध्वनि कानीं पडत होता. पोलंडच्या लोकांनीं स्वातंत्र्यासाठीं रशियाविरुद्ध बंड केल्यास नेपोलियननें आपणास मदत करावी असें झारचें म्हणणें होतें. परंतु आपण स्वतः लोकांच्या इच्छेवरून सिंहासनावर चढल्यामुळें आपणास हें मान्य करणें शोभणार नाहीं, असें नेपोलियन यास वाटलें. नंतर आस्ट्रिया अगर तुर्कस्थान यांत चंचुप्रवेश करण्याचे कामीं साह्य मिळावें असें झारनें बोलणें लावलें. परंतु अशा रीतीनें लुटारूपणांस साथीदार होणें हेंही नेपोलियन यास योग्य दिसलें नाहीं. इंग्लंड व फ्रान्स यांच्यांत फारां दिवसांचें हाडवैर असल्यामुळें ते परस्परांचीं विघ्नें वाढविण्यास सदा टपलेले असत. कांहीं भांडण सुरूं झाल्याची बातमी लागतांच इंग्लंडनें त्यांत तेल ओतण्या

करितां आपला वकील मॉस्को येथें पाठविला. या तंट्याचा फायदा घेऊन नेपोलियन यास रशियामध्यें शह द्यावा, व ह्यायोगानें त्यास स्पेनकडील जार कमी करावा लागला म्हणजे त्या बाजूस त्याचेवर मात करावी असा इंग्लंडनें घाट घातला. इंग्रजी वकिलानें रशियन दरबारांतील ठळक मंडळींच्या घरीं द्रव्याचीं पोतीं ओतून त्यांचे द्वारें झारचे मनावर दाब पाडला, व त्यास अखेरीस युद्धास उद्युक्त केलें. युद्धाचा प्रसंग टळावा म्हणून नेपोलियननें नानाप्रकारें झारची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. त्याच्या मतानें त्यास स्वतःच्या अब्रूस कलंक न लावतां झारची जी एकच विनंति मान्य करतां येण्यासारखी होती ती मान्य करून त्यानें झारला ' कांटिनेंटल सिस्टिम 'च्या बंधनांतून मुक्त केलें, व इंग्रजी माल रशियांत येऊं देण्याची सवलत दिली. परंतु आतांपर्यंत झारच्या मनावर दरबाराचा पूर्ण पगडा बसला असल्यामुळें या सवलतीचा उपयोग झाला नाहीं. तेव्हां अखेरचा उपाय म्हणून नेपोलियननें इंग्लंडाला स्वतंत्रपणें तहाबद्दल लिहिलें. परंतु ही विनंति मान्य करण्याचें इंग्लंडला कांहींच कारण उरलें नव्हतें.

फ्रान्स व व इटालीमधून शक्य तितकी फौज जमा करून, व प्रशिया, आस्ट्रिया, बव्हेरिया वगैरे दोस्त राष्ट्रांकडून थोडथोडी फौज घेऊन नेपोलियन एकंदर पांच लक्ष सैन्यासह रशियावर स्वारी करण्यास ९ मे १८१२ रोजीं निघाला. रशियासारख्या दूरच्या देशावर चाल करूं नये असा सर्व फ्रेंच सेनापतींनीं नेपोलियन यास सल्ला दिला. कारण, त्या देशास जातांना फौज आस्ट्रिया व प्रशियासारख्या मनांतून रशियास अनुकूळ असलेल्या देशांतून नेणें भाग होतें. प्रशिया वगैरेंची मैत्री केवळ शस्त्रानें संपादन केलेली असल्यामुळें रशियांत नेपोलियनवर एखादें संकट गुदरल्यास ते एकदम उलटणार व त्याचें फ्रान्सशीं दळणवळण बंद पाडणार हा धोका नेपोलियन जाणून होता. परंतु ' रशियास वठणीवर आणावें; नाहीं तर रशिया व इंग्लंड वांकवतील तसें वांकावें याशिवाय मला तिसरा मार्ग उरला नव्हता. म्हणून मीं स्वारी करण्याचें ठरविलें ' असा नेपोलियन खुलासा करितो.

बाराशें मैल रस्ता चालून फ्रेंच सैन्य २३ जून रोजीं नीमेन नदीच्या कांठीं दाखल झालें. युद्धानिमित्त अगर अन्य कारणानें नेपोलियन ज्या ज्या देशांत जाई तेथें तेथें रिपब्लिकन पक्षाचा वाली या नात्यानें स्वातंत्र्यप्राप्त्यर्थ त्रस्त

लोक त्याचें साह्य मागत. नीमेन नदीचे कांठावर नेपोलियन आल्यानंतर पोलंड-मधील ठळक लोक त्याचेंकडे आले, व त्यांनीं आपल्या देशास स्वातंत्र्य देण्यांत यावें अशी विनंति केली. पोलंड देशाचे तीन तुकडे करून रशिया, प्रशिया व आस्ट्रिया यांनीं आपसांत वांटून घेतले होते. 'पोलंड आजपासून स्वतंत्र आहे' इतके शब्द नेपोलियननें उच्चारतांच तो स्वतंत्र झाला असता. व अशा उपकाराबद्दल रशियावरील स्वारीकरितां त्यास एक लाखपर्यंत पोलिश सैन्यही मिळालें असतें. परंतु या कृत्यानें नेपोलियनचे सध्यांचे दोस्त जे प्रशिया व आस्ट्रिया त्यांस राग आला असता. व रशियाचें वैमनस्य दुणावून युद्ध शक्य तितकें लवकर मिटतें घेण्याची नेपोलियनची इच्छा व्यर्थ झाली असती. शिवाय अशा परिणामांकडे दुर्लक्ष करूनही पोलंडमध्यें क्रांति केली तरी आपण फ्रान्समध्यें परत आल्यावर पोलंडसारख्या लहान राष्ट्रास आपलें स्वातंत्र्य कायम राखतां येणार नाहीं असा नेपोलियननें विचार केला. म्हणून त्यानें पोलिश लोकांस उठवाउडवीचीं उत्तरें देऊन आपल्या लष्करांत भरती घालण्याची संधि जाणनबुजून दवडली.

नीमेन नदीवर फ्रेंच सैन्य आल्यानंतर लढायांत सुरुवात झाली. झारनें असें धोरण ठेविलें होतें कीं, नेपोलियनचा युद्धानें प्रतिकार करतां आल्यास ठीकच आहे, परंतु हटणें भाग झाल्यास मार्गांतील पिकांची नासाडी करीत व धान्यसंग्रह असलेलीं गांवें जाळीत सुटावें. तेथील हिंवाळा जवळच आला होता. तेव्हां नेपोलियन जसजसा रशियांत जास्त घुसेल तसतसा उपासमार व थंडी यांच्या योगानें त्याच्या सैन्याचा अधिकाधिक नाश होऊं लागेल, असा झारचा अजमास होता. हें धोरण नेपोलियनच्या लवकरच लक्षांत आलें. परंतु पराजय झाल्याप्रमाणें हटण्यानेंही आपली इभ्रत जाऊन प्रशिया वगैरे बिथरूं लागतील असें त्यास वाटलें. म्हणून तो तसाच शत्रूस रेटीत मास्को-पर्यंत गेला. रशियन सैन्यही लढत व मुलूख उध्वस्त करीत हटूं लागलें. सर्वांत भयंकर युद्ध बॉरोडिनो येथें ५ सप्टेंबर रोजीं झालें, व या एकाच युद्धांत ३०,००० फ्रेंच व ५०,००० रशियन ठार झाले. अखेरीस पॅरिसपासून अडीच हजार मैलांवर असलेल्या मास्को शहरांत नेपोलियननें १४ सप्टेंबर रोजीं प्रवेश केला. या रशियन राजधानींत तरी आपणास सामग्री मिळेल, असें नेपोलियन यास वाटलें.

परंतु या बाबतींत त्याचा अजमास सपशेल चुकला. रशियन अधिकाऱ्यांनीं रानटीपणाचा कळस करून राजधानीचें शहरही जाळून फस्त करण्याचें ठरविलें होतें. विहिरी बुजवून, नळ तोडून, आग विझविण्याचे बंब मोडून व मोठमोठ्या इमारतींखालीं सुरुंग लावून ते तयारीनें राहिले होते. लोकांस जलदीनें शहर खुलें करून जाण्याचे त्यांनीं सक्त हुकूम सोडले होते. परंतु त्यांची अन्य ठिकाणीं घरादारांची व निर्वाहाची कांहींच सोय केली नव्हती. त्यामुळें हजारों धनिक लोकही अन्नान्नदशा होऊन मरण पावले. फ्रेंच सैन्यानें शहरांत ठाणें दिल्याबरोबर जागजागीं आग लावण्याकरितां तुरुंगांतील सर्व बदमाष कैदी मुक्त करण्यांत आले होते. १६ तारखेस मध्यरात्रीं प्रथम आग लावण्यांत आली व एकामागून एक सुरुंग उडून सर्वत्र एकच कडकडाट झाला. धरणीकंप अगर ज्वालामुखीचा स्फोट अशा प्रसंगांप्रमाणें सर्व जमीन हादरूं लागली. धुराचे काळे व प्रचंड लोट इमारतींतून निघून आकाशांत सर्वत्र पसरले; नंतर त्यांच्या अंतर्भागांत अग्नीची पिंगट प्रभा चमकूं लागली; आणि अखेरीस सर्व शहरभर लालभडक ज्वालांचें स्वैर तांडव सुरू झालें. मास्कोची भव्य नगरी केवळ दहा बारा तासांचे अवधींत अग्निसमुद्रांतील वादळांत सांपडलेल्या क्षुद्र नौकेप्रमाणें दिसूं लागली.*

फ्रेंच शिपायांनीं आगलाव्या बदमाषांस 'अग्नये स्वाहा' करून धाक बसविण्यासाठीं व आग विझविण्यासाठीं शर्थीचे यत्न केले, व नेपोलियनच्या आज्ञेप्रमाणें हजारों रशियन रहिवाशांचे प्राण वांचविले. तथापि त्यांस शहराच्या फारच थोड्या भागाचें रक्षण करितां आलें. नेपोलियनची शहराबाहेर जाण्याबद्दल सर्वांनीं प्रथमपासून प्रार्थना चालविली होती. परंतु ही

---

*नेपोलियननें या आगीसंबंधीं काढलेल्या उद्गारांचें इंग्रजींत असें भाषांतर करण्यांत आलें आहे:—"Not all the fictions of the burning of the Troy, though heightened by all the powers of poetry could equal the reality of the destruction of Moscow.

It was the spectacle of a sea and billows of fire, a sky and clouds of flame; mountains of red rolling flames elevating themselves to the skies of flame above, and then sinking into ocean of flame below. It was the most grand, the most sublime, the most terrific sight the world has ever beheld!"

आग विझवितां येण्याबद्दल त्याची खात्री असल्यामुळें तो तेथून हलेना. अखेरीस राजवाड्याचे सर्व दरवाजे पेटून आंत आगीचे डोंब येऊं लागल्या-नंतर मार्शल मॉर्टियरनें त्यास बाहेर ओढून काढलें. त्यास शहराबाहेर जातां येण्याकरितां सर्वांत सुरक्षित म्हणून जो बोळ निवडण्यांत आला तोही इतका भडकून गेला होता कीं, दोन्ही बाजूंस घरें नसून विस्तवाच्या झुलत्या भिंती असल्याचा भास होत होता. अशा तऱ्हेच्या अरुंद रस्त्यानें, खालीं निखाऱ्यांचा पसारा, वरून जळक्या वाशांचा वृष्टि, आणि मधूनमधून दोन्ही बाजूंकडील घरांस जोडणाऱ्या ज्वालांच्या पताका व कमानी, अशा स्थितींत तो व त्यास वाट दाखविणारे कसे तरी शर्थीनें बाहेर पडले. परंतु तेवढ्यांत सर्वांचे बूट व कपडे आणि ज्यांस दाढ्या होत्या त्यांच्या दाढ्या यांस आगीपासून बरीच इजा पोंचली. आगीचा जोर कमी होण्यास आठ दिवस लागल्यामुळें नेपोलियन यास तोंपर्यंत राजवाड्यांत परत येऊन राहणें शक्य झालें नाहीं.

यामुळें सामग्री मिळण्याची शेवटची आशा संपून भावि महानर्थांची कल्पना नेपोलियनच्या मनापुढें पूर्णपणें उभी राहिली. परत फिरून हिंवाळा पोलंडमध्यें घालवावा व नंतर पुनः युद्धास सुरुवात करावी असा त्यानें बेत केला. तथापि शत्रूच्या कोणत्याही कृत्यानें आपल्या मूळ योजनेंत काडीमात्र फरक पडला नाहीं व आपणास यत्किंचितूही इजा झाली नाहीं असें दाखविण्याचें त्यानें धोरण ठेविलें. त्यानें पूर्वींच्या चाळीस वर्षांचीं 'ॲन्युअल रजिस्टरें' तपासून येथें हिंवाळ्यास नोव्हेंबरचे तिसऱ्या आठवड्यांत प्रारंभ होतो अशी माहिती मिळविली. म्हणून मॉस्को येथें आणखी कांहीं दिवस घालविले तरी हिंवाळ्यापूर्वी पोलंडला सहज पोंचतां येईल असें त्यास वाटलें. त्यानें मॉस्कोचा मुक्काम घालून निरनिराळ्या बाबतींत फर्मानें प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली, व आपली स्थिति पूर्णपणें सुरक्षित असून मॉस्को येथून हलण्याचा आपला बिलकुल इरादा नाहीं असा युरोपांत ग्रह उत्पन्न केला.

नेपोलियन शत्रु म्हणून रशियांत आला असतांही थोड्याच अवकाशांत रशियन प्रजेबद्दल त्यानें जी झारपेक्षांही जास्त कळकळ दाखविली त्यामुळें आदर व आशा उत्पन्न होऊन अर्धवट गुलामगिरींत दिवस काढीत असलेल्या रशियन 'सर्फ्स' वर्गानें त्याचेकडे आपले प्रतिनिधि पाठविले, व आपणांस

करून मॉस्को येथें लोकसत्ताक राज्य स्थापावें अशी विनंति केली. ही मान्य करून लक्षावधि रशियन सैन्य झारविरुद्ध लढण्यास नेपोलियन यास मिळवितां आलें असतें; व सामग्रीच्या अभावानें होत असलेल्या व पुढें वाढणाऱ्या हालांतून सुटतां आलें असतें. परंतु यामुळें आपल्याबद्दलचा युरोपियन राजे व राजपक्षीय लोक यांचा तीव्र द्वेष शतपट वृद्धिंगत होईल, व आपणास फ्रान्सची सुधारणा करण्यास जी विश्रांति पाहिजे ती न मिळतां युद्ध अनंत काल लांबेल असा विचार करून नेपोलियननें या प्रतिनिधींस स्पष्ट नकारार्थी उत्तर दिलें. ‘ झारचें मन न दुखावें एवढ्याचकरितां मीं हा मोठा स्वार्थत्याग केला ’ असें नेपोलियनचें म्हणणें आहे.

आक्टोबर १३ रोजीं अकस्मात् बर्फवृष्टि होऊन भोंवतालचें मैदान पांढरें होऊन गेलें. याप्रमाणें नेहमींपेक्षां या वर्षी तीन आठवडे हिंवाळ्यास लवकर सुरुवात झाली. फ्रेंच सैन्यावरील पुढील अरिष्ट या ईश्वरी कोपाचेंच फळ होय. नेपोलियननें पोलंडकडे निघण्याचा ताबडतोब हुकूम दिला. १८ तारखेस सैन्य हलूं लागलें, व तेव्हांपासून पोलंडला पोंचेपर्यंत एकसारखे रशियन कोसॅक स्वारांचे छापे सुरू झाले. थंडीचें मान लवकरच फॅरनहाइटच्या –६० अंशावर आलें. नाकांतून सोडलेल्या श्वासाचेंही बर्फ होऊं लागलें, व थंडीनें ताठून पदोपदीं अनेक शिपाई पडूं लागले. हिमवृष्टि सतत सुरू असल्यामुळें पडलेल्या शिपायांचे भोंवतीं बर्फाचें थडगें जमण्यास विलंब लागत नसे. शरीरांतील रक्त गोठून घोडे व शिपाई जमिनीवर पडले म्हणजे त्यांचा पुरा प्राण जाण्याचे आंतच कावळे व गिधाडें त्यांचे लचके तोडीत. अशा स्थितींत तीन आठवडेपर्यंत शत्रूंशीं अहोरात्र झगडून मुख्य सैन्यास वाट चालण्यास सवड देण्याचें काम मार्शल ने यावर पडलें. तें त्यानें इतक्या उत्कृष्टपणानें बजाविलें कीं, नेपोलियननें त्यास ‘ शूरांत अतिशूर ’ असा किताब दिला. ता. २७ व २८ आक्टोबर रोजीं बेरेसिनाचे पुलावर झालेल्या घनघोर संग्रामाची हकीकत अंगावर शहारे आणण्याजोगी आहे. या पुलावर केवळ यमपुरीचे देखावे दिसून आले असें म्हणण्यास हरकत नाहीं. दैवकृत व मनुष्यकृत महापत्तींच्या फेऱ्यांत सांपडला असतांही नेपोलियन या युद्धांत नेहमींप्रमाणेंच प्रशांत चित्तानें डावपेंच लढवून संख्येनें भारी असलेल्या शत्रूंचा पराभव करूं शकला, याबद्दल रशियन चरित्रकारांनींही त्याची अत्यंत

प्रशंसा केली आहे. नेपोलियननें रशियन मुलखांत नेलेल्या चार लक्ष फौजेपैकीं वीस हजार लोक पोलंडमध्यें जिवंत परत आले.

शत्रुपक्षाकडे एकंदर प्राणहानि याहूनही जास्त झाली. रशियन लष्करानें गांव जाळल्यामुळें त्या देशांतील दोन तीन लाख प्रजा कृत्रिम दुष्काळानें प्राणांस मुकली. फ्रान्सच्या स्वारीस अटकाव करतांना व पुढें फ्रेंचांचा पाठलाग करितांना झालेल्या लढायांत दोनतीन लाख रशियन सैन्य ठार झालें. शिवाय पाठलागाचे वेळीं थंडीचा कडाका फ्रेंचांप्रमाणें तद्देशीय सैन्यासही जाणवला; व दुर्मिळ संधि न गमावण्यासाठीं मोठ्या ईर्षेनें फ्रेंच राक्षसाचा पाठलाग करीत असतां रशियनांपैकीं एक लाख शिपाई हिमराक्षसाच्या जबड्यांत सांपडले.

पोलंडचे लोक फ्रान्सला अनुकूळ होते. तेथपर्यंत आपलें सैन्य आणून पोंचविल्यावर नेपोलियन तावडतोब इतरांच्या पूर्वीं एकटाच पॅरिसकडे निघाला. कारण रशियांतील बातमी कळल्यापासून आस्ट्रिया वगैरे राष्ट्रें पुनः फ्रान्सवर चाल करण्यास सज्ज होऊं लागलीं होतीं. पॅरिस येथें पोंचतांच नेपोलियन त्यांच्या प्रतिकाराच्या तयारीस लागला.

रशियांतील प्रळयानें त्याच्या मनास धक्का वगैरे बसल्याचें कोणासही दिसून आलें नाहीं. त्यानें आपल्या मनाचें असें वर्णन केलें आहे कीं, " परमेश्वरानें माझें मन संगमरवरी दगडासारखें बनविलें आहे. महासंकटाची वीज कडकडली तरी त्याची स्थिरता भंग पावत नाहीं. क्षुद्र संकटांचे बाण तर त्यावरून नुसते घरंगळत जातात. "*

फ्रान्सच्या या वर्षीच्या दुर्दैवाची कथा येथेंच संपत नाहीं. पानिपतपेक्षां मोठा अनर्थ रशियामध्यें फ्रेंच साम्राज्यावर गुदरला असतां स्पेनमध्येंही नशिबानें त्याचा पिच्छा पुरविण्यास कमी केलें नाहीं. रशियामधील स्वारीकरितां आपली सर्व अस्सल फौज जमविल्यावर नेपोलियननें पोर्तुगाल–स्पेनच्या रक्षणार्थ नुकत्याच लष्करांत घेतलेल्या मुलांचें व ज्ञातारपणानें निरुपयोगी

---

* या त्याच्या उद्गारांचें इंग्रजींत पुढें दिल्याप्रमाणें भाषांतर करण्यांत आलें आहे:—
" Nature has given me a mind of marble. Thunder cannot ruffle it. The shaft merely glides along. "

झालेल्या शिपायांचें मिळून एक लक्ष सैन्य ठेविलें होतें. नेपोलियन शेलक्या फौजेसह दूरदेशीं गेलेला दिसतांच स्पेनपोर्तुगालमधील लोक उठले, व जूनोसारख्या गचाळ सेनापतीच्या हाताखालीं त्या देशांत ठेविलेल्या एक लक्ष फौजेवर तुटून पडले. ही स्थिति पाहून इंग्लंडनें स्पॅनिश बंडखोरांस सहाय्य करण्याकरितां शिंदे–होळकरांशीं लढून प्रसिद्धीस आलेला व पुढें ड्यूक ऑफ वेलिंग्टन अशी पदवी पावलेला आपला खासा सरदार खाशा सेनेसह पाठविला. वेलिंग्टननें संकटसमयीं सर जॉन मूरप्रमाणें आपणास थेट समुद्र पाहण्याचा प्रसंग येऊं नये म्हणून स्वतःकरितां आश्रयस्थान निर्माण करण्याचें योजिलें. लंडनच्या कुबेरनगरींतून वाटेल तसा पैसा आणून त्यानें पोर्तुगालच्या पूर्वसीमेवर किल्ल्यांची रांगची रांग बांधून टाकली.

१८१२ प्रमाणें १८१३ व १८१४ सालींही नेपोलियन अन्यत्र युद्धांत गुंतल्याचें पुढें समजून येणार आहे. हीं तीन वर्षें वेलिंग्टनचीं स्पेनमध्यें लढण्यांत गेलीं. मार्शल जूनो बेसावध दिसला म्हणजे त्यास बंडखोर स्पॅनिशांच्या सहाय्यानें चावा घ्यावा, त्यामुळें खडबडून उठून तो हुडकूं लागला म्हणजे दडून बसावें, अशा शिताफीनें वेलिंग्टन युद्ध करीत होता. जूनोनें विशेष दक्षता दाखविली व विशेष नेट धरला तर वेलिंग्टन सूं पळ काढून पोर्तुगालमध्यें किल्ल्यांच्या आड जाऊन बसत असे. या पळांस खुबीदार पळ ( Skilful retreats ) असें नांव देण्यांत आलें आहे. फ्रेंच साम्राज्याच्या दक्षिण कोंपऱ्यांतील वेलिंग्टनचे हे छापे व पळ यांस इतिहासांत ‘ द्वीपकल्पांतील युद्ध ’ अशी संज्ञा आहे. नेपोलियननें स्पेन-पोर्तुगालमध्यें ठेविलेल्या सैन्यांपैकीं या तीन वर्षांत मिळून तीनचतुर्थांशाचा संहार झाला. वेलिंग्टनचा हा द्वीपकल्पांतील द्वीपिकल्प पराक्रम अवलोकन करून सर्व युरोपनें तोंडांत बोट घातलें. इंग्लिशांनीं त्यास Iron Duke म्हणजे ‘ लोखंडी ड्यूक ’ असें अजिंक्यत्वद्योतक नांव दिलें. त्याचेवर अनेक कवींनीं पोवाडे रचले, व ‘ गंधर्व गाती करिती तनाना ’ अशी इंग्लंडांत स्थिति होऊन गेली. पार्लमेंटनें त्यास लाखों पौंडाच्या देणग्या देऊन त्याचा लोहदेह सुवर्णानें मढविला, व लोकांनीं तो दिसेल तेथें जयघोष करून त्याचा अंतरात्मा प्रसन्न केला.

याप्रमाणें इंग्रजी युद्धकौशल्याची कीर्ति वेलिंग्टन दिगंतीं पसरवीत असत त्याच्या शुभ्र यशास इंग्रज शिपायांच्या वर्तनानें मात्र थोडासा काळिमा

लागला. लुटालूट, जाळपोळ व त्याहूनही निंद्य कर्मे करून त्यांनीं स्पॅनिश लोकांस त्रस्त करून सोडिलें. फ्रेंच सैन्याचे वर्तनांत आक्षेप घेण्यास बिलकुल जागा नव्हती. युद्ध शत्रूच्या सैन्याशींच करावयाचें, शत्रूच्या मुलखांतील प्रजेच्या मालास, प्राणास अगर अब्रूस बिलकुल धक्का पोंचवावयाचा नाहीं, अशी नेपोलियनची आपल्या सैन्यास सक्त ताकीद असे. हें वळण अंगीं जडलेल्या फ्रेंच सैन्यांतील कडक शिस्त व इंग्रज सैन्याचे अत्याचार पाहून शत्रू म्हणून आलेले फ्रेंच पुरवले पण मित्र म्हणून आलेले इंग्रज नकोत, असें स्पेनच्या लोकांस होऊन गेलें. याबद्दल कित्येकांनीं 'लोखंडी ड्यूकास' दोष दिला आहे तो मात्र गैर आहे असें म्हणावें लागतें. कारण शिपायांचें हें वर्तन त्यास बिलकुल पसंत नव्हतें. 'शिपाई बेशिस्त झाले आहेत, ते मला आंवरत नाहींत.' अशा तक्रारी त्यानें अनेक वेळां आपल्या सरकाराकडे केल्या आहेत.

---

# प्रकरण १२ वें.

## सर्व युरोपबरोबर युद्ध.

(१८१३)

रशियामध्यें चार लक्ष व स्पेनमध्यें पाव लक्ष फौज गारद होऊन फ्रान्सची कंबर मोडली असें दिसून येतांच युरोपांतील सर्व मोठ्या राष्ट्रांनीं नेपोलियनबरोबर युद्ध करण्याकरितां पुनः जूट केली, व १८१३ सालीं एका मनुष्याविरुद्ध सर्व युरोपखंड लढत असल्याचा विलक्षण देखावा दृष्टीस पडला. या बड्या राष्ट्रांनीं लहान लहान संस्थानांस अशी नोटीस दिली कीं, 'आपलें सर्व सैन्य आम्हांस द्यावें, नाहीं तर तुमचें राज्य खालसा करूं'. अशा सक्तीनें बव्हेरिया वगैरे देशांस त्यांनीं आपल्या पक्षास खेंचून आणिलें. एकट्या सॅक्सनीनें मात्र स्वहिताकडे लक्ष देऊन मित्रद्रोह करण्याचें नाकारलें. त्यामुळें युरोपियन फौजांनीं तो देश तेव्हांच पादाक्रांत करून टाकला.

ही बातमी नेपोलियन यास समजतांच त्यानें दोन लक्ष फौज जमा केली व त्यांपैकीं दीड लक्ष फौज घेऊन तो १५ एप्रिल रोजीं पॅरिस येथून निघाला. निघते वेळीं तो म्हणाला, " माझ्या राज्यांतल्या कनिष्ठ प्रतीच्या शेतकऱ्यांचाही मला हेवा वाटूं लागला आहे. माझ्या इतकें वय झाल्यावर त्यास देशाच्या ऋणांतून मुक्त होऊन आपल्या बायकामुलांच्या सहवासांत स्वस्थतेनें काळ घालवितां येतो. परंतु मला अद्यापि युद्ध करीत राहणें भाग आहे. " दुसऱ्या एका भाषणाचे प्रसंगीं त्यानें असे उद्गार काढले कीं, ' मी ऐंशी वर्षांचा झालों तरी माझ्या मागचें हें युद्ध सुटेल कीं नाहीं कोण जाणे. '

तारीख २५ एप्रिल रोजीं युद्धास तोंड लागलें, व तेव्हांपासून एकसारखीं खडतर युद्धें होऊन भयंकर प्राणहानीस सुरुवात झाली. नेपोलियन शत्रूंची धूळधाण उडवीत ब्रन्झलॉ येथें पोंचल्यावर तेथें प्रसिद्ध रशियन सेनापति कुटुसॉफ हा नुकताच वारल्याचें त्यास समजलें. नेपोलियन यास शत्रूच्या गुणाबद्दलही आदर असे. कुटुसॉफ हा फार शूर व कुशल सेनापति असल्यामुळें त्याचें येथें स्मारक करण्याबद्दल नेपोलियननें हुकूम दिला व त्या कामाकरितां लागणारे पैसेही तावडतोब पुरविले. हें त्याचें कृत्य स्तुत्य समजलें जातें.

मोरो नांवाच्या फ्रेंच सेनापतीस हद्दपारीची शिक्षा होऊन त्यास अमेरिकेंत पाठविण्यांत आलें होतें, हें मागें सांगितलेंच आहे. पुढें नेपोलियननें त्यास माफी करून परत येण्याची परवानगी दिली होती. हा मनुष्य आतां नेपोलियनच्या शत्रूंस मिळाला. बर्नाडाट नांवाच्या फ्रेंच सेनापतीस स्वीडनचें राज्य मिळाल्याबद्दलचा वृत्तांत पूर्वीं आलाच आहे. नेपोलियनचा पडता काळ पाहून व त्याच्यांत पूर्वीप्रमाणें निग्रहानुग्रह करण्याचें सामर्थ्य उरलें नाहीं हें जाणून बर्नाडाट स्वीडिश फौजेसह नेपोलियनच्या शत्रूंस मिळाला. दोन फ्रेंच सेनापति आपल्या गोटांत आलेले पाहून युरोपियन राजमंडळास आनंद झाला, व नेपोलियनचे डावपेंच यांस चांगले अवगत असले पाहिजेत असा विचार करून सर्वांनीं युद्ध त्यांच्याच धोरणानें चालविण्याचें ठरविलें. मोरो व बर्नाडाट यांनीं नेपोलियनच्या शत्रूंस असा सल्ला दिला कीं, " तुमच्याजवळ कितीही फौज असली तरी जेथें नेपोलियन स्वतः हजर असेल तेथें यश मिळविण्याची तुम्हीं आशा सोडा. नेपोलियनची गांठ पडेल तेव्हां पळ काढावा, व फ्रेंच सैन्याच्या ज्या

भागांत तो नसेल त्यावर तुटून पडावें असा क्रम तुह्मी स्वीकारा." या गुरुमंत्राप्रमाणें रशिया, प्रशिया, आस्ट्रिया, स्वीडन वगैरेंचीं संयुक्त सैन्यें यापुढें नेपोलियनबरोबर युद्ध करूं लागलीं. मनुष्यबळ किंवा साधनबळ कमी असणाऱ्या पक्षानें स्वीकारण्याचा गनिमी कावा नेपोलियनच्या असंख्य शत्रूंनीं उचलल्यामुळें यापुढें त्यास बराच त्रास झाला. शिवाय रशियन स्वारीनंतर जरी त्यानें कांहीं पायदळ जेमतेम जमा केलें होतें तरी त्याच्या सैन्यांत स्वारांचा जवळजवळ पुरता अभावच होता. त्यामुळें १८१२ नंतर नेपोलियननें जे जय मिळविले त्यांचा त्यास चांगला फायदा घेतां आला नाहीं. शत्रू पराभूत होऊन पळावयास लागल्यानंतर स्वारांकडून पाठलाग करविला म्हणजे त्या वेळीं त्यांच्यांत खरा संहार होतो. म्हणून आतां मोठमोठ्या लढाया जिंकूनही त्यास शत्रूंचा पूर्ण विध्वंस करतां येणें अशक्य झालें होतें. अशा भयंकर प्रतिकूलतेच्या परिस्थितींत पांचसात राष्ट्रें एकदम विरुद्ध उठलीं असतां युद्ध चालूं ठेवण्यांत ॲलिसनच्या मतें नेपोलियनच्या धैर्यादि प्रचंड मानसिक शक्ति अन्य प्रसंगापेक्षांही जास्त उज्ज्वल स्वरूपांत दिसून येतात. पूर्वीं लोळवून नामोहरम केलेलीं राष्ट्रें रशियांतील अनर्थानंतर चेतलीं यांत कांहीं अनपेक्षित झालें, असें नेपोलियन यास वाटलें नाहीं तो म्हणाला, " दुखण्यानें पडलेल्या सिंहाच्या तोंडावर गाढवानें दुगाण्या झाडल्याची इसापनीतींत जी गोष्ट आहे त्यांतलाच हा प्रकार आहे."

गनिमी काव्यानें शत्रु आपणास जेरीस आणणार असें दिसतांच नेपोलियननें आपण होऊन हल्ले करून त्यांना लढाया देणें भाग पाडलें, व त्यांचा अनेक ठिकाणीं मोड केला. ता. २५,२६,२७ या तीन दिवसपर्यंत ड्रेस्डेन येथें झालेल्या दारुण संग्रामास इतिहासांत तोड मिळणें कठीण आहे. या भयंकर युद्धानंतर नेपोलियन श्रमानें आजारी पडला. म्हणून पळवून लावलेल्या शत्रूंचा पाठलाग करण्याचें काम त्यास आपल्या सेनापतींवरच सोंपवावें लागलें. परंतु या सेनापतींची शत्रूंच्या मोठमोठ्या भागांशीं गांठ पडून पराभव होऊं लागला. थोड्याच दिवसांत निरनिराळ्या ठिकाणीं व्हँडॅम, ऊडिनॉट, जीरार्ड, लॉरिस्टन, ने, मॅक्डोनल्ड इतक्या सेनापतींचा पराभव होऊन कित्येक तोफा व शिपाई शत्रूंच्या हातीं पडले. तेव्हां अद्यापि प्रकृति सुधारली नसतांही नेपोलियन ४ सप्टेंबर रोजीं युद्धास निघाला. त्यानें

लागलीच दोन तीन ठिकाणीं शत्रूंचा पुनः पराभव केला. परंतु तो तसाच पुढें चाल करीत असतां पिछाडीस शत्रूचें पांच सहा लक्ष सैन्य जमा होऊन त्याचें पॅरिसशीं दळणवळण तुटण्याचा रंग दिसूं लागला. असें असतां नेपोलियननें परत हटण्याचा विचारही मनांत आणिला नाहीं. आपण पुढें जात असतां मागें शत्रु कदाचित् फ्रान्सवर स्वारी करतील त्याचा बंदोबस्त करण्याकरितां त्यानें पुनः एक लक्ष नवें सैन्य जमा करण्याचा फ्रान्समध्यें हुकूम पाठविला. व स्वतः थेट बर्लिनपर्यंत चाल करून प्रशिया देश ताब्यांत घेण्याचा त्यानें धाडसी विचार केला. युद्धज्ञ लेखकांनीं या योजनेबद्दल नेपोलियनची विशेष प्रशंसा केली आहे; परंतु हा बेत नेपोलियनच्या सेनापतीस तेव्हां पसंत न पडून त्यांनीं ऱ्हाइनकडे हटण्याचा आग्रह धरला. नेपोलियन यास आपल्या योजनेस यश येईल याबद्दल शंका नव्हती. परंतु अशा साहसाची जोखीम आपल्या एकट्यावर घेणें त्यास सध्यांच्या परिस्थितींत इष्ट वाटलें नाहीं. करितां त्यानें सेनापतींचें ह्मणणें मान्य केलें.

नेपोलियन परत हटत असतां १६ आक्टोबर रोजीं लीपसिग येथें त्याच्या सव्वा लक्ष सैन्यास साडेतीन लक्ष संयुक्त सैन्याचा गराडा पडला. हा फ्रेंच सेनापतींनी ऱ्हाइनकडे हटण्याबद्दल धरलेल्या दुराग्रहाचा परिणाम होता. तथापि या वेळीं निर्भर्त्सनेचा एक शब्दही न उच्चारतां स्वतःच्या चुकीनें हा प्रसंग ओढवल्याप्रमाणें त्यांतून पार पडण्याकरितां नेपोलियननें यत्नांची शिकस्त चालविली. येथें सर्व दिवसभर तुंबळ युद्ध होऊन दोन्ही पक्षांकडील वीस वीस हजार लोक ठार झाले. या दिवशीं रात्रीं त्यानें तहाबद्दल विचार करण्यास मुदत ( Armistice ) द्यावी अशी युरोपियन राजांस विनंति केली, व अशी मुदत रशिया व आस्ट्रियाच्या बादशहांस आस्टर्लिझच्या लढाईनंतर मीं दिली होती, असें त्यानें शत्रूंस स्मरण दिलें १७ तारखेचा दिवस उत्तराची वाट पाहण्यांत त्यानें काढला; परंतु शत्रूंनीं कांहींही उत्तर न पाठवितां उलट दिवसभर जास्त फौज जमविली. १७ तारखेस रात्रभर नेपोलियन ताप व वांती यांनीं हैराण होता. परंतु स्वस्थ बसण्यांतील धोका जाणून त्यानें दुसरे दिवशीं पुनः शत्रूंवर हल्ला केला. या वेळीं पुनः दोन्ही पक्षांकडील वीस वीस हजार ठार झाले. या दिवशीं रात्रीं नेपोलियन दुसऱ्या दिवसाच्या लढाईची तयारी करीत असतां त्यास वर्दी पोंचली कीं, फक्त दोन

लासांच्या लढाईस पुरण्याइतकाच दारूगोळा शिल्लक आहे. तेव्हां त्यानें सैन्यास तावडतोब पळ काढण्याचा हुकूम दिला. या वेळीं त्यानें लीपसिग गांवास आग लावून दिली असती तर शत्रूंस त्याचा पाठलाग करतां आला नसता. परंतु शत्रूच्या देशांतील बिनलढाऊ लोकांस जाळून टाकणें त्यास मर्दपणाचें वाटलें नाहीं. 'लीपसिगच्या बाहेर पडेपर्यंत तुम्ही फ्रेंच सैन्यावर गोळ्या टाकूं नयेत' अशी त्यानें शत्रूंस विनंति केली. तिकडे दुर्लक्ष करून शत्रूंनीं लीपसिगवर भडिमार केला, व फ्रेंच सैन्यांतील वीस हजार शिपायांबरोबर आपल्याच गांवांतील हजारों लोक ठार केले. लीपसिग शहर जाळण्यास उत्सुक झालेल्या फ्रेंच शिपायांस नेपोलियननें अखेरपर्यंत आंवरून धरिलें.

जनरल म्यूरॅट हा नेपोलियनची बहीण कॅरोलिन इचा नवरा असून त्यास नेपोलियननें नेपल्सचें राज्य दिलें होतें, हें मागें सांगितलेंच आहे. लीपसिगच्या युद्धानंतर नेपोलियनच्या पक्षास चिकटून राहणें धोक्याचें वाटून तो नेपल्सहून नेपोलियनच्या मदतीस फौज आणण्याची सबब सांगून निघून गेला. शत्रूंशीं स्वतंत्रपणें तह करून नेपल्सचें राज्य आपणाकडे राखण्याची व्यवस्था करावी, असा म्यूरॅटचा बेत होता. नेपोलियननें त्याचें धोरण तेव्हांच जाणलें होतें, परंतु पुढें मागें दगा करणारा हा कपटमित्र आतांच गेलेला बरा असें वाटून 'नेपल्सहून तुह्मी लौकर फौज घेऊन यावें' असें ह्मणून नेपोलियननें त्यास निरोप दिला. या वेळीं इटालीचा व्हाइसराय नेपोलियनचा सावत्र मुलगा यूजीन हा नेपोलियनच्या सहाय्यार्थ फौजेनिशीं त्वरेनें येत होता. म्यूरॅटनें नेपल्सची फौज जमा करून यूजीनवर हल्ला केला व नेपोलियनच्या विघ्नांत कृतघ्नपणें भयंकर भर टाकली.

बव्हेरिया वगैरे जर्मनींतील संस्थानांनीं या सुमारास फ्रान्साविरुद्ध युद्ध जाहीर केलें. नेपोलिनयच्या सैन्यांत कांहीं जर्मन पलटणी होत्या. या सर्व पलटणी त्यानें आतां शस्त्रास्त्रांसह जर्मनींत पाठवून दिल्या व त्यांचेबरोबर जर्मन संस्थानिकांस असा निरोप पाठविला कीं, "तुह्मी मजबरोबर युद्ध सुरूं केल्यामुळें या पलटणी कैद करून ठेवण्याचा मला हक्क आला आहे. परंतु माझ्या नोकरीस असलेल्या प्रत्येक इसमास मजबद्दल विश्वास असला पाहिजे असें मला वाटत असल्याकारणानें मी सूड घेऊं इच्छित नाहीं." परत हटतांना मार्गांतील

किल्ल्यांमधील शिबंदी आपल्या लष्करांत घेऊन मैदानावर लढण्यास त्यानें लीपासिगच्या लढाईनंतर ८०,००० शिपाई जमा केले होते. परंतु शत्रूंची संख्या आतां सहा लक्षांपर्यंत चढली होती. युद्ध चालू असतां जर्मन पलटणी कदाचित् स्वदेशबांधवांकडे जाऊन बिकट प्रसंग आणतील ह्मणून त्या नेपोलियननें काढून टाकल्यामुळें त्याचें सैन्य रोडावून आतां ऐंशीं हजारावरून तीस हजारांवर आलें. शत्रूंच्या अगणित सैन्यांत या जर्मन शिपायांची उलट भरच पडली.

फ्रान्सकडे त्वरेनें हटत असतां नेपोलियनची हेनॉ येथें ६०,००० शत्रूंशीं गांठ पडली. येथील खडतर युद्धांत त्यांचा पुनः पराभव करून नेपोलियननें पॅरिसचा रस्ता खुला केला. ५ नोव्हेंबर रोजीं तो पॅरिस येथें दाखल झाला.

जर्मन संस्थानिकांपैकीं सॅक्सनीचा राजा नेपोलियनच्या पक्षास अद्यापि निष्ठापूर्वक धरून राहिला होता. त्यास नेपोलियननें कळविलें कीं, "तुमचें संरक्षण करण्याचें आतां माझ्यांत सामर्थ्य नसल्यामुळें तुम्ही माझा पक्ष धरून आपला नाश करून घ्यावा हें मला बरें वाटत नाहीं. आपल्या सुरक्षिततेसाठीं तुम्हीं शत्रूंशीं वाटेल तो तह करावा. आजपर्यंत तुम्हीं केलेल्या सहाय्याचें मला कृतज्ञतापूर्वक सदैव स्मरण राहील." या निरोपानें उदार अंतःकरणाच्या सॅक्सन राजास दुःख झालें. परंतु दैवापुढें मान वांकवून त्यानें नेपोलियनच्या शत्रूंस आपली फौज दिली.

स्वीडनचा राजा गस्टॅव्हस यास त्याच्या प्रजेनें पदच्युत करून नेपोलियनच्या सैन्यांतील बर्नाडॉट नावांच्या सेनापतीस गादीवर बसविलें होतें. या गस्टॅव्हसनें आतां नेपोलियनचें साहाय्य मागितलें. त्यास अनुकूल असा एक पक्ष अगोदरच स्वीडनमध्यें असल्यामुळें नेपोलियनच्या मदतीनें त्यास राज्य सहज परत मिळवितां आलें असतें. अशी मदत करण्यांत नेपोलियनचाही फायदा होता. कारण बर्नाडॉट कृतघ्नपणें नेपोलियनच्या शत्रूंस मिळाला होता, त्यास आपली फौज स्वसंरक्षणाकरितां स्वीडनमध्यें परत न्यावी लागली असती व त्यामुळें नेपोलियनचा भार कांहींसा हलका झाला असता. परंतु प्रजेस नापसंत असलेला राजा तिच्यावर बळेंच लादणें हें नेपोलियन स्वतः लोकनियुक्त राजा असल्यामुळें त्यास अन्यायाचें वाटलें, व त्यानें गस्टॅव्हस यास मदत करण्याचें नाकारलें.

---

# प्रकरण १३ वें.

## सर्व युरोपची फ्रान्सवर स्वारी.

(१८१४)

युरोपांत वीस वर्षेपर्यंत पेटत असलेलें होमकुंड आतां विशेष प्रदीप्त होऊन युद्धाचा वणवा सर्व युरोपभर भडकला. सर्व लहानमोठीं राष्ट्रें नेपोलियनविरुद्ध झालेल्या संघांत या वर्षी सामील झालीं. इ. स. १८१२ व १८१३ सालीं फ्रान्सचें सर्व सैन्य ठार होऊन साधनसंपत्ति आटून गेली होती. अशा स्थितींत युरोपच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत शत्रुसेनेचा कल्पांतसागर खवळून तुफान झालेला पाहूनही प्रतिपक्षास अखेरीस नमविण्याची आशा न सोडण्यांत नेपोलियननें विशेष धैर्य प्रकट केलें असें समजलें जातें. तो ह्मणाला, " या हर्षवायु झालेल्या शत्रूंस, तैमूरलंग आपल्या कैद्यांस ज्याप्रमाणें लोखंडी गजाच्या पिंजऱ्यांतून हिंडवीत असे तसें मला हिंडविण्याची इच्छा झालेली दिसते." आणखी एके प्रसंगीं तो म्हणाला, "हे लोक मला सर्व दिशांनीं वेढून एखाद्या वन्य पशूप्रमाणें माझी शिकार करण्यास पहात आहेत. परंतु सिंहास सतावून सोडणें किती भयंकर आहे तें यांस आतां लवकरच समजून येईल."

लीपसिगखेरीज १८१३ सालीं झालेल्या सर्व युद्धांत नेपोलियनचाच जय झाला होता. परंतु त्या साल अखेर परिणाम मात्र असा झाला कीं, शत्रूंचीं सैन्यें अनेक दिशांनीं फ्रान्समध्यें घुसलीं. नेपोलियनची सर्व कारकीर्द युरोपबरोबर झगडण्यांतच गेली खरी; तथापि, या सालपर्यंत झालेल्या सर्व लढाया फ्रान्सच्या सरहद्दीबाहेर झाल्या होत्या. नेपोलियननें फ्रान्सवर मुळींच स्वारी होऊं न दिल्यामुळें सर्व युरोप युद्धामुळें बेचिराख होत असतां फ्रान्स देश शांततेचें सुख अनुभवीत होता. १८१४ चे आरंभीं मात्र खुद्द फ्रान्सच्या भूमीवर शत्रूंचा धुमाकूळ पाहण्याचा दारुण प्रसंग नेपोलियनवर पहिल्यानें आला.

आस्ट्रियाचा बादशहा नेपोलियनचा श्वशुर असल्यामुळें त्याचें मन फ्रान्सच्या पक्षास मिळण्याकडे किंवा निदान शत्रूंचा पक्ष सोडण्याकडे वळविण्याबद्दल नेपोलियननें आपल्या राणीस सांगावें, अशी सूचना करण्यांत आली

होती. आस्ट्रियासारख्या एखाद्या राष्ट्राचें पाठबळ नेपोलियन यास रगड झालें असतें; परंतु आपल्यास संकटांतून मुक्त करण्याकरितां पत्नीची प्रार्थना करणें त्यास आवडलें नाहीं. तिनें आपण होऊन तशी खटपट केली असती तर त्यास नको होती असें नाहीं. तिला कदाचित् यासंबंधीं माहिती नसेल म्हणून नेपोलियननें "आस्ट्रिया देखील आतां मजविरुद्ध झाला आहे, मी आतां पूर्णपणें एकटा झालों आहें" इतकें राणीस सांगितलें. आपल्या बापाचें वर्तन ऐकून मेरिआ लुइसा रडूं लागली. यापेक्षां ही बातमी तिला कळविल्यापासून जास्त फायदा झालेला दिसत नाहीं.

नेपोलियन यास टोळांप्रमाणें असंख्य असलेल्या शत्रूंशीं टक्कर देण्यास जेमतेम ५०,००० शिपाई मिळूं शकले. यांत चौदा पंधरा वर्षांचीं पोरें बरींच होतीं. तो २४ जानेवारी रविवार रोजीं युद्धास निघाला. पुनः आपणास राजवाड्याचें दर्शन होणार नाहीं असें वाटूनच कीं काय, त्यानें जातांना आपले खासगी कागदपत्र जाळून टाकले; व सेनेटची सभा भरवून पुढीलप्रमाणें भाषण केलें:— "मी आतां युद्धास जात आहें. माझ्या पश्चात् बुर्बोन पक्षीयांकडून तुमच्या राजनिष्ठेचा भंग करण्याचे प्रयत्न केले जातील. केवळ फ्रान्सच्या हिताकडे लक्ष देऊन राजकीय मतभेद विसरा व एकचित्तानें वर्तन करा. मला फ्रान्सच्या खालोखाल प्रिय असलेल्या महाराणीस व राजपुत्रास मी विश्वासानें तुमचे स्वाधीन करून जात आहें." नेपोलियननें भाषणास आरंभ खणखणीत आवाजानें केला होता. परंतु अखेरीस त्याचे आवाजांत कंप येऊं लागला व डोळे पाण्यानें भरून आले. नेपोलियनवरील दुर्धर प्रसंग व त्याची शोकविव्हल स्थिति पाहून, सेनेटचे कांहीं सभासद त्याच्या विरुद्ध होते तरी तेही सद्गदित होऊन गेले.

परंतु नेपोलियनची प्रकृति १८०५ सालापर्यंत होती तशी आतां सुदृढ राहिली नव्हती. त्याचें पूर्वीचें सडपातळ शरीर १८०५ पासून स्थूल होऊं लागलें, व त्याची मूळची चपलता नष्ट होत चालली. १८१२ पासून पोटशूळ, मस्तकशूळ, वांती, ज्वर वगैरे विकारांनीं तो मधून मधून अजारी पडूं लागला, व त्यामुळें कित्येक वेळां युद्धांतही घोंटाळा होत असे. परंतु आतां लक्षावधि विजयोन्मत्त शत्रू स्वदेशांत घुसलेले पाहून तो इतका खवळून गेला कीं त्याच्या मानासिक त्वेषाखालीं शारीरिक ग्लानि दडपून गेली असें ह्मणण्यास हरकत

नाहीं. बूरीन याच्या मतें पुढील चार महिन्यांतील लढायांत त्यानें तारुण्याच्या ऐन भरांतील आवेश प्रकट केला; आणि स्थळ व काळ यांचा संक्षेप करणाऱ्या भयंकर त्वरेच्या हालचालींनीं जगास थक्क करून सोडलें.

पश्चिमेकडून एका वाटेनें व पूर्वेकडून पांच वाटांनीं मिळून या वेळीं पॅरिसच्या रोंखानें शत्रूंचा एकंदर केवढा दळभार लोटला होता त्याची गणनाच करणें कठिण आहे. परंतु अध्यांकच्याचा ५०,००० शिपायांसह नेपोलियन युद्धक्षेत्रांत दाखल झाल्यावर हरणांच्या कळपांत सिंहाची उडी पडल्यानंतरचा देखावा संयुक्त सैन्यांत दिसूं लागला. नेपोलियनचे तरुण शिपाई युद्धांत अनभ्यस्त असल्यामुळें बरेच वेळां आणीबाणीच्या प्रसंगीं कच खात असत. त्यामुळें त्यांस धीर आण्यणाकरितां नेपोलियन यास शत्रूच्या माऱ्यांत सेन्याच्या अग्रभागीं रहावें लागे. मॉंटेरोच्या लढाईत ( १३ फेब्रुवारी ) नेपोलियन यास एखादा गोळा लागेल म्हणून जास्त सुरक्षित ठिकाणीं जाण्याचा आग्रह करण्यांत आला. तेव्हां तो शिपायांस म्हणाला, “ माझ्या तरुण मित्रांनो, तुम्ही निर्धास्त असा. मला ज्या गोळ्यानें मरण यावयाचें आहे तो अद्याप कोणत्याही कारखान्यांत तयार झाला नाहीं.” आर्सिसच्या लढाईत (२० मार्च) एक कुलपी गोळा जवळ पडलेला पाहून तरुण शिपायांची पलटण पळूं लागली. तेव्हां नेपोलियन आपल्या घोड्यास टांच मारून त्वरेनें त्या गोळ्याजवळ आला; व आपल्या घोड्याची मान वांकवून त्यानें त्याचें नाक गोळ्यास लावलें. इतक्यांत तो गोळा फुटला, व आसपासच्या कांहीं लोकांबरोबर नेपोलियनचा घोडा ठार झाला. परंतु त्याला स्वतःला लहानशी देखील जखम झाली नाहीं. अशा तऱ्हेच्या कृत्यांनीं नेपोलियन यास आपल्या सैन्यास निर्भयपणाचें शिक्षण द्यावें लागलें.. त्याचें स्वतःचें असें मत होतें कीं, आयुष्य सरल्यानंतर मनुष्य क्षणभरही जास्त जगूं शकत नाहीं व तें संपण्यापूर्वीं त्यास कांहीं केल्या मृत्यु येत नाहीं.*

---

* नेपोलियननें जोसेफाइन राणीचा त्याग केल्यावरही तिच्याशीं पूर्ववत् पत्रव्यवहार सुरू ठेवला होता. या सुमारास त्यानें लिहिलेल्या एका पत्रांत पुढीलप्रमाणें मजकूर आहेः— “मीं अनेक युद्धांत आपणावर मरण ओढून घेण्याचा यत्न केला आहे. मला आतां मरणाची भीति उरली नाहीं. मी जगास इतका कंटाळून गेलों आहें कीं, मृत्यु आल्यास मला सुखच वाटेल. मला कशाचीही इच्छा उरली नाहीं. परंतु लढाईत एखादी गोळी मजकडे सूं करीत येऊं लागली व ती आतां लागणार असें दिसलें म्हणजे त्यापूर्वीं जोसेफाइन हिला पुनः एक वेळ पहावें असें वाटल्यावांचून रहात नाहीं.”

शत्रू पांच सहा मार्गांनीं येत असल्यामुळें सर्व रस्ते संभाळणें अत्यंत दुर्घट होतें. तथापि तें काम एकट्या नेपोलियननें सतत चार महिनेपर्यंत केलें. त्यानें एका रस्त्यावरील टोळधाड परत रेटावी तों त्यास दुसऱ्या एखाद्या वाटेनें येणारे लक्षावधि शत्रू पॅरिसच्या नजीक पोंचल्याचें कळत असे. त्याबरोबर समोरील शत्रूंचा पाठलाग सोडून तो या नव्या रस्त्याकडे वळे. येथें कांहीं युद्धें होतांच त्यास तिसरीकडे फिरावें लागे. यामुळें विस्तीर्ण रणक्षेत्रांत एकदां या दिशेस तर एकदां त्या दिशेस असें धूमकेतूप्रमाणें त्याचें अकल्पित दर्शन होऊन शत्रूंची गाळण उडत असे.

लीपसिगच्या युद्धानंतर नेपोलियन शरपंजरीं पडला असेल अशी शत्रूंची स्वाभाविकपणें कल्पना झाली होती. त्यामुळें त्याचें आतांचें कृतांतरूप पाहून शत्रूंना त्याची पूर्वीपेक्षाही जास्त दहशत वाटूं लागली. त्यामुळें एका रस्त्यावर त्यास जय मिळतांच बाकीच्या रस्त्यांवरील शत्रूही हटत असत. ब्लूचर हा तीन लक्ष प्रशियन सैन्यासह कां पळतो तर नेपोलियन ३०,००० सैन्यासह पाठलाग करूं लागला ह्मणून; स्कार्टझेनबर्ग हा दोन लक्ष आस्ट्रियन सैन्यासह कां पळतो, तर नेपोलियन आपला पाठलाग करील ह्मणून; वेलिंग्टन दोन लक्ष इंग्रज व स्पॅनिश सैन्यासह कां पळतो, तर इतर सर्व पळाले ह्मणून; असे दीनवाणे देखावे या वर्षी एक दोन वेळां युरोपांत दिसून आले.

या तीन महिनेपर्यंत बहुतेक दर दिवशीं लढाई झाली आहे; कित्येक दिवशीं दोन दोन तीन तीन ठिकाणीं युद्धें झालीं आहेत. नेपोलियननें हजारों लोक ठार केले, व लक्षावधि पळवून लावले. परंतु संयुक्त सैन्याची स्थिति ' पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ' अशी असल्यामुळें अखेरीस कांहीं मार्गांनीं तीन लक्ष शत्रू पॅरिस येथें पोंचले. बुरीन ह्मणतो, " या प्रसंगानें, आल्प्स पर्वतावर कांहीं वेळां गरुडावर कावळ्यांचे कळप तुटून पडतात त्याचें स्मरण होतें. गरुडाच्या चोंचीच्या प्रत्येक तडाख्यासरशीं एखादा तरी कावळा ठार होतो. परंतु असे कावळे मारमारूनच गरुडपक्षी थकतो, व त्यास शत्रूंच्या संख्येपुढें हार जावें लागतें. " या कामीं युरोपियन राजांनीं प्रकट केलेला निर्धार प्रशंसनीय गणला जातो. नेपोलियनपुढें आपलीं सैन्यें शलभतुल्य असल्याचें अनुभवास आल्यावरही त्याचा प्रतापाग्नि मंद करण्यास जितक्यांच्या भस्मराशींचें दडपण अवश्य दिसलें तितके शिपाई त्याच्यावर सोडण्यास ते मुळींच कचरले नाहींत.

शत्रूंची एक तुकडी पॅरिसच्या नजीक पोंचल्याची बातमी कळली तेव्हां नेपोलियन तेथून २०० मैलांवर ३०,००० सैन्यानिशीं लढत होता. त्यानें तावडतोब सर्व सामान टाकून देऊन सड्या फौजेसह पॅरिसचा रस्ता धरला. शत्रू ज्या रस्त्यानें चालले होते त्याशीं समांतर अशा एका मार्गानें रोज ५० मैलांची मजल मारीत तो तारीख ३१ मार्च रोजीं पॅरिसजवळील फॉंटेनेब्लूच्या मैदानांत पोंचला. येथें त्यास समजलें कीं, पॅरिस येथें दोन दिवस निकराची लढाई होऊन अखेरीस तें शहर शत्रूच्या स्वाधीन करण्याच्या अटीवर तह ठरला. 'जास्त लढण्यांत अर्थ दिसला नाहीं; दारूगोळा संपत आला होता,' वगैरे सबबी नेपोलियन यास सांगण्यांत आल्या तेव्हां त्याच्या अंगाचा संतापानें भडका झाला. 'मी पॅरिसच्या सुटकेकरितां येत आहें ह्मणून वेळेवर निरोप पाठविला असूनही तुह्मी राजधानीच्या रक्षणाकरितां सुद्धां जास्त नेट दाखवूं नये काय ? दारूगोळा संपला हें खरें असेल तर मी येईपर्यंत रस्त्यांतील फरशी उकरून तुह्मांस शत्रूंवर निदान शिळांचा वर्षाव तरी करतां आला नसता काय ?' वगैरे प्रश्न तो अत्यंत क्षुब्धपणें विचारूं लागला.

तो त्वेषासरशीं तसाच बरोबर असलेले तीस हजार लोक घेऊन पॅरिसकडे जाऊं लागला. तहाच्या खर्ड्यांवर अद्यापि सह्या व्हावयाच्या असल्यास 'आम्ही पॅरिस खुलें करण्यास तयार नाहीं' असें शत्रूंस कळविण्याकरितां त्यानें आपला मित्र व एडिक्यांप कॉलेनकोर्ट यास पाठविलें. परंतु पॅरिस शत्रूंच्या स्वाधीन करून कांहीं सेनापति फॉंटेनेब्लूकडे सैन्यासह येत होते. त्यांनी 'तह पूर्ण झाला आहे, तो आतां मोडतां येत नाहीं व मोडण्यापासून फायदाही नाहीं, शत्रूंची संख्या फार मोठी आहे' वगैरे सांगून मागें परतण्याबद्दल त्याची फार विनवणी केली. परंतु तो आतां पुरता आग्रहास पेटला होता. जयानें बेहोष झालेल्या शत्रूंशीं तहाचें बोलणें लावण्याचा विचारही त्यास सपत नसे. तथापि, तो कितीही त्वेषास चढला तरी आतां फाटलेल्या आभाळास ठिगळ लावण्याचा त्याचा यत्न व्यर्थ होणार असें जाणून कॉलेनकोर्ट यानें त्याची स्वस्थ बसण्याबद्दल व तहांत विघ्न न आणण्याबद्दल अत्यंत कळकळीनें प्रार्थना केली. शत्रूंस आतां यशाची पक्की खात्री वाटूं लागल्यामुळें त्यांनीं नेपोलियनकडून येणाऱ्या कोणत्याही मनुष्यास हांकून देण्याचें ठरविलें होतें. परंतु कॉलेनकोर्टबद्दल झारच्या मनांत आदरबुद्धि असल्यामुळें त्याचा शत्रूच्या छावणींत

प्रवेश होण्याजोगा होता; करितां तहाची चर्चा करण्यास तो ॲलेक्झांडरकडे निघून गेला.

कॉलेनकोर्ट झारच्या छावणीकडे निघून गेल्यावर इकडे नेपोलियन यास तो परत येईपर्यंत दुःख, चिंता व संताप यामुळें झोंप अगर स्वस्थता मिळाली नाहीं. फ्रेंच रिपब्लिकच्या रक्षणार्थ केलेले भगीरथ यत्न -- दुर्लंध्य पर्वत चढून, दुस्तर नद्या उतरून जाऊन, ईजिप्टचा तप्त वालुकाप्रदेश व रशियाचा हिमाच्छादित प्रांत सारख्याच दृढनिश्चयानें आक्रमून, एका हातानें पंचमहाभूतांचें संयमन करीत दुसऱ्या हातानें सतत बारा वर्षेंपर्यंत शत्रूंशीं केलेलें युद्ध — यांतील पराक्रमांचें जसजसें स्मरण होईल, व त्यांच्या आतां सिद्ध झालेल्या व्यर्थतेचे जसजसे विचार मनांत येतील, तसतसे त्याच्या काळजास एकामागून एक निखारे लागत असल्यामुळें क्षणभरही डोळा लागणें शक्य नव्हतें. आणि शिवाय आतां कॉलेनकोर्ट कोणच्या अटीवर तह ठरवून येणार व त्याअन्वयें काय प्राप्त होणार -- राजधानीचा पुनर्लाभ, कां बंदिवासाचा प्रसंग, कां रणांगणावरील मृत्यु, वगैरे घोर चिंतेचें शल्य अंतःकरणाच्या मर्मांत सलत राहिल्यामुळें त्यानें हा सर्व काळ अस्वस्थतेनें तळमळत घालविला. मधूनमधून पॅरिस येथें आनंदानें थैमान घालत असलेल्या प्रचंड शत्रुसेनेचा त्यास पिशाचतुल्य वाटणारा भुभुःकार ऐकूं आल्यानें त्याचें सर्व अंतर्याम संतापानें खवळून येई, व तो उसळीसरशीं उठून दिवाणखान्यांत वेगानें फेऱ्या घालूं लागे. अशा त्वेषाच्या मधूनमधून आलेल्या झटक्यांत तहाचें भाषण बंद करण्याबद्दल त्यानें कॉलेनकोर्टकडे एकापाठोपाठ सात आठ स्वार रवाना केले.

फ्रान्सवरील प्रसंग पाहून कॉलेनकोर्ट व एकदोन फ्रेंच सेनापति मोठ्या मुत्सद्दीगिरीनें व आर्जवानें शत्रूंशीं बोलणें करीत होते. करितां या स्वारांच्या हातीं येणाऱ्या निरोपांनीं ते गोंधळून गेले. परंतु अखेरीस त्यांनीं खऱ्या स्वामिभक्तीनें या सर्व हुकमांकडे दुर्लक्ष करण्याचें ठरविलें. तो परत आल्यावर नेपोलियननें त्यास ‘ काय ह्मणतो तुझा अलेक्झांडर ? ’ असा प्रश्न केला. ‘ तुझा ॲलेक्झांडर ’ या शद्बांचा कॉलेनकोर्टसारख्या एकनिष्ठ सेवकाच्या मनास साहजिकपणें फार विषाद वाटला. म्हणून नेपोलियनची वृत्ति जास्त शांत होईपर्यंत वाट पाहून नंतर त्यानें हकीकत सांगण्यास प्रारंभ केला.

नेपोलियननें आपल्या मुलास गादीवर बसवून स्वतः गादीचा राजीनामा द्यावा, व यापेक्षां फ्रान्समध्यें शत्रूंनीं कोणतीही जास्त ढवळाढवळ करूं नये, असें ठरल्याचें कॉलेनकोर्टनें नेपोलियन यास कळविलें; व त्याचेपासून तसा राजीनामाही लिहून घेतला. त्यावर एप्रिल ४ रोजीं शत्रुपक्षाकडील सह्या होणार इतक्यांत नेपोलियनवर एक नवें संकट गुदरलें. पॅरिस व फांटेनेब्लू यांच्या दरम्यानचें ईसॉन हें महत्वाचें ठाणें धरून बसण्याचें काम ज्या मार्शल मार्मांउंट नांवाच्या फ्रेंच सेनापतीकडे होतें, तो नेपोलियनचा पक्ष आतां पडलेला पाहून, हाताखालील सैन्यासह शत्रूंस जाऊन मिळाला. त्यामुळें शत्रूंचें सामर्थ्य बरेंच वाढून, नेपोलियनला भलत्या शर्ती घालून खवळूं दिल्यास तो कदाचित् पुनः पॅरिस हस्तगत करील अशी जी त्यांस धास्ती होती ती नाहींशी झाली; व ते बिनशर्त राजीनामा मागूं लागले. तथापि रशियन झारच्या उदारपणाच्या मध्यस्थीमुळें नेपोलियनला, त्याचा बादशहा हा किताब न बदलतां, भूमध्यसमुद्रांतील एल्बा बेटाचें राज्य द्यावें असें अखेरीस ठरलें. या फांटेनेब्लूच्या तहावर ता. ६ एप्रिल रोजीं दोन्ही पक्षांकडील सह्या झाल्या.

तहाप्रमाणें नेपोलियन यास एल्बाकडे फक्त चारशें शिपाई नेण्याची परवानगी होती. परंतु त्याचेबरोबर विदेशवासास जाण्याची फ्रेंच लष्करांत प्रत्येकास उत्कट इच्छा होती. कित्येक शिपाई अशी स्पष्ट धमकी देऊं लागले कीं ' निवडलेल्या चारशेंमध्यें आमचा समावेश झाला नाहीं तर त्यांपैकीं कोणाचा तरी खून करून आम्ही स्वतःकरितां जागा करूं '. २० एप्रिल रोजीं एल्बाकडे निघेपर्यंत अशा माथेफिरू भक्तांची समजूत घालतांना नेपोलियन यास फार प्रयास पडले.

---

# प्रकरण १४ वें.

## एल्बा बेटावरील वास्तव्य.

(१८१४-१५.)

नेपोलियन ३ मे रोजीं एल्बा बेटांत दाखल झाला. हें बेट सुमारें १६ मैल लांब व ६ मैल रुंद आहे. येथें त्याच्या नवीन प्रजाजनांनीं त्याचें अत्यंत उत्साहानें स्वागत केलें. कित्येकांनीं त्याचेपुढें साष्टांग नमस्कार घालून आपली भक्ति प्रकट केली. या गोष्टीनें मात्र नेपोलियन नाखुष झाला. केवळ परमेश्वरापुढें योग्य असा साष्टांग प्रणिपात प्रजेनें राजास करावा, हें त्यास योग्य वाटलें नाहीं.

फ्रान्स देश नेपोलियनचा त्याग करण्यास तयार झाल्यास आपण त्याच्या अंतर्गत राज्यव्यवस्थेंत हात घालणार नाहीं असें शत्रूंनीं जाहीर केलें होतें. परंतु आतां त्यांनीं लुई स्टॅनिस्लॅस झेविअर नांवाचा एक बुर्बोन वंशांतील इसम गादीवर बसविला, व १७८९ पासून फ्रान्सनें जिंकलेला सर्व मुलूख काढून घेऊन पूर्वीच्या मालकांस अर्पण केला. यायोगानें फ्रान्सची लोकसंख्या दीड कोटीनें कमी झाली. शिवाय शत्रूंनीं जातांना बरेच किल्ले पाडले, व १२००० तोफा व इतर पुष्कळ सामान नेलें. नेपोलियनबरोबर सॅक्सनीचा राजा फार इमानानें वागल्याबद्दल त्याच्यावर शत्रूंचा राग होता सॅक्सनीपैकीं वीस लक्ष वस्तीचा मुलूख प्रशियास देण्यांत आला. वॉर्साचें राज्य रशियास, व इटालीचें आस्ट्रियास अर्पण करण्यांत आलें. स्वीडनचा राजा बर्नाडाट यास नेपोलियनचा पक्ष सोडल्यास नॉर्वेच्या राज्याची बक्षिसी देण्याचें इंग्लिशांनीं वचन दिलें होतें. तें वचन खरें करण्याची आतां वेळ आली. परंतु इंग्लंड व स्वीडन या दोघांमध्यें परस्पर झालेल्या करारास नॉर्वेचे लोक कबूल होईनात. म्हणून समुद्रावरून इंग्लिशांनीं व जमिनीवरून बर्नाडाटनें भाडिमार करून तो देश पादाक्रांत केला व स्वीडनला जोडून टाकला.

एल्बांत गेल्याबरोबर नेपोलियननें सर्व बेटाची पहाणी केली. व तेथें अवश्य दिसल्यावरून त्यानें अनेक सडका, कालवे वगैरे काढण्यास व किना-

त्याची तटबंदी करण्यास सुरुवात केली. जवळच असलेलें रिआनोसा नांवाचें वस्ती नसलेलें लहानसें बेट त्यानें आपल्या छोट्या राज्यास जोडलें. त्याचा बराच काळ निरनिराळ्या देशाच्या प्रवाशांबरोबर संभाषण करण्यांत गेला. त्याच्या वास्तव्यामुळें या बेटास अपूर्व महत्व आलें; व येथें त्याच्या दर्शनाचे लाभासाठीं युरोपांतील सर्व लहान थोर, श्रीमंत गरीब, यांच्या झुंडीच्या झुंडी लोटूं लागल्या. तो सर्वांशीं मोकळ्या मनानें भाषण करीत असे. स्वतःबद्दल तो पूर्वीं होऊन गेलेल्या एखाद्या ऐतिहासिक व्यक्तीविषयीं जसें तिऱ्हाइतपणें बोलावें तसें बोले. आणि शत्रूंबद्दल, व त्याचा ज्यांनीं घात केला असें त्यास वाटत होतें त्या लोकांबद्दलही, तो कडक शब्द उच्चारीत नसे.

पांच सहा महिने गेल्यावर नेपोलियन यास पैशाची अडचण होऊं लागली. त्यास तहाप्रमाणें ठरलेली नेमणूक लुईनें केव्हांच पोंचविली नाहीं; व संयुक्त शत्रूंनींही या लुईच्या वर्तनाकडे कानाडोळा केला, इतकेंच नव्हे, तर नेपोलियन यास पकडून सेंट हेलेना येथें अटकेंत ठेवण्याचा विचार चालविला. त्याचा खून करण्याकरितां मारेकरी पाठविण्यासही त्यांनीं सुरुवात केली. शत्रूंच्या या वृत्तीचें कारण या अवधींत फ्रान्समधील राजकीय परिस्थितींत झालेला फरक हें होय.

लुईनें आपल्या करड्या अंमलानें इतक्या थोड्या अवकाशांत प्रजेस त्रस्त करून टाकलें. इतके वर्षांच्या परदेशवासापासूनही तो कांहीं शहाणपण शिकला नव्हता. फ्रेंच रेव्होल्यूशनपासून राजसत्तेबद्दल उतरलेला पूज्यभाव ध्यानीं-मनींही नसल्याप्रमाणें तो वर्तन करूं लागला. नेपोलियन गेल्यानंतर युरोप आपणास लोकसत्ताक राज्य स्थापन करूं देईल अशी फ्रान्सची अपेक्षा होती. त्यामुळें लुई त्यांच्यावर लादण्यांत आला, येवढ्यानेंच ते नाखुष झाले होते. तथापि, तो कसा वागतो तें समजेपर्यंत लोकांनीं फारशी चळवळ केली नाहीं. लुईचें शरीर स्थूल व अवजड असून उदरप्रदेशाच्या विस्तारामुळें त्यास चालण्याची क्रियाही कष्टप्रद होत असे. त्वचेचा दाह टाळण्यासाठीं तो आपल्या पायाकरितां मखमालीचें पादत्राण करवीत असे. कुशल कारागिरांनीं अनेक संस्कृतींनीं शोभिवंत केलेला त्याचा केशकलाप पाठीवरून कमरेपर्यंत रुळत असे. त्याच्या पोषाखांतही शरीरसौन्दर्याच्या वृद्ध्यर्थ फ्याशन-

चे यच्चयावत् प्रकार असत. लुईचें हें ध्यान पाहून फ्रेंच लोकांस हंसें कोसळूं लागलें. विशेषतः हें विलक्षण सोंग नेपोलियनच्या जागीं अधिष्ठित झालेलें पाहून त्यांना तिरस्कार वाटूं लागला. अठरावा लुई म्हणण्याच्या ऐवजीं लोक त्यास डुक्कर लुई असें ह्मणूं लागले. नेपोलियन व त्याचे सेनापति यांची जेथें वर्दळ असावयाची तेथें लुई आणि त्याचे सुस्त, पोशे व विलासी नातलग नांदूं लागलेले पाहून ' हरेरद्य द्वारे शिव शिव शिवानां कलकलः ' अशा प्रकारचें हें राजवाड्यांतील स्थित्यंतर दर्शविण्याकरितां एका विनोदी मनुष्यानें एक चित्र प्रसिद्ध केलें. त्याच्या प्रतींचा संबंध फ्रान्सभर फार प्रसार झाला. त्यांत एक गरुडपक्षी राजवाड्यामधून निघून अंतरिक्षांत भराऱ्या मारीत असतां वाड्यांत गलिच्छ डुकरें लोळत आहेत असें दाखविलें होतें. लुईच्या हास्यास्पद मूर्तीनें फ्रेंचांस आलेल्या तिटकाऱ्याची मजल त्याच्या सुलतानी कृतीनें तर द्वेषापर्यंत गेली. आपण १७९१ पासून सतत फ्रान्सच्या गादीवर असून नेपोलियनची सबंध कारकीर्द ह्मणजे मध्यंतरीं झालेलें एक बंड होय, असें तो म्हणूं लागला. त्यानें राज्यकारभारांत लोकमताचा मागमूसही न ठेवतां सरदारवर्गाच्या विशेष हक्कांचें पुनरुज्जीवन केलें. त्यामुळें त्यास हांकून देऊन नेपोलियन यास परत बोलावण्याचे विचार लोकांच्या मनांत येऊं लागले. तेव्हां लोकांच्या आशेचें बीजच नाहींसें करावें या हेतूनें नेपोलियन यास ठार करण्याचा, अगर पकडून सेंट हेलेनासारख्या दूरच्या बेटांत कोंडून ठेवण्याचा, संयुक्त शत्रूंनीं बेत केला. त्यास पकडून सेंट हेलेनाकडे नेण्याचे कामावर सर सिडने स्मिथ याची योजना झाली. या गोष्टीची युरोपियन पत्रांत उघड चर्चा चालत असे, व ती नेपोलियन यास वाचावयास मिळे शिवाय मारेकऱ्यांचाही सुळसुळाट होताच. त्याकडेही दुर्लक्ष करावें तर पुनः पैशाची अडचण. म्हणून नेपोलियननें अखेरीस फ्रान्सला परत जाण्याचा निश्चय केला.

ता. २७ फेब्रुवारी १८१५ रोजीं पहांटे नेपोलियननें आपले ६०० शिपाई जमा केले; व त्यांचेसह 'आतां फासे तर टाकले' असें ह्मणत तो गलबतावर चढला. मार्गांत कांहीं लढाऊ गलबतांची गांठ पडली; परंतु त्यांस ही एल्बामधून आलेली एक व्यापारी बोट वाटून त्यांनीं तिकडे दुर्लक्ष केलें. एका लढाऊ जहाजाच्या कप्तानानें ' स्पीकिंग ट्रंपेट ' मधून नेपोलियनच्या प्रकृतीबद्दल

चौकशी केली. त्यास ' नेपोलियनची प्रकृति फारच चांगली दिसली ' असें खुद्द नेपोलियननेंच उत्तर दिलें. १ मार्च रोजीं तो फ्रान्समध्यें कॅन्स येथें उतरला; व थोडा वेळ विश्रांति घेऊन पॅरिसकडे निघाला. रोज सुमारें ३५ मैलांची तो मजल करीत चालला. सर्वत्र लोकांनीं त्याचें उत्साहानें स्वागत आरंभिल्यामुळें बुर्बोन पोलिसांस त्यास अटकाव करणें अशक्य झालें. लक्षावधि लोक आपणांस सैन्यांत घ्यावें ह्मणून त्याची विनंति करूं लागले. त्या विनंतीचा नेपोलियननें साभार स्वीकार केला, परंतु या लोकांचें स्वसंरक्षणाकरितां त्यानें सैन्य तयार केलें नाहीं. त्यानें असें जाहीर केलें कीं, " सिंहासन मिळविण्याकरितां युद्ध करून कोणत्याही पक्षाच्या फ्रेंच लोकांच्या मृत्यूस कारणीभूत होण्याची माझी इच्छा नाहीं. लोकांच्या संमतीनें पुनः गादी मिळाली तरच तिचा मी स्वीकार करणार आहें." सामान्य लोकसमूहांत आपणास कोणीही विरुद्ध जाणार नाहीं, लुईच्या लष्करांतील शिपायांची वृत्तिही आपण पालटूं शकूं, असा त्याचा दृढ विश्वास होता. या प्रसंगीं नेपोलियनची लोकप्रियता विशेष ठळकपणें दिसून आली. या वेळीं त्यानें कॅन्सपासून पॅरिसपर्यंत बुर्बोन राजाच्या फौजांनीं भरलेल्या प्रदेशांतून सैन्याशिवाय केलेली चाल, व एकही बंदुक न उडवितां करून घेतलेली राज्यप्राप्ति, हा त्याच्या अद्भुतरसमय चरित्रांतील अत्यंत अद्भुत प्रसंग होय असें समजलें जातें. नेपोलियनच्या पक्षाचे लेखक तो लोकमताविरुद्ध आचरण करणारा राजा नव्हता हें सिद्ध करण्यास या प्रसंगाकडे बोट दाखवितात.

नेपोलियन फ्रान्समध्यें परत आल्याचें समजतांच लुईनें तो ' औट-लॉ ' आहे, म्हणजे, तो कायद्याच्या संरक्षणास अपात्र असून त्यास ठार करणें हा गुन्हा होत नाहीं, असें आपल्या प्रजेच्या माहितीकरितां एक प्रसिद्धिपत्रक काढिलें. एखाद्याचा वध करण्याची मुभा ठेवल्यानें समाजांतील क्रूर वृत्तींच्या व्यक्तींस स्फुरण चढणें स्वाभाविक आहे. आणि या वेळीं तर नेपोलियनचा शिरच्छेद करणाऱ्यास केवळ लुईनेंच नव्हे तर युरोपांतील वाटेल त्या तक्ताधिपतीनें तो मागेल तें बक्षीस दिलें असतें. तथापि अशा ब्रह्मास्त्राचाही नेपोलियनच्या देशसेवार्जित तपोबलापुढें कांहीं उपयोग झाला नाहीं.

पुढें लुईनें नेपोलियनवर ६,००० फौज पाठविली. तिची व नेपोलियनची ७ मार्च रोजीं ग्रेनोबल येथें गांठ पडली. लुईची फौज दृष्टिपथांत येतांच नेपोलियननें आपल्या अनुयायांस मागें राहण्याचा हुकूम दिला, व तो एकटाच

घोड्यावरून पुढें जाऊं लागला. लुईच्या सैन्यापासून १०० पावलांवर आल्यानंतर तो घोड्यावरून उतरून निर्धास्तपणें पायानें चालूं लागला. फौजेस बंदुका सोडण्याचा हुकूम झाला, व नेपोलियनवर सहा हजार बंदुका रोखण्यांत आल्या. तेव्हां तो आपली छाती उघडी करून खणखणीत आवाजानें म्हणाला, "तुमच्यापैकीं एकाही मनुष्यास आपल्या बादशहास ठार करण्याची इच्छा असेल तर खुशाल गोळ्या सोडा. हा मी येथेंच उभा आहें" फ्रान्सचा लौकिक ज्यानें चिरकालिक करून टाकला त्याचे हे शब्द कानीं पडतांच फ्रेंच शिपायांचे कंठ दाटून आले, व हातचीं शस्त्रें गळूं लागलीं. ते नेपोलियनच्या भोंवतीं जमा होऊन त्याचे नांवाचा जयजयकार करूं लागले. या प्रकारानें लुईचा सेनापति मर्चांट हा वेड्यासारखा झाला. तो नेपोलियनचे बाजारबुणगे सहज उधळून टाकण्याच्या उमेदींत होता. परंतु आतां गोळीबार सुरू होणार असें त्यास वाटत असतां नेपोलियननें पुढे येऊन एखाद्या मांत्रिकाप्रमाणें त्याचें सैन्य हिरावून नेलें. युद्धाची ही अश्रुतपूर्व तऱ्हा, आणि वशीकरणप्रयोगासारखा विलक्षण चमत्कार, दृष्टीस पडल्यानें भ्रांत होऊन तो जीव वांचविण्याकरितां रणांगणांतून पळून गेला.

नेपोलियन येथून पुढें कूच करूं लागेपर्यंत त्याच्या आगमनाची बातमी सर्व देशभर पसरून चोहोंकडे गडबड सुरू झाली होती. त्याचा खून करण्याकरितां लुईनें कांहीं मारेकरी सोडले होते. परंतु त्याचेभोंवतीं भक्तांचा सदैव खडा पहारा असल्यामुळें त्यास इजा पोंचूं शकली नाहीं. लुईच्या हुकुमावरून मार्शल ने, मॅक्डोनल्ड वगैरे सेनापति आपापल्या ठिकठिकाणच्या पलटणी जमा करून नेपोलियनवर चाल करण्यास पॅरिसमधून निघाले. परंतु नेपोलियननें सोडलेल्या आकर्षक महाशक्तीनें विद्ध झालेलें फ्रेंच सैन्य आतां बुर्बोनपक्षास निरुपयोगी झालें होतें. मॅक्डोनल्ड वगैरे लोक आपल्या पलटणी नेण्यास मोठ्या रणोत्साहानें गेले. परंतु शिपायांकडून 'नेपोलियनकी जय' अशा आरोळ्यांनीं आपलें स्वागत झालेलें पाहून ते गोंधळून गेले. त्यांनीं 'लुइकी जय' असा ध्वनि करण्याकडे शिपायांचीं मनें वळविण्यास नानापरीनें यत्न करून पाहिले. धमक्या, विनवण्या वगैरे त्यांचे सर्व इलाज थकले. ते कांहींही बोलले तरी शिपायांनीं नेपोलियनच्याच नांवाचा जयजयकार करण्याचा सपाटा चालविला. मॅक्डोनल्ड नाउमेद होऊन आपली पलटण सोडून एकटाच पॅरिसकडे परतला.

तेव्हां शिपायांनीं पुनः ' नेपोलियनकी जय ' अशी गर्जना करून त्याची दुर्यो केली. मार्शल ने यानें आपल्या पलटणीसंबंधानें दुसरा पंथ स्वीकारला. सर्व लोकांत पसरलेला नेपोलियनबद्दलच्या भक्तीचा अनिवार पूर थांबविण्याची आशा व्यर्थ होय अशी खात्री झाल्यावर त्यानें आपणही स्वतः नेपोलियनचा पक्ष स्वीकारल्याचें जाहीर केलें. तेव्हां त्याच्या शिपायांनीं ' नेपोलियनकी जय ' अशा आरोळ्यांनीं आकाश दणाणून त्याचें अभिनंदन केलें. मॅक्डोनल्ड, ने, वगैरे प्रसिद्ध फ्रेंच सेनापतींची शिपायांमध्यें त्यांच्याबद्दल असलेल्या पूज्य-बुद्धीवर फार भिस्त होती. परंतु नेपोलियनच्या सैन्यांतून लुईच्या नोकरींत गेल्यानंतर त्या पूज्यभावाचा लवलेशही उरला नाहीं, असें या प्रसंगानें सम-जून त्यांचा स्वतःच्या स्वतंत्र योग्यतेबद्दलचा भ्रम दूर झाला.

नेपोलियनच्या पक्षास मिळणाऱ्या सर्व लोकांस लुईनें आतां 'ओट-लॉ' केलेलें समजतांच फ्रेंच शिपाई खवळले, व त्यांनीं राजपक्षीयांस कापून काढण्याची शपथ घेतली. हें नेपोलियनच्या कानीं आल्यावर त्यानें जाहीरपत्रकाचे द्वारें शिपायांस तसें करण्याची मनाई केली. ' मी येथें यादवी माजविण्याकरितां आलों नाहीं; करितां, जे कोणी कोणत्याही पक्षाच्या फ्रेंच मनुष्याचा वध करतील त्यांस सैन्यांत घेतलें जाणार नाहीं ' असें त्यानें प्रसिद्ध केल्यावरून गांवोगांवीं होण्याच्या रंगांत आलेल्या कत्तली बंद पडल्या. १० तारखेस तो लिआन्स येथें पोंचला. तेथें चार दिवस मुक्काम करून त्यानें लोकसत्तेच्या पायावर नवी राज्यघटना तयार केली; व समताभिलाषी फ्रेंच राष्ट्रास अप्रिय असलेले सर-दारवर्गाचे विशेष हक्क पुनः रद्द केले. नेपोलियनच्या गारुडानें भारलेल्या फ्रान्स-देशांत राहणें लुई यास आतां धोक्याचें वाटून तो औट घटकेचें राज्य भोगलेला शिराळशेट पॅरिस येथून पळत सुटला. मार्शल ग्रोचीनें त्याच्या चुलतभावास कैद केलें, व पुढें तो लुईचाच पाठलाग करूं लागला. परंतु नेपोलियननें "लुईच्या चुलतभावास बंधमुक्त करावें, व लुईसही पकडूं नये; तो इच्छेस येईल त्या-प्रमाणें फ्रान्समध्यें राहो अगर बाहेर जावो " असें फर्माविल्यामुळें लुईची स्वारी हॉलंडला सुखरूप पोंचून नेपोलियनविरुद्ध सर्व युरोपियन राजांची पुनः जूट करण्याच्या खटपटीस लागूं शकली. खुद्द लुई अशा रीतीनें भंकडपणें पळ काढीत असतां त्याच्या घराण्यांतील डचेस अँगूलीम ही स्त्री नेपोलियन विरुद्ध फौज जमविण्यास नेटानें प्रयत्न करीत होती. तिच्या धाडसाबद्दल

नेपोलियन यासही आदर वाटल्यावांचून राहिला नाहीं. तो म्हणाला, " बुर्बोन घराण्यांतील खरा पुरुष म्हणजे एकटी ही स्त्रीच होय."

२० तारखेस नेपोलियन मेलननजीक दाखल झाला. तेथें राजपक्षीयांनीं त्यास अटकाव करण्यासाठीं अखेरचा व शर्थीचा यत्न करण्याचा निश्चय केला होता. बुर्बोन अधिकारी येथें एक लक्ष फौजेसह सज्ज असल्याचें समजतांच नेपोलियननें आपल्या लोकांस मागें राहण्यास सांगितलें, व तो एकटाच उघड्या गाडींतून पुढें जाऊं लागला. बुर्बोन फौज दृष्टीस पडूं लागल्यावर तो गाडींत उभा राहिला. त्यास सैन्यानें तेव्हांच ओळखिलें. नेपोलियननें फ्रेंच शिपायांस भेट देण्याची इच्छा झाल्याप्रमाणें हात पसरले, तेव्हां 'नेपोलियनकी जय' असा सर्वत्र एकच ध्वनि झाला. नेपोलियननें गाडींतून उडी टाकली, व सर्व शिपाई आनंदातिशयानें त्यास व एकमेकांस भेट देऊं लागले. याप्रमाणें पूर्वीच्याच धाडसी तोडग्यानें क्षणार्धांत सर्व सैन्य पुनः नेपोलियनचें झालें. ग्रेनोबल येथील प्रकाराच्या या दुसऱ्या व त्याहूनही मोठ्या प्रमाणावर झालेल्या आवृत्तीनें आश्चर्यमूढ होऊन बुर्बोन अधिकारी जीव घेऊन पळत सुटले. अशा रीतीनें एखाद्या राजकीय चेटक्याप्रमाणें मार्गावरील सैन्यें दर्शनमात्रें आपलींशीं करीत नेपोलियन ७०० मैलांचा प्रवास आटपून ता. २१ मार्च रोजीं पॅरिस येथें येऊन पोंचला. त्यानें यापूर्वी कादंबरींतही न खपण्याइतकीं असंभाव्य वाटणारीं कृत्यें करून प्रतिपक्षीय सैन्यांचा अनेकवार पाडाव केला होता. त्या सर्वांवर, ग्रेनोबल व मेलन येथें शस्त्र बाजूस ठेवून केवळ आपल्या नांवांतील जादूच्या जोरावर केलेल्या लीलांनीं, त्यानें कळस चढविला असें बरेच चरित्रकार म्हणतात.*

---

* Alone and unarmed, he had invaded a kingdom of thirty millions of inhabitants. A bloodless conqueror, he had vanquished all the armies sent to oppose him; and had simply by the magic power of that love, with which France cherished his memory, driven the Burbon usurpers from the throne. Was there ever such an invasion, such a conquest as this before? Will there ever be again? A more emphatic vote in favour of a sovereign could by no possibility be given. A

( पुढें चालू. )

लुई फार लगबगीनें पळून गेला असल्यामुळें राजवाड्यांत त्याचीं बरींच खाजगी पत्रें पडलेलीं नेपोलियन यास दिसलीं. तेव्हां त्यानें तीं एका पाकिटांत घालून व सील करून न पाहतां लुईकडे पाठवून दिलीं. पुढें लौकरच नेपोलियननें फ्रेंच सैन्यास एक मेजवानी दिली. ती आटपतांच शिपाई त्याचा लुईनें काढून टाकलेला पुतळा पूर्वस्थळीं स्थापन करण्याकरितां धांवूं लागले. परंतु नेपोलियननें तसें न करण्याबद्दल हुकूम सोडला. तो ह्मणाला " कोणाचाही पुतळा स्थापन करणें ही गोष्ट मेजवानीचे आनंदांत करून टाकण्यासारखी क्षुल्लक नाहीं. माझ्या पश्चात् सर्व राष्ट्रानें स्वस्थ विचारांतीं तो स्थापन करणें योग्य आहे असें ठरविलें तरच तसें करणें बरोबर होईल. " ॲबॉट याच्या मतें या व अशा गोष्टींवरून नेपोलियनच्या स्वभावाचा धीरोदात्तपणा सिद्ध होतो. तो म्हणतो, " अशी स्थिति असूनही कांहीं लोक नेपोलियन बोनापार्ट याचेबद्दल तिरस्काराची भाषा बोलूं शकतात. या लोकांस दोष देण्याऐवजीं त्यांची कींवच करणें बरोबर होईल. कित्येकांचे डोळ्यांस रंगांतील फरक समजत नाहीं. कित्येकांचे कानांस सुरांतील मधुरत्व अगर कटुत्व समजत नाहीं. त्याचप्रमाणें कित्येकांस मनाचा थोरपणा समजत नाहीं. याबद्दल त्यांस दूषण देणें योग्य नाहीं. असें व्यंग त्यांच्यांत असावें हें त्यांचें दुर्दैव होय. "

नेपोलियननें आतां जी नवी राज्यघटना ( constitution ) तयार केली त्यायोगानें फ्रान्सची राज्यपद्धति इंग्लंडप्रमाणें मर्यादित राजसत्ताक झाली. नेपोलियननें पूर्वीं जी अनियंत्रित राजसत्ता (dictatorial power) हातीं ठेविली होती ती जरी त्याच्या मतें अपरिहार्य कारणामुळें घ्यावी लागली होती

---

( मागील पृष्ठावरून समाप्त. )

more legitimate title to the throne than this unanimous voice of the nation, no monarch ever enjoyed....The triumphal journey of Napoleon from Cannes to Paris exhibits by far the most remarkable instance the world has ever witnessed of the power exercised over human hearts by one mighty mind. .. ...In view of such achievements, almost too marvellous for the dreams of fancy, we can hardly wonder that Lamartine should say that, as a man, "Napoleon was the greatest of the creations of God."

—*Abbott*.

तरी त्यामुळें लोकसत्ताप्राधान्यवादी पक्ष नाखुष झाला होता. अलीकडे दोन तीन महिन्यांत घडलेल्या गोष्टींवरून बुर्बोन वंश फ्रेंच राष्ट्रास किती अप्रिय आहे तें शत्रूंस कळून येऊन ते आपणांशीं इतःपर युद्ध करण्याचे भानगडींत पडणार नाहींत असे नेपोलियन यास वाटूं लागलें. म्हणून केवळ आणीबाणीच्या प्रसंगीं धारण करण्याची अनियंत्रित सत्ता सोडून देऊन तो प्रजेच्या हक्कांच्या मर्यादा वाढविण्यास तयार झाला. यामुळें लोकसत्तावाद्यांस आनंद होऊन त्यांचें पूर्वी नसलेलें पाठबळ नेपोलियन यास मिळालें.

इतकेंच करून तो थांबला नाहीं. 'फ्रान्सचें सिंहासन १८०४ सालीं नाहीं तर निदान १८१५ सालीं तरी त्यानें केवळ बुद्धिमत्तेच्या व लष्करी सामर्थ्याच्या जोरावर बळकावलें,' असा आरोप करण्यास भविष्यकालीन इतिहासकारांस कांहींही जागा राहूं नये म्हणून त्यानें पुनः कायदेशीर रीतीनें राजपदाचे जागीं आपली निवडणूक करून घेण्याचें ठरविलें. कायद्याप्रमाणें मत देण्याचा अधिकार असलेल्या सर्व व्यक्ति व संस्था यांच्यापुढें त्यानें हा प्रश्न ठेविला तेव्हां त्यास प्रतिकूल मतांपेक्षां दहा लक्ष जास्त मतें अनुकूल पडलीं व तो पुनः पद्धतशीर रीतीनें फ्रान्सचा बादशहा झाला.

---

# प्रकरण १५ वें.

## वाटर्लू येथील पराभव; देशत्याग.

(१८१५.)

नेपोलियन फ्रान्समध्यें परत आला तेव्हां सर्व युरोपियन राजे व वकील त्याला अखेरीस कायमचे अटकेंत ठेवून आपण कृतकृत्य झालों अशा आनंदांत व्हिएन्ना येथील कांग्रेसकरितां जमले होते. निरनिराळ्या देशांच्या मर्यादा कायमच्या ठरवून टाकण्याचें काम कांग्रेसमध्यें चालूं होतें. त्यांच्या पाहुणचाराकरितां बिचाऱ्या आस्ट्रियन बादशहास रोज हजारों पौंडांचें केवळ मांसच पुरवावें लागत होतें. याखेरीज मद्य, नाचरंग, तमाशे वगैरेबद्दल खर्च

होत होता तो वेगळाच. अशा रीतीनें हें विलासी राजमंडळ ऐषआरामांत दंग असतां नेपोलियन निसटून परत आल्याची बातमी एका जासुदानें भयभीत मुद्रेनें व हलक्या स्वरानें येऊन सांगितली. तेव्हां एकाएकीं सर्वांच्या तोंडचें पाणी पळून एकंदरींत जी गाळण उडाली तिचें वर्णन करणें शक्य नाहीं. अकस्मात् विजेचा लोळ तेथें येऊन पडता तरी या बातमीनें उडाली तशी त्रेधा उडाली नसती, असें ॲलिसन सांगतो. नेपोलियनचा पाडाव करण्यासाठीं सर्व एकजुटीनें लढत असतांही पूर्वी किती प्रयास पडले होते ते आठवून पुनः युद्ध सुरू करण्यास कोणीही तयार होत नव्हतें. परंतु अशा स्थितींत सर्वांचा उत्साह जागृत करण्यास नेपोलियनचा पक्ष सोडून धोक्यांत पडलेला फ्रेंच मुत्सद्दी टॅलेरँड हा पुढें आला. त्याच्या वक्तृत्वास नौकाबलामुळें अकुतोभय झालेल्या इंग्लंडच्या वकिलांचें पाठबळ मिळून पुनः सर्वांनीं युद्धास कंबर बांधली. नेपोलियननें शांतता राखण्याबद्दल सर्व राष्ट्रांस पत्रें लिहिलीं. व स्वतः-वर शांततेसाठीं केवळ वरकांती प्रयत्न केल्याचा आक्षेप येऊं नये म्हणून, इतर राष्ट्रांत जरी युद्धाची तयारी जारीनें सुरू होती तरी, उत्तर मिळेपर्यंत फ्रान्स-मध्यें त्यासंबंधीं कांहींही तयारी केली नाहीं. शत्रूंनीं नेपोलियनचीं पत्रें घेऊन येणाऱ्या जासुदांस मज्जाव करून असा जाहीरनामा काढला कीं, "नेपोलियन बोनापार्ट हा तह मोडून एल्बामधून पळून आल्यामुळें सर्व सुधारलेल्या जगानें त्यास वाळींत टाकलें असून त्यास आतां जिवंत राहण्याचा हक्क उरला नाहीं." याप्रमाणें फ्रेंच लोकांच्या निःशेष संहारार्थ युद्ध ( war of extermination ) करण्याचा शत्रूंचा निर्धार झालासें वाटल्यामुळें नेपोलियननें त्यांच्या प्रतिकारार्थ युद्धास निघण्याचें ठरविलें. तह जमत नाहीं असें पक्केपणीं निश्चित होण्यास १ जूनपर्यंत काळ लोटला. तेव्हांपासून शत्रूंनीं फ्रान्समधील पाडलेल्या तटबंदीच्या दुरुस्तीस प्रारंभ करून तो १२ जून रोजीं फौजेसह पॅरिस मधून निघाला.

परंतु नेपोलियनमध्यें आतां बराच फरक पडला होता. थकवा अगर निरुत्साह हे कसे ते त्यास पूर्वी माहीतही नसत. व अद्यापिही पाहणारांस त्याचें शरीर व मन यांची नेहमींची भयंकर तडफ सामान्यतः अबाधित असल्याप्रमाणेंच वाटे. परंतु युद्धक्लेशांनीं स्नायूंस क्षीणता येऊन, व नानाप्रकारच्या विपत्तींमुळें जीविताचा वीट येऊन, त्याचेवर अलीकडे मधूनमधून शारीरिक व मानसिक ग्लानीचा

अंमल बसूं लागला होता. दीर्घकालपर्यंत सारख्याच जोमानें काम करण्याची त्याची ताकद आतां नष्ट झाली होती. क्षुल्लक गोष्टींत प्रधानांस सल्ला विचारणें, महत्वाचीं कामें बाजूस टाकून कोणाबरोबरही निरुपयोगी लांबलचक संभाषण करीत बसणें, वाचतां वाचतां अगर अत्यंत निकडीचें काम चालू असतांही एकदम झोंपीं जाणें, वगैरे त्याच्यामध्यें पूर्वीं केव्हांही न दिसलेलीं शारीरिक व मानसिक दौर्बल्याचीं चिन्हें आतां केव्हां केव्हां दृष्टीस पडूं लागलीं होतीं. शिवाय त्यास मूत्राशयांतील विकारानें घोड्यावर बसण्यास अडचण होऊं लागली होती. या अकालीं जरेचा बुद्धिमत्तेवर परिणाम झाला नसल्यामुळें, युद्ध उपस्थित झाल्यास त्यांत कोणत्या तऱ्हेच्या डावपेचांनीं यश येईल तें बिनचूकपणें आंखून देण्याचें सामर्थ्य त्याचे अंगीं अद्यापिही होतें. परंतु तदनुसार स्वतः युद्ध चालविण्याची धमक आतां पूर्वींच्या मानानें नेपोलियनचे अंगांत मुळींच राहिली नव्हती. तज्ज्ञांच्या मतें वाटर्लूच्या मोहिमेंत त्यानें युद्धाची केलेली योजना (plan) व तींत प्रसंगाप्रमाणें केलेले फेरफार निर्दोष होते; परंतु हालचालीचे बाबतींत नेहमींची त्वरा व दक्षता त्यानें कांहीं प्रसंगीं बिलकुल प्रकट केली नाहीं. या मोहिमेंत तो होतां होईल तितकें घोड्यावर बसण्याचें टाळून बहुतेक हालचाल गाडींतून करीत होता; आणि कांहीं अत्यंत आणीबाणीच्या प्रसंगीं स्वस्थ बसून राहण्यांत, सेनापतींशीं राजकारणासंबंधीं निरर्थक गोष्टी बोलण्यांत, अगर निद्रा घेण्यांत, त्याच्या हातून कालक्षय घडला असें युद्धानभिज्ञांचेंही लक्ष्यांत आलें आहे.*

---

* His vigilant vitality, once superhuman, had forsaken him. He, formerly so keen for exact news of the enemy, seemed scarcely to care to know or to inquire the movements of the allied armies. He, once so electrically rapid, had ceased to value time......On the morning of Ligny and on the succeeding day, he lost many precious hours, and so, perhaps, the campaign....Then comes the supreme battle (Waterloo). Napoleon seems to have watched it with some apathy; and, on seeing the catastrophe, to have calmly remarked "Il paraît qui'ls sont mêle's" and walked his horse off the field.

*–Rosebury.*

( पुढें चालू. )

सेनापति हा युद्रामध्यें फक्त मुख्य धोरण ठरवीत असतो परंतु त्याचे हुकूम अमलांत आणण्याची तजवीज करणें, व सैन्याची हरएक प्रकारें व्यवस्था ठेवणें, हें सर्व काम चीफ–ऑफ–स्टाफ नांवाच्या अधिकाऱ्यास करावें लागतें. यास्तव त्याचें महत्व सेनापतीइतकेंच, किंबहुना रतिभर जास्त, असतें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. नेपोलियनचा पूर्वीच्या युद्धांतील चीफ–ऑफ–स्टाफ जो बार्थिअर तो या वेळीं बुर्बोन राजाबरोबर निघून गेला होता. त्याचे जागीं मार्शल सूल्ट याची नेमणूक करावी लागली. सूल्ट यानें जन्मभर सेनापतीचें काम केलें होतें. सैन्यासंबंधीं हजारो किरकोळ कामें रीतीप्रमाणें आपल्या चीफ–ऑफ–स्टाफवर सोंपविण्याची त्यास संवय होती. असा सर्वस्वी अनभ्यस्त मनुष्य या जोखमीच्या कामावर ठेवांवा लागल्यामुळें या मोहिमेंतील हालचाली व्यवस्थितपणें व वक्तशीरपणें पार पाडल्या नाहींत. बार्थिअर अगर दुसरा एखादा माहितगार मनुष्य असता तर नेपोलियनच्या अशक्ततेमुळें घडलेले दुष्परिणाम बरेच कमी झाले असते; परंतु आतां त्यांत उलट भरच पडत गेली. अनभ्यस्त मनुष्याम या प्रसंगीं चीफ-ऑफ-स्टाफ नेमावा लागल्यानें तज्ज्ञांच्या मतें फ्रेंच पक्षाची केवळ अपरिमेय हानि झाली.

पूर्वीच्या युद्धाप्रमाणें हाताखालीं डेसेक्स, लॅन्स, मसीना यांच्यासारखे उत्कृष्ट सेनापति या खेपेस नेपोलियन यास मिळूं शकले नाहीत. कांहीं मरण पावले होते, व कांहीं बुर्बोन पक्ष धरून निघून गेले होते. नेपोलियनची भिस्त

---

( मागील पृष्ठावरून समाप्त. )

It had long been remarked that the Emperor Napoleon was wholly different from the General Buonapart of the Italian campaigns. Buonapart had been lean, shy. laconic; all fire and spirit..., the Emperor was fat and talkative, and had fits, according to Marmount, of indolent ease... In the campaign of 1814, his activity had been prodigious. But he could not maintain himself at this level. A physical decay had begun in him, affecting through his body, not indeed his mind, but his will and power of application....In some of the most critical and terrible moments of the Waterloo compaign, he seems to have been scarcely able to keep himself awake.

—*Seely.*

मुख्यतः मागें सांगितल्याप्रमाणें ' स्ट्रॅटेजीवर ' असल्याकारणानें त्यास चाणाक्ष सेनापतींची विशेष अवश्यकता असे. तो सेनापतींस त्यांनीं करण्याच्या हालचालींसंबंधीं फार सविस्तर हुकूम लिहीत असे; परंतु युद्धांतील मुख्य धोरणाकडे लक्ष ठेवून सांगितलेल्या हालचालींनीं उद्दिष्ट पार पडत नाहीं असें दिसल्यास सेनापतींनीं त्यांत योग्य तो फेरफार करावा अशी त्याची अपेक्षा असे. मॅरेंगो वगैरे कांहीं लढायांत त्याच्या सेनापतींनीं हुकुमाशिवाय कांहीं हालचाली केल्या होत्या, व त्यांनीं त्या केल्या नसत्या तर तेथें यशही आलें नसतें. या पद्धतीमुळें इतर सैन्याप्रमाणें नेपोलियनच्या लष्करांत सांगकाम्या अधिकाऱ्यांचा उपयोग होत नसे. या मोहिमेंत पलटणींवरील सेनापतींपैकीं डीअर्लाइन, रील, व्हँडॅम, जीरार्ड, लोबॉ हे दुय्यम प्रतीचे लोक होते. मिळालेल्या सेनापतींत अनुभविक ह्मणजे मार्शल ग्रौची व मार्शल ने. पैकीं ग्रौची हा बोलूनचालून मंदबुद्धीचा मनुष्य होता. मार्शल ने यास १४ तारखेस रात्रीं, म्हणजे युद्धास तोंड लागण्याचे सुमारासच, सैन्यांत घेतां आल्यामुळें आपल्या पलटणीची माहिती करून घेण्यास सवड उरली नाहीं. त्यास सूल्ट यानें हाताखालीं स्टाफ देण्याचीही तजवीज केली नाहीं. परंतु या कारणाचा ज्यांच्यांशीं संबंध नाहीं अशाही बाबतींत त्यानें निष्काळजीपणानें महत्वाच्या चुका केल्या. त्यानें या खेपेस अनेक वेळां आज्ञाभंग करून आपल्या पूर्वींच्या लौकिकास न शोभण्यासारखें वर्तन केलें; व फ्रेंच सैन्यावर घोर प्रसंग आणले. युद्धनिष्णातांची त्याचेवरील टीका फार कडक आहे तात्पर्य, या खेपेस पलटणींवर नेमण्यास जे सेनापति मिळाले ते सर्व नालायक होते.

आतां सैन्यासंबंधीं पाहिलें म्हणजे त्याची तर पुनर्घटनाच करणें ( re-organization ) प्राप्त होतें. बुर्बोन राजानें नेपोलियनची पद्धत मोडून सैन्याच्या घटनेंत व अंतर्व्यवस्थेंत फार फिरवाफिरव केली होती. पुनर्घटनेचें काम फार कालावधीचें आहे तेव्हां तें १ जूनपासून १२ जूनपर्यंत कितपत पार पडलें असेल त्याची सहज कल्पना करतां येईल. नेपोलियन यास जुन्यांपैकीं बरेच शिपाई मिळूं शकले; परंतु अलीकडील काळांत बऱ्याच अधिकाऱ्यांनीं फितुरीचें वर्तन केल्यामुळें शिपायांचा सरसकट सर्व ऑफिसरांवरीलच विश्वास व भक्ति उडून गेली होती. युद्धांत यश येण्यास शिपाई व ऑफिसर यांचीं अंतःकरणें एक असावीं लागतात, परस्परांमध्यें पूर्ण विश्वास नांदत

असावा लागतो, असें तज्ज्ञ सांगतात. याप्रमाणें फ्रेंच सैन्य यावेळीं घटनेच्या बाबतींत कांहींसें सदोष होतें; व शिपाई अनुभविक असले तरी त्यांची युद्धाकरितां मानसिक तयारी असावी तशी नव्हती.*

फ्रान्सच्या रोखानें आतां चाल करीत असलेल्या सैन्यांपैकीं सर्वांत दूरचें म्हणजे दोन लक्ष रशियन. त्याच्या अलीकडे एक अडीच लक्षाचें व साठ हजाराचें अशीं दोन ऑस्ट्रियन सैन्यें होतीं, आणि फ्रान्सच्या सरहद्दीपासून सर्वांत नजीक ठेंपलेलीं म्हणजे ब्रुसेल्स येथील वेलिंग्टनचें एक लाख इंग्लिश सैन्य, व नॅमूर येथील ब्लूचरचें सव्वा लाख प्रशियन सैन्य. नेपोलियन यास फक्त सव्वा लक्ष फौज जमा करतां आली होती. त्यानें सर्व शत्रूंस एकत्र होण्यास अवधि न देतां प्रथम ब्लूचर यास गांठून प्रशियनांस कंठस्नान घालण्याचें ठरविलें. वेलिंग्टन व ब्लूचर दोघेही सरहद्दीजवळ होते खरे; परंतु वेलिंग्टन सावधगिरीनें वागणारा, व पूर्ण तयारी असल्याखेरीज लढाई न देणारा मनुष्य असल्यामुळें, व त्यास आपलें पांगलेलें सैन्य युद्धाकरितां एकत्र करण्यास दोन दिवस लागणार असल्यामुळें, त्याचेवर हल्ला केल्यास तो पळून जाईल असें नेपोलियन यास वाटलें. शिवाय, वेलिंग्टनवर हल्ला केल्यास त्यास ब्लूचर कसेंही करून साह्य करील, परंतु ब्लूचरवर हल्ला केल्यास त्यास वेलिंग्टन आपली पूर्ण तयारी होण्यापूर्वी साहाय्य करणार नाहीं असा त्यानें तर्क केला.

---

* We recognise that the army with which Napoleon was preparing to take the field in June 1815, was not as well-organised a body of troops as some of the armies which he had led to victory, that its corps-commanders were not as brilliant soldiers as were many of the distinguished generals of that period, that peculiar circumstances rendered Soult, Ney and Grouchy less serviceable than they probably would have been had things been otherwise? ordered and that the Emperor himself was more or less deficient in that never-resting activity of body and mind which he had one possessed. ,a,

—*J. C. Ropes.y.*

## तारीख १५ जून.

पॅरिस येथून १२ तारखेस निघून १४ तारखेस संध्याकाळीं नेपोलियननें आपलें सर्व सैन्य सरहद्दीवरील बोमांट गांवानजीक जमविलें, आणि हें इतक्या सपाट्यानें व गुप्तपणानें केलें कीं दुसरे दिवशीं सकाळपर्यंत तो पॅरिस येथून निघाल्याचीही शत्रूंस बातमी लागली नाहीं. तेथून १६ मैलांवर चार्लेराय येथें प्रशियनांचें अघाडीचें ठाणें होतें. त्यावर बऱ्याच फौजेसह स्वतः चालून जाण्याचें त्यानें ठरविलें, व बाकीच्या फौजेसह चाल करून पश्चिमेकडील क्वाटरब्रास* नांवाचें ठिकाण हस्तगत करण्याचा त्यानें मार्शल ने यास तोंडी हुकूम दिला. कारण, हें ठिकाण धरून बसल्यानें वेलिंग्टन यास ब्लूचरच्या मदतीस येणें अशक्य झालें असतें.


सूल्टच्या चुकीमुळें चार्लेराय येथें सर्व फ्रेंच सैन्य जमा होण्यास चार तास उशीर झाला. त्यामुळें शत्रूंस तयारीकरितां वेळ मिळून फ्रेंचांच्या हातून निसटतां आलें. मार्शल ने हा हुकुमाप्रमाणें क्वाटरब्रासवर चाल न करतां कांहीं मैल अलीकडेच राहिला. तथापि त्यानें रात्रीं नेपोलियनच्या छावणीकडे येऊन ही हकीकत त्यास कळविली. शिवाय त्यानें आणखी एका भानगडी-चीही माहिती दिली. ती अशी कीं, नेच्या पलटणींपैकीं डी अर्लाइनची तुकडी आतांपर्यंत नेच्या छावणींत पोंचली नसून ती दुसरे दिवशीं दहा वाजे-पर्यंत पोंचण्यासारखी नव्हती. आणि या हयगयीबद्दल सूल्ट अगर ने याज-कडे दोष नसून डी अर्लाइनकडेच दोष होता. तेव्हां नेपोलियननें ने यास ‘ दुसरे दिवशीं डी अर्लाइन आल्यावर सर्व ( ४०,००० ) सैन्यासह ११ वा-जतां चाल करून १ वाजतां क्वाटरब्रासला पोंचावें, व तें ठिकाण २ वाजेपर्यंत सर करावें ’ अशा आशयाचा लेखी हुकूम दिला.

या दिवशीं सूल्ट, ने आणि डी अर्लाइन या तिघांनीं केलेल्या तीन गोंध-ळांत आणखी एका गोंधळाची भर पडली. जनरल बुर्मांट नांवाचा सेनापति

---

* सर्व देशांतील स्थळांच्या व व्यक्तींच्या नांवांचे उच्चार इंग्रजी वर्णोच्चार पद्धती-प्रमाणें साधारणतः जसे होतील तसे समजून त्याप्रमाणें तीं नांवें या पुस्तकांत सोयी-करितां लिहिलीं आहेत. उदाहरणार्थ, Napoleon, Paris, Blucher, Leipsic, Eylau, Quatre Bras हीं नांवें नेपोलियन, पॅरिस, ब्लूचर, लीप्सिक, ईलॉ, क्वाटर-ब्रास अशीं लिहिलीं आहेत.

गुप्तपणें ब्लूचरकडे निघून गेला. यामुळें शत्रूंस नेपोलियनच्या धोरणाची सविस्तर माहिती कळली; व फ्रेंच सैन्यांतील शिपायांची उमेद व हुरूप (morale) खचून गेली.




## ता० १६ जून.

ब्लूचरनें युद्धाकरितां आपली सर्व फौज आतां लिग्नी येथें जमा केली होती. वास्तविक तो नॅमूर येथें असतांनाच त्याचेवर नेपोलियनचा हल्ला व्हावयाचा. परंतु फितूर होऊन त्याजकडे आलेल्या फ्रेंच सेनापति बुर्मांटच्या तोंडून नेपोलियनच्या योजनेचें ज्ञान झाल्यामुळें त्यानें वेलिंग्टनपासून नॅमूरपेक्षां जास्त जवळचें असें लिग्नी गांव सैन्य एकत्र करण्याकरितां निवडलें. मार्शल ने याची क्वाटरब्रासवर चाल व आपली लिग्नीवर चाल एकदम होणें अवश्य वाटून नेपोलियननें सकाळींच तळ न हालवितां चार्लेराय येथें १२ वाजेपर्यंत वेळ काढला;

याप्रमाणें सूल्टच्या चुकीनें शत्रूंना १४ तारखेस तयारीकरितां जसे पांच सहा तास मिळाले होते तसेच या तारखेस पुनः सहा सात तास जास्त मिळाले. या गोष्टीचें महत्व सांगावें तितकें थोडेंच आहे.

नेपोलियन लिग्नी येथें २ वाजतां पोंचला. तेव्हांपर्यंत क्वाटरब्रास सर होण्यासारखें असल्यामुळें ने यास सर्व फौजेचें कारण उरणार नाहीं, व आपणास येथें मिळेल तितकी फौज हवीच आहे,असा विचार करून नेपोलियननें ने यास २०,००० फौज लिग्नीकडे रवाना करण्याबद्धल हुकूम पाठविला. तो ने यास पोंचून त्याची कुमक ६ वाजतां, म्हणजे लिग्नी येथील युद्ध संपण्याचे सुमारास, ब्लूचरचा पाठलाग करण्यास मिळेल असा नेपोलियननें अजमास केला. लिग्नीची लढाई २॥ वाजतां सुरू होऊन ३ वाजतांच अखेरीस यश येण्याचें चिन्ह दिसूं लागलें. तेव्हां नेची मदत मिळाल्यास प्रशियन फौजेंतील एकूण एक मनुष्य ठार अगर कैद करतां येईल असा विचार करून नेपोलियननें ने यास त्याच अर्थाचा पुनः ३ वाजतां हुकूम पाठविला; व त्यांत म्हटलें कीं, " फ्रान्सची भवितव्यता आतां सर्वस्वी तुमचे हातांत आहे. "

परंतु ने यानें स्पष्ट हुकुमाचें उल्लंघन करून आपल्या एकंदर ४०,००० फौजेपैकीं २५,००० फौज मागें ठेवली होती; व फक्त १५,००० सैन्यच क्वाटरब्रासकडे नेलें होतें. वेलिंग्टननें तें ठाणें आतां ३०,००० फौजेनिशीं व्यापल्यामुळें तें ने यास हस्तगत करितां येईना. नेपोलियनचा २ वाजतांचा हुकूम ४ वाजतां हातीं पडल्यावर त्यास सर्व फौज न आणल्याबद्धल पश्चात्ताप होऊं लागला. मजबूत ठाणें धरून बसलेल्या दुप्पट सैन्यावर व्यर्थ तुटून पडत असतां फ्रेंच फौजेंत शत्रूच्या गोळ्यांनीं चाललेला संहार पाहून तो म्हणाला, " या सर्व गोळ्या मला लागून माझ्या चिंधड्या उडवितील तर ईश्वराची मजवर कृपाच होईल. " नेपोलियनच्या ३ वाजतांच्या हुकुमाचा तर फारच गोंधळ झाला. तो हुकूम घेऊन जाणाऱ्या एडिक्यांपाची वाटेंत डी अर्लाइनच्या तुकडीशीं गांठ पडली. ही तुकडी नेच्या फौजेपैकीं असून त्याच्या हुकुमाप्रमाणें क्वाटरब्रासकडे चालली होती. परंतु त्या एडिक्यांपानें ३ वाजतांचा नेपोलियनचा हुकूम दाखवून डी अर्लाइन यास लिग्नीकडे वळण्यास स्वतःच्या जबाबदारीवर सांगितलें; व आश्चर्य हें कीं, त्याप्रमाणें डी अर्लाइन लिग्नीकडे वळला. ३ वाजतांचा हुकूम जरी लिग्नीकडे फौज पाठविण्याबद्धलच असला तरी तो

नेपोलियनचा ने यास हुकूम होता. तेव्हां मधल्यामध्यें डी अर्लाइन व हा एडिक्यांप यांनीं ही भानगड करणें अगदींच शिस्तीस सोडून होतें. युरोपपेक्षां कमी सुधारलेल्या सैन्यांतही अशी अंदाधुंदी कचितच आढळून येईल. एडिक्यांप क्वाटरब्रास येथें पोंचला तेव्हां नेला ही भानगड समजली. त्याबरोबर त्यानें लिग्नीच्या नजीक पोंचलेल्या या तुकडीस परत फिरवून क्वाटरब्रासकडे नेलें. अखेरीस मार्शल ने यास स्वतःचाच पराभव झाल्यामुळें नेपोलियनच्या साह्यास फौज रवाना करतां आली नाहीं. डी अर्लाइन यानें नेचा हा परत फिरण्याचा हुकूम अमान्य करून त्या एडिक्यांपच्या सांगण्याप्रमाणें अखेरपर्यंत वर्तन केलें असतें तर निदान नेपोलियनचा तरी फायदा झाला असता. तो प्रथम लिग्नीकडे फिरलाच नसता तर तिकडे ने यास तरी यश आलें असतें. परंतु त्यानें केलेल्या वर्तनामुळें त्यास व्यर्थ हेलपाटे बसून त्याचा दोन्ही ठिकाणीं उपयोग झाला नाहीं.

लिग्नी येथील युद्ध नेपोलियननें फार उत्कृष्टपणानें चालविल्यामुळें नेच्या मदतीशिवायही प्रशियनांपैकीं एकूण एक मनुष्य कापून निघण्याचा रंग दिसूं लागला. ६ वाजतां, शिल्लक फौजेसह हतप्राय प्रशियन फौजेवर सरसकट हल्ला करून तिची कत्तल उडविण्याचा औपचारिक विधि उरकून टाकण्याबद्दल नेपोलियनें हुकूम दिला. इतक्यांत वर सांगितलेलें डी अर्लाइनचें पलटण जवळ दिसूं लागलें. परंतु क्वाटरब्रासकडून येणारें सैन्य ज्या दिशेस दिसावें तेथें न दिसतां, डी अर्लाइन वाटेंतूनच फिरला असल्यामुळें, निराळ्या दिशेस दिसूं लागलें. तेव्हां हे शत्रू कां मित्र तें निश्चित करणें, व शत्रू नाहींत असें ठरेपर्यंत शिल्लक फौजेचा उपयोग न करणें, नेपोलियन यास अवश्य झालें. पाठविलेल्या जासुदानें तें फ्रेंच पलटण आहे असें कळवीपर्यंत ८ वाजले. तेव्हां तें प्रशियनांवर पिछाडीकडून हल्ला करील असा अजमास करून नेपोलियननें शिल्लक फौजेसह स्वतः समोरून हल्ला केला. परंतु इतक्यांत मागें सांगितल्याप्रमाणें डी अर्लाइन दिसेनासा झाला. ८॥ वाजतां दिवस मावळला व युद्ध बंद पडलें. फ्रेंच पक्षाकडील १८०००, व प्रशियनांकडील ४०,००० ठार व कैद झाले. ब्लूचरचा सर्वनाश झाला नाहीं याचें कारण डी अर्लाइन हा नेपोलियन यास न मिळतां समरभूमीनजीक अनपेक्षित स्थळीं क्षणभर आपलें सैन्य दाखवून मात्र गेला हें होय. याप्रमाणें १५ तारखेस झालेल्या चार गोंधळांत या दिवशीं मार्शल ने,

डी अर्लाइन व एक एडिक्यांप या तिघांनीं मिळून तीन नव्या घातक चुकांची भर टाकली.

ग्रंथ संग्रहालय

## तारीख १७ जून.

नेपोलियननें ता. १२ पासून ता. १६ अखेरपर्यंत युद्धाचें काम फार जोमानें केलें. परंतु ता. १७ रोजीं त्यास ग्लानि आली. या तारखेस ३॥ वाजतां दिवस उजाडतांच त्यानें ब्लूचर कोणत्या दिशेनें पळत आहे, ने यानें क्वाटरब्रास हस्तगत केलें किंवा नाहीं, हस्तगत केलें नसलें तरी लिग्नीचें वर्तमान समजून वेलिंग्टन तें ठिकाण सोडून उत्तरेस ब्रुसेल्सकडे पळाला किंवा काय, इतकी माहिती ताबडतोब काढावयास पाहिजे होती. ती न काढतां ७ तास त्यानें सेनापतींबरोबर राजकारणाच्या व्यर्थ गोष्टी बोलत बसण्यांत घालविले. अशी कालहानि येथें झाली नसती तर पूर्वींच्या भानगडींचे परिणाम बऱ्याच अंशानें निस्तरतां आले असते.

वास्तविकपणें ही माहिती काढण्याचें काम सूल्ट याचें. नेपोलियननें न सांगतांही त्यानें दोन तास दिवस चढण्याचे आंत ५॥ वाजेपर्यंत ही सर्व खबर नेपोलियनच्या पुढें आणून ठेवावयास पाहिजे होती. ने यानेंही क्वाटरब्रासचें वर्तमान कळविण्याचें कर्तव्य केलें नाहीं. नेपोलियन अवश्य ती चौकशी न करतां असें गृहीत धरून चालला कीं, ब्लूचर पूर्वेकडे आपल्या दळणवळणाचे मार्गानें पळत आहे; व वेलिंग्टन यास लिग्नीचें वर्तमान समजून तो उत्तरेस ब्रुसेल्स-कडे पळत आहे. वस्तुस्थिति दोन्ही बाबतींत अगदीं उलट होती. वेलिंग्टनास लिग्नीची बातमी १० वाजतां लागली. त्या बातमीचा लखोटा वाचल्यावर तो जवळच्या ऑफिसरांस म्हणाला, "त्या म्हाताऱ्याला लिग्नी येथें चांगला सडक मार (damned good licking) बसला आहे. तेव्हां आपणास येथें राहणें सुरक्षित नाहीं" १० वाजेपर्यंत वेलिंग्टन तेथेंच असल्यामुळें तेवढ्यांत नेनें समोरून व नेपोलियननें डावीकडून त्याचेवर हल्ला केला असता तर त्याच्या फौजेचा निकाल लागला असता. ब्लूचर वेलिंग्टनला मिळण्याचे उद्देशानें उत्तरेकडे पळत होता. तेंही ३॥ वाजतां वेळेवर जाणलें असतें तर त्यास अटकाव करतां आला असता.

नेपोलियनचा याप्रमाणें वेळ व्यर्थ जात असतां, आदले दिवशीं ३ वाजतांचा हुकूम नेकडे घेऊन गेलेला एडिक्यांप लिग्नीस या दिवशीं ८ वाजतां परत आला.

त्याचेकडून वेलिंग्टन क्वाटरब्रास येथून न हलल्याचें समजल्यावरून नेपोलियन ११ वाजतां त्या ठिकाणाकडे निघाला. निघण्यापूर्वी ३५,००० लोक हाताखालीं देऊन त्यानें ग्रौची यास प्रशियनांचा पूर्वेकडे पाठलाग करण्यास रवाना केलें होतें. परंतु नेपोलियन निघण्याचे वेळीं अशी खबर आली कीं, लिग्नी येथून पळालेल्या प्रशियनांपैकीं २०,००० लोक गँब्लूक्स गांवीं दिसत आहेत. हें ठिकाण प्रशियनांच्या दळणवळणाच्या मार्गावर नसून उत्तरेस आहे. त्यामुळें नेपोलियन यास चिंता उत्पन्न झाली; व त्यानें ग्रौचीस असा लेखी हुकूम पाठविला कीं, " पूर्वेकडे व उत्तरेकडे ताबडतोब शोध करून प्रशियन कोठें जात आहेत तें मला कळवावें ह्मणजे मला त्यांचा हेतु समजेल. ते इंग्लिशांपासून दूर जात आहेत किंवा प्रथम उत्तरेस वेव्हरपर्यंत जाऊन तेथील रस्त्यानें ब्रुसेल्सकडे वळत आहेत तें कळणें अवश्य आहे. तुह्मांस कोठेंही जावें लागलें तरी तुमची फौज व माझी फौज यांचे दरम्यान जागजागीं स्वार ठेवून केव्हांही संबंध न तुटेल अशी व्यवस्था ठेवावी. तुमची हालचाल माझेकडील मुख्य सैन्याच्या हालचालीच्या अनुरोधानेंच झाली पाहिजे." या हुकुमांत प्रशियन सैन्य इंग्लिशांकडे जात असून त्यास प्रतिबंध करणें शक्य नसल्यास ग्रौचीनें काय करावें तें सांगितलेलें नाहीं. असें सांगण्याची नेपोलियनची पद्धतच नसे. वरील परिस्थितींत ग्रौचीनें नेपोलियनच्या उजवीकडील डाइल नदी मूस्टियरच्या पुलावरून ओलांडून वेलिंग्टनशीं लढणाऱ्या फ्रेंच सैन्यास मिळावें ही उघड गोष्ट ग्रौची यास स्पष्ट शब्दांनीं सांगत बसण्याची आवश्यकता नव्हती.

नेपोलियन क्वाटरब्रासला पोंचल्यावर वेलिंग्टन तेथून पळून वाटर्लू येथें गेल्याचें त्यास समजलें. तेव्हां नेची व आपली फौज एक करून तो पाठलाग करूं लागला, व दिवस मावळल्यावर वाटर्लू येथें पोंचला.

क्वाटरब्रास येथून वेलिंग्टन पळूं लागला तेव्हां नेची तेथें सर्व ह्मणजे ४०,००० फौज होती. तथापि नेनें पाठलाग केला नाहीं. या पाठलागांत त्यास शत्रूचा सर्वस्वी विध्वंस करतां आला असता. नेनें या बाबतींत बेपर्वाईच्या आळसाची परमावधि केली असें समजलें जातें.

लिग्नीच्या पराभवानंतर ब्लूचरनें हताश न होतां आपल्या दाणावैरणीचा मार्ग बेलाशक सोडला, व लिग्नीच्या आसपास वेलिंग्टनला मिळणें जरी शक्य

झालें नाहीं तरी जरा उत्तरेस हटून वेलिंग्टनला मिळण्याच्या व पुनः नेपोलि-यनशीं दोन हात करण्याच्या तो उमेदींत होता हें मागें सांगितलेंच आहे. उत्तरेकडे हटण्यांत दिसलेलें त्याचें धाडस व बुद्धीचा दूरवर पोंच हे निष्णातांच्या स्तुतीस पात्र झाले आहेत. वेलिंग्टननें लिग्नीची बातमी ऐकून क्वाटर-ब्रासचा तळ उठविला तेव्हां आपलें सैन्य उत्तरेस थेट अँटवर्प बंदरापर्यंत नेऊन तेथील गलबतांत भरण्याचा त्याचा विचार होता. परंतु ब्लूचरनें त्यास स्वतः केलेल्या धाडसी योजनेची बातमी देऊन समुद्रापर्यंत न हटतां मध्यंतरीं वॉट-र्लूसारख्या ठिकाणीं राहण्याचा आग्रह केला. वेलिंग्टनच्या हाताखालीं या वेळीं त्याची स्पेनमधील युद्धांत कसलेली अस्सल इंग्लिश फौज नसल्याकारणानें तो साहजिकपणेंच एकट्यानें लढाई देण्यास तयार नव्हता. त्यामुळें ब्लूचरची इच्छा कळल्यावरही बराच वेळ वेलिंग्टनची वाटर्लूच्या मैदानावर ‘ न ययौ न तस्थौ ’ अशी स्थिति होती. परंतु ती रात्र संपण्याचे सुमारास ब्लूचरनें “ तुम्हीं वाटर्लू येथेंच रहावें, जास्त हटण्याचें कारण नाहीं, मी तेथें लढाईचे वेळीं तीन पलटणें ( ७०,००० सैन्य ) घेऊन खास येतों ” असें पुनः कळविलें. याप्रमाणें ब्लूचरनें तीन पलटणींसह साह्य करण्याबद्दल त्रिवार आश्वासन दिल्यावर वाटर्लू येथें राहणें वेलिंग्टनास वेडगळ व निष्कारण साहसाचें वाटलें नाहीं; व त्यानें अखेरीस तेथें लढाई देण्याचा बेत केला.

## ता. १८ जून.

१७ तारखेस रात्रीं ग्रौची यानें १० वाजतां गँब्लूक्स येथें पोंचून नेपो-लियन यास पत्र लिहिलें कीं ‘ ब्लूचर उत्तरेस वेव्हरकडे जाऊन तेथून पश्चिमे-कडील रस्त्यानें चाल करून वेलिंग्टनास मिळणार आहे असें दिसतें. मी वेव्हर-कडे पाठलाग करून त्यास अटकाव करतों. ’ हें पत्र नेपोलियन यास वॉटर्लू येथें १८ तारखेस पहांटे २ वाजतां पोंचलें. त्यावरून नेपोलियन साहजिकपणें समजला कीं, ग्रौची ब्लूचर यास अटकाव करील, व तें साधत नाहीं असें दिसल्यास तो मूस्टियरच्या पुलावरून डाइल नदी ओलांडून वॉटर्लू येथील फ्रेंच सैन्यास मिळेल. म्हणून त्यास निश्चिंतता वाटूं लागली. परंतु ग्रौची इतका मंदबुद्धीचा होता कीं, प्रशियनास अटकाव करणें म्हणजे त्यांच्या पुढें जाणें, अगर त्यांच्या व वेलिंग्टनच्या मध्यें येऊन बसणें, हें त्यास समजलें नाहीं. प्रशियन बरेच तास अगोदर निघाल्यामुळें त्यांच्यापुढें जाणें ग्रौचीस शक्य

नव्हतें; व रस्ता खराब असल्यामुळें तिरपी वाट धरून वेलिंग्टन व ब्लूचर यांचे-मध्यें येऊन बसणेंही त्यास साधण्यासारखें नव्हतें. त्यानें वॉटर्लू येथें नेपोलियन यास मिळणेंच भाग होतें. तथापि तो पळणाऱ्या प्रशियनांस वेव्हर येथें गांठून त्यांच्या पिछाडीवर तुटून पडला. परंतु त्याचा उपयोग काय ! पिछाडीची एक लहान तुकडी अडकली तरी पुढील सर्व प्रशियन फौज वाटर्लूकडे बिन-हरकत चालली होती. प्रशियनांस अटकाव होत नाहीं, व वॉटर्लू येथें तर लढाई सुरू आहे असें तोफांच्या आवाजावरून जाणून ग्रौचीच्या हाताखालील ऑफिसर त्यास नेपोलियनकडे वळण्यास सुचवूं लागले. सूचनेचा योग्यपणा ग्रौचीच्या लक्ष्यांत आला, परंतु ती अदबीच्या भाषेंत करण्यांत आली नाहीं असें वाटून ग्रौचीनें ती रागानें अमान्य केली. प्रथम मंदबुद्धीनें व नंतर अभिमानानें त्यानें फ्रेंच फौजेवर पराभवाचा प्रसंग आणला.

इकडे वॉटर्लू येथें नेपोलियनचें ७०,००० सैन्य होतें; व वेलिंग्टनचेंही तितकेंच, अगर कांहीं ग्रंथकार ह्मणतात त्याप्रमाणें, पांच दहा हजार जास्त असेल. वेलिंग्टननें धरलेलें ठाणें स्वसंरक्षणास फार सोयीचें होतें. शिवाय, इंग्लिश व फ्रेंच यांचे दरम्यान एक खंदक असल्यामुळें तोफांचे माऱ्यांत त्याची एक बाजू उतरून व दुसरी चढून गेल्याखेरीज फ्रेंचांस शत्रूंवर तुटून पडणें शक्य नव्हतें. १७ तारखेच्या दुपारपासून एकसारखी वृष्टि सुरू असल्याकारणानें रणक्षेत्रास दलदलीचें स्वरूप आलें होतें, व खंदकांत तर गुडघाभर चिखल झाला होता. ग्रौचीच्या पत्रानें ब्लूचर इकडे वेलिंग्टनच्या मदतीस येण्याची भीति नाहींशी झाल्यामुळें एकट्या इंग्लिश सेनेचा कसाही व केव्हांही समाचार घेतां येईल असें नेपोलियन यास वाटलें. कदाचित् ब्लूचर वेलिंग्टन यास मिळाला तर ग्रौची आपणास मिळून फिरून पारडें सारखें होईल अशी त्याची समजूत होती. करितां त्यानें घाई न करितां तोफा व स्वार यांच्या हालचालीच्या सोयीसाठीं जमीन जरा कोरडी होऊं देण्याचें मनांत आणून इंग्लिशांवर खरा हल्ला दीड वाजतां करण्याचें ठरविलें. हा हल्ला इंग्लिश रांगेच्या मध्यावरील मांट सेंट जीन नांवाच्या खेड्यावर करावयाचा होता; कारण, त्यानें इंग्लिशांचा अट्वर्पकडे हटण्याचा मार्ग बंद झाला असता.

आपल्या रणोत्सुक सेनेस कांहीं तरी काम देण्याकरितां, व आपला मुख्य रोख न कळावा ह्मणून शत्रूंस हुलकावणी दाखविण्याकरितां, नेपोलियननें १२

वाजतां इंग्लिशांच्या उजवीवर हल्ला करण्यास एक पलटण पाठविली. हा केवळ प्रदर्शनी ( Demonstrative ) हल्ला असूनही यांत बरीच प्राणहानि झाली. कारण त्या पलटणीवरील अधिकारी रील यानें, अगर त्याचा वरिष्ठ मार्शल ने यानें, शत्रूंवर चालून जाण्यापूर्वी रीतीप्रमाणें दुर्बिणींतून त्यांच्या ठाण्याची तपासणी करणें व त्यावरून इष्ट दिसेल तेथें प्रथम तोफांचा भडिमार करणें वगैरे गोष्टींत पूर्ण हयगय केली. नेपोलियननेंही दिलेल्या हुकुमाची अंमलबजावणी कशी चालली आहे तें पाहण्याची दक्षता ठेविली नाहीं. तो या दिवशीं उदासीन वृत्तींतच होता. दीड वाजतां त्यानें पूर्वी ठरविल्याप्रमाणें इंग्लिश मध्यावर नेच्या फौजेपैकीं डी अर्लाइनची पलटण पाठविली, व तीस नव्या नव्या तुकड्यांचा आधार देऊन मांट सेंट जीन हस्तगत करण्याचा त्याचा विचार होता. परंतु ही पलटण पाठवितांच उजवीकडे दूर अंतरावर प्रशियनांची हालचाल दिसूं लागली. तेव्हां नेपोलियननें या पलटणीस फारशी कुमक न पाठवितां कांहीं फौज प्रशियनांकरितां शिल्लक राखण्याचें ठरविलें. याप्रमाणें प्रशियन्स ग्रौचीच्या हातून निसटूं लागल्याचें दिसतांच नेपोलियन यास काळजी वाटूं लागली; व ग्रौची डाइल नदीवरून आपणाकडे येऊं लागला आहे किंवा नाहीं तें पाहण्यास, व तो तेथें न दिसल्यास त्यास असेल तेथून तातडीनें वॉटर्लूकडे बोलावून आणण्यास, नेपोलियन एकामागून एक जासूद पाठवूं लागला. मागें सांगितल्याप्रमाणें ग्रौची हा दूर वेव्हर येथें प्रशियनांच्या एका पिछाडीकडील लहान तुकडीशीं चकमक करीत असल्यामुळें त्यास हे निरोप संध्याकाळपर्यंत पोंचले नाहींत, व तो वॉटर्लूकडे मुळींच आला नाहीं. याप्रमाणें ग्रौची हा या दिवशीं आपल्या ३५००० फौजेसह रणक्षेत्रानजीक भटकत राहून प्रशियनांशींही लढला नाहीं, व इंग्लिशांशींही लढला नाहीं.

इंग्लिश मध्यावर दीड वाजतां पाठविलेल्या पलटणीस या कारणानें प्रथमच्या बेताप्रमाणें कुमक पोंचत राहिली नाहीं. शिवाय, ती पलटण पाठवितांना तिची ने यानें ठराविक पद्धति सोडून फारच अडाणीपणाची रचना केली होती. त्यामुळें इंग्लिशांशीं दीड तास झुंज करून अखेरीस त्या पलटणीस तीन वाजतां परत हटावें लागलें. त्या वेळेपर्यंत कांहीं प्रशियन तुकड्या फार नजीक ठेपल्यामुळें नेपोलियननें वॉटर्लूकडील युद्ध नेवर सोंपविलें, व तो स्वतः कांहीं फौजेसह प्रशियनांस विरोध करूं लागला. जास्त प्रशियन्स आल्यावर तर चार

वाजल्यापासून तो वॉटर्लूच्या मैदानापासून पूर्वेकडे दीड मैलांवर जाऊन प्राशियनांशीं झगडत राहिला; आणि तेथेंच तो सात वाजेपर्यंत होता. प्राशियनांकडील काम स्वतःवर घेण्याचें कारण असें कीं, त्यांच्या हालचाली फ्रेंच फौजेच्या पार्श्वभागावर व पिछाडीवर चालल्या असल्यामुळें दळणवळणाचा रस्ता हातून जाण्याचा धोका दिसत होता. समोरील इंग्लिश सेनेचा मोड न झाला तरी तात्कालिक नुकसान कांहींही होण्यासारखें नव्हतें. याप्रमाणें, वॉटर्लूचें युद्ध आरंभापासून बहुतांशीं व रंगांत आल्यापासून सर्वांशीं वेलिंग्टन व मार्शल ने या दोघांमध्येंच झालें. *

वाटर्लूच्या युद्धाचा सर्व अधिकार नेच्या हातीं पडल्यावर त्यास त्यानें दीड वाजल्यापासून आरंभिलेला अव्यवस्थितपणा पूर्णपणें गाजविण्यास सवड झाली. आपलें 'टॅक्टिक्स' चें सर्व ज्ञान बाजूस ठेवून फार धाडसानें परंतु चुकीच्या पद्धतीनें इंग्लिश रांगांवर तुटून पडण्याचा त्यानें तडाखा लावला. पायदळांस थकविल्यावर त्यानें घोडदळाचा बळी देण्यास सुरुवात केली. † फ्रेंच शिपायांचा उपयोग त्यांचा सेनापति इतक्या अडाणीपणानें करीत असतां, व इंग्लिश सैन्यांत सर्व दिवसभर ब्रुसेल्सकडून नव्या नव्या तुकड्या येऊन भर पडत असतां, त्यांनीं निव्वळ आपल्या आंगचें शौर्य व निर्धार यांच्या जोरावर ६ वाजतां खंदकाच्या इंग्लिशांकडील बाजूचीं कांहीं ठाणीं हस्तगत केलीं. तेव्हांपासून इंग्लिश सैन्य पराभवाच्या उपांत्य स्थितींतून अंत्य स्थितींत हलके हलके प्रवेश करूं लागलें.

---

* Ney seems to have had the immediate direction of the 1st and 2nd corps even when the Emperor was personally superintending the battle; and when Napoleon was called off to direct the defence of Planchenoit, Ney was certainly in sole control. —*Ropes.*

† The faulty formation of d'Erloin's corps in its great assault on the English left was the first blunder. The employment of the whole of Reille's corps in the attack on Hougoumont was the next. Then the negligent and wasteful way in which the attacks on both Hougoumout and La Haye Sainte were conducted warrant severe criticism. The employment of all the reserve cavalry of the army was a most unheard of and uncalled for proceeding. —*Ropes.*

दीड वाजतां आलेले वीस हजार प्रशियन्स, व त्यांस पुनः कांहीं वेळानें येऊन मिळालेले पंधरा हजार प्रशियन्स, यांजबरोबर नेपोलियन फक्त दहा हजार फौजेनिशीं झगडत होता. तथापि विशेष कौशल्याचे डावपेंच लढवून त्यानें या सर्व शत्रूंस साडेसहा वाजतां पिटाळून लावलें. व लागलीच इंग्लिश बाजूस चाललेलें युद्ध पाहण्याकरितां तो सात वाजतां मार्शल नेकडे परत आला. इंग्लिश सैन्याची दुरवस्था त्यानें पाहिली. परंतु त्या कामीं ने यानें निष्काळजीपणानें बरीच प्राणहानि करून घेऊन सर्व फ्रेंच पलटणींना थकविल्याचेंही त्यास दिसून आलें. वास्तविकपणें उजवीकडे व पिछाडीकडे प्रशियन वावरूं लागल्यापासून, व ग्रौची हा न येण्याचें चिन्ह दिसूं लागल्यापासून, शक्य तितकी फौज शिल्लक राखणें अवश्य झालें होतें. इंग्लिशांपासून तात्कालिक धोका कांहींच नव्हता. त्यांच्यावर विशेष नेटानें तुटून पडण्याचें तर कारणच नव्हतें. शिवाय ने यानें इंग्लिशांवर जितकें यश मिळविलें होतें तितकें याहून पुष्कळ कमी प्राणहानीनें मिळवितां येण्यासारखें होतें. करितां, ने यानें सर्व फ्रेंच फौजेची खराबी केल्याबद्दल नेपोलियन यास राग आला. इंग्लिशांवर हल्ला चालूं ठेवून यश पुरें करण्यास आतां ताज्यांपैकीं इंपीरियल गार्डची एकच पलटण शिल्लक होती. नेपोलियनखेरीज त्या पलटणीवर कोणाचाही अधिकार नसल्यामुळें ती ने यास युद्धांत घेतां आली नव्हती. यिवढ्या एका पलटणीवर महत्वाचा कांहींही कार्यभाग होण्यासारखा नसतां, नेपोलियन यास तीच इंग्लिशांवर रवाना करणें प्राप्त झालें.

आतांपर्यंत इंग्लिश सैन्यांतील बहुतेक पलटणी भग्न होऊन सर्व शिस्त नष्ट झाली होती. इंग्लिश शिपाई ब्रुसेल्सच्या मार्गानें हातचीं शस्त्रें टाकीत त्वरेनें पळत सुटले होते. ब्रुसेल्सचा रस्ता पळपुटे शिपाई, दारूगोळ्याच्या व मालाच्या गाड्या यांनीं खेंचून भरला होता. ब्रुसेल्समध्यें या वेळीं वेलिंग्टनच्या पराभवाचें वर्तमान पोंचून तेथील लोक आपापल्या चीजवस्तीसह कसे धूम ठोकूं लागले होते त्याचें ' व्हॅनिटी फेअर ' कादंबरींत उत्कृष्ट वर्णन आढळतें. सैन्याची अशी अवस्था पाहून सामान्य सेनानायकानें सैन्याबरोबर स्वतःही समरभूमीवरून पाय काढला असता. परंतु वेलिंग्टननें आपलें धैर्य बिलकुल ढळूं दिलें नाहीं. ब्लुचरचें आतांपर्यंत आलेलें पसतीस हजार सैन्य जरी नेपोलियननें हांकून लावलें होतें, तरी आणखी पसतीस हजार ताजें प्रशियन

सैन्य येऊन जयाचें पारडें फिरवील येवढ्याच उत्तरोत्तर दुर्बल होत चाललेल्या आशातंतूचा त्यास आश्रय उरला होता. तथापि, तेवढ्यासच चिकटून राहून तो दृढनिश्चयी सेनानायक ब्लूचरच्या मार्गाकडे टक लावून बसला.

इतक्यांत फ्रेंच पक्षावर त्यास अकल्पित वाटणारें असें एक संकट आलें. फ्रेंचांच्या स्वाभाविक कल्पनेप्रमाणें ग्रोची हा ब्लूचरचा पक्का बंदोबस्त करीत होता. प्रशियनांचे पसतीस हजार लोक तरी वाटर्लूकडे कसे येऊं शकले होते याचेंच त्यांस अगोदर आश्चर्य वाटत होतें. करितां वर सांगितलेली जी एकच ताजी ह्मणजे इंपीरियल गार्डची पलटण राहिली होती, ती अवश्य त्या घोडदळाच्या आश्रयाशिवाय निर्वाणीचा यत्न ह्मणून इंग्लिशांवर हल्ला करीत असतां, ब्लूचरचें नव्या दमाचें पसतीस हजार सैन्य, पूर्वीं नेपोलियननें पळवून लाविलेल्या पसतीस हजार सैन्यासहवर्तमान, आतां रणभूमीवर जयध्वनि करीत दाखल झालेलें पाहून फ्रेंच शिपायांच्या मनाची काय स्थिति झाली असेल त्याची कल्पनाच करावी. फ्रेंच पक्षावरील ‘ ही आकाशची कुऱ्हाडच होय ’ असें ॲबॉट यानें ह्मटलें आहे.

या सत्तर हजार दोस्त सेनेच्या दर्शनानें इंग्लिश फौजेस जास्त स्फुरण चढलें. अवशिष्ट शिपायांतील धांवाधांव बंद झाली, व स्वारांच्या आश्रयाशिवाय नाइलाजास्तव अयोग्य पद्धतीनें हल्ला करणाऱ्या फ्रेंच इंपीरियल गार्डास त्यांनीं मागें रेटलें. ज्या इंपीरियल गार्डापुढें युरोपांतील सर्व सैन्यें थरथरां कांपत असत त्यांचा आपण प्रतिकार केल्याबद्धल इंग्लिशांस जो अभिमान वाटला तो सर्वस्वीं योग्य होता. या वेळीं वेलिंग्टनच्या हुकुमांची वाट न पाहतां इंग्लिश ऑफिसरांनीं स्वयंस्फूर्तीनें योग्य त्याच हालचाली केल्याबद्धल रोप्स वगैरे युद्धविशारदांनीं ब्रिटिश पक्षाची अत्यंत प्रशंसा केली आहे. हा अखेरचा हल्ला परतविण्यांत स्पष्ट यश आल्यामुळें वेलिंग्टन आपल्या सैन्याची पिछाडी सोडून बिनीजवळ आला, व Let the whole line advance म्हणजे ‘ सर्व सैन्यानें आतां शत्रूंवर चालून जावें ’ असा त्यानें हुकूम सोडला.

ताज्या दमाच्या प्रशियनांनीं फ्रेंचाचा दूरवर पाठलाग केला, व बरीच कत्तल उडविली. या लढाईंत व पाठलागांत फ्रेंच पक्षाकडील ३०,००० आणि इंग्लिश व प्रशियन पक्षाकडील २२,००० ठार झाले असे ‘ एन्साय-



ड्यूक ऑफ वेलिंग्टन

( ज्यानें वाटर्लू येथें नेपोलियनचा पराभव केला )

क्लोपीडिया ब्रिटॅनिका'मध्यें आंकडे दिले आहेत. याप्रमाणें, ब्लूचरची मदत त्याच्या वचनापेक्षां कांहीं तास उशिरानें पोंचली तरी वेलिंग्टननें नेपोलियनचा पूर्ण पराभव केला. वेलिंग्टनचें पळ काढण्यांतही चातुर्य कसें दिसून येई तें मागें दिलेल्या स्पेनमधील युद्धाच्या त्रोटक वृत्तांतापेक्षां या प्रसंगावरून जास्त स्पष्ट होईल. काटरब्रास येथें फ्रेंचांचा पराभव करूनही त्यांची जास्त हानि करण्याच्या धोरणानें तो ऑटपर्वकडे पळूं लागला. त्याच्या दुर्दम्य निश्चयास लोखंडाची अगर पोलादाची उपमा कां देण्यांत येते, तें वाटर्लू लढाईच्या उत्तर भागावरून विशेष ठळकपणें नजरेस येईल.

या लढाईसंबंधीं निष्णातांची टीका वेलिंग्टनच्या अत्युत्कृष्ट नैपुण्याबद्दल जितकी गौरवपर आहे तितकीच मार्शल ने याच्या अकुशलतेबद्दल दूषणपर आहे. * येथें पांच वाजल्यापासून सात वाजेपर्यंत वेलिंग्टनची स्थिति अस्पृहणीय होण्याचें कारण त्याच्या फौजेंत सर्व इंग्लिश पलटणें नसून कांहीं डच पलटणें होतीं हें होय. डच पलटणें पळूं लागल्यावर इंग्लिश पलटणें बराच वेळपावेतों खडकाप्रमाणें दुर्भेद्य राहिलीं होतीं; व तीं अखेरीस पळूं लागलीं तीं संसर्गाच्या दुष्ट दोषामुळेंच. अशा तऱ्हेच्या सैन्याच्या साधनानेंही वेलिंग्टन मार्शल ने यास हार न जातां आपलें ठाणें ब्लूचर येईपर्यंत धरून बसूं शकला हें थोरांची क्रियासिद्धि उपकरणांवर अवलंबून नसते, या कविवचनास पुष्टि देणारें अत्यंत ठळक उदाहरण आहे. इंग्लिश सेना व सेनापति

---

* Ney failed most unmistakably to make the most of his resources. It is impossible not to contrast his conduct with that of Wellington whose admirable forethought and coolness gave him the command of the situation and enabled him to utilise fully all the resources, which, at the close of this trying day still remained to him.

The English tactics deserved and have always received the high commendation of historians... ..The unfailing energy and enterprise shown by the Duke himself and his lieutenants is at least quite as remarkable as the obstinacy and courage displayed in resisting the repeated attacks of their antagonists.

—*Ropes.*

यांचा सुप्रसिद्ध दृढनिश्चय, चिकाटी व दुमदारपणा यांचें या लढाईंत कमालीचें प्रदर्शन झालें असें समजलें जातें. नेपोलियन बोनापार्ट याचेपासून जलावर अगर स्थलावर कोठेंही पराभव न पावतां उलट उभयत्र **नेपोलियनचा युद्धांत मोड केल्याचा मान सबंध युरोपांत एकट्या ब्रिटिश राष्ट्रासच आहे.** वाटर्लूच्या रणांगणावर, नेपोलियननें ज्यास ' शूरांत अतिशूर ' असा किताब दिला होता त्या मार्शल नेच्या भयंकर धडकीच्या कसोटीस उतरल्यापासून, व त्याच्या भडिमारांत तावून सुलाखून निघाल्यापासून, इंग्लंडचा सर्वत्र दरारा बसून त्यास जगामध्यें शाश्वतची श्रेष्ठता प्राप्त झाली आहे.

यापूर्वी नेपोलियनचा केव्हां पराभव झाला नव्हता असें नाहीं. इ. स. १७९७ सालीं झालेल्या लढायांपैकीं कॅल्डीरोच्या लढाईत (१३ नोव्हेंबर) त्याचा आस्ट्रियन सेनापति ॲल्व्हिन्झी यांनें मोड केला होता. १८१३ मधील लीपसिकचे युद्धांत त्यास आलेलें अपयश तर प्रसिद्धच आहे. १८१४ सालच्या लढायांपैकीं रॉद्यिर येथील युद्धांत ( ३० जानेवारी ) त्याचा प्रशियन सेनापति ब्लूचर व आस्ट्रियन सेनापति स्कॉर्टझेन्बर्ग यांनीं मिळून पराजय केला होता. परंतु अशा सर्व प्रसंगानंतर नेपोलियननें मोठ्या लढाया जिंकून पराभवांचें विस्मरण पाडलें होतें. वाटर्लूची लढाई, नेपोलियन प्रशियनांकडे गुंतल्यामुळें, व वेलिंग्टन यास ब्लूचर येईपर्यंत फ्रेंचावर चालून जाण्याची आवश्यकता न वाटल्यामुळें, बऱ्याच अंशीं शिपाया–शिपायांतील लढाईसारखी ( Soldiers' battle ) गणली जाते, व तीस युद्धशास्त्रविषयक महत्व नाहीं. परंतु, या लढाईनंतर फ्रान्समध्यें झालेल्या भानगडींनीं नेपोलियन कायमचा पदच्युत होऊन त्यास पुनः रणांगणावर येतां न आल्यामुळें हीस राजकीय महत्व येऊन ती जगांतील क्रांतिकारक लढायांत गणली जाते.

## १८ जूनपासून १५ ऑगस्ट.

नेपोलियन पॅरिस येथें ता. २१ जून रोजीं पहांटे दोन वाजतां पोंचला. यापुढें फ्रान्सच्या संरक्षणार्थ कराव्या लागणाऱ्या कृत्यांत पार्लमेंटची वारंवार संमति घेत बसणें फ्रान्सच्या हितास विघातक होईल हें सेनेटला समजावून देऊन तिचेपासून कांहीं काळपर्यंत अनियंत्रित सत्ता मागून घ्यावी, व नंतर पुनः युद्धास निघावें असा त्याचा बेत होता. परंतु वाटर्लूच्या लढाईमुळें त्याचे गुप्त शत्रू हर्षभरित झाले होते, व त्याच्या या वेळच्या संकट-

मय परिस्थितीचा फायदा घेण्यास ते पुढें सरसावले. मूळच्या बुर्बोन वंशांतील राजा गादीवर असावा अशी इच्छा असल्यामुळें राजपक्षीयांचे मनांत नेपोलियनबद्दल द्वेषभाव होता. या पक्षाचा पुढारी फौचे हा आतां वेलिंग्टनचा हस्तक बनला होता. फौचे यास कट्ट्या लोकसत्तावाद्यांचेंही साह्य मिळूं शकलें. कारण त्यांस अमर्याद अगर समर्याद कशाही प्रकारची राजसत्ता पसंत नसल्यामुळें त्यांचेही मनांत नेपोलियनबद्दल द्वेष असे. शत्रू आठ दिवसांत पॅरिस येथें येऊन दाखल होण्याचा रंग असल्यामुळें फ्रेंच लोकांत जी धांदल उडाली ती फौचेच्या पथ्यावर पडली. या वेळीं शत्रूंनीं असा जाहीरनामा काढला कीं, ' आमचें युद्ध फक्त नेपोलियनविरुद्ध आहे; फ्रान्सविरुद्ध नाहीं. नेपोलियनला फ्रेंच लोकांनीं काढून टाकल्यास आम्ही फ्रान्सच्या राजमर्यादेंत अगर राज्यघटनेच्या बाबतींत कांहींही ढवळाढवळ करणार नाहीं. ' फ्रेंच राष्ट्र अनेक वर्षांच्या अखंड युद्धानें जेरीस आलें होतें. म्हणून या जाहीरनाम्याप्रमाणें वर्तन करून शांतता संपादन करण्याचा त्यांस मोह पडूं लागला. अशा स्थितींत फौचे वगैरे पुढारी ' नेपोलियन बादशहास गादीचा राजीनामा देण्याची विनंति करावी, ' असा ठराव पास करून घेऊं शकले. या आणीबाणीच्या प्रसंगीं सर्व परिस्थितीचा शांतपणें विचार करण्यास सवड न मिळाल्यानें प्रसिद्ध लाफेयटसारख्या प्रामाणिक मुत्सद्यांस फौजेचें कारस्थान न समजून त्यांनीं कशीतरी राष्ट्राची युद्धांतून सुटका करण्याकरितां या सूचनेस पाठबळ दिलें. पुढें शत्रूंनीं फ्रान्सची मर्यादा व राज्यघटना या बाबतींत आपल्या जाहीरनाम्यांतील आश्वासनाप्रमाणें वर्तन केलें नाहींसें वाटून लाफेयट यास नेपोलियनला घालवून देण्याचे कामीं मदत केल्याबद्दल पश्चात्ताप होऊन त्यानें आपली चुकी कबूल केली खरी, परंतु या वेळीं त्यानें आपलें वजन फौचेसारख्या दगलबाजांच्या पारड्यांत टाकलें. उलटपक्षीं कार्नो व बेंजामिन कांस्टंट या कट्ट्य लोकसत्तावादी पुढाऱ्यांची या वेळीं नेपोलियनला अनुकूलता मिळाली. शत्रूंचा जाहीरनामा हा फ्रेंच राष्ट्रांत फूट पाडून कार्य साधण्याचा एक प्रकार असून नेपोलियन गेल्यावर ते फ्रान्समध्यें लोकसत्ताक राज्य स्थापन करूं न देतां बुर्बोन राजा आणून बसवितील असें त्यांस वाटलें, व अशा प्रसंगीं नेपोलियनच्याच हातीं अनियंत्रित सत्ता देण्यांत देशाचें कल्याण आहे, असें त्यांनीं प्रतिपादन केलें, परंतु त्यांचें कांहीं चाललें नाहीं. फौचे यानें पार्लमेंटांतील

तरुण अननुभवी सभासदांवर नानाप्रकारांनीं वजन पाडून हा ठराव पसार करून घेतला.

फौचेनें मांडलेली दगलबाजी नेपोलियन जाणून होता आणि त्याचें सामर्थ्य व लोकप्रियता इतकी होती कीं, त्यास फौचेला फांसावर चढविण्यास, सेनेट उधळून टाकण्यास, किंबहुना राजानुकूल पक्ष व कट्टे लोकसत्तावादी या दोन्ही अल्पसंख्याक वर्गाचें निर्मूलन करण्यास, कचरण्याचें कांहीं कारण नव्हतें. परंतु राष्ट्रहिताकरितांही देशबांधवांच्या हत्येचें पातक शिरावर घेणें त्यास गैर वाटलें. त्याचा असा कृतसंकल्प होता कीं, फ्रेंच लोक रक्तपाताचा प्रसंग न आणितां एकमतानें जितके दिवस सत्ता हातीं ठेवतील तितके दिवसच ती हातीं ठेवावयाची. करितां त्यानें सेनेटच्या विनंतीप्रमाणें तावडतोब राजीनामा लिहून पाठविला, व त्याच वेळीं सभासदांस बजाविलें कीं, 'शत्रूंच्या आश्वासनावर विश्वासून जर तुह्मी असें वर्तन करीत असाल तर तुमची भयंकर फसवणूक होणार आहे.' हा राजीनामा मिळतांच फौचेनें एक तात्पुरती राज्यव्यवस्था (Provisional Government) स्थापन करून राज्यकारभार सुरू केला. नेपोलियननें अमेरिकेंतील युनायटेड स्टेट्सूमध्यें जाण्याचा बेत केला. तेथील लोकांनीं फ्रान्समधील धामधुमीचें वर्तमान ऐकतांच आपले देशांत येऊन राहण्याबद्दल त्यास अत्यंत आदरपूर्वक निमंत्रण केलें होतें. या प्रवासाकरितां लवकर गलबतें तयार ठेवण्याबद्दल त्यानें नव्या फ्रेंच सरकारास कळविलें.

नेपोलियनच्या राजीनाम्याची वार्ता फ्रान्सच्या बहुजनसमाजास फारच शोकप्रद झाली. राजवाड्याभोंवतीं अहोरात्र लक्षावधि लोकांचे थवे जमा होऊं लागले व फौचेसकट सर्व सभासदांची कत्तल करण्यास आह्मांस आज्ञा व्हावी, व आह्मांस लष्करांत घेऊन फ्रान्सला लागलेला पराभवाचा कलंक धुवून टाकावा व देशाचें रक्षण करावें अशी विनंति करूं लागले. नेपोलियननें फक्त एखादी खूण करण्याचा अवकाश होता, सर्व राजपक्षीयांची कत्तल होण्यास क्षणाचाही विलंब लागला नसता. तथापि त्यानें हा जबरदस्त मोह आवरून धरून, लोकांस संमति दिली तर नाहींच, परंतु हा लक्षावधि लोकांचा प्रक्षुब्ध समुदाय संमतीशिवायही अत्याचार करील, व त्याचें खापर आपल्या माथ्यावर फुटेल, या भीतीनें त्यानें पॅरिस शहर सोडण्याचा निश्चय केला. त्यानें लोकांच्या गर्दीतून आपली रिकामी गाडी पाठविली, आणि तिकडे सर्वांचें लक्ष

लागून प्रचंड जयजयकार सुरूं झाल्याचें ऐकतांच तो एका साध्या गाडींत बसून मागील दारानें गेला; व पॅरिसपासून दूर अंतरावर असलेल्या मामेसन नांवाच्या राजवाड्यांत जाऊन राहिला (ता. २५ जून). लोकसमाजाच्या अनिवार प्रेमाच्या तडाख्यांतून सुटका करून घेण्यासाठीं गुप्तपणें पळ काढावा लागल्याचें हें विलक्षण उदाहरण आहे.

नेपोलियनबद्दल लष्करांतील शिपायांची भक्ति तर याहूनही तिळभर जास्तच होती. आपण पदच्युत झाल्याबद्दल खवळून फ्रेंच सैन्य बंड करील असा विचार करून नेपोलियननें त्यास नवीन सरकाराशीं इमानानें राहण्याबद्दल जाहीरपत्रक काढून पुढीलप्रमाणें उपदेश केलाः—“ तुमच्या श्रमांचें हृद्गत जाणण्यास नालायख असलेल्या कांहीं लोकांच्या मतें तुमची मजबद्दलची निष्ठा केवळ व्यक्तिविषयक आहे. तुमच्या पुढील चरित्रावरून त्यांची अशी खात्री करा कीं माझी सेवा करण्यांत तुह्मी फ्रान्सचीच सेवा करीत होतां, व मजबद्दल जी तुमची भक्ति आहे ती माझें फ्रान्सवर निःसीम प्रेम असल्यामुळेंच होय. ”

मामेसनच्या राजवाड्यांत नेपोलियन अमेरिकेस जाण्याकरितां गलबतें मिळण्याची वाट पहात होता. परंतु फौचेच्या मनांत त्यास अमेरिकेंत जाऊं द्यावयाचें नसून शत्रूंच्या स्वाधीन करावयाचें होतें. कारण पुढें मागें नेपोलियन अमेरिकेंतून एल्बाप्रमाणें परत आल्यास आपणास निमकहराम वर्तनाबद्दल शासन करील अशी फौचे यांस भीति वाटत होती. नेपोलियन गलबतांबद्दल तगादा लावूं लागला तेव्हां फौचेनें एक उत्कृष्ट क्लृप्ति काढली. त्यानें रॉचेफर्ट बंदरांत गलबतें तयार असल्याचें नेपोलियनला कळविलें; व त्याबरोबरच अमेरिकेंत जाण्याकरितां नेपोलियन यास तुह्मीं परवाना द्यावा असें ड्यूक ऑफ वेलिंग्टन यास फ्रेंच सरकाराकडून विनंतिपत्र पाठविलें. नेपोलियनचा प्रवास निर्विघ्नपणें पार पडावा, व मार्गांत इंग्लिश गलबतांपासून पीडा होऊं नये, ह्मणून ही योजना केली असें फौचेनें कारण दिलें. या पत्रावरून नेपोलियन अमेरिकेंत जाण्याच्या तयारींत असल्याचें कळल्यामुळें वेलिंग्टननें फ्रेंच बंदरांभोंवतीं इंग्रजी गलबतांचा पहारा उभा करण्याची व्यवस्था केली, व फ्रेंच सरकारास उत्तर पाठविलें कीं, ‘ नेपोलियन

बोनापार्ट याला परवाना देण्याच्या विनंतीस कोणत्याही प्रकारचें उत्तर देण्याचा मला अधिकार नाहीं.'

वेलिंग्टन व ब्लूचर आपापल्या फौजांसह तारीख २९ जून रोजीं पॅरिसच्या वेशीजवळ येऊन थडकले. त्यापूर्वी कांहीं तास नेपोलियन रॉचेफर्ट बंदराकडे निघाला होता. हे बंदर पॅरिसपासून ३०० मैलांवर आहे. मार्गांतील सर्व गांवीं लोकांनीं त्यास ओळखून त्याचा जयजयकार केला, व डिक्टेटरशिप घेण्याबद्दल परोपरीनें विनंति केली. परंतु त्यानें आपला निश्चय केव्हांही ढळूं दिला नाहीं. ५ जुलै रोजीं तो रॉचेफर्ट येथें पोंचला. तेथें इंग्रजी गलबतांचा गराडा दिसल्यावर " फौचे हा किती नीच मनुष्य आहे ! ' असे अखेरीस त्याच्या तोंडांतून स्पष्ट उद्गार निघाले.

नेपोलियननें बेलेरोफान नांवाच्या इंग्रजी गलबताचा कप्तान मेटलंड याजकडे मनुष्य पाठवून चौकशी केली, तेव्हां त्यास समजलें कीं फ्रान्समधून कोणत्याही देशाकडे जाणाऱ्या प्रवाशांस कैद करण्याचा ब्रिटिश सरकारचा आपल्या आरमारास हुकूम सुटला होता. तेव्हां त्यानें पुनः मेटलंडकडे मनुष्य पाठवून विचारलें कीं " मी लंडन शहरांत एक सामान्य गृहस्थ ह्मणून रहावयास येणार आहें, तेव्हां या गोष्टीस तुमच्या सरकारची कांहीं हरकत आहे काय ? " त्यासंबंधानें आपल्या सरकाराकडून खुलासा आणवून मेटलंडनें १४ जुलै रोजीं नेपोलियन यास कळविलें कीं, ' आपली इच्छा असल्यास आपणांस इंग्लंडांत घेऊन जाण्याची मला परवानगी मिळाली आहे. ' तेव्हां इंग्लंडांत जाण्यानें स्वातंत्र्यास धोका येण्याचा संभव आहे, असें त्याचे अनुयायी ह्मणत असतांही, नेपोलियननें लंडनमध्यें जाऊन राहण्याचें ठरविलें. इतक्यांत त्याच तारखेस रात्रीं बातमी आली कीं, शत्रूंनीं गादीवर बसविलेल्या बुर्बोन राजानें नेपोलियन यास कैद करून नेण्याकरितां रॉचेफर्टकडे स्वार पाठविले आहेत. तेव्हां तेथें फार वेळ न काढतां नेपोलियन पहांटे बोटींत बसून बेलेरोफॉन गलबताकडे निघाला.

या गलबतावर आल्याबरोबर नेपोलियनला बादशहास योग्य अशी तोफांची सलामी देण्यांत आली, व इंग्लिश खलाशांनीं व ऑफिसरांनीं लष्करी मुजरे केले ( presented arms ). परदेशीय बादशहा पाहुणा म्हणून आला असतां त्याच्याशीं ज्या प्रकारचें वर्तन ठेवण्याची पद्धत आहे त्याच

प्रकारानें मेटलंड यानें नेपोलियनशीं वर्तन ठेवलें होतें. बेलेरोफॉन आगबोट इंग्लंडांतील प्लायमाऊथ बंदरांत येऊन दाखल झाल्यावर मात्र सर्व स्थिति पालटली. त्या गलबताभोंवतीं एकदम इंग्रजी आरमाराचा पहारा ठेवण्यांत आला, व नेपोलियन समोर असतांनाही डोक्यावर टोप्या ठेवण्याची खलाशांस ताकीद देण्यांत आली. त्याची आतां काय वाट लावावी याबद्दल प्रधानमंडळांत खल सुरू झाला. त्याला सेंट हेलेना येथें अटकेंत ठेवावें असें अखेरीस ठरलें.

ता. ३० जुलै रोजीं एक इंग्रज ऑफिसर बेलेरोफॉन गलबतावर आला, व त्यानें पुढील बिनसहीचा व बिनतारखेचा कागद वाचून दाखविला:–"सेनापति बोनापार्ट यास कळविण्यांत येतें कीं, तो युद्धांत पकडलेला कैदी असल्यामुळें त्यास सेंट हेलेना बेटावर जन्मभर अटकेंत ठेवण्यांत येईल. त्यास ३ ऑफिसर, १ सर्जन व १२ नोकर आपल्याबरोबर नेतां येतील. परंतु या सर्वांसही युद्धांतील कैद्यांप्रमाणें वागविण्यांत येईल." इंग्लंडचे कायदे, लढाईचे कायदे, व राष्ट्राराष्ट्रांतील व्यवहाराचे कायदे यांपैकीं कशाच्याही अन्वयें नेपोलियनची अटक कायदेशीर होत नाहीं असें नेपोलियनच्या पक्षाचा चरित्रकार ॲबॉट हा ह्मणतो; व आपल्या विधानास आधार ह्मणून मॅकिंटाश नांवाच्या इंग्रज पंडिताचें मत देतो.

युद्धाचे गडबडींत स्वाभाविकपणें नेपोलियनला अनिष्ट तेवढ्याच खऱ्या व खोट्या बातम्या सरकारी व इतर रीतीनें इंग्लंडांत प्रसिद्ध झाल्याकारणानें या काळीं इंग्लंडांतील लोकसमाज नेपोलियन यास तो वास्तविकपणें होता त्याहूनही शतपट क्रूर, दुष्ट व हलक्या वृत्तीचा समजत असे. अशिक्षित वर्ग तर त्यास खरोखरच 'माणसें खाणारा राक्षस' असें मानीत असे. तो न्याहारीसच आठ बकरीं व पांच मुलें चट्ट करतो, अशा गोष्टी सांगून व त्यास आणण्याचा धाक दाखवून स्त्रिया हट्ट करणाऱ्या मुलांस गप्प करीत. परंतु युद्ध संपल्यामुळें आतां स्वदेशीं परतलेल्या इंग्रज शिपायांनीं हें मत पार बदलून टाकलें होतें. ते ज्या नेपोलियनच्या अनेक गोष्टी सांगत त्यांवरून नेपोलियन हा क्षमाशील व प्रजावत्सल राजा असून शत्रूंशींही उदार व दिलदारपणें वागणारा मनुष्य आहे, असा लोकांत ग्रह होऊं लागला. पार्लमेंटांतील रिपब्लिक पक्षास तर नेपोलियन युरोपांतील लोकसत्तावाद्यांचा आधारस्तंभ म्हणून प्रिय होताच. तेव्हां नेपोलियनला लंडनमध्यें राहूं द्यावें, अशी इंग्लिश समाजांत फार इच्छा प्रकट

होऊं लागली. शेंकडों बोटींत बसून हजारों लोक त्याचे दर्शनास जाऊं लागले, म्हणून त्यांस गोळीबार करून सक्तीनें परत हांकून देणें अधिकाऱ्यांस भाग पडलें. किनाऱ्यावरही दूरदूरच्या गांवांहून येऊन लक्षावधि लोक जमा होत, व नेपोलियन डेकवर दिसला म्हणजे टोप्या काढून, हातरुमाल हलवून, व जयजयकार करून आपला आदर प्रदर्शित करीत. इंग्लिश वकिलांनीं 'हेबिअस कार्पस 'च्या कायद्याअन्वयें त्याची मुक्तता करण्याची खटपट सुरू केली. कित्येकांनीं आपल्या खटल्यांत त्याच्या साक्षीची जरूर असल्याचे निमित्त करून त्यास किनाऱ्यावर आणण्याचा यत्न केला. परंतु बेलेरोफॉनच्या कप्तानानें गलबत वेगानें पळवून नेपोलियन यास साक्षीचें समन्स लागूं होऊं दिलें नाहीं. या सर्व प्रकारानें इंग्लिश सरकार नेपोलियन अटकेंत असतांही घाबरून गेलें. लोक उच्छृंखल होऊन नेपोलियनला किनाऱ्यावर आणतील, व लोकसत्ताक राज्य स्थापन करून त्यास प्रेसिडेंट करतील येथपर्यंत ब्रिटिश सरकारास धास्ती पडली. म्हणून इतक्या लांबच्या प्रवासाकरितां योग्य ती गलबतावर तरतूद झाली नसतांही त्यांनीं गलबतास ९ ऑगस्ट रोजींच सेंट हेलेनाकडे निघण्याचा गडबडीनें हुकूम दिला. नेपोलियन आतां सर्वस्वीं हातीं सांपडला असल्यामुळें त्यास कोणत्याही प्रकारचा त्रास न देतां त्याच्या इच्छेप्रमाणें व सोयीप्रमाणें त्यास वागविण्याची ब्रिटिश सरकारची उत्सुकता होती. 'निर्जितेषु तरसा तरस्विनां शत्रुषु प्रणतिरेव कीर्तये ' असेंच महात्म्यांचें व्रत असतें. परंतु नेपोलियन युरोपांतील कोणत्याही देशांत नुसता एक सामान्य नागरिक म्हणून राहिला तरी तेथें राजकीय खळबळ झाल्याखेरीज राहणार नाहीं असें त्यास प्रामाणिकपणें वाटलें.

नेपोलियनला नेण्यास ज्या गलबताची योजना झाली होती त्याचें नांव नॉर्दंबर्लंड असें होतें. हें गलबत निघण्यापूर्वी एका इंग्लिश ऑफिसरानें नेपोलियनच्या मालाचा झाडा घेऊन त्यांत सांपडलेले एक लक्ष फ्रँक जप्त केले. नेपोलियनच्या खिशांत चार लक्षांचा ऐवज होता तो मात्र त्याचेजवळच शिल्लक राहिला. नेपोलियन स्वतःस आपण होऊन इंग्लंडांत राहावयास आलेला परराष्ट्रीय पाहुणा असें मानीत होता; परंतु ब्रिटिश सरकार त्यास आपण लढाईंत जिंकून कैद करून आणलें असें मानीत असल्यामुळें त्यांनीं त्याची तलवार मागण्यास लॉर्ड कीथ यास पाठविलें. पण नेपोलियननें तलवार देण्याचें नाकारलें.

नार्दंबर्लंड बोट व तिच्याभोंवतीं पहारा करणारीं दहा लढाऊ गलबतें सेंट हेलेना येथें १५ ऑगस्ट रोजीं पोंचलीं. तेथें एकच बंगला असल्यामुळें व तो तेथील इंग्लिश गव्हर्नरास पाहिजे असल्यामुळें नेपोलियन यास एक १४ फूट रुंदीच व २८ फूट लांबीचा गुरांचा गोठा थोडीशी दुरुस्ती करून रहावयास देण्यांत आला.

याप्रमाणें सर्व युरोपास भारी झालेल्या नेपोलियनला इंग्लिश प्रधानमंडळानें स्वपराक्रमानें सेंट हेलेना बेटावर आपल्या अटकेंत आणून ठेविलें. कॉर्सिकन देशभक्त पॅओली याचा अनुवाद करून ज्या इंग्लंडचें नेपोलियन "दुकानदारांचें राष्ट्र" असें तुच्छतापूर्वक वर्णन करीत असे, त्या देशाचें अपूर्व तेज अशा रीतीनें पूर्ण प्रत्ययास येऊन या वेळीं त्यास मोठा अचंबाच वाटला असला पाहिजे. इंग्लिशांचें धैर्य व चिकाटी विलक्षण असल्याबद्दल त्यासही कबुली द्यावी लागली आहे. ' फ्रेंच लोकांस पराभव मुळींच सहन करतां येत नाहीं, इंग्लिशांचे कितीही व केवढेही पराभव झाले तरी ते सहन करण्याचें मानसिक सामर्थ्य मोठें आहे ' अशी तो इंग्लिशांची प्रशंसा करी. ' मी फ्रान्सच्या ऐवजीं इंग्लंडचा राजा असतों तर वॉटर्लूसारख्या दहा पराभवांनीं माझें सिंहासन जातें ना ' असे त्यानें एके प्रसंगीं उद्गार काढले. रोजबरी यांच्या मतें येवढ्या मोठ्या मनुष्याकडून इंग्लिशांच्या राष्ट्रीय शीलाबद्दल इतकी स्तुति झालेली अन्यत्र पहावयास मिळत नाहीं. नेपोलियननें इंग्लंडच्या राजास लिहिलेल्या एका पत्रांत, 'माझ्या सर्व शत्रूंत अत्यंत प्रबळ, स्थिर व उदार,' असें इंग्लंडचें वर्णन केलें होतें. अशा प्रतापशाली राष्ट्राशीं, त्याच्या चतुर्थांशही आरमार जवळ नसतां, विरोधाचा प्रसंग न टाळण्यांत नेपोलियननें एक मोठी चूक केली असें म्हणतात; व त्याच्या शोकपर्यवसायी चरित्रकथेवरून ' अहो दुरंता बलवद्विरोधता ' असा एक महत्वाचा बोध काढतात.

---

# प्रकरण १६ वें.

## सेंट हेलेना बेटावरील बंदिवास; मृत्यु.

(१८१५-१८२१.)

या अवधींत युरोपांतील सर्व राजांनीं आपापल्या सैन्यासह पॅरिस येथें तळ दिले. त्यांनीं आपलें युद्ध फक्त नेपोलियन या व्यक्तीशीं आहे वगैरे जाहीरनामा काढला असल्याचें मागें सांगितलेंच आहे. पॅरिस येथें आल्यावर त्यांनीं फ्रेंच लोकांस लोकसत्ताक राज्य स्थापूं न देतां बुर्बोन राजा गादीवर बसविला; १७८९ नंतर फ्रान्सनें जिंकलेला सर्व प्रांत खालसा केला; नेपोलियनच्या पक्षानें लढलेल्या मार्शल ने वगैरे कांहीं सेनापतींस गोळ्या घालून ठार केलें; व युद्धाच्या खर्चाबद्दल भरपाई म्हणून फ्रेंच लोकांपासून अतोनात खंडणी वसूल केली.

सेंट हेलेना बेट हा ज्वालामुखी पर्वतांच्या योगानें समुद्रपृष्ठावर चढलेला एक रुक्ष खडक आहे. येथील हवा इतकी उष्ण व रोगट आहे कीं येथें पन्नास वर्षेंपर्यंत जगलेला एकही इसम सांपडत नाहीं. उंदीर व घुशी यांचा उपद्रव इतका आहे कीं, येथील मुख्य वस्ती त्यांचीच होती, असें रोजबरी यांनीं विनोदानें म्हटलें आहे. नेपोलियन व त्याचे परिवारांतील फ्रेंच मंडळी बोलत बसली असतांही घुशी घरामध्यें बेलाशक किलकिलाट करीत वावरत असत, व रात्रीचे वेळीं अंगावरून धांवत. खुंट्यांवर ठेवलेल्या टोप्यांतूनही घुशी वसत असल्यामुळें त्या सावधगिरीनें काढाव्या लागत. वेलिंग्टननें हिंदुस्थानांतून युरोपांत जात असतांना हें बेट पाहिलें होतें; व नेपोलियनला अटकेंत ठेवण्यास हें सर्वस्वी योग्य असें वाटून त्यानेंच याची निवड केली होती.

हें बेट १० मैल लांब व ६ मैल रुंद आहे. किनाऱ्यापाशीं सर्वत्र कडा तुटलेला असून तेथून समुद्रपृष्ठ ६०० पासून १२०० फूटपर्यंत खोल आहे. भोंवतालीं हजारों मैलपर्यंत एकही देश अगर लहानसें बेट नाहीं. अशा

निसर्गतः बंदोबस्ताच्या ठिकाणामधूनही नेपोलियन निसटून जाईल या भीतीनें ब्रिटिश सरकारनें जास्ती बंदोबस्त करण्यास आळस केला नाहीं. दहा वीस लढाऊ गलबतें बेटाभोंवतीं अहोरात्र घिरट्या घालीत असत. परदेशच्या सर्व जहाजांस तेथें येण्याची मनाई करण्यांत आली होती; व भोंवतालीं किनाऱ्यावर तोफा मांडण्यांत आल्या होत्या. नेपोलियनच्या घरापासून ३ मैलांवर सभोंवार ५०–५० यार्डांचे अंतरानें पलटणींचे पाहरे बसविलेले होते. त्याच्या प्रत्येक हालचालीची वर्दी ताबडतोब बेटावरील गव्हर्नरास व आरमारी अधिकाऱ्यांस मिळावी अशी व्यवस्था सिग्नल–स्टेशनें स्थापून करण्यांत आली होती. नेपोलियनला घरापासून ६० यार्डांपलीकडे जावयाचें असल्यास बरोबर एखादा ब्रिटिश ऑफिसर येत जाईल, असें कळविण्यांत आलें होतें. याप्रमाणें पाहऱ्यांखालीं हिंडणें अपमानास्पद वाटून नेपोलियननें घराबाहेर पडण्याचें सोडून दिलें. रोगट हवेनें व व्यायामाच्या अभावानें त्यास एक वर्षांत जठराशयांतील कॅन्सरचा रोग जडून भयंकर व्यथा होऊं लागली.

नेपोलियन यास सालीना ८००० पौंड देण्याचा ठराव झाला होता. त्याचेबरोबर लॅस् कॅसेस्, गुर्गांड, मॉंथालॉन व बर्ट्रॅंड हे चार ऑफिसर, त्यांचे कुटुंबांतील मंडळी व शिवाय नोकरचाकर मिळून ५० मनुष्यें होतीं. येवढ्या लोकांस याच्या दुप्पट पेन्शनही पुरण्याजोगें नव्हतें, हें उघड आहे. परंतु यासंबंधीं ब्रिटिश सरकाराबद्दल सर वॉल्टर स्कॉट यानें असा खुलासा केला आहे कीं, नेपोलियनवर देखरेख ठेविण्यासाठीं सेंट हेलेना येथें नेमलेल्या गव्हर्नरास १२००० पौंड पगार द्यावा लागत असल्यामुळें नेपोलियनकरितां जास्त पैसे खर्च करण्याची ब्रिटिश सरकारास सवड नव्हती. नेपोलियननें ब्रिटिश सरकारास कळविलें कीं, ' मला लागतील इतके पैसे पुरवा किंवा माझीं पत्रें सील न फोडतां फ्रान्समध्यें पोंचवा म्हणजे मी आपणास हवे तितके पैसे आणीत जाईन व तुम्हांस पैही खर्चण्याचें कारण पडणार नाहीं.' परंतु पत्रांतून राजकीय कारस्थान केलें जाणार नाहीं अशी खात्री न वाटून ब्रिटिश सरकारनें पत्रें वाचून पाहिल्याखेरीज कोठेंही पोंचविण्याचें नाकारलें. उलटपक्षीं नेपोलियन यासही उघडीं पत्रें पाठवितां येणें शक्य नव्हतें. कारण त्यायोगानें त्याचे मित्र कोण व पैसे कोठें आहेत वगैरे बातमी बुर्बोन राजास लागून कांहींचे प्राण धोक्यांत पडले असते. तेव्हां नेपोलियनला आपलीं सोन्याचांदी-

चीं भांडीं वगैरेंचा बेटावर लिलांव करून पैसे उत्पन्न करावे लागले. हें वर्तमान युरोपास पोंचतांच तेथें त्या काळच्या ब्रिटिश प्रधानमंडळाच्या वर्तनाबद्दल सर्वत्र धिःकार प्रदर्शित करण्यांत येऊं लागला. तेव्हां ब्रिटिश प्रधानमंडळानें मेहेरनजर करून 'सेनापति बोनापार्ट' चा सांपत्तिक दर्जा व इंग्रजी गव्हर्न-राचा दर्जा हे सारखे केले व नेपोलियनची नेमणूक बारा हजार पौंडांपर्यंत वाढविली.

ब्रिटिश सरकारनें आपणास '•जनरल ' म्हणण्याचा उपक्रम केलेला पाहून नेपोलियन यास प्रथम हंसूं येत असे. 'मी फ्रेंच सैन्यावरील मुख्य होतों म्हणून मला हे जनरल म्हणतात तेव्हां मी फ्रेंच चर्चवरील मुख्य होतों म्हणून उद्यां मला हे आर्चबिशप म्हणतील कीं काय कोण जाणे ' असें तो थट्टेनें म्हणत असे. परंतु पुढें ' फ्रेंच लोकांस आपला राजा निवडण्याचा अधिकार नाहीं, त्यांनीं बुर्बोन वंशास पदच्युत केलें हें कृत्य बंडखोरपणाचें झालें ' अशीं विधानें होऊं लागल्यानंतर नेपोलियननें आपणास 'नेपोलियन बादशहा' असेंच ह्मटलें पाहिजे अगर आपणास एखादें निराळेंच नांव घेऊं दिलें पाहिजे, असा आग्रह धरला. ' फ्रेंच राष्ट्राची इभ्रत राखण्याकरितां हा आग्रह अवश्य आहे ' असें तो म्हणे. त्याचें असें म्हणणें होतें कीं, " फ्रेंच लोकांस मला बादशहा करण्याचा अधिकार नव्हता तर सेनापति करण्याचा अधिकार तरी कोठून आला ? मी फ्रान्सचा बादशहा नव्हतों तर ब्रिटिश प्रधानमंडळानें माझे कारकीर्दींत लंडन येथें दिवस काढीत असलेल्या बुर्बान राजाकडे आपले वकील न पाठवितां पॅरिस येथें मजकडे पाठविण्याची उठाठेव कां केली ? " नेपोलियनच्या बाद-शाहीस मान्यता दर्शविणाऱ्या कोणत्याही कागदावर इतर युरोपियन राजा-प्रमाणें इंग्रज राजाची सही गुंतलेली नाहीं असें ब्रिटिश प्रधानमंडळाचें म्हणणें होतें. त्यावर नेपोलियनचें उत्तर होतें कीं, " १८१४ सालीं नेपोलियननें फ्रान्सचें राज्य सोडावें व एल्बाचा ' बादशहा ' व्हावें असा जो पॅरिस येथें तह झाला त्यावर इतरांप्रमाणें इंग्रज राजाचीही सही आहे; आणि याकरितां तरी मला ' नेपोलियन बादशहा ' असें म्हणणें ब्रिटिश सरकारास भाग आहे. शिवाय युद्धांत पराभव होऊन अगर अन्य कारणानें कोणत्याही बाद-शहाचें राज्य गेलें तरी त्याची पदवी गाळण्याची युरोपांत वहिवाट नाहीं. सध्यां हातीं राज्य नसल्यामुळें मला ' माजी बादशहा ' असें ह्मटलें तरी चालेल

अगर, यापैकीं कोणताही मार्ग पसंत नसल्यास, मी कर्नल म्यूरन अथवा बॅरन ड्यूरकसारखें निराळेंच नांव धारण करण्यास तयार आहे. परंतु नेपोलियन या नांवापूर्वी फ्रेंच लोकांनीं जोडलेलें राजपद गाळून त्यांचा उपमर्द करण्याच्या कृत्यास मला संमति देतां येत नाहीं. " या वादविवादांतून कांहीं निष्पन्न झालें नाहीं. ' जनरल बोनापार्ट ' असा पत्ता लिहून ब्रिटिश गव्हर्नराकडून आलेलीं पत्रें नेपोलियन वाचीत नसे, व ' नेपोलियन बादशहा ' अशा सहीचीं पत्रें गव्हर्नर वाचीत नसे. त्यामुळें दोन्ही पक्षांत जवळ जवळ आरंभापासूनच पत्रव्यवहार व भाषणव्यवहार बंद होता.

नेपोलियनला जनरल म्हणण्याच्या ब्रिटिश सरकारच्या आग्रहास कांहींनीं 'क्षुद्रबुद्धीचा व पोरकट आढ्यतेचा प्रकार' असें नांव दिलें आहे. एक ग्रंथकार तर म्हणतो कीं, कर्नल सीझर, कॅप्टन अ‍ॅलेक्झांडर, लेफ्टेनंट चार्लमेन वगैरे हास्यास्पद शब्दप्रयोगांचे अर्थ काय तेंच आपणास समजत नाहीं. परंतु स्कॉटचें ब्रिटिश सरकारतर्फे यास असें उत्तर आहे कीं, नेपोलियनच्या बादशाहीस मान्यता दिली असती तर त्याचा त्याप्रमाणें इतमाम राखण्यास फार खर्च आला असता, याकरितां त्यास बादशहा ह्मणून न ओळखण्याचा मार्ग स्वीकारावा लागला.

नेपोलियनची राणी मेरी लुइसी हीस तिचा बाप आस्ट्रियाचा बादशहा यानें अटकेंत ठेविलें होतें. त्याचा मुलगाही मेरी लुइसाबरोबरच होता. त्यांस शत्रूंनीं सेंट हेलेना येथें आणूं दिलें नाहीं, याबद्दल नेपोलियन यास फार खेद वाटत असे. ज्याच्या प्राप्तीकरितां जोसेफाइनसारख्या स्त्रीशीं विवाहसंबंध तोडावा लागला तो मुलगाही अखेरीस न लाभल्याप्रमाणें होऊन कायमचा दृष्टीआड झाल्यानें त्यास अत्यंत दुःख होऊं लागलें. पुत्राचें स्मरण झाल्यास त्यास शोकावेग आंवरून धरणें कठीण जात असल्यामुळें तो त्याची गोष्टही बहुधा काढीत नसे. मॅडम मॉंथॉलॉनबरोबर बोलत असतां तो एकदां म्हणाला कीं, "या मुलाची आठवण होतांच नानाप्रकारचे भयंकर विचार मनांत येऊं लागतात, व ते घालवितांही येत नाहींत. कोणी विषप्रयोग करून भयंकर यातनांनीं या अज्ञान निराश्रित मुलाचा अंत करील किंवा काय असें वाटतें. याच्या

जन्मोत्सवाचे प्रसंगींहा मला पुढें प्रतिदिवशीं रक्ताचे अश्रु गाळण्यास लावील अशी कल्पना तरी झाली असती काय ? "*

नेपोलियन बेटावरून निसटून जाऊं नये म्हणून खबरदारी ठेवण्याकरितां ब्रिटिश सरकारनें सर हडसन लो याची सेंट हेलेनाच्या गव्हर्नरीचे जागीं नेमणूक केली. नेपोलियन निसटून जाऊं नये म्हणून अवश्य ते उपाय योजावयाचे, परंतु त्या बरोबरच त्याचें यावेळचें जीवित शक्य तितकें कमी कष्टमय करण्यास झटावयाचें, अशी गव्हर्नरावर असलेली नैतिक जबाबदारी पार पाडण्यास हा नालायक होता, असें लॉर्ड रोजबरी वगैरे इंग्लिश लेखकांचेंही मत दिसतें. रोजबरी त्यास सभ्य गृहस्थ ( gentleman ) म्हणण्यासही तयार नाहींत. अशा तऱ्हेच्या मनुष्याची योजना झाल्यामुळें अर्वाचीन काळचें एखादें ब्रिटिश प्रधानमंडळ नेपोलियनसारख्या कैद्यास जसें सौजन्यानें व सहानुभूतीनें वागवील तसा त्या वेळीं प्रकार झाला नाहीं.

हा गव्हर्नर प्रथम एकदोनदां भेटावयास आल्या वेळींच नेपोलियनला त्याच्या स्वभावाचा संताप आला, व त्यानें त्याची गांठ पुढें केव्हांही घेतली नाहीं. त्यामुळें चिडून सर हडसन रोज नवे नवे निर्बंध घालूं लागला. तथापि नेपोलियननें घराबाहेर पडण्याचेंच टाकल्यामुळें सर हडसनची सुडाची इच्छा फारशी तृप्त झाली नाहीं. आस्ट्रिया, रशिया व फ्रान्स या देशांच्या राजांनींही एकएक कामिशनर पाठविला होता. नेपोलियन यास रोज प्रत्यक्ष पाहून तो बेटावर असल्याबद्दल आपआपल्या सरकारांस कळविण्याचें यांचें काम होतें.

---

* Do I deceive myself, madame, in imagining that this rock, all frightful as it is, would be an elysium if my son were by my side? On receiving into my arms that infant, could I have believed that one day he would become the source of my greatest anguish? Yes, madame, every day he costs me tears of blood. I imagine to myself the most horrid events which I cannot remove from my mind. I see either the potion or the empoisoned fruit which is about to terminate the days of that young innocent by the most cruel sufferings. Compassionate my weakness, madame; console me!

हे लोक कशा प्रकारचे होते, व कोणत्या उद्देशानें पाठविण्यांत आले होते, तें एकट्या फ्रेंच कमिशनरच्या हकीकतीवरून समजण्याजोगें आहे. त्यास ज्यानें पाठविलें त्या टॅलेरँड नांवाच्या फ्रेंच प्रधानानें म्हटलें आहे कीं, " नेपोलियननें माझा जो छळ केला त्याबद्दल येवढाच सूड मला घेतां येण्याजोगा आहे. परंतु तो सूड फारच भयंकर आहे. नेपोलियन मला पूर्णपणें माहीत आहे. फ्रेंच कमिशनर मॅंटचेन्यूसारख्या वाचाळ महामूर्खाबरोबर नित्य प्रसंग पडल्यानें त्यास मंद अग्नीवर भाजत ठेवल्याप्रमाणें व्यथा होऊन मरण आल्याखेरीज राहणार नाहीं. " परंतु सुडाची ही नाजुक युक्ति नेपोलियननें साधूं दिली नाहीं. त्यानें मॅंटचेन्यूची अगर इतर कमिशनरांची केव्हांही गांठ घेतली नाहीं. सर हडसन लो व इतर कमिशनर यांनीं दार फोडून जबरदस्तीनें आंत घुसण्याची धमकी दिल्यावरून नेपोलियननें त्यांस कळविलें कीं, 'जो कोणी परवानगीशिवाय आंत येईल त्यास मी बेलाशक गोळी घालीन.' हे कमिशनर नेपोलियनला पाहण्याकरितां आठ आठ दहा दहा तासपर्यंत घिरट्या घालीत अगर तिष्ठत बसत. कांहीं दिवसांनीं तर त्यांस या प्रकारानें वेड लागण्याची पाळी आली. शिवाय येथील हवेनें त्याच्या प्रकृति फारच क्षीण होऊं लागल्या. सर हडसन लोचीं व त्यांचीं रोज भांडणें चालत. कारण, एकाच अधिकारांतील वांटेकरी म्हणून त्यांच्यांत मत्सरभाव उत्पन्न झाला होता. अशा परिस्थितीस कंटाळून हे कमिशनर दोन तीन वर्षांनीं नेपोलियन यास एकही वेळ पाहिल्याशिवाय परत स्वदेशीं गेले. लॉर्ड रोजबरी विनोदानें म्हणतात:–The climate or Lowe or both were too much for the constitutions of these unlucky diplomatists.

कॅन्सरचा भयंकर रोग व सर हडसन लोचा बारीकसारीक गोष्टींतही छळ यांपासून नेपोलियन यास रोज पीडा होत होतीच; परंतु सेंट हेलेना येथें त्यास याहूनही दुःसह पीडा व्यवसायाच्या अभावामुळें झाली. 'मी केव्हांही कामांत नसलों म्हणजे पाण्यांतून बाहेर काढलेल्या माशाप्रमाणे माझी तडफड होते' असें तो आपलें वर्णन करीत असे. त्यानें येथें आपलें चरित्र लिहावयास घेतलें होतें. शिवाय युरोपांतील टपाल आलें म्हणजे त्यांत अनेक वर्तमानपत्रें, त्याचीं स्वतःचीं चरित्रें, व इतर नवीं प्रसिद्ध झालेलीं पुस्तकें येत असत. परंतु तीं सर्व दोन तीन दिवसांत वाचून टाकून तो राहिलेल्या वेळेचें काय

करावें या चिंतेंत पडे. लॉर्ड रोजबरी म्हणतात " नेपोलियन स्वतःसंबंधीं सांगे कीं ' व्यवसाय हेंच माझें जीवन आहे, मीं उद्योगाकरितांच जन्म घेतला आहे. अश्रांत श्रम करण्याचें माझ्यांत किती सामर्थ्य आहे त्याची मर्यादा मलाही समजलेली नाहीं. ' चॅप्टलनें वर्णन केल्याप्रमाणें, त्याचें शरीर व मन हीं अशा प्रकारचीं होतीं कीं त्यास थकवा शक्यच नसे. अशा भयंकर यंत्रास पुरण्यासारखें काम सेंट हेलेना येथें कोठून मिळूं शकणार ! त्याच्या ज्या शारीरिक, मानसिक व बौद्धिक शक्ति सर्व जगाशीं झुंजण्यास समर्थ असत त्यांच्या व्यापारास आतां बाहेर वाव नसल्यामुळें त्या आंतलेआंत त्याचेवरच उलटल्या, व त्यासच फाडून खाऊं लागल्या. अलौकिक कर्तृत्वशक्तीचे यापूर्वीं जे लोक होऊन गेले त्यांचा जगांत अंत फार झटपट झाला आहे. नेपोलियनप्रमाणें मरणाच्या भयंकर व्यथेंत वर्षानुवर्ष कुचंबत राहण्याचा प्रसंग अशा योग्यतेच्या दुसऱ्या पुरुषावर आलेला इतिहासांत दिसत नाहीं. "

पुढें पुढें नेपोलियनची स्थिति फारच वाईट होत चालली. त्याचा रोग बळावत चालला, व त्यास उठून बसण्याची देखील शक्ति राहिली नाहीं. त्याच्या परिवारांतील फ्रेंच ऑफिसरांपैकीं एकेकास सर हडसन लो कांहीं तरी नियम मोडल्याचें कारण सांगून हांकून देऊं लागला. इंग्लिश डॉक्टर ओमीरा याचे मनांत नेपोलियनबद्दल पूज्यभाव जडलेला पाहून सर हडसननें त्याचीही उचलबांगडी केली. लोनें निवडलेल्या डॉक्टराचें औषध नेपोलियननें घेण्याचें नाकारल्यावरून पुढें त्यास औषधावांचूनच दिवस काढावे लागले. केव्हां केव्हां एकसारखा चोवीस तासपर्यंत पोटांत शूळ असे. घेरी येईपर्यंत एकामागून एक वांत्या होत. ज्वराचें ठाणें तर अंगांत कायमचेंच बसलें होतें. याप्रमाणें प्रकृति विकोपास जातां जातां अखेरीस ४ मे १८२१ रोजीं रात्रीं नेपोलियन यास वायु झाला. वायूमध्यें त्याचें चित्त कोठल्या तरी युद्धांत असून सैन्यास एकामागून एक हुकूम देण्याचा सपाटा चालला होता. या वेळीं आसपास सृष्टींतही भयंकर वातक्षोभ झालेला असून बेटावरील सर्व घरें हादरून गेलीं व कित्येक झाडें कडकडां मोडून पडलीं. लवकरच सर्व आकाश मेघांनीं व्याप्त होऊन मुसळधार पावसास सुरुवात झाली. या वादळाबरोबरच नेपोलियनच्या प्राणांतील कल्होळ सकाळीं कमी झाला, व संध्याकाळीं सहा वाजतां सूर्य क्षितिजाखालीं उतरत असतां नेपोलिनचें देहावसान झालें.

पॅरिस येथें शव नेण्याची ब्रिटिश सरकारची परवानगी नसल्यामुळें नेपो-लियन यास सेंट हेलेना येथेंच पुरण्याचें ठरलें. त्या विधीचे वेळीं इंग्लिश आरमारानें नेपोलियनच्या सन्मानार्थ मिनिटा–मिनिटाचे अंतरानें तोफा उड-विल्या. सर वाल्टर स्कॉट ह्मणतो कीं, " ज्यास एकवेळ सर्व युरोपखंड पुरेसें होत नव्हतें तो देह आतां साडेतीन हाताच्या खळग्यांत स्वस्थपणें पडून राहिला आहे. "

---

# प्रकरण १७ वें.

## कांहीं विषयांवरील मतें; युद्धेतर कृत्यें; कर्तृत्वशक्ति.

नेपोलियन बोनापार्ट हा कोणत्याही मोहिमेवर निघण्यापूर्वीं भावी युद्धा-संबंधीं सर्व धोरण (plan) पॅरिस येथेंच ठरवीत असे. तो प्रथम शत्रूची एकंदर फौज किती आहे, व तिच्या तुकड्या कोठकोठें आहेत यासंबंधीं शक्य तितकी माहिती काढी, व युद्धप्रदेशाचा नकाशा घेऊन त्या त्या स्थळीं टांचण्या टोंचीत असे. आपलीं पलटणें जेथें असतील तेथें निराळ्या रंगाच्या टांचण्या टोंची. मग युद्धक्षेत्रांतील महत्वाचें स्थान निश्चित करून तेथें पर-स्परांपासून दूर असलेल्या आपल्या पलटणी एकत्र करण्याचें ठरवी. व सर्व रस्त्यावरील वळणें, चढउतार, खंदक, डोंगर, नद्या, दलदलीचें प्रांत वगैरे लक्षांत घेऊन प्रत्येक पलटणीस इष्ट स्थळीं व इष्ट वेळीं दाखल होण्यास कोणत्या मार्गानें, कोणत्या वेगानें, किती मजलांमध्यें चाल करावयास पाहिजे तें निश्चित करून तदनुसार ताबडतोब सर्वांस सविस्तर हुकूम लिहीत असे. अशा प्रकारें महत्वाच्या स्थानाचा निर्णय करून तेथें फौजेचें एकीकरण करण्यासाठीं असे हुकूम कोणत्याही सेनापतीस अगाऊ लिहितां आल्यास या एका गोष्टीमुळेंच त्याचें नांव अजरामर होईल, असें जनरल जॉमिनी हा आपले ग्रंथांत म्हणतो. या योजनेबरहुकूम काम चालूं असलें म्हणजे त्यास यशाची इतकी खात्री

वाटे, कीं तो रणांगणांवर कडाक्याचें युद्ध चालूं असतां शेंकडों तोफांच्या गर्जनेंत निश्चिंतपणें झोंप घेई. परत हटण्याचा प्रसंग येणारच नाहीं अशा दृढविश्वासानें तो मार्गातील पूल ओलांडल्यावर ते पाडून टाकण्यासही कमी करीत नसे. लष्कराच्या भावी हालचाली दाखविण्याकरितां तो वर सांगितल्याप्रमाणें नकाशावरील टांचण्या हलवीत असतां जवळ कोणी ऑफिसर असल्यास त्यास ही योजना समजावूनही सांगत असे. परंतु त्यांना हा निव्वळ एक करमणुकीचा प्रकार वाटत असे. या टांचण्यांच्या चालीप्रमाणेंच पुढें सर्व घडून आलें पाहिजे अशी नेपोलियन यास खात्री कशी वाटत असे याची आम्हांस कल्पनांही होत नव्हती, असें जनरल जॉमिनी म्हणतो. १८०० सालीं नेपोलियननें नकाशावरून मॅरेंगो येथें अखेरचें युद्ध होऊन शत्रु पराभव पावणार असें निश्चित करून आपला प्रायव्हेट सेक्रेटरी बूरीन यास सांगितलें. परंतु बूरीन नकाशा व त्यावरील टांचण्या यांकडे पाहून हंसूं लागला. त्यास हा सर्व खेळ आहे असें वाटलें. तेव्हां नेपोलियननें त्यास 'तूं मट्ठ आहेस, दगड आहेस' असें ह्मणत नकाशा गुंडाळला. पुढें मॅरेंगोच्या रणांगणावरूनच तेथें झालेल्या लढाईचा रिपोर्ट बूरीन यास पॅरिसकडे पाठवावा लागला तेव्हां पूर्वीची ही गोष्ट आठवून त्याचे मनावर पूर्ण प्रकाश पडला.

युद्धाचा व्यूह अशा रीतीनें रचल्यानंतर त्यांतील यश ज्यांच्या अंतःकरणपूर्वक झटण्यावर अवलंबून असावयाचें त्या शिपायांस स्फुरण आणण्यासारखे शब्दही त्यास बोलतां येत असत. युद्धापूर्वी तो जाहीरनामे काढून पुढील काम किती जड व श्रमाचें आहे तें शिपायास कळवी; व लोकसत्ताक राज्यांतील सैनिकांस कांहीं असाध्य नसल्यामुळें ते मोहीम फत्ते करतील असा आपला भरंवसा व्यक्त करून तो त्यांची प्रशंसा करी. एके प्रसंगीं काम अशक्य आहे असें शिपायांस वाटतेंसें दिसल्यावरून तो ह्मणाला "फ्रेंच भाषेंत 'अशक्य' हा शब्द नाहीं." मोहीम संपल्यावर काढलेल्या जाहीरनाम्यांत तर शिपायांची दाखविलेल्या मर्दुमकीबद्दल सर्वस्वी स्तुतिच केलेली असे, व विजयाचें श्रेय निव्वळ त्यांसच दिलेलें असे. परंतु अशा स्तुतीनें ते चढून तिचा अनिष्ट परिणाम होऊं नये ह्मणून 'तुह्मी आज जगांत अद्वितीय आहां खरे, परंतु तुह्मांस अद्यापि प्राचीन रोमन वीरांची सर आलेली नाहीं' अशा आशयाच्या शब्दांनीं जास्त पराक्रम व्यक्त करण्याची त्यांच्यांत उत्सुकता जागृत

ठेवी. या जाहीरनाम्यांचा फार उपयोग होत असे, व त्यांस युद्धविशारदांनींही महत्व दिलें आहे. इजिप्टमधील मनोऱ्यांजवळच्या लढाईत जे शिपाई ठार झाले त्यांचीं नांवें नेपोलियननें त्या मनोऱ्यांवर कोरविलीं. त्यामुळें हे मेलेले शिपाई मनोऱ्यांप्रमाणेंच अजरामर झालेसे वाटून जगलेल्या शिपायांस त्यांचा हेवा येऊं लागला. शिवाय, या लढाईस रीतीप्रमाणें 'गिसेची लढाई' असें जवळच्या गांवावरून नांव मिळणें योग्य असतां, त्यानें समरभूमीवरून मनोरे दिसत होते या गोष्टीचा फायदा घेऊन 'मनोऱ्यांची लढाई' असें कल्पनाशक्तीस उद्दीप्त करणारें दिलेलें नांवही लक्षांत घेण्यासारखें आहे. आस्टर्लिझच्या लढाईस आरंभ होण्याचे वेळीं सूर्यबिंब एकदम ढगांमधून झळकलें. यावरून असा प्रकार अन्य युद्धप्रसंगीं घडला ह्मणजे तो शिपायांस 'हा पहा आस्टर्लिझचा सूर्य!' असें ह्मणून तेथेंही आस्टर्लिझप्रमाणें यश येण्याचा शकुन झाला असें सुचवी. अशा गोष्टीसंबंधानें एकदां एक मित्र नेपोलियन यास म्हणाला 'यांत कॉय आहे? हा निव्वळ भावनेचा भाग आहे.' त्यावर नेपोलियननें उत्तर दिलें कीं 'होय. परंतु भावनेस तुच्छ मानतां येत नाहीं. तिचेंच जगांत साम्राज्य आहे.'

नेपोलियनचें असें मत होतें कीं, युद्धाचा निकाल सैन्यावर अवलंबून नसून सेनापतीचें धोरण, शांतवृत्ति, युद्धकलेंतील नैपुण्य व शिपायांत आवेश चढविण्याचें सामर्थ्य यांवरच अवलंबून असतो. गॉल देश रोमन सैन्यानें जिंकला नसून सीझरनें जिंकला, असें तो म्हणे. *

---

* नेपोलियननें सेनापतीचे गुण व महत्व याबद्दल केलेल्या विवेचनाचें इंग्रजींत पुढीलप्रमाणें भाषांतर करण्यांत आलें आहे:—

The first quality of a commander-in-chief is the possession of a cool head, which receives correct impressions of things, which never becomes over-excited, which does not permit itself to be intoxicated by good or bewildered by bad news,—a mind in which the successive or simultaneous impressions received during the course of a day classify themselves, and takes the only place they should properly occupy; for good sense and

( पुढें चालू. )

नेपोलियन् बोनापार्ट यानें लष्करांत नोकरी मिळाल्यानंतर इपॅमिनांडासच्या काळापासून फ्रेडरिक दि ग्रेटच्या काळापर्यंत जगांत जितके नामांकित योद्धे होऊन गेले त्यांच्या युद्धपद्धतींचें फार सूक्ष्म अध्ययन केलें, * व त्या सर्वांतील गुणदोष लक्षांत घेऊन त्यानें स्वतःची नवी पद्धति बसविली. या पद्धतीच्या अमोघत्वाबद्दल त्यास प्रत्यक्ष मोठ्या युद्धाचा अनुभव घेण्यापूर्वींच खात्री वाटत असे. इ. स. १७९७ मध्यें त्यास इटलीवर रवाना करण्यांत आलें तेव्हां तो हाताखालील सेनापति सल्ला देऊं लागले असतां न ऐकतां म्हणाला, "आपल्याविरुद्ध आस्ट्रियन पक्षाकडे फार अनुभविक सेनापति आहेत. परंतु मजबरोबर ते लढूं लागतांच त्यांची धूळधाण उडून जाईल व त्यांस आपलीं आजवर पढलेलीं लष्करी डावपेंचांचीं पुस्तकें जाळून टाकावींशिं

---

(मागील पृष्ठावरून समाप्त.)

reason are the result of comparing several sensations, weighed with equal consideration.

There are men, who by reason of their physical and moral constitutions, interpret every event in the same way; whatever may be their wisdom, spirit, courage, and other qualities, nature has not called them to the command of armies and the direction of great military operations.

The commander-in-chief is the head; he is everything for the army. It was not the Roman army which conquered Gaul, but Caesar; it was not the Carthagenian army, which, at the gates of Rome, made the Eternal City tremble, but Hannibal; it was not the Macedonian army which marched as far as the Indus, but Alexander; it was not the Prussian army which defended Prussia for seven years against the three most powerful states of Europe, but Frederick.

* नेपोलियननें आपल्या पूर्वीं होऊन गेलेल्या सर्व ठळक सेनापतींवर केलेल्या टीका प्रसिद्ध आहेत. परंतु त्यास एकदां 'ऑलिव्हर क्रॉम्वेल हा चांगला सेनापति होता काय?' असा सेंट हेलेना येथें प्रश्न करण्यांत आला असतां तो म्हणाला 'क्रॉम्वेलवर मत देण्याइतकी मला त्याच्या लढायांची बारीक माहिती नाहीं.'

वाटतील." लेफ्टेनेंट सार्जंट सांगतो कीं, नेपोलियन ज्या तत्त्वांप्रमाणें युद्ध करीत असे तीं त्रिकालाबाधित आहेत. अर्वाचीन युद्धसामग्रीनें तीं अमलांत आणण्याचे बाबतींत किरकोळ फेरफार झाले आहेत, परंतु ते प्रायः 'टॅक्टिक्स'-मध्येंच आहेत. नेपोलियनचा जीवर विशेष भर असे त्या 'स्ट्रॅटेजी'मध्यें नाहींत. अर्वाचीन शस्त्रास्त्रें व यंत्रें यांमुळें तर स्ट्रॅटेजीस जास्तच महत्व चढलें आहे; व तिचीं तत्त्वें अमलांत आणणें जास्त सुलभ झालें आहे. लॉर्ड म्हणतो, "प्रत्येक जयेच्छु अर्वाचीन सेनापति नेपोलियनचेंच अनुकरण करण्यास झटत असतो."

याप्रमाणें अर्वाचीन युद्धविद्येसंबंधीं त्यास निष्णातांकडून सर्वानुमतें आचार्यपद देण्यांत येतें. परंतु तो स्वतः त्या विद्येबद्दल विशेषशा आदरानें बोलत नसे. तो म्हणे कीं "युद्ध हें रानटीपणाचें शास्त्र आहे." त्याच्या मतें "या शास्त्राचा सामान्य नियम असा आहे कीं, ज्या पक्षाकडे लढाईचे वेळीं जास्त संख्या त्या पक्षाकडे जय." तो असेंही म्हणे कीं, "मला युद्धाचा सर्वस्वी तिटकारा आहे; परंतु शत्रूंनीं 'तूं आम्हांस जिंक, नाहीं तर आम्हीं तुला जिंकतों.' अशी वृत्ति धरल्यामुळें मला शस्त्र उचलणें वारंवार भाग पडे." एके प्रसंगीं तो म्हणाला कीं, "मला शांततेचीं बरींच कामें करून फ्रान्सची सुधारणा करावयाची होती. परंतु शत्रूंनीं मला आपलें सर्व आयुष्य रणांगणावर वायां दवडणें भाग पाडलें." युद्धांत जय मिळाल्यावर आनंद व्यक्त न करितां समरभूमीवर घायाळ होऊन पडलेले आपले व शत्रूचे शिपाई पाहून तो शोक प्रकट करी. या सर्वांची शुश्रूषा होण्याची व्यवस्था करीपर्यंत तो कितीही निकडीचें दुसरें काम असलें तरी हलत नसे. तो ह्मणे कीं, "हे युरोपियन राजे लोक स्वतः घरीं राहून रणांगणावर फौज पाठवीत असतात. परंतु ते मजप्रमाणें लढाईंत हजर राहतील तर मृतांचीं छिन्नभिन्न शरीरें पाहून व जखमी लोकांचे आक्रोश ऐकून त्यांची युद्धाची आवड खात्रीनें कमी झाल्याशिवाय राहणार नाहीं."

अशा रीतीनें तो युद्धाची नावड व्यक्त करीत असे तरी त्याच्या हातून घडलेलें युद्धकार्य फारच भयंकर होतें. बायरन कवि म्हणतो कीं, "युद्धाची भूकंपभैरव गर्जना म्हणजे नेपोलियनचें केवळ निःश्वसित होतें." स्कॉट म्हणतो कीं, तो विपत्काळीं न डगमगतां "साक्षात् प्रतिकूळ दैवासही धाब्यावर

बसविणारा " योद्धा होता. डब्ल्यू. टी. स्टेड हा आपल्या एका ग्रंथांत अॅलेक्झांडर, सीझर व नेपोलियन या तिघांस 'मंगळाचा त्रैमूर्तिक अवतार ' असें नांव देऊन म्हणतो कीं, " या तिघांतही नेपोलियनइतकी युद्धार्णवांत ज्यानें सपशेल उडी झोंकून दिली आहे असा कोणीही आढळत नाहीं. " युद्धनिष्णात लेखक लॉर्ड हा त्यास Prodigy of War म्हणजे लोकोत्तर योद्धा असें म्हणतो. दुसरा युद्धज्ञ लेखक सार्जंट म्हणतो कीं, ' नेपोलियनसारखा दुसरा योद्धा जन्मास येणें शक्य नाहीं. ' फ्रान्साविरुद्ध सर्व राष्ट्रांची जूट करून शत्रूंनीं युद्धास विराट स्वरूप दिल्यानंतर त्यांत झगडण्यास फ्रान्सकडे असा विराट पुरुष असल्यामुळें त्या देशास शत्रूंना एकदम शरणचिठ्ठी देण्याचा प्रसंग आला नाहीं. त्यानें संयुक्त राष्ट्रांचे एकामागून एक सहा संघ विदीर्ण करून एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्रिय करणाऱ्या परशुरामाचें स्मरण जागृत केलें. त्यास पदच्युत करण्याचे कामीं शत्रूंचे १५ लक्ष लोक ठार व यापेक्षां अनेकपट जखमी झाल्यामुळें त्याच्याकडे या काळीं युरोपांत यमराजाच्या प्रतिनिधीचें काम आल्यासारखें दिसतें. त्यास गर्भवासांतही कांहीं अंशीं युद्धाचा संस्कार घडला होता असें पहिल्या पानांत दिलेल्या हकीकतीवरून म्हणतां येईल. मृत्यूपूर्वीच्या वायूंतही त्यास डोळ्यापुढें जीं चित्रें दिसत होतीं तीं युद्धाचींच होतीं. त्याच्या कोणत्याही चरित्राचें कोणतेंही पान काढलें तरी त्यांत कोठल्याना कोठल्या तरी युद्धाचें वर्णन चालूं असल्याचें आढळतें. परंत अशा रीतीनें त्याच्या चरित्रांत प्रथमपासून अखेरपर्यंत ऐकूं येणाऱ्या तोफांच्या कडकडाटानें कानठळ्या बसून कोणी त्याचें ' योद्धा ' येवढेंच वर्णन केलें तर तें मात्र अव्याप्तीच्या दोषास पात्र होईल, असें पुढें दिलेल्या त्याच्या युद्धेतर कृत्यांच्या त्रोटक सारांशावरून लक्षांत येईल.

नेपोलियननें डिरेक्टरी मोडून स्वतःकडे लोकसत्ताक राज्याच्या अध्यक्षत्वाची जागा घेतली तेव्हांपासन त्याचे हाता राज्यकारभाराचे बाबतींत अनियंत्रित सत्ता आली. त्यास सल्ला देण्याकरितां त्याचे जोडीस दुसरे दोन कॉन्सल नेमण्यांत आले होते. परंत त्यांनीं सल्ला देणें तो विचारला असतांच द्यावयाचा असें नेपोलियननें ठरविलें, व त्यांस सल्ला कव्हांही विचारला नाहीं. सर्व एक्सेक्यटिव्ह सत्ता या तीन कॉन्सलांस, म्हणजे वर सांगितल्याप्रमाणें वस्तुतः एकट्या नेपोलियनला, देण्यांत आली होती. या कॉन्सलांच्या मदतीस चार सभा

होत्या. त्यांपैकी सेनेट सभेचे सभासद निवडणुकीनें भरण्यांत येत, व इतर तीन सभांचे सेनेटकडून नेमण्यांत येत. त्यामुळें एकदां सेनेटमध्यें अनुकूल सभासदांची निवडणूक झाली म्हणजे सरकारास कोणत्याही कृत्यांत कोणत्याही सभेकडून विरोध होण्याची भीति नसे.

डिरेक्टरीनें आपणास विरोध करणाऱ्या हजारों राजपक्षाच्या व कट्ट्या लोकसत्तावाद्यांच्या कुटुंबांस हद्दपार केलें होतें. परंतु या योगानें फ्रान्स देश अनेक कर्तृत्ववान् लोकांच्या सेवेस अंतरून उलट त्यांना शत्रु बनवितो असा विचार करून नेपोलियननें सर्वांस पूर्वींच्या गुन्ह्यांची माफी करून परत येण्याची परवानगी दिली. हे लोक परत आले तरी त्यांस गडबड न करूं देण्याचें काम डिरेक्टरीस अशक्य झालें होतें तरी आपणास तें झेंपेल अशी नेपोलियनची खात्री होती. यांतील प्रमुख लोकांस त्यानें सेनेटखेरीज इतर तीन सभांत सभासद नेमून टाकलें. या जागा भरपूर वेतनाच्या असल्यामुळें, व नेपोलियनचें स्वतःचें सामर्थ्यही विशेष असल्यामुळें, त्या लोकांनीं डिरेक्टरीप्रमाणें नेपोलियन यास उपद्रव दिला नाहीं. टॅलेरँड व फौचेसारख्या पिशाचतुल्य गणलेल्या भयंकर व घातकी प्रतिपक्षीयांस प्रधानकीच्या जागा देण्यासही तो कचरला नाहीं. त्यांस फ्रान्समध्यें मोकळें सोडणें तर धोक्याचेंच होतें. परंतु राज्यकारभारांत घेतल्यावरही ते गडबड करूं लागल्यास त्यांचें नियमन करण्यास आपल्या आंगीं अवश्य तें वेताळाचें सामर्थ्य आहे, असें नेपोलियन यास वाटलें. हे लोक नेपोलियनच्या अमलाखालीं निमूटपणें आपापलीं कामें करीत असत. पुढें नेपोलियनचा युरोपांत पराभव होऊं लागल्यावर ते उच्छृंखळ झाले ही गोष्ट निराळी. *

याप्रमाणें फ्रान्समधील पक्षभेद नाहींसे करून सर्व पक्षाच्या संमतीनें व सलोख्यानें राज्यकारभार होण्याच्या व्यवस्थेस प्रारंभ केल्यावर नेपोलियन इतर गोष्टींकडे वळला. राज्यक्रांतीचे काळीं फ्रान्समध्यें ला व्हेंडी वगैरे प्रांतांतून

---

* नेपोलियन यास त्याचा खून करण्याच्या यत्नांतही कोणी विशेष धाडस प्रकट केलें असतां त्याविषयीं आदर वाटे, व जुळल्यास त्या मनुष्यास आपल्या पदरीं ठेवून चांगल्या मार्गास लावण्याचा तो यत्न करीत असे. कॅडूडाल हा राजपक्षीय फ्रेंचमन व स्टॅप्स हा ऑस्ट्रियन यांस फांशीं देण्यापूर्वी त्यानें असा यत्न करून पाहिला होता. परंतु त्यांची वृत्ति पालटण्याचें मुळींच चिन्ह न दिसल्यामुळें त्यांचेवर शिक्षेची अंमलबजावणी झाली.

कांहीं कारणावरून यादवी युद्धें सुरू असून भयंकर प्राणहानि चालली होती. नेपोलियननें तेथील पुढाऱ्यांस बोलावून आणून साम व दंड यांच्या प्रयोगानें हीं युद्धें ताबडतोब बंद पाडलीं. या काळीं दरवडेखोरांचा तर सर्व देशभर भयंकर सुळसुळाट झाला होता. त्यांच्या चौकशीकरितां त्यानें स्पेशल कोर्टें स्थापन करून झटपट चौकशीच्या प्रयोगानें त्यांचा नायनाट करून टाकला. फ्रेंच सरकारास कर्ज झालें होतें तेंही त्यानें काटकसरीनें फेडून टाकलें.

राज्यक्रांतीच्या काळच्या तरुण पिढीप्रमाणें नेपोलियन प्रथम कट्टा लोकसत्तावादी होता. परंतु लुईच्या घरावर हल्ला करून पॅरिसच्या लोकांनीं त्याची जी अप्रतिष्ठा केली ती रस्त्यावरून पाहिल्यापासून नेपोलियनचें मत बदलत चाललें. पुढील अत्याचार पाहून तर त्यास फ्रेंच लोक पूर्ण स्वातंत्र्यास पात्र नाहींत असें वाटूं लागलें. त्या वेळीं फ्रेंच लोकांत स्वातंत्र्य व समता हे दोन राष्ट्रीय बाण्याचे शब्द होऊन राहिले होते. परंतु फ्रेंच लोक स्वातंत्र्यास नालायक आहेत असें त्याला वाटत असे, व ते लायख असले तरी फ्रेंच लोकसत्तापद्धतीस हाणून पाडण्यास सर्व राष्ट्रांनीं कंबर बांधली आहे तोंपर्यंत त्यांना टक्कर देतां येण्यास एका व्यक्तींत अनियंत्रित सत्ता अवश्य आहे असें त्यास वाटलें, व परचक्राची भीति केव्हांही नाहींशी न झाल्यामुळें त्यानें आपल्या हातांतील अनियंत्रित सत्ता केव्हांही सोडली नाहीं. समतेच्या बाबतींत मात्र फ्रेंच लोकांची इच्छा सफळ करतां येईल असें त्यास वाटलें. राज्यक्रांतीपूर्वी सरदारवर्गास सर्व करांची माफी व सर्व वरिष्ठ जागा व्यापण्याचा हक्क असे. यानें सामान्य लोकांस होत असलेला अन्याय नेपोलियननें सरदारांचे विशेष हक्क रद्द करून दूर केला. याप्रमाणें राज्यक्रांति करणारांनीं केलेल्या फेरफारांपैकीं त्याच्या मतें इष्ट तेवढें कायम ठेवून अनिष्ट तेवढें काढून टाकण्याचें नेपोलियननें धोरण ठेवलें.

त्यानें लोकमताचा राज्यकारभारावरील दाब कमी केल्याबद्दल कट्टे लोकसत्ताभक्त मनांतून नाखुष होते. परंतु त्याच्या एका कृत्यामुळें फ्रान्समधील स्वातंत्र्याप्रमाणें समतेचाही लय होणार असें कांहीं लोक म्हणूं लागले. नेपोलियननें एक 'लीजन–ऑफ–ऑनर' ची संस्था काढली; व तींत जे लोक कोणताही गुण विशेषपणें प्रकट करतील त्यांस घ्यावयाचें असें ठरविलें. या लोकांस अंगावर धारण करण्याचें एक साधें भूषणाचिन्ह असून आपल्या मानाप्रमाणें

राहणी ठेवतां यावी म्हणून अडीचशेंपासून पांच हजार फ्रांकपर्यंत नेमणूक करून दिलेली असे. परंतु कांहीं पक्षाच्या पुढाऱ्यांस हें पसंत पडलें नाहीं. ते म्हणूं लागले कीं, पूर्वी जसा सरदारांचा एक श्रेष्ठ वर्ग होता तसा आतां ' लीजन–ऑफ–ऑनर 'चा वर्ग अस्तित्वांत येऊन समाजांत पुनः विषमता, सुरू होणार. राज्यक्रांतीच्या भक्तांस हरएक प्रकारच्या पदवीची चीड असे. त्यांस उच्चनीचभाव बिलकुल खपत नसून, त्यांनीं सर्वांचा दर्जा सारखा असें दर्शविण्याकरितां, निरनिराळ्या दर्जाच्या लोकांच्या नांवापूर्वी लावण्याचीं रावसाहेब, श्रीमंत, महाराज वगैरे अर्थाचीं औपचारिक पदें रद्द करून सर्वांस ' नागरिक ' या अर्थाचें ' सिटोयेन ' हें एकच पद लावण्याचा प्रघात पाडला होता. परंतु नेपोलियन म्हणाला कीं, ' कोणांत कांहींही गुण असला तरी त्यास इतरांप्रमाणें लेखावयाचें या समतेच्या कल्पनेंत कांहींच अर्थ नाहीं. यायोगानें कोणासही आपले गुण प्रकट करण्यास झटण्याची उत्कंठा रहात नाहीं. शिवाय पूर्वीच्या सरदारांप्रमाणें हा पिढीजाद वरिष्ठ वर्ग होत नाहीं. ' लीजन–ऑफ–ऑनर ' मध्यें कोणासही वंशपरंपरा घेतलें जाणार नसून तो मान त्या त्या व्यक्तीच्या आयुष्यापुरताच आहे. फ्रेंच तत्त्वज्ञांनीं आपल्या-इतकीच सामान्य लोकांच्या मनाची संस्कृति असते असें समजणें चुकीचें आहे. परराष्ट्रांतील अमीरउमराव पॅरिसमध्यें आले म्हणजे येथील लोक त्यांच्या दर्जाचे विशिष्ट पोषाख व भूषणचिन्हें यांकडे किती उत्सुकतेनें पहात राहतात तें या तत्त्वज्ञांनीं लक्षांत घ्यावें. इतर देशांत गुणवानांस पदव्या देण्याची चाल आहे व तिचा अनिष्ट परिणाम होत असल्याचा बोभाटा नाहीं. तेव्हां फ्रान्सनें पदव्यांच्या प्रश्नांबद्दल डोक्यांत इतकी राख घालून घेण्यास कां तयार व्हावें, तें मला समजत नाहीं. व्यक्तींनीं काय किंवा राष्ट्रांनीं काय, निष्कारण लोक-विलक्षण वर्तन करणें शहाणपणाचें नाहीं. आपल्या मर्दुमकीचा किताबानें गौरव केला जाईल अशी शिपायांची समजूत असली म्हणजे लष्करांत एका किताबाची किंमत दहा हजार सैन्याइतकी होते. शास्त्रें व कला यांच्या अभिवृद्धीसही अशा बहुमानाची बरीच किंमत आहे. ' . .

फ्रान्समध्यें पूर्वी असलेल्या बहुतेक शिक्षणसंस्था राज्यक्रांतीचे काळीं अनेक कारणांनीं बंद पडल्या होत्या. डिरेक्टरीच्या अमदानींत तरुण पिढीच्या शिक्षणाकरितां सोय करण्याची थोडी खटपट झाली. परंतु द्रव्याच्या अभावीं

म्हणण्यासारखी काहीं व्यवस्था झाली नव्हती. बऱ्याच अंशीं सरकारी खर्चानें चालणाऱ्या प्राथमिक शाळा होत्या त्यांची संख्या नेपोलियननें पुष्कळ वाढविली. दुय्यम प्रतीच्या शिक्षणाकरितां ज्या शाळा होत्या त्यांत केवळ शास्त्रीय विषयांचें शिक्षण देण्यांत येत असे. कारण क्रांतिकारकांस प्राचीन मृत भाषांचें ज्ञान निरुपयोगी वाटत असे. नेपोलियन यास स्वतः भौतिक शास्त्रांची फार आवड होती; परंतु केवळ त्यांच्याच अध्ययनानें ग्रीक अगर रोमन वाङ्मयाच्या परिचयाशिवाय विद्यार्थी शीलवान्, सदाचारी व उदात्त–विचार–संपन्न असे निपजणार नाहींत असें त्यास वाटत असल्यामुळें त्यानें आपल्या स्वतःच्या कल्पनेप्रमाणें तरुण पिढीस शिक्षण मिळण्याकरितां तीस नव्या दुय्यम शाळा स्थापन केल्या. त्यांत प्राचीन भाषा, गणित, इतिहास व कोणत्याही धंद्याच्या अभ्यासाला प्रारंभ करण्यास जेवढ्यांचें ज्ञान अवश्य असतें तीं भौतिक शास्त्रांचीं मूलतत्त्वें, इतकें शिकविलें जाई. कायदा, वैद्यक, शिल्प वगैरेंचा विशेष अभ्यास करणारांकरितां स्वतंत्र संस्था काढण्यांत आल्या होत्या. दुय्यम शाळांतील विद्यार्थ्यांस बोर्डिंगांत रहावें लागे. पालकांस सरकारी शाळांतच मुलें पाठवावींशीं वाटावीं म्हणून सर्व शाळांत मिळून नेपोलियननें एकंदर पन्नास लक्ष फ्रांकच्या साडेसहा हजार स्कॉलर्शिपा ठेविल्या होत्या, व विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकरितां व आचरणावरील देखरेखीकरितां विद्वत्तेनें व शीलानें श्रेष्ठ असेच शिक्षक नेमण्याची त्यानें खबरदारी ठेविली होती. येथें धर्मशिक्षणाकरितां पाद्रीही असत. खेरीज, फ्रान्सच्या त्या काळच्या आवश्यकतेकडे लक्ष देऊन नेपोलियननें या दुय्यम शाळांत लष्करी शिक्षणही सक्तीचें केलें होतें. ज्यांचीं वयें एकवीसपासून पंचवीस वर्षांपर्यंत असतील अशा सर्व लोकांच्या नांवांच्या याद्या सरकारांत तयार असत. प्रसंगीं कायमचें सैन्य युद्धास अपुरें वाटल्यास प्रथम २५ वर्षांचे लोक बोलावण्यांत येत. हे सर्व लष्करी शिक्षण मिळालेले असल्यामुळें रणक्षेत्राकडे लागलीच नेले जात. यांची संख्या साठपासून ऐंशी हजारपर्यंत भरे. इतकेही शिपाई कमी वाटल्यास पुढें २४ वर्षें वयाचे, व त्यापुढें २३ वर्षें वयाचे, याप्रमाणें कमी कमी वयाचे लोक बोलावण्यांत येत. बोलावलेल्या मनुष्यास, तो राव असो अगर रंक असो, नाहीं म्हणण्याचा अधिकार कायद्यानें ठेवला नव्हता. अशा प्रकारें सैन्य जमा करण्याच्या पद्धतीस ‘ कान्स्क्रिपन् ’ असें म्हणतात. सामान्यतः लष्करांत शिपा-

यांची भरती हलक्या वर्गांतून होत असते. परंतु नेपोलियनच्या या पद्धतीमुळें लष्करांत मुख्य भरणा मध्यम स्थितींतल्या सुशिक्षित वर्गांतून होत असे. नेपोलियनच्या शिपायांत चाणाक्षपणा, तारतम्य, व नीतिमत्ता हे विशेष दिसण्याचें कारण सदर पद्धतीच होय, असें स्कॉटनें म्हटलें आहे.

याचप्रमाणें मुलींच्या शिक्षणाकरितांही त्यानें शाळा काढल्या. त्यांत मुलींस पुढें गृहिणीपणाचें काम चांगलें बजावतां येण्यास अवश्य तेवढेंच ज्ञान देण्याच्या धोरणानें अभ्यासक्रम ठेवला होता. स्त्रियांस विशेष शिक्षणाची आवश्यकता नाहीं. असें नेपोलियनचें मत होतें. राजकारणांत पडणाऱ्या स्त्रियांचा तर त्यास फारच राग येत असे. प्रसिद्ध राजकारणी फ्रेंच विदुषी मॅडेम डी स्टील हिनें एके प्रसंगीं विद्वत्समाज जमला असतां, नेपोलियन यास विचारलें कीं, ‘ येथें दिसत असलेल्या सर्व स्त्रियांत श्रेष्ठ कोण ? ’ नेपोलियननें ‘ तुह्मी ’ हें अपेक्षित उत्तर न देतां ह्मटलें कीं “ जिला सर्वांत जास्त मुलें झालीं असतील ती. ”

राज्यक्रांतीच्या पुढाऱ्यांनीं देवळें बंद करून प्रार्थना व इतर धर्मविधींस मनाई केली होती. त्या वेळचा प्रत्येक ठळक मनुष्य नास्तिक होता. नेपोलियनची लोकप्रियता व वजन इतकें मोठें होतें तरी तो ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल बोलूं लागला ह्मणजे सैन्यांतील किंवा इतर अधिकारी स्पष्टपणें त्याच्या तोंडावर विरुद्ध बोलत. तथापि धर्मभ्रष्टतेच्या पाठोपाठ नीतिभ्रष्टताही येते, असें त्याचें मत असल्यामुळें, व पुढाऱ्यांप्रमाणें लोकांत धर्मद्वेष पसरलेला त्यास न दिसल्यामुळें नेपोलियननें फर्स्ट कॉन्सल झाल्याबरोबर सर्व अडचणी दूर सारून धैर्यानें खिस्ती धर्माची पुनः स्थापना केली. यासंबंधानें त्यानें पोपबरोबर केलेल्या तहास कन्कॉरडॅट् असें ह्मणतात. या योगानें धर्माधिकाऱ्यांच्या नेमणुकींच्या वगैरे बाबतींत पोपची सत्ता मर्यादित झाली खरी; तथापि कोणीकडून निरीश्वरवादी फ्रान्स पुनः खिस्ती झालें, यामुळें पोपमहाराजांस फार आनंद झाला. धर्ममताचे बाबतींत त्यानें सर्वांस स्वातंत्र्य ठेविलें होतें. रोमन कॅथोलिक अगर प्रॉटेस्टंट वगैरे कोणच्याही शाखेचा अगर धर्माचा मनुष्य असला तरी तो राज्यांतील कोणत्याही अधिकारास नालायख मानण्यांत येत नसे. नेपोलियन यास ईश्वराचे अस्तित्वाबद्दल पूर्ण खात्री वाटत असून धर्मग्रंथांचे वाचनाचा त्यास फार नाद होता. त्यास जगांतील बहुतेक धर्म सारख्याच

योग्यतेचे वाटत असत. तथापि त्यास ख्रिस्तीधर्मापेक्षां मुसलमानी धर्म जास्त चांगला वाटत असे असें मानण्यास जागा आहे. बुर्बोन राजे नेपोलियननंतर पुनः गादीवर आले तेव्हां राजवाड्यांतील ग्रंथांत धर्मपुस्तकांचा विशेष भरणा पाहून त्यांस आश्चर्य वाटलें. जन्मापासून सर्व काळ नास्तिक वातावरणांत गेला असतांही धर्मसंबंधीं विविध प्रकारचे विचार नेपोलियनच्या मनांत वरचे-वर डोकावत. सृष्टीचे सर्व व्यापार व्यवस्थितपणें चाललेले पाहून त्यांस कोणी नियंता नसावा असें समजणें त्याच्या मतें अशक्य होतें. अदृश्यत्वामुळें ईश्वराचें अस्तित्व नाकबूल करणाऱ्या एका गृहस्थास तो म्हणाला, " तुह्मी एखाद्याच्या बुद्धीच्या प्रभावाचें वर्णन करितां, परंतु ती बुद्धि तर तुम्हांस दाखवितां येत नाहीं. यावरून अव्यक्ताचें कार्यसामर्थ्य तुम्हांस मान्य असलें पाहिजे. " या जगन्नियन्त्याच्या सूत्राप्रमाणें सर्व गोष्टी प्राङ्निश्चित काळीं व स्थळीं घडत असून त्यांत आगेमागें कांहीं होत नाहीं असें त्याचें मत होतें. एके प्रसंगीं एक मनुष्य त्यास एका साहसाच्या कृत्यापासून परावृत्त करीत असतां तो म्हणाला, " मनुष्यास ईश्वरनिश्चित काळाच्या एक क्षणही पूर्वीं अगर नंतर मृत्यु येत नाहीं. मनुष्यानें मृत्यूच्या भीतीनें आवश्यक साहसापासून मागें सरण्याचें कारण नाहीं. कारण, मरण येण्यास तोफांचे गोळेच अवश्य आहेत असें नाहीं. दोन दिवसांचा ताप अगर एक वेळ ठेंचकळून पडल्याचें निमित्तही मृत्यु येण्यास पुरेसें होतें असें आपण पाहतों. " एकदां एक ऑफिसर गोळा चुकविण्यास गडबडीनें भिंतीच्या आड झालेला पाहून त्यास नेपोलियन म्हणाला, " तो गोळा तुझा प्राण घेण्यासच जर सुटला असेल तर तूं सात हात खोल खळगा खणून दडलास तरी तेथेंही तो तुला हुडकून काढील. ह्मणून विनाकारण भित्रेपणानें आपलें काम सोडूं नको. " मनुष्यानें आपल्या बऱ्या-वाईट सर्व भोगांचा भोगूनच क्षय करावा, ( should live out his destiny ) ते चुकविण्याचा हलक्या मार्गानें यत्न करूं नये, असें त्याचें मत होतें. याच कारणासाठीं त्यानें आपला मित्र ड्यूरक हा आपल्या असाध्य जखमेची व्यथा सहन न झाल्यामुळें विष मागत असतां त्यास दिलें नाहीं. प्राङ्निश्चयवाद अगर दैववाद ( predestinarianism; fatalism ) हे मनुष्यास निष्क्रियता आणतात, अशा मतास नेपोलियनचें उदाहरण पुष्टि देत नाहीं.

पूर्वी फ्रान्समध्यें प्रत्येक जिल्ह्यास निराळे कायदे असल्यामुळें खटल्यांच्या निकालाचे बाबतींत घोंटाळा होत असे. राज्यक्रांतीचे वेळीं जिल्ह्यांच्या मर्यादा फिरविण्यांत आल्यामुळें या भानगडींत भर पडली. शिवाय तेव्हां स्थापित झालेल्या समतेच्या व स्वातंत्र्याच्या तत्त्वांच्या धोरणावरहुकूम बऱ्याच कायद्यांत फेरफार करण्यांत आल्यामुळें न्यायखात्याचे कामास ब्रह्मगोंधळाचें स्वरूप आलें होतें. हें पाहून नेपोलियननें सर्व फ्रान्सकरितां एक कायदा करण्याचें मनावर घेतलें. या कामांत त्यानें अत्यंत विख्यात कायदेपंडितांचें साह्य मिळविलें. कौन्सिलमध्यें यासंबंधीं आठ आठ तास वादविवाद चाले तरी तो बहुतेक प्रसंगीं हजर रहात असे. या चर्चेमध्यें नेपोलियननें प्रकट केलेलें कायद्यांच्या तत्त्वांचें पूर्ण ज्ञान व त्याचे नवीन व मार्मिक विचार पाहून कायदेपंडित चकित झाले. ही गोष्ट आज केवळ दंतकथा मानण्यांत आली असती, परंतु सुदैवानें सर्वांच्या भाषणांचे अक्षरशः रिपोर्ट घेण्यांत आले आहेत. ते वाचून नेपोलियनचें कायद्यासंबंधीं ज्ञान, व त्याची व्यापक व सर्वगामी बुद्धिमत्ता यांचें अर्वाचीन मुत्सद्यांस आश्चर्य वाटत आहे. ह्या कौन्सिलांत ट्रान्शेट नांवाचा एक अत्यंत विद्वान् सभासद् होता. परंतु त्यास आपलें म्हणणें चांगल्या रीतीनें मांडण्याची हतोटी नसल्यामुळें त्याच्या सूचना कौन्सिलमध्यें अमान्य होत. परंतु तो कसाही बोलला तरी नेपोलियन त्याच्या भाषणांतील मुद्याचें तेव्हांच ग्रहण करीत असे, व त्याचाच मुद्दा विशद व जोरदार रीतीनें मांडून त्यांतील रहस्य तो सभासदांच्या लक्षांत आणीत असे.* या कायद्यांस फ्रेंच

* Free discussion in that assembly gave him the highest gratification; he provoked it, sustained it and shared in it. He spoke without preparation, without embarrassment, without pretensions in the style rather of free and animated conversation than of a premeditated or laboured harangue. He appeared inferior to no member of the council, often equal to the ablest of them, in the readiness with which he caught the point at issue, and the logical force with which he supported his opinions, and not unfrequently superior to any in the originality and vigour of his expressions. The varied powers and prodigious capacity of Napoleon's mind nowhere ap-

(पुढें चालू.

लोकांनीं 'कोड नेपोलियन' असें नांव दिलें. प्रेसिडेंट थिअर्स म्हणतात, "सोल्जर व ऑफिसर यांचें साह्य नेपोलियन यास नसतें तर त्यास ज्याप्रमाणें लढाया जिंकतां आल्या नसत्या त्याचप्रमाणें कायदेपंडितांचें साह्य नसतें तर त्यास हे दिवाणी कायदे करतां आले नसते. युद्धांत जी कामगिरी ऑफिसर करतात त्यापेक्षां जास्त या कामीं कायदेपंडितांनीं कांहीं केलें नाहीं. त्याचें सर्व श्रेय नेपोलियन यासच आहे." हे कायदे नेपोलियनच्या विरुद्ध लढलेल्या बऱ्याच देशांनीं जसेच्या तसे उचलले आहेत; व स्पेनपासून राशियापर्यंत सर्व देशाच्या कायद्यांत यांचे धोरणानें दुरुस्ती झाली आहे. यापेक्षां या दिवाणी कायद्यांच्या उत्कृष्टपणाची चांगली साक्ष मिळणें शक्य नाहीं असें समजलें जातें. यानंतर नेपोलियननें लवकरच पीनल कोड, सिव्हिल प्रोसीजर कोड, क्रिमिनल प्रोसिजर कोड, कमर्शियल कोड हीं तयार करून हातीं घेतलेल्या कार्याची पूर्तता केली.

नेपोलियननें आपल्या युद्धमय कारकीर्दींत लोकोपयुक्त कृत्यांकडे दुर्लक्ष केलेलें दिसत नाहीं. त्याच्या अंमलांतील फ्रान्स व इटाली हे देश आल्प्ससारख्या दुर्लंघ्य पर्वतामुळें एकमेकापासून तुटलेले पाहून ते जोडण्याकरितां त्यानें सिम्प्लन, सेनिस, जेनेव्हर या तीन शिखरांवरून तीन रस्ते बांधले. हे

---

( मागील पृष्ठावरून समाप्त. )

peared in such brilliant colours as on those occasions and would hardly appear credible if authentic evidence on the subject did not exist in the *procés-verbaux* of those memorable discussions. Bertrand de Melville, formerly minister to Louis XVI, a man of no ordinary capacity, said in reference to those discussions, "Napoleon was certainly an extraordinary man; we were very far, indeed, from appreciating him on the other side of the water. From the moment that I looked into the discussions on the Civil Code I conceived the most profound admiration for his capacity. It is utterly inconceivable where he acquired so much information on these subjects.

—*Alison.*

इतके रुंद आहेत कीं त्यावरून तोफांसहित मोठें सैन्य सहज एका देशांतून दुसऱ्यांत जाऊं शकतें. परंतु सामान्य प्रवाशाचे नुसते चांगले रस्ते असल्यानें भागत नाहीं: करितां त्यास ठिकठिकाणीं मुक्काम करतां यावा म्हणून नेपोलियननें या रस्त्यावर गांवें वसविलीं. त्यानें सहा कोट फ्रांक खर्च करून आपल्या राज्यांत एकंदर चाळीस हजार मैल लांबीच्या सडका बांधल्या अगर दुरुस्त केल्या. जास्त जमीन लागवडींत येण्याकरितां त्यानें बारा कोट फ्रांक खर्चून दोन प्रचंड व सात आठ साधारण मोठ्यांपैकीं असे कालवे काढले. सर्व मोठमोठ्या नद्या एकमेकांस जोडणाऱ्या या कालव्यांचें सबंध फ्रान्सभर एक जाळेंच झालें आहे. त्यायोगानें लहानसहान व्यापारी गलबतांस फ्रान्सला वळसा घातल्याशिवाय उत्तरेकडून दक्षिकडे जातां येत असल्यामुळें व्यापाराची बरीच सोय झाली आहे. किल्ले बांधण्यांत व किनाऱ्याची आणि बंदरांची तटबंदी करण्यांत त्यानें सत्तावीस कोट फ्रांकचा खर्च केला. अँटवर्प वगैरे बंदरांतील भव्य व मजबूत काम पाहून प्रवासी अद्याप थक्क होतात. त्यानें बांधलेल्या पुलांपैकीं चौदा, युरोपांतील अत्यंत भव्य व सुंदर पुलांत गणले जातात. उपयुक्त कार्यांखेरीज केवळ पॅरिस वगैरे शहरांस शोभा आणण्याकरितां भव्य इमारती, विस्तीर्ण बागबगीचे, सुंदर कारंजीं, रम्य विहारगृहें वगैरेकडेही त्यानें मोठमोठ्या रकमा लावल्या आहेत. जगांतील सुंदर व प्रेक्षणीय शहरांत पॅरिसला आग्रस्थान देण्याचें सर्व श्रेय नेपोलियन यासच आहे. ॲबॉट म्हणतो, " नेपोलियनमध्यें तत्त्वज्ञाची उपयुक्तता व कवीची सौंदर्याभिरुचि यांचा उत्कृष्ट मिलाफ झालेला होता. जो सूर्य वनस्पतींचें पोषण करून धान्य पिकवितो तोच गुलाबासारख्या फुलांस नयनमनोहर अशी कांतिही देतो. "

या सर्व कृत्यांत नेपोलियनचे हातून एकंदर शंभर कोटि फ्रांक खर्च झाले. एक मुत्सद्दी म्हणतो कीं, " सोळाव्या लुईच्या वेळचा एखादा मनुष्य स्वर्गांतून खालीं उतरला तर इतक्या नव्या सडका, कालवे, इमारती, सरहद्दीवरील व किनाऱ्यावरील तटबंदीचें काम वगैरे पाहून ' येवढें स्थित्यंतर होण्यास फ्रान्सला किती शांततेचीं शतकें लाभलीं, व त्या कामीं किती राजे व मुत्सद्दी खपले ? ' असें तो विचारल्यावांचून राहणार नाहीं. त्याच्या पहिल्या प्रश्नाचें उत्तर ' अखंड घोर युद्धाचीं बारा वर्षें ', व दुसऱ्या प्रश्नाचें उत्तर ' एक मनुष्य ', असें समजल्यावर त्यास किती विस्मय वाटेल, त्याची कल्पनाच

करावी. " हीं कामें चालू असतां नेपोलियन तेथें वरचेवर जाऊन बारकाईनें पाही, व इंजिनिअरांस बिकट प्रसंगीं तोड सुचवीत असे. लँग्वॅडॉक कॅनालच्या पुलावर कांहीं काम बांधण्यांत एंजिनिअरिंगसंबंधीं कांहीं अपूर्व अडचणी येणार होत्या, हें नेपोलियन यास माहीत होतें. तें उत्तम प्रकारें पार पडलेलें पाहून त्यास संतोष झाला; व निरनिराळ्या अडचणींतून सुटण्यास काय युक्त्या योजिल्या तें कळावें म्हणून तो तेथील एंजिनिअरास प्रश्न करूं लागला. परंतु उत्तरें समाधानकारक न मिळाल्यावरून नेपोलियननें ताडलें कीं हें काम या मनुष्यानें बांधलेलेंच नसावें, त्यास हाताखालीं कोणी हुषार मनुष्य मिळाला असावा. तपास करून त्यानें तो मनुष्य हुडकून काढला; व त्याचीं उत्तरें बरोबर आल्यावरून नेपोलियननें त्यास चीफ एंजिनिअर नेमून पॅरिस येथें नेलें.

युद्धांचा खर्च संभाळून व १८१३ आणि १८१४ सालांखेरीज केव्हांही जबर कर बसविल्यावांचून नेपोलियन यास अशा कामाकडे इतका पैसा लावितां आला ही आश्चर्याची गोष्ट आहे, असें ॲलिसन ह्मणतो. नेपोलियनच्या विरुद्ध लढणाऱ्यांपैकीं फक्त इंग्लंड देशासच युद्धांचे पायीं या अवधींत ६० कोटि पौंड कर्ज झालें. इतर राष्ट्रांसही बरींच कर्जें झालीं. परंतु नेपोलियन यास अखेरपर्यंत पैचेंही कर्ज झालें नाहीं. इंग्लंडचे कांहीं वर्षें मुख्य प्रधान असलेले लॉर्ड रोजबरी यांस हें कोडें वाटत असून त्यांची मति गुंग झाली आहे. ते म्हणतात, ' त्यास आपलें विस्तीर्ण साम्राज्य बिलकुल कर्ज न करितां इतकें बलिष्ठ व ऐश्वर्ययुक्त कसें राखतां आलें, हें एक आश्चर्यकारक गूढ आहे.' नेपोलियनचें अपूर्व फडनिशी कौशल्य, व राज्याच्या जमाखर्चाच्या किरकोळ बाबतींवरही त्याची प्रत्यक्ष सक्त नजर, यांमुळें अधिकाऱ्यांस पैसे खाण्यास अगर उधळपट्टी करण्यास सवड मिळाली नाहीं. त्यानें पहिल्याच वर्षीं वीस लक्ष फ्रांकची अफरातफर उघडकीस आणल्यामुळें अधिकाऱ्यांवर चांगला वचक बसला. पुढेंही केव्हां असा प्रयत्न झाल्यास तो आपल्या असामान्य दक्षतेमुळें चवाठ्यावर आणिल्याखेरीज व त्याबद्दल योग्य त्या मनुष्यास शासन केल्याखेरीज रहात नसे. त्यामुळें त्या काळच्या फ्रेंच साम्राज्याचा हिशोब सामान्य व्यापाऱ्याच्या घरच्या हिशोबापेक्षांही चोख असे असें रोजबरी म्हणतो. एके दिवशीं जमाखर्चाचा कागद पहात असतां नेपोलियन यास एका पलटणीचा

खच बॅनॅस्कॉन गांवावर मांडलेला दिसला. तेव्हां तो म्हणाला, " ही चूक आहे. ही पलटण त्या वेळीं बॅनॅस्कॉन गांवीं नव्हती. " हा ज्या काळचा खर्च होता त्या काळीं नेपोलियन फ्रान्समध्यें नसून रशियांतील लढाईत गुंतला असल्याचें आठवून फ्रेंच फडणीस तो हिशोब बरोबर आहे असें म्हणूं लागला. परंतु चौकशीअंतीं ही लबाडी होती असें ठरलें. ज्या कारकुनाची ही हातचलाखी होती त्यास कामावरून दूर करण्यांत आलें, व ही गोष्ट सर्व साम्राज्यांत पसरून त्यांतील अप्रामाणिक कारकुनांस तिचेपासून इशारत पोंचली.*

नेपोलियन केवळ फडणिशी खात्याचाच कारभार पहात असे असें नाहीं. इतर सर्व खात्यांच्या किरकोळ बाबतींपर्यंतही कारभार तो स्वतः पहात असे. प्रेसिडेंट थिअर्सनें नेपोलियनच्या प्रधानांस त्याचे कारकून म्हटलें आहे. रोजबरी म्हणतोः—" राज्यकारभाराच्या दृष्टीनेंही त्याची योग्यता फार मोठी आहे. त्याच्या प्रचंड साम्राज्ययंत्राचें लहानमोठें प्रत्येक चाक व प्रत्येक कळ त्यानें स्वतःच्या ताब्यांत ठेवली होती. हा विस्तीर्ण राज्यशकट त्यास केवळ एखाद्या हातांतील खेळण्याप्रमाणें वाटत असे. त्याच्या युद्धखात्यांतील प्रधान-मंडळ म्हणजे तोच, परराष्ट्रीय कारस्थानांचें खातें, आरमारखातें, व इतर हर-एक प्रकारचें खातें यांकडील प्रधानमंडळ म्हणजे स्वतः तोच, अशी स्थिति होती. राज्याच्या प्रत्येक खात्यासंबंधीं त्यास यच्चयावत् माहिती असे, कार-भारांतील सर्व प्रकरणें तोच चालवीत असे, सर्व कार्यांत स्फूर्ति त्याचेचकडून

---

* Indeed his powers of application and memory seemed almost supernatural. There was scarcely a man in France of any note with whose private history and qualifications he was not acquainted... So retentive was his memory that sums over which he glanced his eye were never effaced from his mind. He recollected the respective produce of all taxes through every year of his administration. His detection of errors in account appeared so marvellous as to create a general persuasion that his vigilance was almost supernatural.

—*Abbott*.

मिळे. शिवाय त्याच्या विलक्षण स्मरणशक्तीमुळें राज्ययंत्राचे सर्व भाग, सर्व किरकोळ बाबती व सर्व लोक हे त्याच्या ध्यानांत असत. ”

इ. स. १७९९ चे अखेरीस नेपोलियनच्या हातीं फ्रान्सचें राज्य पडलें तेव्हां त्यास लढाई कशी करावी यापेक्षां कांहीं जास्त माहिती नव्हती. राज्यकारभाराचें त्यास मुळींच ज्ञान नव्हतें. ‘ वॉर ऑफिस ’ मध्यें काय काम केलें जातें याचीही त्यास कल्पना नव्हती. परंतु साध्या साध्या गोष्टींबद्दल प्रधानांस विचारून-त्यांचेकडून प्रसंगीं हंसून घेण्याचीही त्यास लाज वाटत नसे. असे प्रश्न विचारून व निरनिराळ्या खात्यांतील कागदपत्र पाहून त्यानें आपल्या अचाट आकलनशक्तीनें अखेरीस सर्व राज्यकारभाराची माहिती कशी करून घेतली, व आपल्या प्रधानांवर ताण करून त्यांस केवळ सांगितलेलें काम करणारे कारकून कसे बनविले त्यासंबंधीं रोजवरी पुढील गोष्ट सांगतोः—“ ईलॉच्या मोहिमेंत एके दिवशीं डारू नांवाच्या प्रधानानें पत्रें वाचण्याकरितां बादशहाजवळ रजा मागितली. तेव्हां नेपोलियन तिरस्कारानें म्हणाला. ‘ या देशांत येथील पिकांवर निर्वाह करीत एखाद्या अरबी छावणींतील लोकांप्रमाणें आपण चाल करीत असतां येथें पत्रें वगैरे कसलीं पहावयाचीं असणार ? ’ डारू म्हणाला ‘ ठीक आहे. आणून दाखवितों. ’ थोड्याच वेळांत पत्रांच्या गठ्यांचे भारे घेतलेल्या पांच सात चिटणिसांसह तो परत आला. नेपोलियननें त्यांपैकीं कोठलें तरी एक पत्र उसपलें व उघडून वाचलें. त्यामध्यें मेयन्स येथील इस्पितळाकरितां शंभर पिचकाऱ्यांची मागणी केली होती. नेपोलियननें विचारलें ‘ मेयन्सच्या इस्पितळांकरितां पिचकाऱ्या तुम्हांस पुरवाव्या लागतात काय ! ’ डारू म्हणाला ‘ होय, त्याबद्दलचा खर्च सरकाराकडून होत असतो. ’ नेपोलियननें तेथेंच चार तासपर्यंत बसून सर्व पत्रें उघडून वाचलीं. पुढें लागोपाठ आठ दिवस त्यानें हेंच काम केलें. नंतर तो म्हणाला, ‘ लष्कराची अंतस्थ व्यवस्था कशी ठेवण्यांत येते तें मला आतां प्रथम संमजत आहे. ’ टिल्सिटच्या तहानंतर पॅरिसला परत आल्यावर त्यानें इतर प्रधानांचे याचप्रमाणें कागद पाहिले. या कामास त्याला फक्त सहा आठवडे लागले. त्यानंतर त्यानें या सर्व प्रधानांचे हाताखालील अधिकाऱ्यांचेही याचप्रमाणें कागद पाहून टाकले. विस्तीर्ण राज्यकारभाराची किरकोळ बाबतीपर्यंत नेपोलियननें केलेली ही सूक्ष्म व लक्षपूर्वक तपासणी, व सर्व माहितीचें

त्यानें परिश्रमपूर्वक परंतु अत्यंत त्वरित केलेलें ग्रहण येवढ्यांचाच विचार केला असतां त्यांत व्यक्त झालेलें सामर्थ्य किती प्रचंड आहे!"

याप्रमाणें सर्व खात्यांच्या कामांत किरकोळ बाबींपर्यंतही लक्ष घातल्यामुळें नेपोलियन यास सडका, कालवे, ड्रेनेज, सॅनिटेशन वगैरेसंबंधीं योजना निश्चित करण्यास किती थोडा वेळ मिळत असे, परंतु तेवढ्या वेळांतही तो किती काम उरकत असे यासंबंधीं स्कॉटनें ह्मटलें आहे:-नेपोलियनची उद्योगप्रियता, व लष्करी अगर बिनलष्करी एंजिनिअरिंगसंबंधीं प्रश्न एकवार दृष्टि फेंकतांच सोडविण्याचें सामर्थ्य, यांचा फ्रान्समधील प्रजेस आश्चर्यानें थक्क करण्याकडे बराच उपयोग होत असे. त्याच्या कारकीर्दीत शांततेचे जे थोडे दिवस जात त्यामध्यें उद्योगशून्यतेची स्थिति सहन न होऊन तो निरनिराळे जिल्हे तपासण्यास निघत असे. अशा प्रसंगीं जोसेफाइन राणी त्याचेबरोबर असे तरी तो इतक्या वेगानें प्रवास करी कीं त्यासंबंधीं कोणास सांगितलें असतां खरेंही वाटणार नाहीं. एखाद्या महत्वाच्या गांवानजीक दाखल होतांच तो गाडींतून उतरून घोड्यावर बसे, व गांवामधून व गांवाभोंवतीं इतक्या त्वरेनें फेरफटका करी कीं त्याच्या एडिक्यांपास त्यास दृष्टिपथांत ठेवणेंही दुर्घट होत असे. अशा सपाट्यानें जात असतांच तो त्या गांवांत गैरसोयी कोणत्या आहेत व सुधारणा कोणत्या होण्यासारख्या आहेत तें लक्षांत घेऊन लागलीच म्युनिसिपल अधिकाऱ्यांस बोलावणें पाठवी. ज्या गांवांत त्या अधिकाऱ्यांचा जन्म गेलेला त्या गांवची कांहीं मिनिटांत बादशहानें इतकी बारीक माहिती मिळविलेली त्यांना दिसून येई कीं कांहीं प्रश्नांचें उत्तर देतांना त्यांची धांदल उडत असे. या अधिकाऱ्यांच्या मागणीवरून अगर खुद्द बादशहाच्या सूचनेवरून कांहीं सार्वजानक बांधकाम वगैरे करण्याचें ठरून ती माहिती मॉनिटर पत्रांत प्रसिद्ध केली जात असे.

कित्येक युद्धांचे वेळीं नेपोलियनला लढाईस सुरुवात होण्यापूर्वी फक्त दहा पंधरा मिनिटें रणभूमीवर हजर होण्यास सवड मिळे. येवढ्या अवधींत आपल्या हुकमाप्रमाणें सेनापतींनीं सैन्याची मांडणी केली आहे किंवा नाहीं हें पाहणें त्यास भाग पडे. नेपोलियनला कांहीं वेळां आपल्या शिपायांच्या रांगांमधूनच भयंकर त्वरेनें घोडा फेंकीत कसें जावें लागे व त्यामुळें कित्येकांचे हातपाय

मोडण्यापर्यंतही कशी वेळ येत असे त्याचें ॲलिसननें याप्रमाणें वर्णन केलें आहे:—

" The imperial suite, like a whirlwind, swept through the columns too fast for the men either to fall into the ranks or to present arms, and before the astonished crowd could find time to gaze on their beloved chief, the corte'ge was disappearing in the distance. Room, however, was always cleared ; the outriders called out to make way, and at the magic words, 'The Emperor! The Emperor!' infantry, cavalry and artillery were pell-mell hurried to the side, often in frightful confusion or with fractures of legs and arms. "

जरूर पडल्यास तो झोंप बरेच दिवस लांबणीवर टाकूं शके. अर्कोला येथील लढाईचे प्रसंगीं त्यानें लागोपाठ सहा दिवसांत एक क्षणभरही झोंप घेतली नाहीं. युद्ध संपल्यानंतर त्यानें एकसारखी साठ सत्तर तास झोंप घेतल्यावर त्याचेवर पूर्वीच्या जाग्रणाचा परिणाम राहिला नाहीं.

शत्रुसेनेची गांठ पडली म्हणजे दिवसां युद्धें व रात्रीं युद्धाची तयारी असा त्याचा वेळ जात असे. रात्रीचे वेळीं अशी तयारी करीत असतां, प्रसंग विशेष आणीबाणीचा असल्यास, तो विस्तीर्ण युद्धक्षेत्रांतील आपल्या निरनिराळ्या पलटणींस हुकूम जासुदांकडून न पाठवितां स्वतः पोंचवीत असे. याकामीं शेंपाऊणशें मैलपर्यंत एकेका रात्रींत दौड पडत असे. अशा वेळीं तो स्वतः जवळ जवळ देहभानावर नसल्यामुळें त्यास थकवा येत नसे, परंतु घोडे धांवतां धांवतां मरून पडत. कांहीं प्रसंगीं बेसुमार वेगानें पिटाळल्यामुळें एकेका रात्रींत पांच पांच सहा सहा घोडे त्याचे मांडीखालीं ठार झाले आहेत.

तो केवळ अश्रात परिश्रम करूं शके इतकेंच नव्हे, तर काम उरकण्याची त्याची त्वराही भयंकर असे. युद्धक्षेत्राकडे अगर राज्यांतून तपासणी-प्रवासास जातांना तो गाडीवानानें कितीही वेग दिला तरी तृप्त होत नसे. चाकाच्या धांवा लाल होऊन गेल्या तरी तो वेग वाढविण्याबद्दल आंतून ओरडत असे, असें बुरीन सांगतो. तो लिहूं लागला म्हणजे इतक्या वेगानें कागदावरून पेन ओढीत जाई कीं, त्यायोगानें त्याचा लेख दुर्वाच्य होत असे.

आणि शिवाय वाक्यांतील शब्द व शब्दांतील वर्ण बरेच गळलेले असत.* यामुळें त्यानें मजकूर तोंडानें सांगितलेला बरा, त्याच्या लेखाची नक्कल करण्याचें नशिबीं येऊं नये असें कारकुनांस होत असे. तो तोंडानें मजकूर सांगूं लागला म्हणजे एकाच वेळीं चार लेखकांस निरनिराळ्या चार विषयांसंबंधीं मजकूर सांगे, असें ॲलिसन म्हणतो.

स्नान करते वेळीं तो बूरीन यास शेजारचे खोलींत बसवून सर्व फ्रेंच वर्तमानपत्रें व इतर देशांतील वर्तमानपत्रांतील लेखांचे सारांश मोठ्यानें वाचण्यास सांगे. फ्रेंच भाषेंत प्रसिद्ध होणारीं सर्व पुस्तकें तो फावल्या वेळीं वाचीत असे. युद्धानिमित्त अगर अन्य कारणास्तव प्रवास करणें झाल्यास तो गाडींत पांचशेंपासून हजारपर्यंत ग्रंथ घेऊन जात असे व उतरण्याचे ठिकाणास पोंचेपर्यंत बहुधा बरेच वाचून टाकी. वाचलेल्या पुस्तकावर आपलें मत व टीका मार्जिनवर लिहिण्याचा त्याचा प्रघात होता. ह्मणून रोजबरी यांनीं नेपोलियनचे सेंट हेलेना येथील ग्रंथ लिलांवानें विकून टाकल्याबद्दल त्या काळच्या ब्रिटिश सरकारास दूषण दिलें आहे. तेथें इंग्लिश सरकारनें नेपोलियनला एकंदर चौदाशें पौंडांचीं पुस्तकें वाचावयास दिलीं होतीं. या पुस्तकावरील नेपोलियननें स्वहस्तानें लिहिलेलें मत पाहण्याचा मार्ग नाहींसा झाला. फ्रेंच भाषेंतील नेपोलियनच्या विशेष आवडीचे असे तीन हजार ग्रंथ होते. ते पुनः पुनः वाचावे लागत म्हणून त्यानें स्वतःकरितां निराळे छापून काढण्याचा हुकूम दिला होता.

तो वक्ता व लेखक ह्मणूनही प्रसिद्ध आहे. त्याची भाषाशैली अत्यंत जोरदार व सरस असून त्याच्या वार्णीत अपूर्व ओज दिसून येतें, असें मोठमोठ्या

---

* हस्ताक्षराप्रमाणेंच घोड्यावर बसणें व निशाण मारणें या कला त्यास चांगल्या येत नसत. त्याचें घोड्यावर बसणें एखाद्या अडाणी शेतकऱ्याप्रमाणें असे. तो जात्या निर्भय असल्यामुळें घोडा वाटेल तसा पिटाळण्यास भीत नसे. परंतु कला अशा दृष्टीनें त्यास घोड्यावर बसणें ( horsemanship ) चांगलें येत नसे. त्याला घोड्यावर बसून हिंडतांना परदेशीय अनोळखी लोकांनीं पाहिलें ह्मणजे फ्रान्सचा अद्वितीय सेनापति तो हाच असें त्यांस कांहीं केल्या वाटत नसे. लढाईमध्यें त्याला स्वतः हातांत बंदुक घेण्याचें कारणच नव्हतें. परंतु तो केव्हां शिकारीस गेला तर माणसाळलेलीं खबुतरें अगर पाळीव ससे याखेरीज कोणीही त्याच्या बंदुकीच्या नेमांत सांपडत नसे. त्यास बुद्धिबळेंही चांगलीं खेळतां येत नसल्यामुळें लॅस कॅसेस सारख्या दरबारी लोकांशीं स्वतःवर बादशहाकडून मात करून घेण्यासाठीं चुकीचे डाव देतां देतां पुरे वाट होत असे.

नामांकित लेखकांचें मत आहे. कार्लाइल ह्मणतो. "नेपोलियनचे शब्द देखील त्याच्या आस्टर्लिझच्या लढाईसारखेंच आहेत." थिअर्स ह्मणतो, 'या अद्भुत मनुष्यामध्यें अनन्यसाधारण असा हा विशेष होता कीं, तो आपल्या काळच्या योद्धयांत ज्याप्रमाणें श्रेष्ठ, त्याचप्रमाणें कायदे करणारांमध्यें, राज्यकारभार करणारांमध्यें व लेखकांमध्येंही श्रेष्ठ होता.' लामार्टिन म्हणतो, 'त्यानें लिहिलेल्या प्रत्येक ओळीवर त्याच्या प्रचंड सामर्थ्याचा छाप आहे. त्यानें आपल्या युद्धांचीं लिहिलेलीं वर्णनें सीझरपेक्षां अनंत पटीनें सरस वठलीं आहेत. त्याचा शब्द म्हणजे त्याची प्रतिमाच आहे.' नेपोलियननें सेनेटपुढें केलेलीं भाषणें, त्यानें वेळोवेळीं प्रधानांस व सेनापतींस व परदेशांतील फ्रेंच वकिलांस वगैरे लिहिलेलीं पत्रें छापून प्रसिद्ध झालीं आहेत. त्यांचे बारीक टाइपांत बत्तीस खंड (व्हॉल्यूम्स) झाले आहेत. यांतील प्रत्येक पान नवीन व मार्मिक विचारांनीं भरलेलें असून भाषासरणीही अत्यंत सरस आहे, असें मोठमोठ्या ग्रंथकारांनीं अभिप्राय प्रकट केले आहेत. युरोपमधील सर्व देशांतून ग्रंथसंख्येच्या मोठेपणाबद्दल प्रसिद्ध असे चार लेखक निवडून काढून त्यांचे ग्रंथ एकत्र केले तरी त्यापेक्षां जास्त मजकूर नेपोलियनच्या लेखणींतून उतरला आहे.

नेपोलियनचें खाजगी संभाषणही अत्यंत मनोरंजक असे. रोजबेरी म्हणतो, 'नेपोलियनचें भाषण बेतवार, मोकळ्या मनाचें, प्रसंगीं निष्ठुर, परंतु सर्वदा मनोवेधक अशा प्रकारचें असे. त्यांतील चित्ताकर्षकतेचें रहस्य असें आहे कीं, तो चालू विषयावर आपलें सर्व मन तात्काळ एकाग्र करूं शके. त्यामुळें विवेचनांत आपल्या स्मरणांतील गोष्टी, इतिहासांतील समान प्रसंगाचे दाखले, स्वतःचा उपजत चाणाक्षपणा, मनुष्यजातीच्या स्वभावाचें सामान्य ज्ञान, व ज्यांशीं त्याचा संबंध आला असेल त्या व्यक्तींच्या स्वभावाचें विशेष ज्ञान या सर्वांचा उपयोग करून त्यास एका क्षणांत त्या विषयावर लख्ख प्रकाश पाडतां येत असे.' नेपोलियनच्या भाषासरणीबद्दलचे हे अभिप्राय कितपत योग्य आहेत तें ज्याचें त्यास पाहतां यावें येवढ्याच हेतूनें पृष्ठें १७, २८, ६५, ६८, ७८, १२२ व १२७ यांतील टीपा दिलेल्या आहेत.

त्या काळचें प्रमुख फ्रेंच दैनिक वर्तमानपत्र 'मॉनिटर' यांतील सर्व महत्वाचे अग्रलेख व स्फुटलेख खुद्द नेपोलियनच्या हातचे असत.

अशा तऱ्हेच्या अनेकविध कार्यांत सदा व्यापृत असल्यामुळें नेपोलियन यास युद्ध नसल्या वेळींही विश्रांति मिळत नसे. या गोष्टीचा उपयोग नेपोलियन आपल्यावर अशुद्ध खाजगी आचरणाचा आक्षेप करणारांस उत्तरें देण्याकडे करीत असे. त्या काळीं नेपोलियन यास प्रतिकूल असणाऱ्या युरोपियन वर्तमानपत्रांतून असा मजकूर प्रसिद्ध होत असे कीं, नेपोलियन यास हजारों उपस्त्रिया असून तो व त्याचे कुटुंबांतील सर्व माणसें अत्यंत हीन नीत्तिमत्तेचीं आहेत. अशा पत्रांतून आलेल्या स्वतःबद्दलच्या लांबलचक बीभत्स गोष्टी वाचून नेपोलियन म्हणे कीं, " अशा तऱ्हेचे, विलास करीत बसण्यास मला फुरसद केव्हां मिळते तें या लेखकांनीं दाखवून द्यावें. " तो स्वतःचें असें वर्णन करी कीं, " मला द्यूत अगर स्त्री यांची आवड नाहीं. मी सर्वांशीं राजकारणी प्राणी आहें."

एका विषयांत मन पूर्णपणें गढलें असतां तेथून तें एकदम काढून दुसऱ्या विषयांत तितक्याच तीव्रतेनें घालणें, हें नेपोलियन यास अशक्य वाटत नसे. त्याच्या चरित्रांत असे प्रसंग आढळतात कीं, दहा पंधरा दिवस रणांगणावर युद्धाचे श्रमांत गेले असतां, युद्ध आटपतांच राशिया वगैरेसारख्या दूरच्या देशांतून घोड्यावर बसून विसांवा न घेतां अत्यंत शीघ्र गतीनें पॅरिस येथें सैन्याच्या पूर्वींच येऊन पोंचावें, व राजवाड्याचा जिना चढतां चढतांच जमाबंदी, न्याय वगैरे खात्यांचे कागद तपासण्यास सुरुवात करावी, व तसेंच पुढें रात्रभर खपून आपल्या गैरहजिरीमुळें तुंबलेलें काम संपवून टाकावें. रणांगणावर लढाई ऐन रंगांत आलेल्या वेळीं पॅरिस येथून एखादा स्वार जोसेफाईनचें पत्र घेऊन आला असतां तो तें ताबडतोब वाचून आल्या मनुष्याबरोबर उत्तर रवाना करून पुनः युद्धाकडे वळे. त्यानें आपल्या मनाचें असें वर्णन केलें आहे कीं, ' माझ्या मनांत निरानिराळ्या विषयांचे निरनिराळे कप्पे आहेत. जरूर असेल तो कप्पा मी वाटेल तेव्हां उघडूं शकतों. इतर निकडीचें काम आल्यास मी नवा कप्पा उघडून पहिला लागलीच मिटून टाकतों. निजण्याची इच्छा झाली म्हणजे मी सर्वच कप्पे मिटतों. '

नेपोलियन यास मोठीं कामें चालूं असतां क्षुद्र कामांत मन घालण्याचा कंटाळा अगर आळस येत नसे. राजवाड्यांतील कारभाऱ्यानें हिशोब बरोबर दिला आहे किंवा नाहीं तें पाहण्याकरितां वेषांतर करून दुकानांत जिनसांच्या भावांची चौकशी स्वतः करणें, ऑमेलेट नांवाचें पक्कान्न आपणांस साधेल

किंवा नाहीं तें पाहण्याकरितां स्वतः चुलीजवळ बसून करावयास लागणें, एखाद्या शिपायानें बायकोस मारहाण केल्याचें ऐकतांच त्याचा बंदोबस्त करणें, पॅरिसच्या नाटकगृहांत दोन नटांमध्यें तंटा लागल्याचें रशियांत असतांना समजतांच तेथून आपल्या मध्यस्तीनें तें भांडण मिटविणें, वगैरे शेंकडों गोष्टी त्याचेबद्दल प्रसिद्ध आहेत. तो मॅरेंगो येथील युद्धापूर्वी आल्प्सवरून जात असतां वाटाड्यास त्याची सर्व हकीकत विचारीत होता. त्याच्या मनांत लग्न करावयाचें असून निर्वाहाची अडचण आहे असें कळल्यामुळें नेपोलियननें 'यास एक घर व एक शेत देण्यांत यावें' असा हुकूम तेथच्या तेथें लिहिला व ती चिठ्ठी त्याचे हातीं देऊन पॅरिस येथील प्रधानास नेऊन देण्यास सांगितलें.

युद्ध, परराष्ट्रांशीं कारस्थान, स्वराज्यांतील सर्व खात्यांचें सर्व काम यांची जबाबदारी एका मनुष्यानें आपल्या शिरावर घेतल्याचें युरोपच्या इतिहासांत दुसरें उदाहरण मिळणार नाहीं. बूरीन सांगतो कीं, " नेपोलियनच्या उद्योगाचें दीर्घत्व, बहुविधत्व व त्वरा यांची कल्पना त्याच्या सांनिध्यांत नसलेल्या मनुष्यास आणून देतां येण्याजोगी नाहीं. " टॅलेरँड सांगतो, " नेपोलियनची व्यवसायशीलता केवळ अतर्क्य होती. कर्तृत्वाबद्दल प्रसिद्ध असे युरोपांतील चार लोक घेतले तरी त्या सर्वांस मिळून उरकणार नाहीं इतक्या कामाचा तो एकटा निकाल लावी. " नेपोलियन स्वतः म्हणे कीं, " माझ्यामध्यें काम करण्याची किती ताकद आहे तिचा मलाच अंत लागलेला नाहीं. "

नेपोलियनची ही कार्यक्षमता कित्येकांस जवळ जवळ अतिमानुष वाटत आहे. रोजबरी यांनीं अशा आशयाचें मत दिलें आहे कीं, " मनुष्यप्राण्याच्या कर्तृत्वशक्तीची मजल कोठवर आहे, याबद्दलची कल्पना नेपोलियनच्या चरित्राचे परिशीलनानंतर अमर्याद वाढूं लागते. युद्धासंबंधीं व राज्यकारभारासंबंधीं सर्व गुणांचे परमोत्कर्ष एका व्यक्तींत एकवटूं शकतील, प्रचंड शारीरिक व मानसिक शक्तींचा संयोग एकाच व्यक्तींत संभवेल, अथवा एकाच व्यक्तीच्या दृष्टीस परमावधीची सूक्ष्मता व पराकाष्ठेची व्यापकता असूं शकेल, असें नेपोलियनच्या जन्मापूर्वी कोणासही वाटलें नसतें. ज्या घडामोडींस वास्तविकपणें कित्येक शतकें लागावीं त्या त्यानें पंधरा वीस वर्षांत करून टाकल्यामुळें त्यानें एक प्रकारें इतिहासाचा संकोच केला आहे. कल्पनेबाहेरचीं अघटित कृत्यें करून दाखवुन त्यानें एकप्रकारें मानवी कल्पनाशक्तीचा

विस्तार केला आहे. या महापुरुषाचें चरित्र वाचल्यावर पूर्वेतिहासांतील महापुरुष म्हणून गाजत असलेले लोक खरोखर त्या संज्ञेस पात्र आहेत किंवा काय असा संशय येऊं लागतो. नेपोलियनपेक्षां श्रेष्ठ, अगर निदान त्याच्या तोडीचे, पराक्रम करून दाखविल्याखेरीज आतां स्वाभाविकपणेंच कोणाचें नांव होण्यासारखें नसल्यामुळें त्यानें भविष्यकाळीं कीर्ति संपादन करणें अशक्य करून सोडलें आहे. नेपोलियनच्या नामोच्चाराबरोबर प्रभुत्व, ऐश्वर्य आणि अनर्थ ही त्रिविध कल्पना पूर्णपणें व ठळकपणें जशी मनापुढें उभी राहते तशी ती दुसऱ्या कोणत्याही नांवानें उत्पन्न होत नाहीं. त्यानें आपली उन्नति स्वतःच्या अतिमानुष गुणांच्या जोरावर करून घेतली, व त्याचा अधःपातही त्याच्या अति ुन गुणांमुळेंच घडून आला. " *

नेपोलियनचें वर्णन करणाऱ्या लेखकांत थ्यूसिडाइडिसची कुशाग्रबुद्धि, टॅसिटसचें अप्रतिम वक्तृत्व, व प्राचीन भाषांप्रमाणें अतिसंस्कृत भाषा यांचा संयोग होईल तरच तें यथायोग्य वठेल, असें ॲलिसनसारखे विख्यात ग्रंथकार म्हणतात. नेपोलियनच्या उलाढाली सर्व जगभर झाल्या असल्याकारणानें विषयाची व्यवस्थित मांडणी करणें दुर्घट होतें, असें प्रो. सीली ध्वनित करतात. युद्ध व राज्यकारभार या दोन्हींत निष्णात असा लेखक मिळणें संभवनीय नसल्यामुळें नेपोलियनचें यथायोग्य सांगोपांग चरित्र लिहिलें जाणें दुर्घट आहे, असें लॉर्ड रोजबरी म्हणतात.

---

* He enlarged indefinitely the limits of human conception and human probability. Till he had lived, no one could realise that there could be so stupendous a combination of civil and military genius, such comprehension of view united to such grasp of detail, such prodigious vitality of body and mind. "He contracts History" says Madame d'Houdetot "and expands imagination." "He has thrown a doubt" says Lord Dudley, "on all past glory; he has made all future renown impossible" No name represents so completely and conspicuously dominion, splendour and catastrophe. He raised himself by the use, and ruined himself by the abuse, of superhuman faculties.

—*Rosebury.*

नेपोलियनच्या कृत्यांच्या योग्यायोग्यतेसंबंधीं व त्याच्या स्वभावाच्या बरे- वाईटपणाविषयीं येथें कांहीं लिहिण्याचा उद्देश नाहीं. त्याच्या नाशास कारण झालेली त्याची महत्वाकांक्षा व इग्लंडसंबंधीं खुनशीपणाची व दीर्घद्वेषाची वृत्ति हीं प्रसिद्धच आहेत. पण त्याची विशेष ख्याति त्याच्या स्वभावांतील कोणत्या- ही दोषापेक्षां अगर गुणापेक्षां त्याच्या कर्तृत्वशक्तीबद्दलच आहे; व तीच मुख्यत्वेंकरून नजरेस आणण्याचा येथें यत्न केला आहे. नेपोलियनच्या कार्य- क्षमतेबद्दल जरी सर्वांची एकवाक्यता आहे तरी त्याचें मन सत्वगुणप्रधान होतें किंवा तमोगुणप्रधान होतें, या प्रश्नास मोठमोठ्या ग्रंथकारांनीं दिलेल्या उत्तरांत दोन ध्रुवांइतकें अंतर आहे. सद्गुणांचा समुद्र अगर दुर्गुणांचा सागर याच्या दरम्यानचें मत सहसा आढळत नाहीं. ज्या ईजिप्शियन लोकांनीं फ्रान्सची कांहीं आगळीक केली नव्हती त्यांचेवर केवळ भूमध्यसमुद्रावर स्वामित्व संपादन करण्याकरितां नेपोलियननें केलेल्या स्वारींतही एका पक्षा- च्या ग्रंथकारांस कांहीं अन्याय दिसत नाहीं; आणि त्याच्या लहानमोठ्या सर्व कृत्यांत कपट व क्रूरता याखेरीज दुसरें कांहीं विरुद्धपक्षाच्या लेखकांस दिसत नाहीं. कित्येकांनीं नेपोलियनच्या स्वभावासंबंधीं अज्ञेयवादच पत्करला आहे. परंतु नेपोलियनचीं अघटित कृत्यें पाहिलीं म्हणजे त्यांचें रहस्य काय, त्या मनुष्याची मनोरचना व स्वभाव काय असावे, त्याच्या हातून जे विलक्षण पराक्रम घडले त्यांस कारण त्याचें कांहीं विशिष्ट ध्येय अगर विशिष्ट भावना होती किंवा काय, हें जाणण्याची उत्कंठा सर्वांस लागते, असें चरित्रकार म्हणतात. रोजवरीच्या मतें नेपोलियनपुढें नेहमीं कांहीं विशिष्ट ध्येय असे किंवा नसे याबद्दल निश्चयात्मक कांहीं सांगतां येणार नाहीं. तथापि, ज्याप्रमाणें मनुष्यजातीचा किमयेचा नाद सुटत नाहीं त्याप्रमाणें नेपोलियनाच्या सामर्थ्याचें रहस्य काय तें शोधित बसण्याचा नादही सुटणें नाहीं.* त्याच्या बुद्धिवैभवास साजेशी मानसिक उन्नति अगर उंच आशय त्याचे ठिकाणीं दिसून येतो असें समजलें जात नाहीं, व त्याच्या अंतरंगाचें

* A problem he is, and a problem he will remain. Mankind will seek, but eternally in vain, to penetrate the secret of this prodigious human being. But the study, even if illusory, will always remain absorbing. There will always be alchemists and always investigators of Napoleon's character.
—*Rosebury*.

सूक्ष्म परीक्षण करणारे त्यास महात्मा अगर श्रेष्ठ विभूति गणत नाहींत. परंतु त्याच्या कर्तृत्वावरून निरनिराळे ग्रंथकार 'अद्भुत, प्रचंड मनुष्य, अतिपरिणत मनुष्य' अशा शब्दांनीं त्याचें वर्णन करतात. लॉर्ड रोजबरी म्हणतात, "नेपोलियन हा नरदेह, मनुष्यवाणी, व त्याचप्रमाणें मानवी दोष येवढ्यामुळें मनुष्यजातीशीं संबंध जडलेल्या एखाद्या श्रेष्ठतर कोटींतील प्राण्याप्रमाणें भासतो."*

नेपोलियन जेव्हां फर्स्ट कॉन्सल झाला, व इतर देशचे राजे, मुत्सद्दी, सेनापति व पंडित यांच्याशीं त्याच्या गांठीं पडूं लागल्या तेव्हां आपल्या योग्यतेचा मनुष्य कोणी नाहीं, व आपले गुण अलौकिक आहेत, अशी जाणीव त्याच्यामध्यें प्रथम उत्पन्न झाल्याचें तो सांगतो. कांहीं तरी लोकोत्तर कृत्यांनीं आपलें नांव इतिहासग्रंथांच्या पानांवर सदैव स्फुरत्प्रभेनें झळकत ठेवावें अशी त्याची वासना स्पष्ट दिसून येते. परंतु कीर्तीची नश्वरता व सर्व जगाच्या मानानें कोणत्याही एका व्यक्तीची क्षुद्रता किती आहे हें तो पूर्णपणें जाणून होता, असें त्याच्या पुढें दिलेल्या उद्गारांवरून अनुमान होतें. "आज शिकंदर बादशहासंबंधानें कितीशी सविस्तर माहिती उपलब्ध आहे? त्याचें थडगें कोठें आहे तें तरी कोण दाखवूं शकेल?" "कोणी सर्व जगाचा प्रथमपासून इतिहास लिहावयास घेतला तर त्यास माझ्या पराक्रमांच्या वर्णनास फार तर अर्धें पान देतां येईल."

नेपोलियनची स्वदेशांत लोकप्रियता इतकी होती कीं, त्याजबद्दल प्रकट करण्यांत येई ती भक्ति केवळ चक्रवर्ती राजास योग्य अशी नसून जवळ जवळ अवतारी पुरुषास योग्य अशी असे.† इ. स. १८१२ च्या मोहिमेंत रशियामध्यें हजारों शिपाई बर्फानें मरत असल्याची बातमी पॅरिस येथें येऊं लागली त्या काळीं लोक 'बादशहाची प्रकृति कशी आहे' येवढी एकच चिंता प्रकट करीत होते. नेपोलियननें परत आल्यावर छपवाछपवींत अर्थ नाहीं असें वाटून सर्व खरी हकीकत सरकारी रीतीनें प्रसिद्ध केली. तींत शेवटीं "बादशहांची

---

* A supernatural visitant, something alien to ourselves, and yet linked to ourselves by the bond of humanity—not merely human shape and human utterance, but human failing and human depravity —*Rosebury.*

† The prodigious man who had rescued their provinces from civil war, and had given them back quiet, safety, prosperity and the exercise of their religion was in their eyes more than a man—he was almost a god. —*Thiers.*

९९३

प्रकृति पूर्वीपेक्षांही उत्तम आहे असें म्हटलें होतें. या एका वाक्यानें वरील सर्व हकीकतीवरून लोकांस होणारें दुःख लयास जात असे, असें चरित्रकार सांगतात. या प्रसंगापेक्षांही त्याची लोकप्रियता त्याच्या मृत्यूनंतर एकोणीस वर्षांनीं म्हणजे इ. स. १८४० सालीं जास्त स्पष्टपणें दिसून आली.

नेपोलियनची सेंट हेलेनाकडे रवानगी केल्यावर शत्रूंनीं फ्रान्सच्या गादीवर बुर्बोन राजा बसविला. परंतु शत्रूंचें लष्कर फ्रान्समधून हलून तेथील लोकांस थोडी स्वस्थता मिळाल्यावर त्यांनीं इ. स. १८३० मध्यें या बुर्बोन राजास हांकून दिलें. त्यानंतर लोकसत्ताक राज्य स्थापन न करितां, त्यांनीं आर्लीन्स घराण्यांतील लुई फिलिप यांस गादीवर बसवून मर्यादित राजसत्ताकपद्धति सुरू केली. या वेळीं जें प्रधानमंडळ होतें त्यांत, ज्यानें नेपोलियनच्या काळचा इतिहास लिहिला आहे व जो पुढें फ्रेंच रिपब्लिकचा अध्यक्ष झाला, तो थिअर्स प्रमुख होता. लोकांत नेपोलियनच्या अस्थि ब्रिटिश सरकाराकडून परत घेण्याबद्दल जोराची चळवळ सुरू झाल्यामुळें थिअर्सच्या प्रधानमंडळानें ५ मे १८४० रोजीं ब्रिटिश सरकाराकडे तशी मागणी केली. ब्रिटिश सरकारनें ती तावडतोब मान्य केली व म्हटलें कीं, 'नेपोलियन बादशहास आतां जेथें पुरण्यांत येईल तेथेंच इंग्लंड व फ्रान्स यांचे मधील बऱ्याच दिवसांच्या वैरासही मूठमाती मिळेल अशी आम्हांस आशा आहे.' फ्रेंच राजपुत्र सेंट हेले-नाकडे गेला तेव्हां ब्रिटिश तोफांच्या सलामींत नेपोलियनचें शव त्याच्या स्वाधीन करण्यांत आलें. फ्रान्समध्यें आल्यावर तें शव पॅरिस येथें पोंचेपर्यंत प्रत्येक गांवीं अपूर्व समारंभानें व तोफांच्या गर्जनेंत त्याचें स्वागत झालें. त्याचें दर्शन घेण्याच्या सार्वत्रिक उत्सुकतेमुळें तें ज्या मार्गानें नेण्यांत आलें त्याच्या दोन्ही बाजूंकडील शेंदीडशें मैलांपर्यंतचीं सर्व गांवें वस्ती हलून उजाड दिसूं लागलीं. नेपोलियन यास पुरण्याकरितां जी इमारत बांधण्यांत आली तिचे कामीं फ्रेंच सर-कारचें वैभवसर्वस्व व फ्रेंच शिल्पज्ञांचें कौशल्यसर्वस्व खर्च झालें होतें. पुरण्याच्या समारंभाचे प्रसंगीं युरोपांतील दूरदूरच्या प्रांतांतूनही सर्व ठळक लोक हजर होते. नेपोलियननें आपल्या मृत्युपत्रांत "माझें ज्या फ्रेंच लोकांवर प्रेम आहे त्यांच्यामध्यें सीननदीचे कांठीं मला पुरण्यांत यावें" अशी इच्छा प्रदर्शित केली होती. ती या रीतीनें सफळ झाली. त्याचप्रमाणें ब्रिटिश प्रधान पामर्स्टन यांची इच्छा सफळ होऊन तेव्हांपासून इंग्लंड व फ्रान्स यांमधील शत्रुत्व नष्ट झालें आहे.

---

REFBK-0000993